
# अर्थ
## तो सांगतो पुन्हा

शरद जोशी



# ‘अर्थ’ तो सांगतो पुन्हा !

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

‘अर्थ’ तो सांगतो पुन्हा । शरद जोशी

Artha to sangato punha | Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१ ००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, अंबेठाण-४१० ५०१
ता. खेड, जि. पुणे.
Email : sharadjoshi.mah@gmail.com

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
दत्ता जोशी
मो. ९४२२२५२५५०

अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ,
औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
१० नोव्हेंबर २०१०
(शेतकरी महामेळावा, शेगाव)

मूल्य रु. १५०/-

# प्रकाशकाचे मनोगत

'इंडिया' आणि 'भारत' ही मांडणी मोठ्या प्रभावीपणे शरद जोशी यांनी केली. आता ही मांडणी बरेचजण वापरत आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळातही हा भेद भारतीय सरकारने ठसठशीतपणे तसाच ठेवला. शरद जोशी यांचे सर्व लिखाण संकलीत करून ग्रंथरूपात आणत असताना 'भारता'साठी या नावाने चौऱ्याहत्तर लेख वेगळे काढले. त्या सर्व लेखांचे परत दोन भाग केले- अर्थ, उद्योग, व्यापार, कामगार या प्रश्नांवरचे लेख वेगळे केले. तर राखीव जागा वीज दरवाढ, छोटी राज्ये, सामाजिक समस्या आदी संदर्भांतल्या लेखांचे संकलन भारतासाठी या नावाने ठेवले. अर्थ, उद्योग, व्यापार या लेख संकलनासाठी 'अर्थ तो सांगतो पुन्हा' हे नाव निश्चित केले. विनोबांच्या लेखसंग्रहाला 'ज्ञान ते सांगतो पुन्हा' हे नाव मिलिंद बोकील यांनी दिले होते. त्यावरूनच मला हे नाव सुचले. 'पोशिंद्यांची लोकशाही' व 'भारतासाठी' ही दोन पुस्तके या सोबतच प्रकाशित होत आहेत.

शरद जोशी यांची एकूण १५ पुस्तके आम्ही प्रकाशित केली. पैकी चार पुस्तके यापूर्वीच प्रकाशित झालेल्या पुस्तिका, लेखसंग्रह यांवर आधारित आहेत. तर अकरा पुस्तके पूर्णतः नवीन आहेत. शरद जोशी यांनी प्रामुख्याने 'शेतकरी संघटक' या पाक्षिकातून लिखाण केले, तसेच याशिवाय दै. लोकमत, दै. देशोन्नती यांतील लिखाण या पुस्तकांमध्ये समाविष्ट आहे. 'द हिंदू बिझनेस लाईन'मध्ये त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी लेखांचे अनुवाद 'शेतकरी संघटक'मध्ये प्रकाशित झालेले होते. तेही विविध पुस्तकांमध्ये समाविष्ट केले आहेत.

अभ्यासकांसाठी हे सर्व लिखाण पुस्तकरूपात उपलब्ध करून देणे आम्हाला आवश्यक वाटत होते. जुन्या पुस्तकांमधील त्रुटी पुढील आवृत्तीच्या वेळी दुरुस्त केल्या जातील.

**श्रीकांत अनंत उमरीकर**

# लेखानुक्रम


१ केंद्रीय अंदाजपत्रक : पहिल्याच घासाला माशी ........ ७
२ हे पाप तुमचे आहे ........ १५
३ नवे औद्योगिक धोरण : सिंगापुरी मॉडेल ........ २१
४ कामगार चळवळ प्रतिगामी बनते आहे ........ ३३
५ बांडगुळांची दादागिरी ........ ३८
६ बँकांची व्यंकटी सांडो ........ ४३
७ थोडीतरी प्रामाणिकता दाखवा ........ ४८
८ उद्योजकाच्या वाटे:खाचखळगे, काटेकुटे ........ ५३
९ केंद्रीय अर्थसंकल्प :१९४७ तारा की धूमकेतू? ........ ६४
१० टांगते अंदाजपत्रक का नको? ........ ६८
११ सामना : उद्योजक आणि बांडगुळांतला ........ ७१
१२ गर्जेल तो पडेल काय? ........ ८२
१३ वाय-टू-के अंदाजपत्रक ........ ८५
१४ विजय आणि पराभवाचे अर्थकारण ........ ८९
१५ फाल्गुन-शिमगा-होळी, शिळया भाताला तीनदा फोडणी ........ ९३
१६ शेतकऱ्यांवर संपुआ अंदाजपत्रकाची कुऱ्हाड ........ ९८
१७ २००५ च्या अंदाजपत्रकामागील आडाखे आणि अंदाज ........ १०३
१८ सावकारांचे पुनरागमन ........ ११२
१९ केंद्रीय अंदाजपत्रक २००६-०७ : 'शिळया कढीला ऊत' ........ ११७
२० केंद्रीय अंदाजपत्रक उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोकळे करणारे हवे ........ १२१
२१ शेतकऱ्यांच्या असंतोषात तेल ओतणारा अर्थसंकल्प ........ १३०
२२ महागाई : सुधारण्याची एक संधी ........ १३६
२३ वित्तमंत्री आणि कर्जमाफीची 'डांबरी बाहुली' ........ १४०
२४ महागाई आणि उंटावरील वैदू ........ १४५
२५ वायदेबाजाराविरुद्ध चिदम्बरम यांचे व्यक्तिगत युद्ध ........ १४९
२६ नव्या संपुआ अर्थसंकल्पाच्या तोंडावर ........ १५३
२७ आम आदमीचे नाव घेत नोकरशाहीला खुश करणारा अर्थसंकल्प ........ १५६
२८ विलक्षण भाववाढीचे घटित ........ १६१
२९ अंदाजपत्रक आणि शेतीच्या समस्या ........ १६५

# केंद्रीय अंदाजपत्रक : पहिल्याच घासाला माशी

१९ मार्च रोजी प्रा. मधू दंडवते, केंद्रीय वित्तमंत्री यांनी लोकसभेसमोर त्यांचे पहिले अंदाजपत्रक मांडले. जुन्या परंपरेप्रमाणे अंदाजपत्रक खरे म्हटले तर फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी सादर केले जाते. या वेळी १९ दिवस उशिरा अंदाजपत्रक सादर करण्यात आले. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला राष्ट्रीय मोर्चाचे सरकार सत्तेवर आले. राष्ट्रीय मोर्चाने निवडणुकीआधी अनेक घोषणा केल्या होत्या. अर्थव्यवस्थेचा एकूण तोंडवळा बदलण्याचा आपला इरादा असल्याचे वेळोवेळी जाहीर केले होते. शासनाच्या पहिल्या अंदाजपत्रकात या सगळ्या नव्या धोरणांचा समावेश करायचा तर त्याला काही जास्त वेळ लागणार हे उघडच होते. राजीव गांधींच्या शासनाखाली अंदाजपत्रक तयार करण्याची जी काही कामे पुरी झाली होती तीसुद्धा बाजूला ठेवून पुन्हा एकदा नव्याने अंदाजपत्रकाची आखणी करायची तर त्याला वेळ हा लागणारच. या कारणाने यंदाचे अंदाजपत्रक उशिरा सादर केले जाईल असे जेव्हा जाहीर करण्यात आले तेव्हा कुणालाच फारसे आश्चर्य वाटले नाही; याउलट अंदाजपत्रकात राष्ट्रीय मोर्चाच्या शासनाचे धोरण स्पष्टपणे दिसून येईल अशी अपेक्षा निर्माण झाली.

अर्थमंत्र्यांसमोरही इतिहासाने एक मोठी संधी उभी करून दिली. जनता पक्षाच्या राजवटीचा अडिचेक वर्षांचा लहानसा कालखंड सोडला तर सगळा वेळ एकाच पक्षाची सत्ता दिल्लीत चालत आली आहे. काँग्रेस पक्षाच्या ४० वर्षांच्या कालावधीत आर्थिक धोरणात काही बदल झालेच नाहीत असे नाही. बदल झाले; पण शासनाच्या एकूण आर्थिक धोरणांवर जवाहरलाल नेहरूंच्या तत्त्वज्ञानाचा एक ठसा कायम राहिला होता. नेहरूंच्या विचाराचा मूळ गाभा काय ? विकास म्हणजे कारखानदारी, विकास म्हणजे नवीन तंत्रज्ञान, त्यासाठी

जड उद्योगधंद्यांचा पाया घातला पाहिजे. देशाच्या संरक्षणासाठीसुद्धा जड उद्योगधंद्यांच्या पायाची गरज आहे. उद्योगधंद्यांचा विकास तातडीने व्हायचा असेल तर त्यासाठी बाहेरून तंत्रज्ञान, यंत्रसामग्री मिळवली पाहिजे. यासाठी लागणारी साधनसंपत्ती ही देशातील बहुसंख्य लोकांच्या व्यवसायातून म्हणजे शेतीतूनच काढली पाहिजे. शेतीला दारिद्र्याचे भांडार करून शहरात पाश्चिमात्य तंत्रज्ञानाची व कारखानदारीची बेटे उभी करण्याचे हे पंडित नेहरूंचे धोरण देशात अव्याहतपणे ४० वर्षे चालले. थोडक्यात 'इंडिया आणि भारत' अशी विभागणी जोपासण्याचे हे धोरण.

याउलट विकास म्हणजे कारखानदारी नाही. विकास म्हणजे सर्वसामान्य माणसांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याची प्रक्रिया आहे. आजपर्यंत झालेला विकास आकडेवारीने मोठा दिपवून टाकणारा दिसत असेल, पण सर्वसामान्य माणूस त्यापासून वंचित राहिला. सामान्य माणसाला विकासाच्या प्रक्रियेत मध्यवर्ती स्थान देण्याचे धोरण विश्वनाथ प्रतापसिंग यांनी अनेक जाहीर भाषणांत सुचवले होते. राष्ट्रीय मोर्चाच्या शासनाकडून लोकांची अशी अपेक्षाही होती. या नवीन धोरणाला मूर्त स्वरूप देण्याची संधी अंदाजपत्रकाच्या निमित्ताने प्रा. मधू दंडवते यांच्याकडे चालून आली होती. असे ऐतिहासिक अंदाजपत्रक तयार करण्यास कितीही जास्त वेळ लागला असता तर त्याबद्दल कुणी तक्रार केली नसती. प्रा. दंडवत्यांनी वेळ मागून घेतला आणि २८ फेब्रुवारीच्या ऐवजी १९ दिवस उशिरा म्हणजे १९ मार्च रोजी नवे अंदाजपत्रक सादर केले. ४० वर्षांनंतर राजकीय सत्तांतर घडले, त्यातून आर्थिक धोरणाचा पाया बदलेल ही आशा. या आशेला धक्का बसला. काँग्रेसी अंदाजपत्रकांतून राष्ट्रीय मोर्चाचे अंदाजपत्रक तयार व्हायला फक्त १९ दिवस पुरले, याचा अर्थ या दोन्ही अंदाजपत्रकांत मूलभूत फरक नाही; फरक असला, तर तो थोडाफार तपशिलाचा आहे, फरक असला तर तो टक्केवारीचा आहे, विचारपद्धतीचा नाही. असे सर्वसाधारण मत झाले आहे.

निवडणुकीच्या काळातील राष्ट्रीय मोर्चाच्या नेत्यांच्या घोषणा, चौधरी देवीलाल यांची उपपंतप्रधानपदी नेमणूक, शेतीमालाचे भाव आणि कर्जमुक्ती यांसंबंधी सत्ता हाती आल्यानंतर स्वतः पंतप्रधानांनी केलेले निवेदन; यांमुळे शेतीवर अवलंबून असलेल्या सर्वच समाजात फार मोठ्या अपेक्षा तयार झाल्या होत्या. याउलट नवीन शासनाच्या धोरणाचा तोंडवळा ग्रामीण विकासाचा असेल, शहरातील लोकांचे फाजील लाड तरी थांबतील असे वाटत होते. या अंदाजपत्रकात शहरी कारखानदार व नोकरदार यांना थोडातरी चाप बसेल अशी अपेक्षा शहरांत होती

आणि तो सहन करण्याची मानसिक तयारी अंदाजपत्रकाच्या दिवसापर्यंत बहुतेक कारखानदार, नोकरदारांची झाली होती.

अंदाजपत्रकाच्या दिवसाच्या सकाळपासून, त्यामुळे बाजारपेठेत काहीसे दडपणाचेच वातावरण होते. ग्रामीण जनतेच्या आधारावर निवडून आलेल्या राष्ट्रीय मोर्चाच्या पहिल्या अंदाजपत्रकात शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांच्याकरिता काही ठोस कार्यक्रम असणार आणि त्याचा भार या वेळी 'इंडिया'वर पडणार हे अपरिहार्य आहे असे सर्वांना वाटत होते.

१९ मार्च १९९० रोजी संध्याकाळी पाच वाजता अर्थमंत्री प्रा. मधू दंडवते यांनी अंदाजपत्रकी भाषण वाचायला सुरुवात केली आणि त्यानंतर काही मिनिटांतच ही धास्ती संपून गेली. नव्या अंदाजपत्रकात नवे काहीच नाही, हेही अंदाजपत्रक आपलेच आहे याची जाणीव मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, दिल्ली येथील शेअर बाजाराच्या व्यवहारात दिसून आले. मुंबईच्या शेअर बाजाराचे अध्यक्ष श्री. मल्ल्या म्हणाले, "शेतकऱ्यांची कर्जमुक्ती शासन करते की काय अशी चिंता पडली होती; पण अर्थमंत्र्यांनी कर्जमुक्ती आटोक्यात ठेवली, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. पगारदारांना आयकरातून सवलत मिळाली याचा आनंद झाला." सरकारचे उत्पन्न वाढविण्याकरिता कोणतीही नवी प्रतिभाशाली कल्पना अंदाजपत्रकात दिसली नाही. पेट्राल, सिगारेट यांसारख्या काही महागड्या चैनीच्या वस्तू यांच्यावर कर बसवले असूनही, त्याची फारशी चिंता किंवा पर्वा 'इंडिया'त दिसली नाही, पेट्रोल महागले म्हणून त्याचे ओझे गाडीमालकावर पडत नाही, ते ओझे शेवटी तो वेगवेगळ्या मार्गांनी दुसऱ्यांवर ढकलून देतो. रेफ्रिजरेटर महाग झाले, तर त्याचा काच रेफ्रिजरेटर वापरणाऱ्या वर्गाला जाणवत नाही. कारखानदार, व्यापारी वाढत्या कराचा बोजा सहजच ग्राहकांवर आणि शेवटी शेतकऱ्यावर टाकू शकतात. चैनीच्या वस्तूंवर कर लावून, आपण मोठी समाजवादी झेप घेतली अशी बढाई अर्थमंत्र्यांनी कितीही आवेशाने मारली, तरी त्याची कसलीही धास्ती भांडवलदारांना वाटलेली दिसली नाही. अंदाजपत्रकाचे भाषण संपले आणि शहरांत सगळीकडे आनंदीआनंद झाला आणि त्याबरोबरच करात आणखी सूट मिळायला पाहिजे होती, अशी हाकाटीही सुरू झाली. अंदाजपत्रकापूर्वीचे धास्तीचे वातावरण पार संपून गेले. पक्ष बदलला, माणसे बदलली; तरी नवे सरकार आपलेच आहे, याचा पुन्हा एकदा प्रत्यय येऊन, धनिक मंडळी सुखावली. याउलट ग्रामीण भागात निराशेचे सावट पसरले. अंदाजपत्रकाच्या बातम्या ऐकायला आपले मोडके तोडके ट्रांझिस्टर्स लावून गावकरी मंडळी घोळक्याने जमून, मोठ्या

उत्कंठेने अंदाजपत्रकाच्या बातम्या ऐकत होती. बातम्या संपल्या तेव्हा त्यांना बसलेला निराशेचा धक्का एवढा मोठा होता, की कुणीही काहीही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते. प्रा. मधू दंडवते यांनी फक्त एक ऐतिहासिक परिवर्तनाची संधी गमावली होती. दंडवतेंचे अंदाजपत्रक जवळजवळ एक लाख कोटी रुपयांचे. कोटीच्या वर दश कोटी, अब्ज, दश अब्ज, खर्व, निखर्व ही परिमाणे शाळेत शिकलो होतो; पण त्यांचा उपयोग प्रत्यक्षात करावा लागेल असे वाटले नव्हते. प्रा. दंडवते यांनी एक निखर्व रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले. एकूण राष्ट्रीय उत्पन्न तीन निखर्वांच्या थोडेफार वर आहे. म्हणून देशातील एकूण सर्वच आर्थिक उलाढालींपैकी तिसरा हिस्सा केंद्रीय शासनाच्या छत्राखालीच होतो. गेली कित्येक वर्षे कोणत्याही अर्थमंत्र्यास खर्च भागेल, इतकी मिळकत उभी करता आलेली नाही. गेल्या वर्षी तर जवळजवळ बारा हजार कोटी रुपयांचा खर्च शासनाने नोटा छापूनच भागवला. एकूण खर्चापैकी ६० टक्के तर चालूच खर्च. भांडवली खर्च ८ टक्के, मग त्यातून उरलेला ३०, ६३ टक्के नियोजनावरचा धरायचा. यापैकी शेतीवर किती खर्च होतो, हा हिशेब काढण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. आपल्या अंदाजपत्रकातील ४९ टक्के भाग शेतीकरिता आणि ग्रामीण विकासाकरिता दिला आहे, असा अर्थमंत्र्यांचा दावा आहे. पूर्वीच्या काँग्रेसी अंदाजपत्रकात ही टक्केवारी किती होती ? माजी अर्थमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या अंदाजपत्रकातील ४५ टक्के भाग ग्रामीण भागासाठीच होता. काँग्रेसचे माजी मंत्री श्री. पुजारी यांच्या हिशेबाप्रमाणे तर काँग्रेस सरकारच्या अंदाजपत्रकात हा ग्रामीण विभागाचा हिस्सा ५५ टक्के होता. अंदाजपत्रकात ग्रामीण भागाचा हिस्सा किती, हा आकडेवारीचा हातचलाखीचा खेळ आहे; पण जवळपास निम्मी रक्कम ग्रामीण विभागाकरिता दिली याचा अर्थ अर्धा निखर्व रुपये गावात येणार आहेत असे नाही. यातील बहुतेक रक्कम शहरात राहणाऱ्या नोकरदारांचे पगार, भत्ते, मोटारगाड्या, कंत्राटदारांचे मुनाफे यातच जातो. बाळाच्या हातात आरसा देऊन, त्याला हाती चंद्र दिला असे भासवावे असाच काहीसा हा प्रकार आहे.

... पण गावातील ग्यानबाचे लक्ष असलेल्या योजनांकरिता काय रक्कम ठेवण्यात येते, याकडे मुळात नव्हतेच, त्याचे सगळे चित्त लागले होते- दोन प्रश्नांवर. शेतीमालाचा भाव आणि कर्जमुक्ती. अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांवर निर्दय घाव घातला, तो कर्जमुक्तीच्या बाबतीत.

राष्ट्रीय मोर्चाच्या जाहीरनाम्यात कर्जमुक्तीसंबंधी जी घोषणा आहे, त्याचा नेमका अर्थ लावणे कठीण आहे. १० हजार रुपयांची कर्जे माफ व्हायची की १०

हजार रुपयांपर्यंतची कर्जे माफ व्हायची? राष्ट्रीय मोर्चाचे आश्वासन काय होते हे फारसे स्पष्ट नाही; पण निवडणुकीच्या काळात व निवडणुकीनंतर राष्ट्रीय मोर्चाच्या अनेक नेत्यांनी वेगवेगळी वक्तव्ये केली. त्यात कर्जमुक्तीचा एकूण 'बोझा' १४ हजार कोटी रुपयांचा असेल असे स्पष्ट म्हटले होते. २८ जानेवारी १९९० रोजी नागपूर येथील भाषणात पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी निःसंदिग्धपणे आश्वासन दिले होते– "कर्जमुक्तीचा खर्च आता १४ हजार कोटींचा येवो की १६ हजार कोटींचा येवो, आम्ही दिलेला शब्दही किती कोटी मोलाचा आहे, 'तोलून' पाहा."

ज्या अर्थी १४ हजार कोटी रुपयांची भाषा बोलली गेली, त्या अर्थी मूळ कल्पना १० हजार रुपयापर्यंत सर्वच शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याची कल्पना उघड आहे. निवडणूक–जाहीरनाम्यात कर्जमुक्तीचे जे आश्वासन होते, ते मर्यादित होते हे खरे; पण सगळ्या छोट्या आणि सीमान्त शेतकऱ्यांची कर्जे १० हजारांपर्यंत संपवली, तरी त्याची रक्कम १४ हजार कोटी होत नाही, हे उघड आहे. म्हणजे पंतप्रधानांनी १४ हजार कोटी रुपयांचा आकडा वापरला त्या अर्थी, लहानमोठ्या सर्व शेतकऱ्यांना १० हजारांपर्यंत कर्जातून सोडवण्याची कल्पना २८ जानेवारीपर्यंत तरी त्यांच्या मनात होती.

अंदाजपत्रकात जी कर्जमुक्तीची कल्पना आली, ती तुलनेने अगदीच तुटपुंजी. कर्जमुक्ती लहान आणि सीमान्त शेतकऱ्यांपर्यंतच मर्यादित ठेवण्याचा 'समाजवादी' आग्रह शासनाने सोडून दिला हे खरे; पण त्याचा वचपा मधू दंडवत्यांनी दुसरीकडे काढला. १० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती करण्याऐवजी १० हजार रुपयापर्यंतची कर्जे असा फरक करून एक नवा श्लेष उपस्थित केला.

शेतकरी वेगवेगळ्या कारणांकरिता वेगवेगळी कर्जे घेतो. कोणत्या एका कर्जाची रक्कम ते कर्ज ज्या कामाकरिता घेतले, यावर अवलंबून राहील. एखाद्या एकरात ठिबक सिंचन पद्धतीने सिंचन करण्यासाठी १० एकर शेतीचा मालक ७–८ हजार रुपये कर्ज घेऊ शकतो. यालउट दोनअडीच एकरेंचा मालक विहिरीकरिता २५–३० हजारांचे कर्ज घेतो. कर्जाची रक्कम आणि शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती यांचा तसा काहीच संबंध नाही. जमिनीचा आकार आणि शेतकऱ्याची हलाखी आणि कर्जबाजारीपणा यांचा काही अन्योन्य संबंध नाही, हे शासनाने मान्य केले; पण याउलट कर्जाची रक्कम आणि शेतकऱ्याची आर्थिक अवस्था यांचा काही संबंध आहे असे भलतेच प्रमेय उभे करून ठेवले आहे.

प्रत्यक्ष व्यवहारात १० हजार रुपयांची मर्यादा कशी राबवली जाईल? कुणी

११ हजार रुपयांचे कर्ज घेतले असेल तर त्याला माफीचा काहीच फायदा मिळणार नाही. त्यामुळे गावात मोठा असंतोष तयार होईल; पण समजा, एखाद्या शेतकऱ्याने दोनतीन कर्जे घेतली आहेत. एक ८ हजार रुपयांचे, एक ९ हजार रुपयांचे आणि तिसरे ११ हजार रुपयांचे. १० हजार रुपयांखालील दोन्ही कर्जांना कर्जमुक्ती लागू होणार की नाही होणार ?

मूळ कर्जाची रक्कम १० हजारापेक्षा जास्त असली म्हणजे कर्जमुक्ती लागू होणार नाही; पण मूळ रकमेवरच;ा साचलेल्या व्याजातून शेतकऱ्याची सुटका होणार की नाही?

कर्जमुक्ती थकबाकीपुरतीच मर्यादित ठेवून एक नवाच गोंधळ उपस्थित केला आहे. विविध सेवा सहकारी सोसायटीच्या कर्जखात्यावर बहुधा थकबाकी अशी नसतेच. कर्जे जुन्याची नवी करून, पुढील वर्षीच्या खात्यावर घेतली जातात. शेतकऱ्याने प्रत्यक्षात रकमेची फेड केलेली नाही; पण कागदोपत्री थकबाकी नसल्याचे दाखवण्यात आले आहे. यामुळे शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभापासून वंचित होईल काय? शेतकऱ्याने सोसायटीत जायचेच बंद केले म्हणजे त्याला थकबाकीदार समजतात; मग कर्जमुक्तीची योजना काय फक्त अशा शेतकऱ्यांना लागू होईल ?

राष्ट्रीयीकृत बँकांची कर्जाची खाती ठेवण्याची एक वेगळी पद्धत आहे. भू-विकास बँक व जिल्हा सहकारी बँकही अशीच पद्धत वापरतात. शेतकऱ्याने परत केलेली रक्कम प्रथम व्याजापोटी दाखल करण्यात येते. व्याजाची रक्कम पुरी चुकवली असेल; पण मुद्दलात काहीच परतफेड केली नसेल, तर कर्जदार थकबाकीत आहे किंवा नाही ? व्याजाची रक्कम अर्धवटच भरली असेल तर ? मुद्दलाची रक्कम हप्त्यापेक्षा कमी का होईना, थोडीफार भरली असेल तर ? मधू दंडवत्यांच्या योजनेमध्ये हे असे अनेक प्रश्न आहेत आणि या प्रत्येक प्रश्नातून मोठे वादविवाद तयार होणार आहेत.

कर्जमुक्तीची जबाबदारी घेण्यात अर्थमंत्र्यांनी अंगचोरपणा केला आहे. राष्ट्रीयीकृत बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांनी दिलेल्या कर्जाबाबत फक्त केंद्र शासनाने कर्जमुक्तीची जबाबदारी घेतली आहे; पण या संस्थांनी शेतकऱ्यांना दिलेली कर्जे एकूण ग्रामीण कर्जाच्या तिसरा हिस्सासुद्धा नाहीत. शेतकऱ्यांची कर्जे प्रामुख्याने सहकारी संस्थांची कर्जे आहेत. सहकारी संस्थांच्या कर्जापासून मुक्ती देण्याची सर्व जबाबदारी राज्य शासनावर टाकून, अर्थमंत्री मोकळे झाले आहेत; पण या हातचलाखीने गोंधळात गोंधळ वाढणार आहे. राज्यांत शासने काही सगळी

राष्ट्रीय मोर्चाची किंवा मित्रपक्षांची नाहीत. इंदिरा काँग्रेसचीही शासने आहेत. ही शासने काही कर्जमुक्तीच्या आश्वासनावर निवडून आलेली नाहीत. मधू दंडवत्यांनी त्यांच्यावर जबाबदारी टाकली, ती त्यांनी स्वीकारलीच पाहिजे असे त्यांच्यावर कायदेशीर बंधनही नाही आणि नैतिक जबाबदारीही नाही. प्रत्येक राज्य जर आपापल्या पद्धतीने कर्जमुक्तीच्या योजनेचा अर्थ लावू लागले किंवा अंमलबजावणी करू लागले, तर देशभर कर्जमुक्तीची अंमलबजावणी वेगवेगळ्या पद्धतींनी होईल आणि त्यात एकसूत्रता काहीच राहणार नाही.

कर्जमुक्तीची जबाबदारी केंद्र शासन व राज्यशासन यांमध्ये विभागल्यामुळे व्यावहारिक अंमलबजावणीत एक मोठी अडचण येणार आहे. कोणाही एक खातेदाराच्या कर्जासंबंधी निर्णय करताना त्याची सगळीच कर्जे लक्षात घ्यावी लागतील. राष्ट्रीयीकृत बँकांतून घेतलेली कर्जे तशीच सहकारी सदस्यांकडून घेतलेली कर्जे एका कागदावर आणून, त्यासंबंधी निर्णय घ्यावा लागेल; पण अंमलबजावणीची विभागणी झाल्यामुळे सगळी कर्जे एका कागदावर येणेच कठीण आहे. सहकारी कर्जाची माहिती मिळाल्याखेरीज राष्ट्रीयीकृत बँकांसंबंधी निर्णय घेता येत नाही. याउलट राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्जाची माहिती मिळाल्याखेरीज सहकारी संस्थांच्या कर्जासंबंधी निर्णय घेता येत नाही. या तिरपागड्यात आणि गुरफट्यात कर्जमुक्तीची सर्वच योजना अडकून पडणार आहे.

अर्थमंत्र्यांनी आणखी एक नवे 'खेकटे' उभे केले आहे. शेतकऱ्यांमध्ये त्यांनी कर्जबुडवे (willful defaulters) असा एक वर्ग असल्याची कल्पना उभी केली आहे. शेतीमालाला रास्त भाव मिळाला नाही, हे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचे खरे कारण आहे, हे वारंवार अर्थमंत्र्यांनी मांडले आहे; तर स्वतः पंतप्रधानांनी जाहीररीत्या सांगितले आहे. याचा अर्थ बुडवा शेतकरी अशी काही जमातच असू शकत नाही. शेतीकरिता घेतलेली कर्जे शेतीच्या उत्पन्नातून फेडता यावी, हे तत्त्व एकदा मान्य झाले, की कर्जबुडवा शेतकरी ही कल्पनाच हास्यास्पद होते. कोण्या शेतकऱ्याचा मुलगा डॉक्टर आहे किंवा त्याची बिगर शेतकी मिळकत आहे म्हणून त्याने अशी मिळकत शेतीचं कर्ज फेडण्याकरिता वापरली पाहिजे ही अपेक्षाच चूक आहे.

आणि समजा कुणी शेतकरी कर्जबुडवा असला, तर त्याच्या या अनैतिक वर्तनाला आळा घालण्याची जबाबदारी कुणाकडे? अर्थमंत्र्यांनी ही जबाबदारी बँक अधिकाऱ्यांकडे सोपविली आहे. ज्या बँक अधिकाऱ्यांनी कर्जाच्या प्रत्येक प्रकरणी क्षणोक्षणी शेतकऱ्यांकडून पैसे उकळले, त्यांच्याकडे ही जबाबदारी

सोपवणे म्हणजे मोठा विनोदच आहे. या सर्वांचा परिणाम एवढाच होणार आहे, की कर्जमुक्तीसाठी अर्थमंत्र्यांनी केलेली एक हजार कोटींची तुटपंजी तरतूद अर्धी अधिक बँक अधिकारीच खाऊन जाणार आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. कर्जमुक्तीची योजना तयार करताना यांतील अडचणी दूर करता येतील. शासनाने ठेवलेल्या समितीला या दृष्टीने डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागेल; पण कर्जमुक्तीपेक्षाही महत्त्वाचा प्रश्न शेतीमालाच्या भावाचा आहे. भविष्यकाळात शेतीमालाला रास्त भाव मिळण्याची शाश्वती मिळाली, तर कर्जमुक्तीचे फारसे महत्त्व नाही, ही भूमिका शेतकरी संघटनेने सातत्याने मांडली आहे. शेतीमालास रास्त भाव मिळावा, यासंबंधीही शासनाने नेमलेल्या समितीस मोठी कामगिरी करून दाखवावी लागणार आहे. अंदाजपत्रक तयार करण्यास १९ दिवस जास्त लागले. या १९ दिवसांत नोकरशहांनी शेतकऱ्यांवर मात केली आहे. नोकरशहांचा हा डाव उलटवायचा असेल, तर त्यासाठी गावोगावी जबरदस्त संघर्ष करण्याची तयारी शेतकऱ्यांनी केली पाहिजे आणि शासनावर प्रभाव पाडण्यासाठी ज्या ज्या शक्यता उपलब्ध आहेत, त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. मधू दंडवत्यांच्या पहिल्याच अंदाजपत्रकाच्या घासात माशी लागली. बाकीच्या जेवणाच्या ताटाचे काय करायचे, हे संघर्षानंतर ठरवता येईल.

◆◆

# हे पाप तुमचे आहे

सहाच महिन्यांपूर्वी भारताला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने थोडेथोडके नाही ३२७५ कोटी रुपयांचे कर्ज दिले. त्या वेळी भारताकडे परदेशी चलनाचा साठा एका पंधरवड्याच्या आयातीइतकासुद्धा राहिला नव्हता. या कर्जाने काही सुधारणा झाली असे दिसत नाही. कारण जून ९१ च्या सुरवातीसच परकीय देणी फेडण्याकरिता सरकारच्या ताब्यातील २० टन सोने सरकारने विकले म्हणा किंवा गहाण ठेवले. परकीय कर्जाची परिस्थिती इतकी बिघडली आहे आाणि झपाट्याने खालावत आहे, की आता कोणत्याही शासनाची पहिली चिंता या सगळ्या कर्जाचे व्याज कसे फेडायचे, म्हणजे व्याज फेडण्याकरिता नवीन कर्ज कुठून आणि कसे आणायचे, ही झाली आहे.

नरसिंह राव शासनासमोरील पहिली समस्या कर्जासंबंधीच आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून १० ते १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिवाळीपर्यंत हाती पाडून घेण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे.

कोणताही सावकार आपले पैसे अगदीच बुडीत खात्यात जात नाहीत ना, याची काळजी घेणारच. स्वातंत्र्य मिळाल्यापासून ४० वर्षांत जो देश सतत कर्जाच्या खाईत बुडतच राहिला, त्याला पुन्हा पुन्हा हजारो कोटी रुपयांची कर्जे देण्याआधी निदान दिलेली कर्जे उधळमाधळीत जाणार नाहीत, याची काहीतरी व्यवस्था आंतर राष्ट्रीय नाणेनिधीस करणे भाग आहे. एक वदंता अशी आहे, की डॉ. मनमोहन सिंग यांना अर्थमंत्री करण्यात यावे, अशी अटच नाणेनिधीने घातली होती. त्यामुळे डॉ. मनमोहन सिंग काँग्रेस पक्षाचे नाहीत, चंद्रशेखर पंतप्रधान असताना पंतप्रधानांचे खास आर्थिक सल्लागार म्हणून ते काम बघत होते, त्याही वेळेस त्यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा होता, पक्ष बदलला, सरकार बदलले, निवडणुकीला उभेही न राहिलेले डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले, ही तशी सूचक घटना आहे.

कर्ज ही काही मोठी चिंतेची बाब नसते. टाटा, बिर्ला, किर्लोस्कर या कंपन्यांना प्रचंड कर्जे आहेत. किंबहुना त्यांची कर्जे हेच त्यांचे वैभव आहे. त्यांना कर्जे देण्यासाठी लोकांच्या रांगा लागतात. भागभांडवल, कर्जरोखे, ठेवी या स्वरूपात दरवर्षी प्रचंड रकमा या कंपन्या गोळा करत असतात. कर्ज फेडता न येणे, ही चिंतेची बाब आहे, कर्ज असणे ही नाही. ही गोष्ट शेतकऱ्यास सहज समजेल आणि पटेल. सोसायटीकडून कर्ज घेण्यात काय वाईट आहे? आलेल्या पिकांतून जर सर्व कर्ज व्याजासकट फेडून टाकता येत असेल, तर कर्ज ही मोठी सोय आहे. भू-विकास बँकेकडून कर्ज घेतले. जमिनीचे काम केले, विहिरीचे काम केले. त्या कामामुळे उत्पन्न वाढले आणि त्या उत्पन्नातून बँकेचे हप्ते ठरलेल्या मुदतीत व्याजासकट फेडता आले, तर कर्जाची चिंता करायचे काय कारण ?

जे शेतकऱ्यांना समजते, ते राष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा खांद्यावर पडलेल्या नेत्यांना समजते आहे असे वाटत नाही. नाणेनिधीकडून नवीन कर्ज घ्यावे किंवा नाही याच विषयावर काहीसा वितंडवाद चालू आहे; पण त्या वादातही गंभीरता नाही. कर्ज घेतल्याशिवाय आज पर्याय नाही, हे सर्वांना माहीत आहे. कर्जात बुडालेला शेतकरी उद्या दरवाजाशी भांडीकुंडी घेऊन जाण्याकरिता जीपगाडी येणार आहे, हे कळले तर कोठूनही अगदी पठाणी व्याजानेसुद्धा रक्कम जमा करू पाहतो, त्याला सोसायटीच बऱ्यापैकी व्याजाने उचल देऊ लागली, तर सोसायटीचे आभार मानायला पाहिजे. निदान उद्याचा दिवस टळला. तसेच नाणेनिधी कर्ज देण्यास तयार आहे. भाग्याची गोष्ट आहे. उद्याची देशाची नादारी टळली म्हणजे उद्या द्यायचे व्याज आणि परतफेडीची रक्कम धनकोच्या हातात ठेवता येईल; देश अक्षरशः नादारीच्या कड्यावर उभा असताना कोणतेही कर्ज घेण्याबाबत फारशी चिकित्सा आणि घासाघीस शक्यही नाही. दुसऱ्या काही मार्गाने परकीय चलनाची परिस्थिती थोडीफार सुधारता येईल. इतर काही देशांकडून कर्जे मिळवण्याचा प्रयत्न करता येईल. परदेशस्थ भारतीयांना हिंदुस्थानात ठेवी ठेवण्याची विनंती करता येईल; पण या प्रयत्नांची फळं काही महिन्या-दोन महिन्यांत दिसू लागणार नाहीत. किंबहुना गेल्या काही काळात परदेशी सरकारांकडून मिळणारी अधिकृत कर्जे अधिकाधिक दुर्मिळ होत आहेत. त्यामुळे अधिक चढ्या व्याजाची कर्जे व्यापारी बँकांकडून आणि संस्थांकडून घेणे केंद्र सरकारला भाग पडत आहे. परदेशस्थ नागरिकांच्या ठेवीचा झराही आटतो आहे आणि शेवटी त्याचा व्याजाचा दर चढाच असणार. थोडक्यात उद्यावर येऊन ठेपलेली बदनामी टाळण्याकरिता नाणे निधीचे कर्ज घेण्याशिवाय काही गत्यंतर नाही.

इंदिरा गांधींच्या काळात नाणेनिधीकडून कर्ज घेतले, तेव्हा नाणेनिधीने घातलेल्या अटींबद्दल मोठी चर्चा झाली होती. नाणेनिधी, जागतिक बँक आणि बहुराष्ट्रीय कंपन्या यांचे नाव काढले, तरी अनेकांच्या, विशेषत: डाव्या पुढाऱ्यांच्या डोक्यात रक्त चढते. नाणेनिधीने घातलेल्या अटी देशाच्या हिताच्या विरोधात आहेत. सार्वभौमत्वाला बाधा आणणाऱ्या आहेत आणि अमेरिका आदी श्रीमंत राष्ट्रांच्या भल्याकरिता आहेत, अशी त्या वेळच्या रशियन नेतृत्वाखालील समाजवादी आघाडीची भूमिका होती. आज खुद्द रशियाच नाणे निधीचा सदस्य होता यावे यासाठी धडपड करत आहे. म्हणजे समाजवादी आघाडीच्या भूमिकेत १० वर्षांपूर्वी काय तथ्य असेल नसेल, त्याचा पुरा बोजवारा उडाला आहे.

... पण भारतीय कम्युनिस्ट प्रवृत्तीने वेदोपनिषद् व्युत्पन्न महामहोपाध्यायांसारखेच आहेत. जुने काही विसरायचे नाही आणि नवीन काही शिकायचे नाही असे त्यांचे व्रत आहे. 'आत्मा अमर आहे,' 'पिंडी तेच ब्रह्मांडी,' 'जग हे माया आहे,'.. इ.इ. तोंडात बसलेली वाक्ये ते बोलत राहतात. अगदी ज्योती बसूंसारखा एरवी सुज्ञ आणि जाणता नेतासुद्धा नाणेनिधीसंबंधी ८१ सालचीच टीका पुन्हा करताना पाहिले म्हणजे हसावे की कीव करावी, हे समजत नाही.

नोणनिधीच्या या सूचना किंवा अटी असतात तरी काय? देशाची अर्थव्यवस्था सुधारावी आणि कर्जफेड होऊ शकावी, या दृष्टीने नाणेनिधी काही सूचना करते. परदेशी कर्जे फेडायची म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारात आयात करतो, त्यापेक्षा जास्त निर्यात करता आली पाहिजे. जर दरवर्षी परकीय व्यापारात तूट येणार असेल, तर कितीही वर्षे नुसती कर्जे घेत राहिल्याने हा प्रश्न सुटणार नाही आणि काही काळानंतर अशी बुडीत कर्जे कुणी देणारच नाही. परिस्थिती सुधारण्याकरिता नाणेनिधीच्या काही सूचना असतात.

उदाहरणार्थ, रुपयाचे मूल्य वास्तववादी असावे. निर्यात कमी होत असेल, तर रुपयाचे मूल्य कमी करावे. म्हणजे भारतीय मालाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कमी होतील, त्यांचा खप वाढेल. त्याबरोबरच, परकीय माल देशात महाग झाल्यामुळे अनावश्यक आयातीला आळा बसेल.

नाणेनिधीची दूसरी सूचना– शासनाने आपला अफाट खर्च कमी करावा. काटकसर करावी आणि अंदाजपत्रकातील घाटा मर्यादित ठेवावा अशी असते. देशात तयार होणाऱ्या मालाचा उत्पादनखर्च अवाच्या सवा वाढला, तर त्याला परदेशी बाजारपेठ मिळणे संभवत नाही आणि मग व्यापारात खोट येते आणि परकीय चलनाची समस्या अधिक गंभीर होते. या अटीत तक्रार करण्यासारखे काय आहे? 'इंडिया'तील

घाटा-
धाटा १७

काहींना या अटी जाचक वाटत असतील; पण नाणेनिधीच्या या अपेक्षा शेतकरी संघटनेच्या भूमिकेशी जुळणाऱ्याआहेत. रुपयाचे मूल्य कृत्रिमरीत्या जादा ठेवल्याने शेतीमालाचा भाव पाडला जातो, हे संघटनेने सुरवातीपासून फार आग्रहाने मांडले आहे. नोकरशाहीच्या खर्चासंबंधीची चिंताही संघटनेने वारंवार व्यक्त केली आहे. थोडक्यात, नाणेनिधीकडून कर्ज घ्यायचे की नाही, हा काही वादविवादाचा विषय होऊ शकत नाही आणि देशाच्या नादारीच्या प्रश्नाचे मूळही तेथे नाही. देशापुढील आर्थिक समस्या अत्यंत गंभीर आहे, असे सर्वजण म्हणतात; पण प्रत्यक्ष चर्चेत किंवा कार्यवाहीत मात्र मूळ मुद्द्याला बगल देऊन, अगदीच किरकोळ प्रश्नांबद्दल काथ्याकूट चालू आहे.

परकीय कर्जाची परतफेड आणि परकीय चलनाचा तुटवडा ही काही एक स्वतंत्र समस्या नाही. देशातील आजारी अर्थव्यवस्थेचे ते फक्त एक लक्षण आहे. अशी अनेक लक्षणे आहेत. परकीय कर्जाची रक्कम आता १ लक्ष २५ हजार कोटींवर गेली आहे. या रकमेच्या एक चतुर्थांशापेक्षा जास्ती भाग दरवर्षीच्या परतफेडीकरिताच लागतो; पण देशाला केवळ परकीय कर्ज आहे असे नव्हे. देशातील देण्यांची रक्कम जवळजवळ याच्या तिप्पट म्हणजे २ लक्ष ७५ हजार कोटी रुपये व त्यावरील व्याजाचाच बोजा २१ हजार कोटी रुपयांचा आहे.

देशात दोन नंबरच्या म्हणजे काळ्या पैशाची एक समांतर अर्थव्यवस्था आहे. दरवर्षी काळ्या पैशात ५० हजार कोटींची भर पडते, असा एक अभ्यास आहे. महागाई भडकते आहे, बेकारी वाढते आहे. या सगळ्या प्रश्नांचा एकत्रित सखोल अभ्यास करून उपाययोजना केली, तर देश वाचण्याची काही शक्यता आहे.

'एकच प्याला' नाटकात दारुड्या तळीराम आजारी पडतो आणि त्याच्याभोवती तीन अर्धकच्चे वैद्य, वैदू, डॉक्टर जमा होतात आणि काहीही थातुरमातुर निदाने करतात, असा एक प्रवेश आहे. देशाची स्थिती आज नेमकी अशीच आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील नादारी ही देशाच्या आर्थिक रोगाचे सर्वांत प्रथम जाणवणारे लक्षण आहे. मूळ आजार त्याहून खोल आहे.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हिंदुस्थान धनको देश होता. युद्धकाळात पुरवलेल्या सामग्रीबद्दल त्याच्या पदरी मोठी रक्कम जमा होती. गुलामीतलाही भारत स्वत:च्या पायावर उभा राहत होता. स्वतंत्र भारत मात्र कर्जात बुडून चालला आहे, त्याचे कारण काय?

या सर्व समस्यांचे मूळ नेहरूप्रणीत नियोजनात आहे. कारखानदारीची वाढ करण्याकरिता या व्यवस्थेत प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात आली. कारखानदारीत

भांडवलनिर्मिती करण्याकरिता शेतीस आणि शेतकऱ्यास बुडवण्यात आले. शेतीतील बचत वापरून, परदेशी तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री यांच्या आधाराने औद्योगिक क्रांती आणण्याचा प्रयत्न झाला. कारखानदारीची एवढी घाई या नियोजनात होती, की देशातील बचतीच्या गतीपेक्षा जलद वाटचाल करण्यासाठी वेगवेगळे उपाय योजण्यात शासकीय व्यवहारात उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करणे आणि तुटीची रक्कम भरून काढण्याकरिता सरळ नोटा छापणे हा एक मार्ग. दरवर्षी जवळजवळ १० कोटी रुपये नोटा छापून उभे केले जातात.

यापलीकडे भर म्हणून परदेशांतून मोठ्या प्रमाणावर कर्जे घेण्यात आली. तंत्रज्ञान विलायती, यंत्रसामग्रीही बहुधा विलायती, ती विकत घेण्याकरिता लागणारा पैसाही विलायती आणि ही सर्व कारखानदारी चालवणारी माणसेही विलायती आचारविचाराची. देशाचे विलायतेवरील परावलंबित्व पराकोटीचे वाढले; पण ही चैनचंगळ कधी तरी थांबणारच ! कधी तरी एकदा बिल देण्याची वेळ येणारच. ही परिस्थिती १९८० च्या आसपास आलेली होती; पण त्या वेळी दोन गोष्टी भारताच्या दृष्टीने सुदैवाच्या घडल्या. भारतातील पेट्रोलच्या साठ्यांचा शोध मोठ्या प्रमाणावर लागल्यामुळे तेलाच्याआयातीचा बोजा आटोक्यात राहिला आणि परदेशांत, विशेषतः मध्य-पूर्वेत कामासाठी गेलेल्या छोट्या माणसांनी-परिचारिका, सुतार, गवंडी यांनी मोठ्या प्रमाणात रकमा हिंदुस्थानात पाठवल्यामुळे निदान परकीय चलनाची स्थिती बरी राहिली; पण दोन गोष्टी तात्पुरत्या आहेत, त्यावर विसंबून राहता येणार नाही याची जाणीव राजीव शासनाने दाखवली नाही. अमर्याद अनिर्बंध आयातीसाठी दरवाजे खुले करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले आणि मग जे अपरिहार्य होते, ते झाले. इराक, कुवेत प्रकरणामुळे पेट्रोलपुरवठ्याची स्थिती बदलली आणि भारतीय नागरिक पाठवत असलेल्या पैशाचा ओघही आटला. आजची गंभीर परिस्थिती इराक युद्धाने तयार झालेली नाही. १९८० च्या जुजबी कुबड्यांच्या आधाराने अर्थव्यवस्था चालू होती, त्या कुबड्या काढून घेतल्या, एवढेच.

परदेशांकडून घेतलेली ही प्रचंड कर्जे फेडली जाण्याची काय शक्यता आहे ? भारतात कारखानदार आहेत, उद्योजक नाहीत; संघटित क्षेत्रात नोकरशहा आहेत, सधन कामगार आहेत, कार्यक्षमता नाही. या कारखानदारीत वापरले जाणारे तंत्रज्ञान जुनेपुराणे ठरले आहे. अशा कारखानदारीत तयार झालेला माल आपण निर्यात करू शकू आणि त्यातून कर्जफेड करू शकू, अशी सुतराम शक्यता नाही. आजही भारत निर्यात करतो, ती कापड, चामडे आणि कच्चा माल यांचीच. कारखानदारी मालाच्या भारतातील किमती या इतर देशांच्या तुलनेने खूपच जास्त आहेत. त्यांची

निर्यात अनुदाने देऊनसुद्धा आजपर्यंत फारशी यशस्वी झाली नाही. शेतीमालाचे भाव परदेशांशी तुलनेने बहुतांशी कमी आहेत; पण त्या मालाच्या निर्यातीवर बंदी तरी आहे किंवा कडक नियंत्रणे तरी आहेत. ज्यांच्याकरिता अब्जावधी रुपयांची आयात केली जाते ते बडे कारखानदार परदेशांशी स्पर्धा करून निर्यात करतील आणि परकीय चलन कमावतील ही काही शक्यता नाही. बाजारपेठेतील स्पर्धेपेक्षा दिल्लीतील भवनात मोर्चेबंदी करणे त्यांच्या प्रकृतीस अधिक जमणारे आहे. आयातनिर्यातीचे परवाने किंवा कारखानदारीची अनुमती एकदा मिळाली, की मक्तेदारीच्या आधारे देशातील जनतेस लुटण्याची मुभा मिळाली असे ते मानतात. थोडक्यात, आजची नेहरूप्रणीत अर्थव्यवस्था प्रचलित आहे, तोपर्यंत परकीय कर्जाचा आणि परकीय चलनाचा प्रश्न सुटण्याची काही शक्यता नाही.

देशाची परिस्थिती गंभीर आहे. त्याकरिता कडक उपाययोजना कराव्या लागतील. सर्वांनी देश वाचवण्यासाठी कंबर कसण्याची तयारी ठेवावी असे वक्तव्य नव्या पंतप्रधानांनी आधीच केले आहे. नव्या अंदाजपत्रकात काही जाचक उपाययोजना होणार हे उघड आहे; पण हा जाच कुणाला होणार? परदेशांतील कर्जे आणि देशातील नोटा छापणे याचा फायदा कुणाला झाला? मुंबईच्या एका पुढाऱ्याने परवा विधान केले, एकट्या मुंबईत १०० कोटी वर मालमत्ता असलेले ५००० वर लोक आहेत ! अंदाजपत्रकातील दोन तृतीयांश रक्कम खाऊन, नोकरशाही माजली आहे; पण त्यांच्या विरुद्ध बोट उचलण्याची शासनाची हिंमत होणार नाही. देशहिताची हाकाटी झाली, की कष्टकऱ्यांच्या पाठीवर चाबूक उडणार हे समजून घ्यावे. शेतकऱ्यांनी या परिस्थितीत खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. देशभक्तीच्या भाषेने गडबडून जाता नये. हे संकट भारतावरील नाही. ते 'इंडिया'वादी अर्थकारणाने तयार झालेले संकट आहे. या पापाचे धनी तुम्ही आहात, ते निस्तरण्याकरिता मदत करण्यास आजही आम्ही तयार आहोत; पण नेहरूवादी नियोजन समूळ उखडून टाकण्याची तयारी असली, तरच शेतकरी आणि कष्टकरी या कामात सहभागी होतील. नेहरू व्यवस्था चालवून देशापुढील आर्थिक आणि वित्तीय समस्या सुटू शकतच नाहीत. त्या आणखीन बिघडत जातील हे स्पष्ट आहे. शासनाने सुचविलेल्या योजना नेहरू तोंडवळ्याच्या असतील, तर त्यांना खंबीरपणे विरोध करण्याकरिता शेतकरी आंदोलनाला उभे राहावे लागेल.

◆◆

# नवे औद्योगिक धोरण :सिंगापुरी मॉडेल

**मसुद्याची लगीनघाई**

आणखी एका नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा २४ जुलै ९१ रोजी लोकसभेपुढे झाली. अंदाजपत्रक सादर होण्याआधी एक तास औद्योगिक धोरणाची घोषणा झाली. नवे सरकार सत्तेवर येऊन महिना उलटतो ना उलटतो, तोच औद्योगिक धोरण तयार झालेसुद्धा ! तशी या धोरणाची घोषणा चौदा पंधरा जुलै रोजीच व्हायची होती; पण एकदोन मुद्द्यांवर डाव्या पक्षाच्या मंडळींनी ताणून धरल्यामुळे मसुदा तयार व्हायला थोडा अधिक वेळ लागला; पण तरीही सरकार स्थापन झाल्यानंतर महिनाभरात नवे उद्योगविषयक धोरण जाहीर झाले.

स्वातंत्र्यानंतर जाहीर झालेले हे काही पहिले औद्योगिक धोरण नाही. या आधी १९४८, १९५६, १९७३, १९७७, १९८० या सालांतही औद्योगिक धोरणांचे ठराव झाले. स्वातंत्र्यानंतर पाच वेळा औद्योगिक धोरण ठरले. शेतीविषयक धोरण तयार करण्याचे शेतकऱ्यांचे कनवाळू म्हणवणाऱ्या सरकारने ठरवले; पण या बाळाचा जन्म काही अजून झालेला नाही आणि होण्याची शक्यताही दिसत नाही. शेतीसंबंधी धोरणात महत्त्वाचे बदल संभवत होते; म्हणून कृषिनीती भोवऱ्यात सापडली असे म्हणावे; तर औद्योगिक धोरणाच्या या मसुद्यात उद्योगधंद्यांसंबंधी धोरणांत अगदी 'घूमजाव' केलेले आहे आणि तरीसुद्धा ते तातडीने तयार झाले. शेती आणि उद्योगधंदे यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातील तफावत या एवढ्याशा गोष्टीनेही स्पष्ट होते.

**औद्योगिक धोरणांचा इतिहास**

इतक्या पाच-सात औद्योगिक धोरणांत म्हटले तरी काय आहे ?

१९४८ च्या ठरावात औद्योगिक विकास हा उत्पादन आणि राहणीमानाचा दर्जा वाढविण्याकरिता, तसेच संपत्तीच्या समान वाटपाकरिता आवश्यक असल्याची

घोषणा झाली. १९५६ सालचा ठराव महत्त्वाचा. या ठरावात पहिल्यांदा उद्योगधंद्यांचे सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि संमिश्र क्षेत्र अशा तीन क्षेत्रांत विभागणी करण्यात आली.

१९७३ च्या ठरावात काही महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत मोठ्या उद्योजक घराण्यांना गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली. याउलट १९७७ मध्ये उद्योगधंद्यांचे विकेन्द्रीकरण आणि छोट्या उद्योगधंद्यांना प्राधान्य देणारा ठराव त्या वेळच्या जनता शासनाने आणला. १९८० मध्ये देशातील बाजारपेठेत स्पर्धेला वाव देणे, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि उद्योगधंद्यांचे आधुनिकीकरण यावर भर देण्यात आला. भारतीय उद्योजकांना आपला माल परदेशांत निर्यात करता यावा आणि उच्च तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही गुंतवणूक करता यावी, अशा तरतुदी या ठरावात होत्या.

**नव्या ठरावाची पार्श्वभूमी**

आजपर्यंतच्या औद्योगिक धोरणांमुळे गतिमान औद्योगिक विकासाचे वातावरण देशात तयार झाले; म्हणून सातव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीस व्यापक संरचना उभी राहिली होती. मूलभूत उद्योगधंदे उभे राहिले होते, देश मोठ्या प्रमाणावर अनेक मालांच्या उत्पादनात–कच्चा, मध्यम व कारखानदारी माल–स्वयंपूर्ण झाला. उद्योगधंद्यांची नवीन केंद्रस्थाने उदयास आली आणि त्याबरोबर उद्योजकांची एक नवी पिढीही उदय पावली. फार मोठ्या संख्येने इंजिनीअर, तंत्रज्ञ आणि कुशल कामगार यांचे प्रशिक्षण पार पडले.

नवीन औद्योगिक धोरणाच्या मसुद्यातील सातव्या परिच्छेदाचा अनुवाद वर दिला आहे. थोडक्यात, नव्या मसुद्याच्या लेखकांचा म्हणजे शासनाचा आग्रह असा आहे, की सातव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीपर्यंत तरी, म्हणजे १९८४ सालापर्यंत सगळे काही आबादीआबाद होते अणि देश पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या कृपेने, एक मोठी औद्योगिक क्रांती संपादन करून त्याहूनही मोठ्या औद्योगिकीकरणाची झेप घेण्यास सज्ज झाला होता.

**सातव्या पंचवार्षिक योजनेत काय घडले ?**

१९८५, १९८६ मध्ये राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली उत्पादकता वाढवणे, उत्पादनखर्च कमी करणे आणि गुणवत्ता वाढवणे यांसाठी अनेक धोरणात्मक आणि व्यावहारिक बदल करण्यात आले. देशी बाजारपेठ वाढीव स्पर्धेस खुली करून देणे आणि आपल्या उद्योगधंद्यांस परकीय स्पर्धेस तोंड देण्यास समर्थ बनवणे यावर भर राहिला. सार्वजनिक क्षेत्रावरील बंधने पुष्कळशी कमी करण्यात

आली आणि त्यांना अधिक स्वायत्तता देण्यात आली. तांत्रिक आणि व्यवस्थापकीय आधुनिकीकरणास उत्पादकता आणि स्पर्धात्मक शक्ती वाढविण्याची गुरूकिल्ली मानले गेले. परिणामतः भारतीय उद्योगधंद्यांनी सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दरवर्षी सरासरीने साडेआठ टक्क्यांची, चकित करून टाकणारी वाढ केली.

उद्योगधंद्यांच्या प्रगतीत एवढा आनंदीआनंद चालू असताना, आजचे आर्थिक संकट आले कसे आणि एका नवीन औद्योगिक धोरणाची गरज ती काय पडली ?

देशात पाच कोटींवर लोक बेरोजगार आहेत, महागाई चढत्या श्रेणीने वाढते आहे, काळा पैसा इतका मातला आहे, की सर्व अर्थव्यवस्था आता काळीच होऊ पाहते आहे. सरकारच्या एकूण उत्पन्नाचा तिसरा भाग कर्जरोख्यांवरील व्याज देण्यातच खर्ची पडतो. आयात जास्त, निर्यात कमी. बाहेरून घेतलेल्या कर्जांची रक्कम सव्वालाख कोटींच्या वर गेली. या रकमेवरचे व्याज भरण्याकरिता गेल्या वर्षभरात नाणेनिधीचे तीनदा कर्ज घ्यावे लागले. अजून मोठे कर्ज मिळवण्याची धडपड चालू आहे. देशातील सोन्याचा साठा एकापाठोपाठ एक चार वेळा विकावा लागला, हा सगळा औद्योगिक उत्कर्षाचा आणि सगळीकडे आबादीआबाद असल्याचा पुरावा आहे ? इतके दिवस देशात दैनावस्था होती त्याची कुणाला चिंता पडली नाही; पण बाहेरच्या सावकाराचे अडले, तेव्हा परिस्थितीचे थोडे भान येऊ लागले.

परदेशी सावकारांचे कर्ज फेडायचे त्यासाठी तीन दिवसांत दोनदा रुपयांचे अवमूल्यनही झाले. अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर नवे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग नाणेनिधीशी चर्चा करण्यास जाणार आहेत. अवमूल्यन, औद्योगिक धोरण, अंदाजपत्रक हे सगळे काही स्वतंत्र प्रज्ञेने तयार झालेले आहे, परदेशी सावकारांच्या सांगण्याप्रमाणे काही झालेले नाही, असे अर्थमंत्र्यांनी मोठ्या सोज्वळपणे सांगितले. 'मी भारतीय जनतेला पहिल्यांदा विश्वासात घेणार आहे, नाणेनिधीशी चर्चा त्यानंतर करणार आहे.' असे ते मोठ्या दिमाखाने म्हणाले; पण लोकांना विश्वासात घेण्याची अर्थमंत्र्यांची पद्धती काही विचित्रच आहे !

त्यांची परिस्थिती तशी नाजूकच आहे. ते काही काँग्रसी नाहीत; पण काँग्रेसच्या अमदानीत घडलेल्या सर्व महत्त्वाच्या घटनांच्या वेळी ते फार मोठमोठ्या पदांवर होते. अर्थखात्याचे सचिव, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर एवढेच नव्हे तर नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष. शासकीय सेवकांना दुष्प्राप्य अशी अनेक पदे त्यांनी भूषवली आणि आता तर लोकसभेची निवडणूक न लढवताही देशाच्या आर्थिक सर्वेसर्वाचे

स्थान त्यांना मिळाले आहे. नियोजन मंडळाचे ते उपाध्यक्ष असताना त्या वेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी नियोजन मंडळाची 'विदूषकांची टोळी' म्हणून अवहेलना केली होती. काही दिवसांपूर्वी एका पत्रकाराने डॉ. मनमोहन सिंगांना प्रश्न विचारला, 'जी धोरणे दोषास्पद म्हणून आता आपण बदलावयास निघाला आहात, त्यांच्या घडवण्यातही आपला हात होताच, हे कसे?' सिंगसाहेब म्हणाले, "शासनाने त्यावेळी माझे ऐकले नाही, याबद्दल मी माझ्या आत्मचरित्रात सविस्तरपणे लिहिणार आहे."

ज्या शासनाने त्यांचे म्हणणे ऐकले नाही, त्या शासनातून तट्कन उठून बाहेर निघण्याची हिंमत दाखवणाऱ्यांतले डॉ. मनमोहन सिंग नव्हेत, हे उघड आहे. आजही त्याच कारणाकरिता नेहरू-इंदिरा-राजीव वारसाची धोरणे उलथवताना त्यांना त्या धोरणांच्या कर्त्यांची भलावण करीतच पुढे जावे लागत आहे. अंदाजपत्रकाचे भाषण घ्या की उद्योगधोरणाचा मसुदा घ्या, मधून मधून पंडित नेहरू, इंदिरा गांधी, सुपुत्र राजीव गांधी यांच्यावर स्तुतिसुमने उधळायची आणि नंतर त्यांनी घालून दिलेली धोरणे जमीनदोस्त करायच्या कामास लागायचे अशी काहीशी शैली त्यांना अवलंबावी लागत आहे. भारत म्हणजे काही रशिया नाही! रशियात आज गोर्बाचेव्ह-समाजवाद अपुरा पडला, मार्क्सवाद एकांगी आहे आणि कामगारवर्गाखेरीज इतर वर्गांचेही समाजात महत्त्वाचे स्थान आहे, असे मूर्तिभंजनाचे काम करीत आहेत. भारतात हे शक्य नाही. आकाश कोसळून पडले, तरी नेहरू घराण्यातील श्वानावरही टीका करणे आम्ही अयोग्य समजतो! त्यात नव्या पंतप्रधानांचे बूड स्थिर नाही. '१०, जनपथ'मधील ताईसाहेबांची मर्जी फिरली, तर उद्या त्यांच्या दरवाजाबाहेर उभे राहणेही कठीण होईल अशीच स्थिती. तेव्हा जमेल ते करावे; पण तोंडात शब्द मात्र नेहरूस्तवनाचेच असावेत असे व्यावहारिक धोरण अर्थमंत्र्यांनी स्वीकारले आहे, हे उघड आहे.

शेक्सपिअरच्या ज्यूलियस सीझर या नाटकात सीझरचा खून होतो. खुन्यांच्या हाती राज्य जाते. सीझरच्या दफनाच्या वेळी त्याचा मित्र मार्क अँटनी भाषण करण्याकरिता उठतो आणि मारेकऱ्यांतील प्रमुख ब्रूटस् या नावाचा सेनापती, त्याच्या विरुद्ध उघडपणे तर बोलता येत नाही; म्हणून दर पाचदहा वाक्यांनंतर 'ब्रूटस् मोठा आदरणीय आहे,' असे वाक्य घोळवीत त्याने ब्रूटसविरुद्ध लोकांना चेतवले. डॉ. मनमोहन सिंग मार्क अँटनीची शैली जाणूनबुजून वापरत असावेत असे वाटत नाही. मार्क अँटनीची भूमिका बजावायलाही मोठे धैर्य लागते.

## औद्योगिक धोरणातील बदल

देशावरील आर्थिक अरिष्ट व्यापक आहे. त्याचे बोचणारे टोक म्हणजे परकीय कर्ज, त्यावरील व्याज आणि परदेशी व्यापारातील तूट. या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करायची म्हणजे ज्या ज्या मालांची आणि सेवांची परदेशांत मागणी आहे, त्यांना प्रेरणा देणे किंवा त्यांच्या शेपट्या पिरगाळणे. परकीय चलनाच्या मिकळतीची आमची साधने म्हणजे सुती वस्त्रे, चामडे व चामड्याच्या वस्तू, काही खनिजे एवढीच. काही अभियांत्रिकी मालाची निर्यात आम्ही करतो; पण या निर्यातीचा एकूण प्रकारच मोठा विचित्र आहे. ही निर्यात प्रामुख्याने समाजवादी देशांना होते. पाश्चिमात्य देशांतून आयात केलेल्या वस्तू वापरून, बनवलेला माल घाट्यात विकला जातो आणि अभियांत्रिकी मालाची निर्यात करतो या फुशारकीने सुखावणारा अहंकार सोडल्यास या व्यवहारात वट्ट मिळकत शून्य. वस्त्रोद्योग आणि चर्मोद्योग या क्षेत्रांत काही करण्यासारखे आहे. कच्चा माल आणि खनिजे याबद्दलही तातडीने काही करता येण्यासारखे आहे. सरकारने घाईगर्दीने धोरण जाहीर केले, ते वस्त्रोद्योग, चर्मोद्योग यांबद्दल नाही; खाणींबद्दल, शेतीबद्दल नाही; धोरण जाहीर केले ते अशा उद्योगधंद्यांबद्दल. जे उद्योगधंदे आयात करून, परकीय चलन फस्त करण्याचे काम करतात, त्यांच्याबद्दल धोरण एवढ्या लगबग जाहीर करण्यात आले. धोरणातले महत्त्वाचे बदल तसे मोजके आहेत.

लायसेंस–परमिट राज्याचा अंत झाला आहे. काही अठरा उद्योगधंदे सोडले तर कारखानदारी सुरू करण्यापूर्वी लायसेन्स–परमिट मिळवण्याकरिता मंत्रालयाच्या फेऱ्या करण्याची आता गरज नाही.

परकीय गुंतवणुकीस भारताचे दरवाजे आता सताड उघडून देण्यात आले आहेत. महत्त्वाच्या क्षेत्रांत तर ५१ टक्क्यांपेक्षा अधिक भागभांडवल परकीय असू शकेल.

परकीय तंत्रज्ञानाच्या आयातीसंबंधी सरकारचा हस्तक्षेत संपुष्टात आला आहे. तंत्रज्ञानाच्या आयातीची आवश्यकता उद्योगपतीच ठरवतील.

सार्वजनिक क्षेत्राची व्यापकता कमी करण्यात आली असून, संरक्षण इत्यादी महत्त्वाचे उद्योगधंदे सोडता खासगी उद्योजकांना दारे खुली करण्यात आली आहेत.

मोठ्या कारखानदारीवरील मक्तेदारी टाळण्याकरिता घातलेले निर्बंध बहुतांशी दूर होतील.

थोडक्यात, कारखानदारीच्या बाबतीत तरी नेहरूप्रणीत नियोजन आणि सार्वजनिक क्षेत्राचे प्राधान्य नवीन औद्योगिक धोरणाने निकालात काढले आहे.

शासनाच्या सर्व निवेदनात दोन प्रवाह आहेत. एक नेहरू घराण्यचा उदोउदो करण्याचा आणि दुसरा जुन्या धोरणांवर टीका करण्याचा. उद्योगधोरणात जे बदल करण्यात आले आहेत त्यांचा तर्कशुद्ध संबंध कोणत्याही प्रवाहाशी लागत नाही. हे बदल का केले जात आहेत हे उद्योगधोरणाच्या प्रास्ताविकावरून समजून येत नाही. शासनाने तयार केलेल्या आर्थिक सर्वेक्षणावरून स्पष्ट होत नाही आणि अर्थमंत्र्यांच्या अंदाजपत्रकीय भाषणामुळे गोंधळ अधिकच वाढतो. निवेदनातील राजकारण तर असंबद्ध आहेच पण त्यातील अर्थशास्त्रही पुढे मांडलेल्या कार्यक्रमाशी जुळताना दिसत नाही.

**अरिष्टाची सोयीस्कर कारणमीमांसा**

आजच्या आर्थिक अरिष्टाचे कारण काय? या प्रश्नाचे उत्तर देणे राजकीय दृष्ट्या सोयीस्कर नसेल पण कारणमीमांसा अस्पष्ट राहिल्याने उपायोजनेमध्ये विस्कळीतपणा आला तर ते मोठे धोक्याचे होईल. शासकीय निवेदनावरून सरकारी भूमिका अशी दिसते की नोव्हेंबर १९८० पर्यत सगळे ठाकठीक होते. गेल्या अठरा महिन्यांतच राजकीय अस्थिरता, चुकीची आर्थिक धोरणे आणि शेवटी, आखाती युद्ध यामुळे हे अरिष्ट ओढवले आहे. अर्थशास्त्रीय विश्लेषणात मात्र आर्थिक अरिष्ट गेल्या अनेक वर्षांच्या चुकीच्या नियोजनामुळे आले आणि उपाययोजना म्हणून अर्थव्यवस्था आमूलाग्र बदलली पाहिजे असाही सूर दिसतो.

जनता दलाच्या प्रवक्त्यांचा सूर सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सर्व काही ठीक होते, सातव्या पंचवार्षिक योजनेपासून म्हणजे राजीव गांधींच्या कारकीर्दीपासून घसरणीला सुरुवात झाली असा आहे. विश्वानाथ प्रतापसिंग इत्यादी मंडळी जोपर्यंत काँग्रेसमध्ये होती तोपर्यंत सगळे काही ठाकठीक होते अशी बतावणी करणे हीही एक राजकीय गरजच आहे. पण मधू दंडवत्यांना याच भूमिकेची री ओढण्याचे वास्तविक काही कारण नव्हते. पण त्यांनीही स्वामींच्या सोयीने आवाज काढला आहे.

भारतीय जनता पार्टीस स्वत:चे असे काही अर्थशास्त्र नाही. किंबहुना, काँग्रेसी अर्थशास्त्र थोडाफार फेरफार केला की भारतीय जनता पार्टीचे अर्थशास्त्र बनते. त्यामुळे फारशी विश्लेषणाची दगदग न करता अडवाणीजींनी सरकारी उपाययोजनेला सर्वसाधारण पाठिंबा जाहीर करून टाकला.

भारतीय जनता पार्टीला अर्थशास्त्र कधीच नव्हते तर डाव्या पक्षांचे अर्थशास्त्र

पार कोसळून गेले आहे. खुद्द सोव्हियत संघच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्जाच्या अपेक्षेने पाहत असताना डाव्या पक्षांची शासनावर टीका करण्यात मोठी कुचंबणा होते आहे. सोव्हियत संघच उघड उघड पाश्चिमात्य अर्थव्यवस्थेकडे जात आहे. डाव्यांनी आता कोणत्या तोंडाने नाणेनिधीवर किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांवर तोंडसुख घ्यावे?

सारांश, घराला आग लागली आहे का लावली आहे याचा विचार करण्याच्या परिस्थितीत कोणताच राजनैतिक पक्ष नाही. हे घर बांधतानाच ज्वालाग्राही पदार्थाचे बांधले होते, त्यात स्फोटक पदार्थ भरून ठेवले होते. असे धोक्याचे घर पन्नास वर्षे उभे राहिले, हेच आश्चर्य! आता आग विझवायची तर आहे, पण त्याचबरोबर साऱ्या घराची पुनर्बांधणी करणे महत्त्वाचे आहे, ही दृष्टी कोठेच नाही. आगीचे बंब बोलवा, ही धुमसती आग कशीबशी मिटवा म्हणजे पुन्हा पहिल्यासारखेच आम्ही जगू शकू, अशी औद्योगिक धोरणाची आणि अंदाजपत्रकाची धारणा आहे.

परिवर्तनाची फुसकी तुतारी

त्यामुळेच, अर्थव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या तुताऱ्या अर्थमंत्र्यांनी कितीही फुंकल्या तरी जाहीर झालेल्या धोरणात नवे असे काहीच नाही. आपण जाहीर केलेला कार्यक्रम नवीन दिशेने टाकलेले 'पहिले पाऊल' आहे, असे त्यांनी वारंवार बाजवले, तरी प्रत्यक्षात कार्यक्रमात नवीन असे काहीच नाही. आर्थिक अरिष्टामुळे जनमानस भयभीत झाले आहे. याचा फायदा घेऊन, त्यांनी संजय गांधींच्या काळापासून सुरू झालेला, राजीव गांधींनी त्यांच्या कारकिर्दीच्या पहिल्या दोन तीन वर्षांत जोमाने पुढे नेलेला आर्थिक कार्यक्रम पुढे नेण्याची तिसरी पायरी गाठली आहे. मनमोहनसिंगांचे अर्थशास्त्र हे इंदिरा गांधींच्या काळापासून सुरू झालेल्या एका नव्या वाटचालीची तिसरी पायरी आहे.

इंदिरा गांधींच्या अखेरच्या वर्षांत उद्योगधंद्यांवरील बंधने ढिली व्हायला सुरवात झालीच होती. मोटारगाड्या आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या आयातीवरील बंधने उठवायला सुरवात झाली होती. उद्योजकांची एक नवीन पिढी तंत्रज्ञान आणि सामग्रीच्या आयातीवरील बंधने दूर व्हावीत; यासाठी हरप्रकारे प्रयत्न करत होती. अंबानी, वाडिया ही या उद्योजकांतील फक्त जास्त प्रसिद्ध नावे. अनिवासी भारतीय भारतातील अर्थव्यवस्थेवर पकड मिळवण्यासाठी नेहरूप्रणीत समाजवादी चौकट ढिली करू पाहतच होते. स्वराज पॉल प्रकरण हे अशा प्रकरणांतील सर्वांत ठळक.

उद्योगधंद्यांवरील आयातीवरील आणि तंत्रज्ञानाच्या स्वीकारावरील बंधने

तोडण्याचा मोठा प्रयत्न राजीव गांधींनी केला. त्यांच्या कारकिर्दीची पहिली तीन वर्षे तरी याच दिशेने पावले टाकली. कारकिर्दीच्या शेवटी मात्र राजीव गांधी पुन्हा जुन्या पठडीकडे वळू लागले होते. त्यांना कदाचित भारतीय अर्थव्यवस्थेच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या मर्यादा लक्षात आल्या असतील किंवा निवडणुकीनंतरच्या पहिल्या काळात 'इंडिया'ला खुश करायचे आणि निवडणुका तोंडावर आल्या म्हणजे लोकाभिमुखता दाखवण्यासाठी 'भारता'कडे वळायचे असे कदाचित् त्यांचे राजकारण असावे. मला व्यक्तिशः असे वाटते की अंबाली-पॉल-अर्थशास्त्राविषयी राजीव गांधींचा भ्रमनिरास झाला होता. याला आधार, पुरावा काही नाही. त्यांच्याशी शेती प्रश्नाविषयी आणि आर्थिक विकासाविषयी चर्चा करतेवेळी माझ्या मनांत तयार झालेली ही एक प्रतिमा आहे.

राजीव गांधी गेले, आर्थिक अरिष्ट आले आणि नवे धोरण, नवे धोरण म्हणून जाहीर करत राजीव गांधीनी बासनात गुंडाळून ठेवलेले धोरण पुन्हा एकदा बाहेर काढण्यात आले आहे.

**नवीन काहीच नाही**

नवीन औद्योगिक धोरणातील कार्यक्रमात नवे असे काय आहे ? उदाहरणार्थ, कारखाने उघडणे किंवा वाढवणे यांवरील परवान्यांची बंधने. १९६६ मध्ये माझा एक वर्गमित्र दिल्लीला उद्योगमंत्रालयात काम करत होता. सहज भेटला म्हणून मी त्याला विचारले, 'उद्योग मंत्रालयात तू करतोस तरी काय?' तो म्हणाला, 'रेफ्रिजरेटरच्या उत्पादनाकरिता परवाने देणे हे माझे काम; पण खरे म्हटले तर एकच गोष्ट मी करतो; घरगुती आकाराच्या रेफ्रिजरेटरचा परवाना बिर्लांच्या ऑल्विनखेरीज दुसऱ्या कुणाला मिळणार नाही याची निश्चिती करणे एवढे माझे खरे काम.' समाजवादाच्या नावाखाली नोकरशाहीची पकड वाढवून, या नोकरशाहीचा वापर काही मोठ्या उद्योजकांची मक्तेदारी तयार करण्याकरिता किंवा टिकवण्याकरिता केला जात आहे, हे उद्योगमंत्रालयातील एका साध्या अधिकाऱ्यास २५ वर्षांपूर्वी स्पष्ट झाले होते. उद्योगधंद्यांसाठी परवाना मिळविणे इतके मुश्किल असावे यातील क्रूर विनोद ध्यानात यायला इतका वेळ लागावा? नेहरू-महालनोबीस अर्थकारण धूर्त होते, मूर्ख नव्हते ! ही असली काच लावणारी परवान्याची पद्धत त्यांच्या काळीतरी सोयीची आणि फायद्याची होती, म्हणूनच ही परवान्याची पद्धत अमलात आली आणि इतकी वर्षे टिकली. बाजारपेठ आणि स्पर्धा यामुळे काटकसर आणि कार्यक्षमता वाढते, हे काही त्या वेळच्या शासकांना किंवा उद्योजकांना समजत नव्हते असे नाही; पण बाजारपेठेतील लढतीपेक्षा

मंत्रालयातील लढाया लढण्यात भारतीय उद्योजकांचे शौर्य आणि कौशल्य जास्त प्रभावी ठरत होते. गुणवत्तेचे उत्पादन करावे, काटकसरीने करावे, आपल्या मालाला मागणी तयार करावी, ही खऱ्याखुऱ्या उद्योजकाची प्रवृत्ती त्यांच्या परिचयाचीसुद्धा नव्हती. दरबारातील वशिल्याने परवाना मिळवावा, मिळालेल्या मक्तेदारीच्या आधाराने खच्चड मालदेखील भरमसाट किमतीत रांगेत ताटकळलेल्या गिऱ्हाइकांना मेहरबानी म्हणून द्यावा असा व्यवसाय त्यांच्या स्वभावास जुळणारा होता. परवानाव्यवस्था टिकली ती तत्कालीन उद्योजकांच्या गरजेपोटी.

**समाजवादी ते सिंगापुरी मॉडेल**

परकीय भांडवलाची गुंतवणूक आजपर्यंत अगदी मर्यादित ठेवण्यात आली होती. परकीय भांडवलदार, बहुराष्ट्रीय कंपन्या आदी देशात येताच नये. आल्या तर एतद्देशीय कंपनीत त्यांचे भागभांडवल अगदी मर्यादित असले पाहिजे. नाहीतर ही मंडळी देश लुटून नेतील आणि देश आर्थिकदृष्ट्या पुन्हा गुलाम होऊन जाईल असा बागुलबुवा दाखवला जात होता. आता एकदम परदेशीयांच्या गुंतवणुकीकरिता दरवाजे सताड उघडण्याचे प्रयोजन काय आणि रहस्य काय? परदेशी गुंतवणूक वाढल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय मालाची स्थिती सुधारेल आणि त्यातून परकीय कर्जाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल अशी शासनाला आशा वाटत असेल; पण या आशेत तथ्य किती आणि भाबडेपणा किती ? परकीयांची गुंतवणूकसुद्धा शेवटी फायद्याच्या दृष्टीनेच होणार. हिंदुस्थानातील उद्योगधंद्यात गुंतवणूक करण्यात त्यांच्या दृष्टीने आकर्षक भाग एकच, तो म्हणजे भारतातील स्वस्त मजुरी; पण हा एक आभास आहे. भारतात मजुरीचे दर कमी असतील; पण संघटित उद्योगधंद्यातील मजुरांची कार्यक्षमता पाहता स्वस्त दरातील मजुरीही महाग पडते. परकीयांना गुंतवणूक करण्यास दिल्यामुळे एक फायदा होण्याची शक्यता आहे. उद्योगधंदे वाढतील, रोजगार वाढेल, त्याबरोबर भारतात पहिल्यांदाच जुनाट आडगिऱ्हाइकी तंत्रज्ञानापेक्षा जवळपास अद्ययावत तंत्रज्ञान येऊ शकेल. या मार्गाने आशिया खंडातील काही देशांनी एक प्रकारचे वैभव मिळवले आहे. तैवान, दक्षिण कोरिया, सिंगापूर या देशांतील उद्योगंदे पाश्चिमात्य उद्योगधंद्यांचे पूरक म्हणून भूमिका बजावतात. अर्थमंत्र्यांनी एका मुलाखतीत सिंगापूरच्या नमुन्याचे कौतुकसुद्धा केले. म्हणजे आता स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या स्वदेशी भारतीय उद्योगधंद्याचे स्वप्न मिटले आहे. तथाकथित समाजवादी नियोजन बाजूला पडले. आता खंडप्राय भारतवर्ष चिमुरड्या सिंगापूरचा नमुना वाखाणू लागला आहे.

परकीय भांडवलच नाही तर परकीय तंत्रज्ञानासही दरवाजे खुले करण्यात आले आहे. इतके दिवस एखादे तंत्रज्ञान परदेशाहून आणण्याची गरज आहे किंवा नाही हे उद्योगमंत्रालयातील 'बाबू' ठरवत असत, हे आठवले म्हणजे हसू येते. तंत्रज्ञानाच्या आयातीवरील बंधने देशी तंत्रज्ञानाच्या विकासाकरिता वापरली गेली असती, तर आज भारताचे असे तंत्रज्ञान निदान एकदोन क्षेत्रांत उभे राहिले असते; पण तंत्रज्ञानाची आयात देशी मक्तेदारांच्या सोयीने मर्यादित केली. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत आज स्वातंत्र्यकाळी पाश्चिमात्य जगाच्या जितक्या मागे होता, त्याच्या कितीतरी पट अधिक मागे आहे; पण परकीय तंत्रज्ञानाला दरवाजे उघडून देण्याचा हेतू काय आहे? पाश्चिमात्यांकडून तंत्रज्ञान घ्यायचे ते बहुधा आडगिऱ्हाईकीच असायचे. यंत्रसामग्रीही बहुधा दुय्यम दर्जाची. अशा कारखान्यात भारतीय कामगारांनी तयार केलेला माल परदेशातील बाजारपेठेत स्पर्धेत टिकून राहील ही आशा फोल आहे.

भारतातील मक्तेदारीवरील बंधने ढिली करण्यात आली. कारखानदारीच्या आकारमानावर आता बंधने राहिली नाहीत. आनंदाची गोष्ट आहे; पण त्यामुळे आर्थिक अरिष्ट हटण्यास किंवा त्यावर उपाययोजना करण्यास कशी काय मदत होणार?

**भाकीत खरे ठरले**

आजपर्यंतचा अनुभव असा, की उद्योगधंद्याची वाढ हीच मुळी भारतातील अरिष्टांची जननी आहे. उद्योगधंदे जितके वाढतील, तितकी यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि कच्चा माल यांची आयात वाढेल. भारतातील उद्योगधंदे त्यांना लागणाऱ्या आयातीच्या रकमेपेक्षा अधिक निर्यात करूच शकणार नाहीत. कार्यक्षमता आणि स्पर्धा हा भारतीय उद्योजकांचा मूळ स्वभावच नाही. त्यामुळे नवे धोरण अपयशी होणार, यात माझ्या मनात काहीही शंका नाही. १९८४-८५ मध्ये राजीव गांधींच्या अर्थशास्त्रावर मी एक भाषण दिले होते. ते भाषण लेख म्हणूनही प्रसिद्ध झाले आहे. या विषयाच्या जिज्ञासूंनी तो लेख आजही आवर्जून पाहावा. (राजीव गांधी राजकीय व आर्थिक आढावा, पृष्ठ क्र.१३१, प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश, जनशक्ती वाचक चळवळ) निर्बंधता, स्पर्धा, खुली बाजारपेठ, आधुनिक तंत्रज्ञान या सर्व गोष्टी खऱ्या उद्योजकांना शक्तिवर्धक आणि पौष्टिक वाटतील. भारतीय कारखानदारांना हा खुराक पचणारा नाही. या धोरणाची सुरवात करायची असेल, तर ती शेतीपासून करावी; कारण खऱ्या उद्योजकाचे गुण भारतीय शेतकऱ्याने दाखवून दिले आहेत. भारतीय कारखानदार नव्या धोरणाचे आज स्वागत करतील.

कारण, त्यामुळे त्यांना काही मोकळीक मिळणार आहे, आयातीची मुभा ढमळणार आहे; पण तीन वर्षांच्या आत ही लाट ओसरेल आणि ही मंडळी पुन्हा एकदा सरकारला कोपऱ्यात गाठून, नवीन सवलतींकरिता हाकाटी करतील असे भाकीत मी त्यावेळी केले होते. मी बरोबर भाकीत वर्तवले होते असे म्हणणे अहंमन्य, अशिष्ठाचाराचे आहे; पण हे भाकीत त्या वेळी मी सांगितले होते, हे तितकेच खरे आहे.

**दरवाजे कोणत्या भांडवलासाठी उघडले ?**

मग सातव्या पंचवार्षिक योजनेत अयशस्वी ठरलेली ही रणनीती आठव्या पंचवार्षिक योजनेत पुन्हा एकदा अविचाराने वापरली जाते आहे काय? १९८५ ते १९९० या काळात हे धोरण फसले. १९९१ ते १९९५ या काळात ते यशस्वी होण्याची काय शक्यता आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. १० वर्षांपूर्वीचा भारतीय कारखानदार आणि आजचा भारतीय कारखानदार यांच्यात एक मोठा फरक पडला आहे. हजारो कोटी रुपयांचा संचय त्यांनी छुप्या मार्गाने परदेशांत केलेला आहे. अनेक अनिवासी भारतीय इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशांत अरबाधीश झाले आहेत. आज स्पर्धा चालू आहे, ती देशी उद्योजक आणि हे विलायती उद्योजक यांमध्ये. परकीय भांडवलास नुसते दरवाजे उघडून दिले म्हणजे ते भांडवल मोठ्या उत्सुकतेने आणि उत्साहाने भारतात प्रवेश करणार आहे, ही कल्पनासुद्धा हास्यास्पद आहे. मग हे दरवाजे कोणत्या भांडवलासाठी उघडले गेले ? या दरवाजाने आत येणार आहे, ते देशी कारखानदारांचे परदेशस्थ भांडवल आणि अनिवासी भारतीयांची साधनसंपत्ती. पाश्चिमात्य राष्ट्रांतील खुल्या बाजारपेठेच्या वातावरणात आपण यशस्वी ठरू शकतो या प्रचीतीने प्रबल आत्मविश्वास तयार झालेले, हे भांडवल आहे, त्याला भारतात यायचे आहे; पण भारतीय अर्थव्यवस्थेच्या कोंदट वातावरणात नाही. उद्योगधंदे सुरू करण्याचे स्वातंत्र्य, भांडवल आणण्याचे स्वातंत्र्य, तंत्रज्ञान आणण्याचे स्वातंत्र्य यांची ग्वाही मिळाली, तरच हे भांडवल भारतात येणार आहे.

**स्वयंभू कारखानदारीचे स्वप्न विरले**

नवीन औद्योगिक धोरणाचे गूढ हे असे आहे. ते अंबानी-हिंदुजांच्या सोयींनी ठरले आहे. स्वयंभू भारतीय कारखानदारीचे स्वप्न आता विरले आहे. भारतीय उद्योगधंदे आता आंतरराष्ट्रीयीकरणाकडे जाणार आहेत. औद्योगिक विकासाचा नवा आदर्श नमुना अमेरिका नाही, रशियाही नाही, नवा आदर्श आहे सिंगापूर.

या धोरणाने भारतातील उद्योगधंदे कदाचित् वाढतील; पण त्यामुळे बेकारी हटणार नाही, महागाई हटणार नाही, काळापैसा जाणार नाही आणि आंतरराष्ट्रीय नादारीही संपणार नाही. ४४ वर्षे औद्योगिकीकरणाच्या अफूच्या गोळीवर हे बाळ वाढते आहे, प्रत्येक वेळी आजारी पडले म्हणजे त्याला आणखी मोठ्या डोसची गरज पडते.

औद्योगिक धोरणासंबंधी एका गोष्टीची चर्चा, धोरणाची घोषणा होण्याआधी पुष्कळ झाली होती. प्रत्यक्ष धोरणाच्या मसुद्यात या विषयाचा उल्लेखही नाही. कार्यक्षम उद्योगधंद्यांना व्यवसाय चालवण्याचे स्वातंत्र्य जसे आहे तसेच बुडीत धंदा बंद करण्याचेही स्वातंत्र्य आवश्यक आहे. आजारी धंदे चालू राहिले तर त्यात कारखानदाराचा तर फायदा नाहीच, पण देशाचाही नाही आणि मर्यादित कामगारांचा गट सोडला तर कामगारवर्गाचाही नाही. उद्योगधंद्यांच्या आंतरराष्ट्रीयीकरणात भांडवलाची सघन गुंतवणूक आणि बेरोजगारी अपरिहार्य आहे. या विषयावर स्पष्ट लिहिणे किंवा बोलणे आज शासनास परवडणारे नाही; कारण डावी मंडळी त्यांना मिळालेले फायदे टिकवून धरण्याकरिता चवताळून उठतील. कामगारांवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून एक निधी जोपासण्यात येणार आहे. पण, या प्रश्नांची व्याप्तीच कोणत्याही ताकदीच्या पलीकडची आहे. नवीन उद्योगधोरण अमलात आले तर त्याचा पहिला संघर्ष होणार आहे संघटित कामगारवर्गाशीच. गेल्या काही वर्षांत कामगारवर्गाची क्रांतिप्रणेत्याची भूमिका हरवलेली होती, ती त्याच्याकडे परत येण्याची चिन्हे दिसत आहेत.

*(६ ऑगस्ट १९९१)*

◆◆

# कामगार चळवळ प्रतिगामी बनते आहे

२९ नोव्हेंबर १९९१ रोजी डाव्या कामगार संघटनांनी 'भारत बंद'चा कार्यक्रम जाहीर केला. सर्वसामान्य संघटित कामगारांनी औद्योगिक बंदला दिलेला प्रतिसाद फारसा मोठा नव्हता; पण केंद्र व राज्य सरकारांचे कर्मचारी, बँका आणि विमानसेवा अशा त्यातल्या त्यात भाग्यवान नोकरदारांच्या क्षेत्रात बंद चांगल्यापैकी यशस्वी झाला.

बंदचा उद्देश नव्या औद्योगिक व आर्थिक धोरणांचा निषेध करणे हा होता.

विशेषतः, अकार्यक्षम आणि तोट्यात चालणारे उद्योगधंदे बंद करून, अंदाजपत्रकावरील भार कमी करण्याचा सरकार प्रयत्न करील या धास्तीपोटी हा बंद जाहीर करण्यात आला होता. अकार्यक्षम उद्योगधंदे बंद करावेत अशी जागतिक वित्तसंस्थांनी मागणी केली आहे; पण असे करण्यात राजकीयदृष्ट्या अडचणी खूप आहेत. त्यामुळे कामगारांचा रोष ओढवून घ्यावा लागेल; संप, हरताळ होतील आणि औद्योगिक उत्पादनावर विपरीत परिणाम घडून येईल. हे सर्व लक्षात घेता शासनाने या बाबतीत धीमी पावले टाकली आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे वगैरे बंद झाल्यास त्यात काम करणाऱ्या कामगारांची पर्यायी सोय लावण्याच्या दृष्टीने मजबूत व्यवस्था उभी करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. अंदाजपत्रकात अशा कामगारांची सोय लावण्यासाठी एक स्वतंत्र निधी उभा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

थोडक्यात, ज्या धोरणाचा निषेध म्हणून औद्योगिक बंद पाळण्यात आला, ते धोरण सरकारने अद्याप जाहीर केलेले नाही, तसे करण्याची फारशी शक्यताही नाही आणि तरीही कर्मचाऱ्यांनी देशभरचे उत्पादन एक दिवस बंद पाडण्याचे धाडस केले. कामगार संघटनांची संख्या लहान असली, तरी एकजूट मोठी आहे. त्या एकजुटीच्या बळावर गेल्या पन्नास वर्षांत संघटित कामगार 'नाही रे'

अवस्थेतून सन्मान्य आणि प्रतिष्ठित अवस्थेपर्यंत येऊन पोहोचला. ‘सर्वश्रेष्ठ नोकरी’ अशी परिस्थिती देशात तयार झाली आणि त्यामुळे आठदहा हजार सरकारी नोकऱ्या राखीव करण्याचा प्रश्न खूप महत्त्वाचा वाटू लागला. संघटित कामगार व्यवस्थेचा भाग बनले आणि आपल्या या कामगिरीवर पाणी पडू नये म्हणून त्यांनी मोर्चे बांधायला सुरवात केली आहे.

“... नवे उद्योगधोरण अमलात आले, तर त्याचा पहिला संघर्ष होणार आहे संघटित कामगारवर्गाशीच. गेल्या काही वर्षांत कामगार वर्गाची क्रांतिप्रणेत्याची भूमिका हरवलेली होती, ती त्याच्याकडे परत घेण्याची चिन्हे दिसत आहेत. (पाहा : नवे औद्योगिक धोरण – सिंगापुरी मॉडेल : शरद जोशी – शेतकरी संघटक, ६ ऑगस्ट १९९१) नव्या अर्थव्यवस्थेविरूद्ध लढा द्यायला कामगार उभे राहणार हे भाकीत खरे ठरते आहे.

कालपर्यंत कामगारांची चळवळ कष्टणाऱ्याला भाकर मिळवून देण्याची पुरोगामी चळवळ होती. सगळ्या डाव्या चळवळीचा पायाच मुळी कामगार चळवळ हा होता. कामगार संघटना बांधणे हे शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, दलित, आदिवासी इत्यादींच्या संघटना बांधण्यापेक्षा खूपच सुलभ आणि सोयीस्कर. त्यामुळे डावी चळवळ कामगार आंदोलनाने आपल्या कब्जात घेतली. आर्थिक परिस्थितीतील परिवर्तन इतके जबरदस्त आहे, की कालपावेतोची कष्टकऱ्यांची पुरोगामी चळवळ आज स्वत:च्या भरलेल्या तुंबडीचे रक्षण करण्याची प्रतिगामी चळवळ बनली आहे. जॉर्ज फर्नांडिससारखे कामगारनेते आता शोषितांचे अग्रणी न राहता, अकार्यक्षम आणि तरीही भरपूर मोबदला घेणाऱ्या व सर्वसाधारण जनतेला सहस्त्र हस्तांनी लुबाडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या टोळयांचे नायक बनले आहेत.

एक उदाहरण पाहूया. उत्तर प्रदेशात स्कूटर तयार करण्यासाठी एक कारखाना सरकारने काढला. दीड दोनशे एकर जागा व्यापली. आज तेथील कामगारांची संख्या सहा हजार आहे. स्कूटरना मागणी भरपूर आहे. बजाज, कायनेटिक होंडा यांसारखे उद्योग अत्यंत भरभराटीत आहेत. पण, उत्तर प्रदेशातील या सरकारी उद्योगाला पाचपन्नास स्कूटर विकणेसुद्धा जड जाते आहे. सरकारपुढे पर्याय दोनच आहेत. एकतर, कारखाना बंद करून टाकणे आणि जे काही नुकसान झाले असेल ते अक्कलखाती जमा करणे. दुसरा पर्याय म्हणजे, हा सगळा पसारा बजाजसारख्या एखाद्या खासगी उद्योगधंद्यास विकून टाकणे आणि काही प्रमाणात तरी नुकसानीचा आकडा कमी करणे. पण, येथील कामगारांच्या संघटनेस हे दोन्ही पर्याय मान्य नाही. खासगीकरण झाले तर पगारावर काही कुऱ्हाड येणार

नाही; पण कारखाना खासगी झाला, तर काम करावे लागेल. टंगळमंगळ काहीही केली, तरी अठ्ठावन्नाव्या वर्षापर्यंत कोणी धक्का लावू शकणार नाही अशी शाश्वती असलेली परिस्थिती हातची सोडायला तो तयार नाही. खासगीकरण झाले, तर स्कूटर खपतील, कारखाना फायद्यात चालेल; पण त्यांची ही ऐश्वर्याची सनद जाईल; म्हणून कामगारांनी भक्कम बांधणी चालविली आहे.

संध्याकाळच्या भाकरीची खात्री काय, आशाही नाही अशा अवस्थेत देशातील चाळीस टक्के लोक आहेत. अशा परिस्थितीत ऐश्वर्याची सनद राखू पाहणाऱ्या कामगार चळवळीला पुरोगामी म्हणायचे कसे ?

केंद्र आणि राज्य शासनाचे कर्मचारी, बँकांतील अधिकारी, आयुर्विमा महामंडळ, इतर वित्तीय संस्था, प्राध्यापक, शिक्षक यांची स्थितीही जवळजवळ अशीच आहे. काम जवळजवळ नाही. कार्यक्षमता जवळपास शून्य. जे काही काम करायचे त्याकरिता लाचलुचपत आणि इतर गैरमार्गांचा सर्रास वापर आणि त्याखेरीज भरभक्कम पगार, निर्देशांकानुसार महागाई भत्ता, वर बोनस, अनेक सार्वजनिक सुट्या, वर पगारी रजा, किरकोळ रजा, आजारपणाची रजा, अभ्यास रजा, वैद्यकीय उपचारांची सोय, निवासाची स्वस्त सोय, सुटीत प्रवासखर्चाची भरपाई, अनेक तऱ्हेच्या कर्जांच्या सोयीसवलती, मुलांच्या शिक्षणाच्या विशेष सोयी, सरकारी खर्चाने भ्रमंतीची-अगदी परदेशी प्रवासाची विशेष सोय व अशा तऱ्हेने नोकरी केल्यानंतर वर निवृत्तीवेतन, प्रॉव्हिडंड फंड आणि मेल्यानंतरसुद्धा कुटुंबाला पेन्शन अशा रेलचेलीत या मंडळींची चंगळ चालू आहे.

ही काही सगळ्या कामगारांची स्थिती नाही. असंघटित कष्टकरी आजही मोठ्या दैनावस्थेत आहेत. कामगारऐक्याची घोषणा करत स्वतःचे खिसे भरणाऱ्या संघटित कामगारांनी आपल्या धाकट्या, कमजोर भावांच्या संघटना बांधण्याची काही चिंता दाखविली नाही. संघटित ताकदीच्या जोरावर देशाला वेठीस धरणाऱ्या या कामगारवर्गात पत्ते, जुगार, दारू बोकाळली आहे. पात्रतेपलीकडे वैभव मिळाले म्हणजे 'देव देव'करण्याकडे कल वाढतो. 'जगातील कामगारांनो, एक व्हा, अशा आरोळ्या ठोकीत संप हरताळ करणारी ही मंडळी जुन्या धर्मरूढींच्या इतकी आहारी गेली आहेत, की जातीयवादी संघटना प्रामुख्याने त्यांच्याच आधाराने उभ्या राहताहेत.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकाची नोकरी मिळविण्यासाठी उमेदवार पंचवीस पंचवीस हजार रुपये देऊ करतात. महाराष्ट्रात फौजदार म्हणून भरती होण्यासाठी लोक लाखांनी रुपये भरतात. अबकारी खात्यात तर एकएक

जागी बदली मिळविण्याकरिता हप्ते ठरले आहेत. चांगली डॉक्टरी, वकिलीच्या परीक्षा पास झालेली मंडळी सरकारी नोकऱ्यांत घुसू पाहत आहेत. डॉक्टरी करण्यापेक्षा आय.ए.एस. झालेले बरे असे त्यांचे म्हणणे आणि आय.ए.एस. मधील सत्तेचा ज्यांना मोह नसेल, त्यांच्यासाठी तर कॉलेजातील प्राध्यापकाच्या नोकरीसारखा भाग्ययोग नाही. प्राध्यापक म्हणून कायम होणे हे जवळजवळ स्वर्गात प्रवेश मिळविण्याच्या बरोबरीचे झाले आहे. सर्व तऱ्हांचे फायदे घेणारी आणि उलट, समाजाची कणमात्र परतफेड न करणारी ही मंडळी नवीन औद्योगिक आणि अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाच्या चाहुलीने हवालदिल झाली आहे. आता आपल्याला काम करावे लागते की काय, अशी त्यांना चिंता पडली आहे. पगार मिळण्यासाठी आता काही किमान कार्यक्षमता दाखवावी लागेल की काय, या आशंकेने ते भयभीत झाले आहेत आणि स्वत:च्या बचावासाठी त्यांनी आतापासूनच कांगावा करायला सुरवात केली आहे.

नव्या आर्थिक आणि औद्योगिक धोरणावर डाव्या चळवळीने मोठे काहूर माजवले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर काही वित्तसंस्था यांनी केंद्रशासनाला केलेल्या काही शिफारशींमुळे डाव्या मंडळींना खूप राग आला आहे. सशस्त्र सैन्यावरील खर्च कमी करावा, सरकारी नोकरांच्या महागाई भत्त्याची पद्धत बंद करावी, लायसेन्स, परमिट राज संपवून, प्रशासकीय खर्च कमी करावा, सूट-सबसिड्या बंद कराव्यात, सर्व अर्थव्यवस्था टाकटुकीने आणि कार्यक्षममतेने चालवावी, रुपयाचे मूल्य अवास्तव उच्चीचे ठेवू नये, रेशनची अस्ताव्यस्त वाढलेली व्यवस्था मर्यादित करून, तिचा फायदा फक्त समाजातील दुर्बल घटकांनाच मिळावा अशा शिफारशींवर तर डावी मंडळी तर खूपच दात खातात.

दुर्दैवाची गोष्ट अशी, की या शिफारशीत वावगे असे काहीच नाही. आपला घरसंसार टाकटुकीने आणि सुगरणपणे चालविणाऱ्या कोणाही गृहिणीनेसुद्धा शासनाला नेमका हाच सल्ला दिला असता; पण शासनाने सल्ला घेतला गृहिणींकडून नाही, कोणताही व्यवसाय, उद्योगधंदा यशस्वीपणे चालविणाऱ्या कोणा उद्योजकांकडूनही नाही; त्यांनी सल्ला घेतला तो सरकारी उधळपट्टीवर चंगळ मारू इच्छिणाऱ्या पोटभरू अर्थशास्त्रज्ञांकडून आणि म्हणून आज हे साधे शहाणपण जागतिक वित्तीय संस्थांकडून शिकण्याची शासनावर वेळ आली आहे.

अगदी शेवटी शेवटी राष्ट्रीय कृषिनीतीसंबंधी शासनाला मिळालेल्या सल्ल्याकडे लक्ष दिले असते, तरी बाहेरच्या सरकारकडून अशी कानउघाडणी करून घेण्याची

वेळ आली नसती.

शासनाचे नवे आर्थिक आणि औद्योगिक धोरण 'राष्ट्रीय कृषिनीती' मान्य करणारे नाही; पण त्या दृष्टीने वाटचाल करणारे आहे. 'करून करून भागले आणि देवभजनी लागले,' अशी काहीशी शासनाची स्थिती आहे. आयुष्यभर व्यसनात आणि छंदीफंदीपणात दिवस घालविल्यानंतर, शरीर थकल्यामुळे, गलितगात्र वृद्धाने परमार्थाच्या गोष्टी बोलाव्यात, अशी शासनाची स्थिती आहे.

शेतकरी संघटनेच्या शेगाव येथील मेळाव्यात १० नोव्हेंबर १९९१ रोजी जमलेल्या लाखलाख शेतकऱ्यांनी राष्ट्रीय कृषिनीतीचा स्वीकार केला. ज्या धोरणाविरुद्ध संघटित औद्योगिक कामगारांच्या डाव्या संघटना शड्डू ठोकून उभ्या राहिल्या आहेत, त्यालाच शेतकरी समाजाने आपले म्हटले आहे.

नवीन धोरणाची अंमलबजावणी करण्याची सरकारची ताकद आणि हिंमत असो वा नसो, शेतकऱ्यांवर वरवंटा फिरविण्याची ताकद आता त्याच्यात उरलेली नाही. शासन आज अप्रस्तुत बनते आहे. शेतकऱ्यांनी आपणहून पुढाकार घेऊन राष्ट्रीय कृषिनीती स्वीकारली आहे. विदेशी चलनाच्या चणचणीतून देशाची सुटका करण्याकरिता 'भारत दशका'ची घोषणा केली आहे. यासाठी पोटाची खळगी कशीबशी भरवणाऱ्या शेतीचा विस्तार करून, सीताशेती, माजघर शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती अशा चार सूत्रांची त्यांनी घोषणा केली आहे. शेतकरी राबत इतके दिवसही होता; पण नव्या व्यवस्थेत त्याच्या बुद्धीला, कल्पकतेला, उद्योजकतेला वाव मिळण्याची काहीशी शक्यता दिसताच, तो स्वतःच्या पायावर उभा राहाणारा समर्थ उद्योजक बनण्यास तयार झाला आहे. देशाला संकटातून सोडवायला सज्ज झाला आहे.

याउलट, सर्व समाजाला नाडणारे अकार्यक्षम कामगार या नव्या व्यवस्थेस विरोध करायला ठाकले आहेत. काल पुरोगामी वाटणारे आज उघडउघड प्रतिगामी बनले आहेत. नव्या अर्थव्यवस्थेतील परिवर्तनाचा आवाकाच इतका मोठा आहे, की सगळे जुने संदर्भ उलटपालट होऊन गेले आहेत.

(६ *डिसेंबर १९९१*)

◆◆

# बांडगुळांची दादागिरी

**अळीचा अजगर बनला**

कामगार चळवळीचे अनेक महत्त्वाचे टप्पे आहेत. सोळा सोळा तास काम, रजा नाही, नोकरीची शाश्वती नाही, दोनअडीच आणे वेतन... अशा परिस्थितीत काम करणाऱ्या कामगारांना संघटित करून, त्यांची स्थिती थोडीफार सुधारण्याचा प्रयत्न ना. म. जोशी यांच्या कालखंडात झाला. कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कामगार चळवळीत पगार-बोनसच्या मागण्या लढवता लढवता कामगारांचे राज्य साऱ्या पृथ्वीतलावर आणण्याचे स्वप्न रंगवले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जॉर्ज फर्नांडिस यांनी कामगारांच्या लढ्याने विरोधी पक्षांचे राजकारण केले. संघटित क्षेत्रातील कामगारांची परिस्थिती गेल्या तीन वर्षांत झपाट्याने सुधारली. लायसेंस परमीट राज्यात अंदाधुंद फायदे कमावणाऱ्या कारखानदारांना कामगार संघटनांशी संघर्ष परवडतही नव्हता आणि आवश्यकही वाटत नव्हता. बंदिस्त बाजारपेठेतील ग्राहकाला यथेच्छ लुबाडल्यानंतर जमा झालेल्या लुटीत कामगारांनाही सहभागी करून घ्यायला त्यांना काही अडचण वाटत नव्हती. संघटित कामगार या काळात शोषक बनला. कामगारराज्याचे स्वप्न संपले, अर्थशास्त्राशी काडीमोड झाली. "हे... मालक वाटेल तसे फायदे कमावतात, त्यांच्याकडून कितीही पैसा हिसकावून घेण्यात गैर काहीच नाही. त्यासाठी कोणताही मार्ग वापरावा लागला तरी चालेल," अशी भाषा आर. जे. मेहता आणि दत्ता सामंत यांच्या काळात सरळ सीधी वापरली जाऊ लागली. कामगार चळवळ म्हणजे गुंडगिरी असे एकदा ठरल्यानंतर, मग त्या आखाड्यात डाव्यांचा जातीयवाद्यांसमोर टिकाव कसा लागावा?

**संपन्न कामगारांचा आक्रस्ताळी पवित्रा**

कामगार चळवळीच्या एका नव्या कालखंडाची सुरवात २० ऑगस्ट १९९३

रोजी झाली. कामगारांच्या चळवळीचे परंपरेने चालत आलेले हत्यार म्हणजे संप! २० ऑगस्ट रोजी संपाचा अवलंब न करता, देशभर हजारो कामगारांनी 'जेल भरो' आंदोलन केले. राष्ट्रीय मोर्चा आणि डाव्या आघाडीशी संलग्न कामगार संघटनांनी या आंदोलनाचा आदेश दिला होता. आंदोलनाचा हेतू खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाण्याच्या सरकारी धोरणाचा विरोध करणे हा होता. डांगे, फर्नांडिस यांच्या काळात राजकीय हेतूसाठी संप केले जात; पण अशा हेतूसाठी कामगार रस्त्यात उतरत असल्याची ही पहिलीच वेळ. झेंडे तेच जुने; कामगार क्रांतीच्या घोषणा त्याच जुन्या; शोषितांच्या क्रांतीच्या; पण हेतू वेगळा, संघटित कामगारांच्या हितसंबंधाचे रक्षण.

**बँकेतील नवे सावकार**

बँकेतील कर्मचारी आता काही 'प्रभाकर'कार यांच्या काळच्यासारखे राहिलेले नाहीत. बँकेत नोकरी मिळाली, की पोराने किंवा पोरीने भाग्य काढले असे समजले जाते. त्यातल्या त्यात बँकेतल्याच कोणाशी लग्न जमले म्हणजे तीन कुळांचा उद्धार झाला! मग स्वस्त व्याजाचे कर्ज घेऊन, चांगला फ्लॅट किंवा बंगला बांधणे इ. इ. भविष्याची गडगंज तरतूद करणे यापलीकडे त्यांना दुसरे काम म्हणून राहत नाही. पुण्यात पुष्य नक्षत्राच्या वेळी सोनारांच्या दुकानात सोने खरीदणाऱ्यांची गर्दी बहुतकरून बँकवाल्यांचीच असते. पक्की कायम नोकरी, युनियनची ताकद, यामुळे ग्रहकांची चिंता करण्याचे त्याला काहीच कारण राहत नाही. कर्ज मागायला आलेला प्रत्येक ग्राहक हा वरकमाईचे साधन एवढीच त्यांची दृष्टी असते.

गडगंज पगार मिळवणारे वैमानिक आणि इतर अधिकारी झाडूवाल्याप्रमाणेच संपावर जातात. कोणा वैमानिकाला दारू पिऊन, ड्यूटीवर आल्याबद्दल बडतर्फ केले, तर सगळ्या देशातली विमान्वाहतूक थंडावून जाते. अशा परिस्थितीत बँक कर्मचारी मागे थोडेच राहणार आहेत? त्यांनीही आता शंख फुंकण्यास सुरवात केली आहे. २ सप्टेंबर आणि ४ ऑक्टोबर रोजी एक एक दिवसाचा प्रतीकात्मक संप त्यांनी जाहीर केला आहे आणि २ नोव्हेंबरपासून बँक कर्मचारी अनिश्चित कालपर्यंत संपावर जाणार आहेत.

**उणे पगाराचे धनी संपावर**

कामगारांच्या मध्यवर्ती संघटनांनी ही आंदोलनाची हाक दिली आहे. २५ ऑगस्टला केन्द्रीय कर्मचाऱ्यांनी संघर्ष दिवस पाळला. त्यांची मागणी आहे– महागाई भत्ता मूळ पगारात मिळवण्यात यावा. त्यामुळे सर्व पेन्शनची रक्कम

दुप्पट होईल आणि यापुढील महागाई भत्त्याच्या प्रत्येक हप्त्याची रक्कम दुप्पट होईल; नवे वेतन कमिशन नेमावे, त्याच्या शिफारशी येईपर्यंत २० टक्के अंतरिम पगारवाढ द्यावी आणि सर्व नोकरदारांना कोणतीही मर्यादा न ठेवता बोनस मिळावा.

कोणत्याही नोकरदाराचे, कामगाराचे वेतन जास्तीत जास्त किती असू शकते? राष्ट्रीय उत्पन्नात किंवा मालकाच्या फायद्यात तो जितकी भर घालतो, त्यापेक्षा जास्त नाही. काही विशेष कामगिरी झाल्यास बोनस मिळावा, ही अपेक्षा ठेवता येईल. सरकारी अंमलदारांचे उत्पादन शून्य. उत्पादकांच्या मार्गात अडचणी उभ्या करणे हे त्यांचे मुख्य काम. म्हणजे त्यांची उत्पादनातील भर नकारात्मक आहे. त्यांचा पगार उणे असला पाहिजे. म्हणजे सरकारी नोकरी करण्याच्या प्रतिष्ठेसाठी सरकारला पैसे देऊ करावे अशी व्यवस्था अर्थशास्त्र्यांच्या नियमानुसार अगदी योग्य होईल; पण प्रत्यक्षात सरकारी नोकर पगार, भत्ते आणि बोनस वाढवून मागत आहेत. सरकारी नोकरांची खरी मागणी खुल्या अर्थव्यवस्थेला विरोध ही आहे. संपात नोकरदारांनी सामील व्हावे म्हणून पगारवाढीच्या वगैरे मागण्या जोडल्या आहेत, एवढेच!

९ सप्टेंबर रोजी देशातील सर्व संघटित कामगार निषेधदिन पाळतील. त्यानंतर तीनच दिवसांत म्हणजे १३ सप्टेंबर रोजी सर्व देशभर रेल्वेचा बेमुदत संप सुरू होणार आहे. खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये आपली जीवनशैली बिघडेल; थोडेफार काम करावे लागेल; वरकमाईची संधी कमी होईल, या चिंतेने संघटित कामगार व्याकूळ व्हावेत हे सहज समजण्यासारखे आहे.

**चीनचा आदर्श**

कामगारांच्या या संघर्षाच्या पवित्र्याने सरकार चिंताग्रस्त होईल हे खरे; पण त्यामुळे ते संघटित कामगारांच्या मागण्या मान्य करेल आणि लायसेंस परमिट राज्याकडे वळेल अशी काही फारशी शक्यता नाही. अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी पगारवाढीच्या वगैरे मागण्या मान्य करणे शक्य नसल्याचे स्पष्टपणे जाहीर केले आहे. नोकरवर्गाला या वेळी काहीही सूट देण्यात आली, तर अंदाजपत्रकी तुटीसंबंधीचे वित्तसंस्थांनी घालून दिलेले निर्बंध पुरे करणे अशक्य होईल. शिवाय, प्रशासकीय खर्च वाढल्यामुळे भारतीय मालाची निर्यात आणखीनच कठीण होईल. त्यामुळे संघटित कामगारांच्या मागण्या मान्य करणे म्हणजे देशातील अर्थव्यवस्था बुजवून टाकणे आहे, हे स्पष्ट आहे.

नेहरूव्यवस्थेकडून खुल्या व्यवस्थेकडे जायचे म्हणजे जुन्या व्यवस्थेत

पोसलेल्या बांडगुळांची छाटणी करणे एक ना एक दिवस भाग पडणारच आहे. चीन आजही विळ्याकणसाचा लाल झेंडा फडकवतो; पण खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाण्याचा कार्यक्रम नेटाने राबवीत आहे. गेल्या आठवड्यात एकट्या कोळसा खाणीच्या क्षेत्रातील ५ लाख कामगारांना कामावरून दूर करण्याचा निर्णय चिनी सरकारने जाहीर केला. एवढेच नव्हे तर, सर्व सरकारी नोकरवर्गाच्या पगारात कपात जाहीर केली. चीनचे हे उदाहरण आमच्याकडच्या लाल झेंडेवाल्यांना पटणार नाही आणि संघर्ष अपरिहार्य होणार आहे. जास्तीत जास्त महिन्या-दोन महिन्यांत बांडगूळ कामगारांचे 'ब्लॅकमेल' ही सर्वांत मोठी राष्ट्रीय समस्या होणार आहे.

**छाटणीची सुवर्णसंधी**

...पण संघिटत कामगारांचा हा आक्रस्ताळी पवित्रा राष्ट्रापुढे चालून आलेली सुवर्णसंधी आहे असे मला वाटते. १९७६-७७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे सेवक संपावर गेले होते; त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील म्हणजे रांगडा शेतकरी गडी. त्यांनी संप खुशाल दोन महिने चालू दिला. नंतर शरद पवार पक्ष पालटून, वसंतदादांना खाली खेचून मुख्यमंत्री झाले. राज्य सरकारी नोकरांच्या मागण्या त्यांनी मान्य केल्या. संप संपला. नव्या मुख्यमंत्र्यांना सेवकांची कृतज्ञता मिळाली; पण नोकरदारांची अरेरावी संपवण्याची संधी गमावली; पण गंमत अशी, की या चोपन्न दिवसांच्या संपात जनता म्हणू लागली, की सरकारी कार्यालये बंद राहिली तर बिघडत तर काहीच नाही; पण देश बरा चालतो.

सरकारी नोकरांनी या वेळी संप केला, की नित्यनियमाप्रमाणे सरकार संपग्रस्त सेवा 'आवश्यक' म्हणून जाहीर करेल. परिणामतः, सर्व संप बेकायदेशीर ठरतील. कामगार संघटनांनी तरीही संप चालूच ठेवला, तर त्याचा स्पष्ट अर्थ असा, की नोकरदारांच्या मते त्यांची व त्यांच्या खात्याची सेवा अनावश्यक आहे; मग ती खाती कायमची बंद करून टाकणे योग्य होईल. कामगारांना तक्रार करायला जागा राहणार नाही. सेवा खरोखरच आवश्यक आहे असे वाटले तर त्यांची पर्यायी व्यवस्था ताबडतोब करून टाकता येईल. अशा तऱ्हेने नोकरशाहीची आपोआप छाटणी होऊन जाईल. उदाहरणार्थ, मार्ग वाहतूक सेवा अनावश्यक आहे असे कामगारांचे मत दिसले, तर ती सेवा खासगी चालकाकडे देता येईल. याउलट, महसूल खाते. तलाठी सर्कल-इन्स्पेक्टर संपावर गेले तर महसूल जमा करण्याचे काम प्रत्येक ग्रमपंचायतीकडे कायमचे सोपवून द्यावे. जमिनीसंबंधी फेरफार ग्रमसभेत केले जातील असे ठरवावे; म्हणजे महसूल खातेही संपेल.

त्यातला गोंधळही संपेल आणि भ्रष्टाचारही संपेल. जी जी खाती या ना त्या स्वरूपात जे परवाने देण्याचे काम करतात, ते सर्व परवानेच अनावश्यक ठरवून रद्द करून टाकावेत, म्हणजे खऱ्या अर्थाने खुली व्यवस्था यायला मदत होईल.

**लोकांनी 'खासगीकरण' करावे**

सर्वसामान्य लोकांनीही यावेळी बांडगुळांच्या दबावाला तोंड देण्यासाठी उभे राहिले पाहिजे. त्यांनी रस्त्यावर येण्याची गरज नाही. आर्थिक हत्यार त्यापेक्षा जास्त प्रभावी असते. काय करता येईल? एक उदाहरण सांगतो : बँक कर्मचाऱ्यांनी खरोखरच संप केला तर मी राष्ट्रीयीकृत बँकांशी जे काही संबंध आहे ते सगळे तोडून सगळे व्यवहार खासगी बँकांत नेणार आहे. हे असे सगळ्या उद्योजकांनी केले जर राष्ट्रीयीकृत बँकांतील कर्मचाऱ्यांचा संप कितीही दिवस चालला, तरी चिंता करण्याची काही गरज राहणार नाही.

आणखी एक सूचना : कोणत्याही संपात कोणत्याही पदावर काम करण्यासाठी सध्याच्या पगाराच्या निम्म्या दरात कुशल, स्वच्छ आणि पात्र पर्यायी कर्मचारी सुचवण्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे.

*(६ सप्टेंबर १९९३)*

◆◆

# बँकांची व्यंकटी सांडो

## एक संप अधिकाऱ्यांचा

५ मे रोजी राष्ट्रीयीकृत बँकांचा अधिकारीवर्ग एक दिवसाच्या लाक्षणिक संपावर गेला. त्यांच्या मागण्या काय होत्या हे फारसे स्पष्ट झाले नाही. राष्ट्रीयीकृत बँकांमधील उधळमाधळ थांबवावी. तोटा कमी करावा, घाट्यातील शाखा बंद कराव्यात, असे आदेश शासनाकडून निघाले आहेत. याच धर्तीचे आणखी काही आदेश निघण्याची शक्यता आहे. बँकांना शेअर बाजारात ४९ टक्क्यांपर्यंत भांडवल गोळा करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे संचालक मंडळावर व्यावसायिक दृष्टीचे लोक येतील आणि बँक कर्मचाऱ्यांना काम करायला सांगतील अशीही भीती कर्मचाऱ्यांना वाटत असावी. खासगी क्षेत्रात नवीन बँका उघडण्यास शासनाने परवानगी दिली आहे आणि काही परदेशी बँका हिंदुस्थानात प्रवेश करू लागल्या आहेत. त्यांच्या स्पर्धेचाही धोका बँक कर्मचाऱ्यांना वाटत असावा. राष्ट्रीयीकृत बँकांची मक्तेदारी तोडण्याच्या प्रयत्नांना विरोध करणे हा संपाचा प्रमुख हेतू. त्याबरोबर तोंडी लावणे म्हणून काही पगारवाढीच्या वगैरे मागण्या असाव्यात.

५ तारखेला संप झाला. देशभरच्या सगळ्या बँकांचे कामकाज ठप्प झाले. संप यशस्वी होणार यात कोणाला काहीच शंका नव्हती. संप बँकअधिकाऱ्यांचा होता; पण अधिकाऱ्यांची सही घेतल्याखेरीज कर्जाचे व्यवहार तर सोडाच; पण खात्यात पैसे जमा करून घेण्याचे किंवा खात्यातून रक्कम काढण्याचे व्यवहार कसे काय होऊ शकणार? अधिकारी अधिकृतरीत्या संपावर राहिले आणि कर्मचारी कामावर आले. काम नसल्यामुळे चकाट्या पिटण्याला, चहा पिण्याला आणि इकडे तिकडे फिरण्याला एरवीपेक्षा जास्त वेळ मिळाला एवढेच.

**एक संप कर्मचाऱ्यांचा**

११ मे रोजी पुन्हा एक दिवसाचा लाक्षणिक संप झाला. या वेळी अधिकारी कामावर होते; पण कर्मचारी कामावर नव्हते. ११ तारखेची निवड संपासाठी मोठ्या हुशारीने करण्यात आली होती. १२ ला शिवजयंतीची सुटी, १३ अक्षय्य तृतीयेचा एक कामाचा दिवस की नंतर १४ आणि १५ ला शनिवार आणि रविवार अशी मोठी नामी युक्ती कर्मचाऱ्यांच्या युनियनने आखली होती. त्यानंतर २४ मे आणि २-३ जून या दिवसांच्या संपाचेही कार्यक्रम जाहीर झाले होते. यंदा लाक्षणिक संपांच्या दिवसांची एकूण संख्या सात.

**एक बँकीय अनुभव**

रोख पैशाची विशेष गरज पडल्यामुळे मी स्वतःच पैसे काढण्याकरिता बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गेलो. काउंटरपाशी एकही कर्मचारी बसलेला नव्हता. काऊंटरमागील टेबलांवर मात्र अर्धा डझन अधिकारी आपली थकीत कामे उरकत असल्याचे दिसत होते किंवा भासवत होते.

त्यातील सर्वांत जवळच्या एकाचे लक्ष मी वेधून घेतले आणि मला पैसे काढायचे असल्याचे सांगितले. हा अधिकारी माझ्यासारख्या कोणा प्रश्न विचारणाऱ्याची उत्सुकतेने वाट पाहत असावा असे दिसले. मोठ्या विजयी सुहास्य मुद्रेने 'आज बँकेत कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे सर्व व्यवहार बंद असल्याचे' त्यांनी सांगितले.

बँकेत काही कर्मचाऱ्यांचा संप असणे ही बँकेची अंतर्गत बाब आहे. त्यात मला काही स्वारस्य नाही. मला माझे पैसे, बँकेकडे जमेसाठी ठेवलेले परत हवे आहेत, बँकेची ती कायदेशीर जबाबदारी आहे, असे काहीसे ऐकवल्यानंतर तो अधिकारी म्हणू लागला, "मी या शाखेतील अधिकारी नाहीच – मी लेखा परीक्षेकरिता येथे आलो आहे." आवाज ऐकून शाखाप्रमुख बाहेर आले. नमस्कार-चमत्कार केला. आत येऊन खोलीत बसा अशी आदरातिथ्याची विनवणी झाली; पण मी काउंटरसमोर राहून पैसे काढणार आहे असे सांगितल्यावर सगळे आदरातिथ्य बाजूला झाले आणि 'कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे काही व्यवहार होणार नाहीत,' असे त्यांनी विनम्रतेने; पण खंबीरपणे सांगितले. मी युक्तिवाद घातला– 'आज बँकेची सुटी नाही, माझ्या खात्यात पैसे आहेत, ते देण्यास बँकेने नकार दिला तर कायद्याप्रमाणे हा गुन्हा होतो, बँकेने दिवाळे काढले आहे असा त्याचा अर्थ होतो;' पण शाखाप्रमुखांची भूमिका पक्की. 'आता तुम्हाला आम्ही काय सांगणार? पण आज पैशाचा व्यवहार होणे शक्य नाही.

कारण कॅशियर सगळे संपावर गेले आहेत.'

**वरती विचारून सांगतो**

माझ्या चेकवर तो स्वीकारता येत नाही, असे शाखाप्रमुखांनी सहीशिक्क्यानिशी लिहून द्यावे असा मी आग्रह धरला. अद्यापपर्यंत इतक्या संपात अशी विनंती साहेबांना कोणी केलेली नसावी. दुसरा कोणी ग्राहक असता तर त्याला त्यांनी सरळ आणि सहज उडवून लावले असावे. काउंटरपाशी उभे राहून, मी हुज्जत घालत असताना दर मिनिटा, दोन मिनिटाला कोणी ना कोणी ग्राहक बँकेच्या दरवाजातून आत येत होता. काउंटरवरची सामसूम आणि सुनसुनाट पाहिल्यावर 'आज पुन्हा बँकेत संप आहे वाटते!' असे म्हणून तोंड वाकडे करून निघून जात होता, अधिकाऱ्यांकडे कोणतीही तक्रार न करता अटीतटीला पडलेला मी एकटाच होतो.

चेक वटवता येत नाही हे लिहून द्या, ही मागणी ऐकून शाखाप्रमुख अडचणीत पडले. 'वरच्या ऑफिसरला फोन करून विचारतो,' म्हणाले, 'चाकणमध्ये फोन व्यवस्था आहे. नव्याने S.T.D व्यवस्थाही चालू झाली आहे. गावात फोन नसता किंवा बँकेचा फोन बंद असता, तर साहेबांनी काय केले असते कोण जाणे! साहेबांनी पुण्याच्या प्रमुख कार्यालयास फोन लावला. मध्यंतरी मी काउंटरपाशी उभाच. लोक सतत येत होते. काम बंद पाहून परत निघून जात होते. साहेबांचा ट्रंककॉल काही लागेना.

बँकेच्या शेजारच्या इमारतीतील सामानाच्या वखारीचे मालक बँकेत डोकावून गेले. मला नमस्कार करून हालहवाल विचारते झाले. मी सत्याग्रह करून बसलो आहे, याचे त्यांना काही आश्चर्य वाटण्याचे कारण नव्हते, चाकणभर मला ओळखतात. वखार मालकांनी बँकेच्या साहेबांपुढे एक प्रस्ताव मांडला. साहेबांना का खोळंबवता ? तुमचा ट्रंककॉल कधी लागायचा ? माझ्या वखारीत या, माझ्या खर्चाने S.T.D कॉल लावा. साहेब प्रस्ताव मान्य करतील असे मला वाटले नव्हते. S.T.D कॉलचे पैसे अर्थात द्यावे लागणार नव्हते; पण आगाऊ ग्रहकाला परस्पर अद्दल घडवण्यासाठी टेलिफोन बांधवांची दिरंगाई साहेबांना तशी सोयीस्कर होती. त्यांनी वखारीत जाऊन फोन करण्याचे मान्य केले. साहेब गेले, मग बाकीच्या अधिकाऱ्यांना माझ्याकडे लक्ष देण्याचे काही कारण नव्हते. मिनिटामागून मिनिटे गेली. अर्धा तास होऊन गेला. पुण्याचा फोन लागला; पण पुण्याच्या कार्यालयातील उच्च अधिकारी जागेवर नव्हते, पुन्हा एकदा फोन वाजला; पण निर्णय काही मिळाला नाही. कदाचित् पुण्याच्या

अधिकाऱ्यांना मुंबईच्या अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करण्याची आवश्यकता भासली असावी. पुण्यात मोफत S.T.D फोन करू देणारा वखारवाला दुर्मिळच. त्यामुळे मुंबईहून आदेश मिळायला वेळ लागत असावा.

**'बँक कर्मचारी बाहेर हाती लागला, तर...'**

शेवटी, चांगल्या ताससव्वातासाने शाखाप्रमुख वखारीतून आले. आपल्या केबिनमध्ये गेले. लघुलिपिकाला बोलावून घेतले आणि नंतर बाहेर येऊन माझ्या हाती एक पत्र दिले. या पत्राची छायालिपी मोठी बघण्यासारखी आहे. 'कर्मचाऱ्यांच्या एका संघटनेचे सभासद आज संपात सामील झाले आहेत. त्यामुळे आज आम्ही कॅश व्यवहार सुरू करू शकलेलो नाही. आम्ही आपल्या सदर चेकचे पेमेंट करू शकत नाही. इ. इ.

कामगारांनी आपापल्या मागण्यांकरिता संप करावा हे समजण्यासारखे आहे. बँककर्मचाऱ्यांचे पगार, त्यांचे भत्ते, त्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती, घरबांधणीची कर्जे हे सर्वांना ठाऊक आहे. घाईगर्दीत असलेले ग्राहक काउंटरच्या पलीकडे बसलेले, घड्याळयाच्या काट्यांवर नजर लावून चुळबूळ करीत आहेत, बँककर्मचारी गप्पा मारत रमतगमत आपली कामे चालवत आहेत. काउंटरवरील ग्रहकाचे काम चटकन् संपवण्याऐवजी काउंटर बंद झाल्यानंतर करावयाची कामे हिशेबठिशेब बिनधास्तपणे आधीच उरकून घेत आहेत, हे पाहिल्यामुळे ज्याचा संताप झाला नाही असा कोणी ग्राहक नसेल. बँकेकडून कर्ज वगैरे हवे असेल तर कर्मचारी आणि अधिकारी मंडळी कर्जदाराला कशी लुटतात हे प्रख्यात आहे. यातील एखादा कर्मचारी कधी बँकेच्या बाहेर सापडला, तर त्याचे काय करता येईल याची दिवास्वप्ने पाहत बँकेचे ग्राहक ताटकळत प्रतीक्षा करीत तासन्तास उभे राहतात. हे सगळे खरे. बँक कर्मचाऱ्यांनी संप करावा हे योग्य नसेल, दुष्टपणाचे असेल, गुन्हेगारीचे असेल; पण समजण्यासारखे आहे.

**हे कसले नादान व्यवस्थापन ?**

माझी तक्रार संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांबद्दल नाही, कामावर असलेल्या अधिकाऱ्यांबद्दल आहे; बँक ऑफ इंडियाच्या प्रमुख कार्यालयातील सर्वोच्च अधिकाऱ्यांबद्दल आहे.

या सर्व अधिकाऱ्यांनी संपकाऱ्यांशी संगनमत केले आहे. अमुक एक तारखेला संप होणार असे कळल्यानंतर जनतेची गैरसोय कमीत कमी कशी होईल आणि बँकेचे व्यवहार जास्तीत जास्त सुरळीतपणे कसे चालतील याची व्यवस्था

बँकेच्या प्रशासनाने आणि अधिकाऱ्यांनी करायला पाहिजे होती. संपाच्या आदल्या दिवशी संपकाळात आवश्यक इतकी रक्कम शाखा-प्रमुखांनी आपल्या हाती घेऊन, निदान तातडीची गरज असलेल्या ग्रहकांच्या गरजा पुऱ्या करण्याची व्यवस्था सहज करता आली असती. कर्मचारी संपावर गेले, तरी उपस्थित अधिकाऱ्यांना जितकी सेवा देणे शक्य होते तितकी देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. अधिकाऱ्यांनी आणि प्रशासनाने असा काही काडीमात्रही प्रयत्न केला नाही. उलट, संपकऱ्यांची लढाई म्हणजे आपली लढाई आणि संपकऱ्यांचा विजय आपलाच विजय अशा थाटात ते वावरत होते.

टपाल खात्यातील संपात, अधिकारीवर्ग आठ आठ दिवस अक्षरश: 'अहर्निशम् सेवामहे' या खात्याच्या ब्रीदवाक्यास जागताना मी पाहिला आहे. पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांनी संप केल्यावर डॉक्टरमंडळी साफसफाईच्या कामात गढलेली मी पाहिलेली आहेत. लोकांचे पैसे लोकांना देण्याची टाळाटाळ संपाच्या निमित्ताने करणारे बँकव्यवस्थापक त्यांच्या पदावर बसण्यास आणि बँकर म्हणवून घेण्यास पात्र नाहीत.

संपानंतर माझे मत अधिक ठाम झाले. खासगी बँका येऊ देत, परदेशी बँका येऊ देत, अगदी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बँका येऊ देत; पण राष्ट्रीयीकृत बँकांतील कर्मचाऱ्यांची नांगी ठेचणे आवश्यक आहे.

**आमच्या नशिबी अशी बँक सेवा कधी येईल ?**

स्टार टेलिव्हिजनवर एका बँकेची जाहिरात येते. बँकेकडून कर्ज कसे मिळवावे याची चौकशी करण्याकरिता एक नवखे ग्राहक बँकेस फोन करते. देशी बँकांच्या सवयीप्रमाणे अर्ज कोणत्या फॉर्मात करावा लागेल, सोबत कागदपत्र काय जोडावे लागतील, कोणाचे दाखले घ्यावे लागतील, गहाण काय ठेवावे लागले इ. प्रश्न तो मोठ्या काकुळतीने बँकअधिकारी बाईस विचारतो. ती प्रत्येक प्रश्नाला हास्यमुद्रेने उत्तर देते, 'त्याची काहीच गरज नाही.' हे संभाषण दोनतीन मिनिटे चालते आणि शेवटी बँककर्मचारी बाई ग्राहकाला म्हणते, 'पण, तुमचे कर्ज मंजूर झाले आहे.'

राष्ट्रीयीकृत बँकांची सद्दी संपो, दुरितांचे तिमिर जावो आणि ग्रहकांवर अरेरावी करणाऱ्या देशी मग्रूर बँकसाहेबांचा नि:पात होवो, जिद्दीने स्पर्धा करून ग्राहकांना अधिकाधिक सेवा देणाऱ्यांचा सूर्य लवकर उगवो, अशी प्रार्थना करण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे?

*(६ जून १९९४)*

◆◆

# थोडीतरी प्रामाणिकता दाखवा

२४ ऑगस्टच्या इकॉनॉमिक टाइम्स्‌च्या अंकात तीन विद्वान अर्थशास्त्रज्ञांची शेतकऱ्यांवर आयकर लावण्याच्या प्रश्नावर चर्चा आहे. शेतीवर आयकर लावावा किंवा नाही, तो कसा लावावा यासंबंधी केंद्र शासनाने पुढाकार घ्यावा की सध्याच्या व्यवस्थेनुसार हा प्रश्न राज्य शासनावरच सोपवावा, शेतीवर कर बसवणे राजकीयदृष्ट्या किती शहाणपणाचे आहे ? या विषयांवर तीन तज्ज्ञांनी आपली मते मांडली. सी.एच. हनुमंत राव, देशभर प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ. एकेकाळी नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून राहिलेले. गेल्या दहा-वीस वर्षांच्या काळात ज्या ज्या सरकारी समित्या नेमल्या, त्यांतील शेतीसंबंधीच्या निम्म्यावर समित्यांवर हनुमंतरावांची नेमणूक. आज जमाना बदलला म्हणता, तर खुल्या व्यवस्थेच्या वाटचालीतही सरकारला सल्ला देण्याचे काम बिनचूक हनुमंतरावांकडेच सोपवले जाते. १९९० मध्ये शेतीमालाचा उत्पादन खर्च काढताना किमान वेतनसुद्धा धरणे चुकीचे होईल अशी आग्रही भूमिका त्यांनी घेतली होती. अलीकडे, शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधने उठावीत असा थोडा वेगळा सूर त्यांनी, बदलते 'हवामान' लक्षात घेऊन काढला आहे. पण, गृहस्थ सनातन डाव्या विचारप्रणालीचा. शेती हा मोठा किफायती व्यवसाय आहे, त्यात धनदांडगे शेतकरी माजले आहेत, दैना काय ती भूमिहीनांची आहे ही त्यांची आजपर्यंतची मांडणी.

शेतीवर आयकर लावण्याच्या संबंधात त्यांनी मांडलेली मते त्यांच्या पूर्वायुष्यास शोभणारीच आहेत.

'शेतीवर कर केव्हापासूनच लावायला पाहिजे होता, आता शेतीत मिळकत वाढली, हरितक्रांती झाली, आता तर अशा कराची विशेष आवश्यकता आहे, सर्व क्षेत्रांत समानता हवी, करातून शेतीलाच का वगळावे?

'जमीनधारणेवर मर्यादा असली, तरी नवीन तंत्रज्ञानाने शेती करून भरपूर

मिळकत कमावता येते, तेव्हा कर हा लावलाच पाहिजे; एकूण उत्पादनाच्या निम्मा भाग निव्वळ नफा धरावा आणि त्यावर कर लावावा; दहा एकरांच्या खातेदारांना कर आकारणीतून वगळावे; करआकारणीसाठी केंद्राने पुढाकार घ्यावा; छोटे आणि सीमान्त शेतकरी, फक्त मोठ्या शेतकऱ्यांवरच कर लादला, तर त्याविरुद्ध आवाज उठवणार नाहीत,' अशी हनुमंतरावांची ठाशीव मागणी.

चर्चेत भाग घेणारे दुसरे अर्थशास्त्रज्ञ राजा चेलय्या. यांनी त्यांच्या प्रस्ताविकात जास्त संतुलित भूमिका घेतली आहे.

'शेतीवर कर नाहीत हे काही खरे नाही. अनेक अप्रत्यक्ष करांचा बोजा शेवटी शेतीवरच पडतो; पण शेतीवर आयकर नाही हे खरे आहे. शेतीची विशेष परिस्थिती लक्षात घेऊन, आवश्यक ते फेरफार करून, शेतीवर आयकर बसवणे हे न्याय्य होईल. याबद्दल राज्य शासनाने पुढाकार घेतल्यास कर गोळा करण्याची दुहेरी व्यवस्था होईल. ती खर्चीक होईल; कराची आकारणी वेगवेगळ्या दराने होईल तेही अयोग्य ठरेल. पण, सध्याचीच कर-वसुली यंत्रणा शेतीवर लागू केली तर शेतकऱ्यांवर मोठा जुलूम आणि जाच होईल. तेव्हा बिगरशेती उत्पन्न आणि फक्त किमान पातळीवरील शेतीचे उत्पन्न एकत्र करता येण्याची मुभा द्यावी.'

चेलय्या यांच्या अध्यक्षतेखालील समितीने येत्या काही काळातील कर-व्यवस्थेविषयी प्रस्ताव मांडले आहेत. त्यामुळे, त्यांच्या मताला विशेष महत्त्व आहे.

चर्चेत भाग घेणारे तिसरे अर्थशास्त्रज्ञ डॉ. पैपाणंदीकर. सध्या ते एका मोठ्या औद्योगिक साम्राज्याचे प्रमुख आहेत. त्यांच्या मांडणीचा गोषवारा सर्वसाधारणपणे असा -

'इतकी वर्षे धान्याचा तुटवडा होता. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक होते. करआकारणी करण्यात काही व्यावहारिक अडचणी होत्या. नेमके उत्पन्न काढणे कठीण, त्या उत्पन्नात दरवर्षी चढउतार होणार. त्यामुळे, कोणा शासनाची शेतीवर कर लावण्याची हिंमत झाली नाही; पण गेल्या वीस वर्षांत शेतीत मोठे नाटकीय परिवर्तन घडले आहे. अन्नधान्याचा साठा भरपूर आहे. उत्पादन अधिक हुकमी झाले आहे. हमी किमती दिल्या जात आहेत. शेतकऱ्यांच्या मिळकती खूप उंचावल्या आहेत आणि त्यात फारसे चढउतार नाहीत; त्यामुळे आता शेतीवर कर लावणे योग्य ठरेल. शेतीतील उत्पादनखर्च काढणे आणि त्याआधारे नेमका मिळकतीचा अंदाज घेणे कठीण आहे. शेतीचा आकार, तेथील हवामान, पाण्याची

उपलब्धता यांच्या आधाराने कराची आकारणी करता येईल. त्यामुळे दरसाल ४००० कोटी रुपयांनी सरकारी उत्पन्न वाढेल. राज्य शासनांकडे जमीनधारणा व महसूल यांचे दप्तर असते. त्यामुळे सुरवातीस तरी करआकारणीचे काम राज्य शासनाने करावे. सध्या ही राज्य सरकारे १५० कोटी रुपयांचा कर या खाती जमा करतात; त्यांच्याकडे आवश्यक ती यंत्रणा आहे. शेतीवर कर बसवणे न्याय्य होईल यात काही शंका नाही; पण याचा अर्थ नजीकच्या भविष्यकाळात कर बसवला जाईल असे नाही. राजकीय वातावरण तेच आहे. शेतकऱ्यांची कोडकौतुके चालूच आहेत. खते, वीज, डिझेल यांवर भरपूर अनुदाने दिली जात आहेत. मतपेटीकडे नजर ठेवणाऱ्या पुढाऱ्यांना ही परिस्थिती बदलता येईल अशी काही शक्यता नाही.'

ती अर्थशास्त्रज्ञ तीन वेगवेगळ्या पार्श्वभूमीचे. शेतीवर कर आकारणी कशी करावी याच्या तपशिलाबद्दल त्यांच्यात काही मतभेद आहेत. पण, शेतीवर कर न लावणे हा प्रचंड अन्याय आहे आणि तो लवकरात लवकर लावला गेला पाहिजे असे त्यांचे आग्रहाचे प्रतिपादन आहे. शेतीचे लाड आता पुरे झाले. इतर क्षेत्रांप्रमाणे शेतीनेही आता कराच्या बोजाचा योग्य तो भार उचलला पाहिजे असे मोठ्या साळसूदपणे, शहाजोगपणे तिघेही मांडतात.

सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनांत ही सगळी थोरामोठ्यांची चर्चा ऐकून, मोठा गोंधळ उडेल. शेतीतल्या कोणत्या उत्पन्नाविषयी एवढे खात्रीपूर्वक ही बडी मंडळी बोलत आहेत याचा त्यांना मोठा विस्मय वाटेल!

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांकरिता कधीही कोणत्याही सवलती, अनुदाने किंवा भिका मागितल्या नाहीत. 'देशातील इतर नागरिकांप्रमाणेच शेतकऱ्यांना सन्मानाने जगता यावे,' एवढीच त्यांची माफक महत्त्वाकांक्षा आहे. इतर सगळ्या नागरिकांवर कर लादला जात असेल, तर तो शेतकऱ्यांनीही दिला पाहिजे. देशात फुकटे म्हणून जगण्याची आमची इच्छा नाही, आयकर भरण्याचा आनंद आणि सौभाग्य आपणही अनुभवावा अशी आमची मोठी तहान आहे आणि मिळकतीवरील कर भरण्याकरिता का होईना, मिळकत असावी एवढंच आमचं मागणं, जास्त काही नाही.

एवढे मोठे मोठे अर्थशास्त्रज्ञ देशातच नव्हे, जगभर नामवंत झालेले, वेगवेगळ्या क्षेत्रांना समान न्याय लागू असावा असा आग्रह धरणारे. आजपर्यंत शेतीचे लाडकौतुक सोडाच, सावत्रपणे हाल झाले ते यांच्या गावीसुद्धा नाही. सरकारने आता कबुलीजबाब दिला आहे, यावरून जगात इतर कोणत्याही देशापेक्षा

हिंदुस्थानात उद्योगधंद्यांना अधिक संरक्षण दशकानुदशके राहिले आहे. हे केंद्रीय शासनाने अधिकृतपणे लोकसभेच्या समितीपुढे मांडले आहे.

गॅट करारावर सही करताना शासनाने शेतीवर दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांची उलटी पट्टी म्हणजे कर लावला, याचा कबुलीजबाब जगाच्या भर दरबारात दिला आहे, हे काय या विद्वानांच्या वाचनात कधी आलेच नसेल ? शेतीवर सर्व अप्रत्यक्ष करांचा बोजा तर पडतोच; पण त्यापलीकडे उणे (–) सबसिडीचा बहात्तर टक्क्याचा क्रूर कठोर भार शेतीवर लादण्यात आला आहे, हे अर्थशास्त्रज्ञांना प्रामाणिकपणे खरेच कधी समजलेच नसेल ? हे त्यांच्या कानी कधी पडलेच नसेल ?

शेतीवर कर आहे; एकूण उत्पादनावर बहात्तर टक्क्यांचा कर आहे. इतर क्षेत्रातील श्रीमंतांतील श्रीमंतांच्या वट्ट मिळकतीवर फक्त पन्नास टक्क्यांपर्यंत कर आहे. या सत्यस्थितीबद्दल सारे नामवंत अर्थशास्त्रज्ञ खरेच इतके निखालस निरागस राहिले आहेत ?

सगळ्या अर्थशास्त्रज्ञांत उणे सबसिडीच्या प्रश्नाबाबत मौन पाळण्याचे एक मोठे कारस्थान शिजले असावे. उणे सबसिडीबद्दल बोलणे त्यांना रुचत नाही, पचत नाही. सबसिडी मान्य केली, की आयुष्यभर त्यांनी मांडलेले अर्थशास्त्र खोटे होते याचा कबुलीजबाब द्यावा लागतो. इतकी वर्षे आपण शेतीसंबंधी बोललो, इतके लिहिले, जगभर मान्यता मिळवली, भरपूर कमाईही केली; हे सगळे करताना आपण जे बोललो, ते अडाणीपणाने तरी होते किंवा अज्ञानाने तरी किंवा खऱ्या परिस्थितीचा अंदाज असूनही, अप्रामाणिक भामटेपणाने लिहिले होते असा कबुलीजबाब देण्याची किमान सचोटीही अर्थशास्त्रज्ञांत नाही म्हणून त्यांनी 'मौनम् सर्वार्थ साधनम्'चा आधार घेतला आहे.

जुलै महिन्याच्या शेवटास नामवंत अर्थशास्त्रज्ञ वि. म. दांडेकर यांना कालाज्ञा झाली. मोठा उमद्या मनाचा, प्रतिभाशाली आणि प्रभावशाली मांडणी करणारा अर्थशास्त्रज्ञ; पण शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत घसरला. सबसिडीचे कट कारस्थान त्यांना उमगलेच नाही; म्हणून शेतीमालाला रास्त भाव देण्यापेक्षा रोजगार हमीचा विस्तार करण्याच्या आचरट योजनांचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. उणे सबसिडीची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यानंतर त्याची दखल घेणारे एक वाक्य काही त्यांच्या तोंडून निघाले नाही आणि गंमत अशी, की त्यांचे मृत्युलेख लिहिणाऱ्या पत्रकारांनी, 'दांडेकरांनी शरद जोशींविरुद्ध युक्तिवाद करण्याची हिंमत दाखवली,' याचेच तोंडभरून कौतुक केले. इतिहासाने दांडेकरांना खोटे पाडले

याचा कुणी उल्लेख केला नाही.

उणे सबसिडीचे भयानक सत्य बोलणे कोणाच इंडियावाल्यांना परवडणारे नाही. त्यांनी तरी का बोलावे? ज्यांच्या घरादाराची उणे सबसिडीने लूट झाली, त्यांनाच त्याची फारशी आच नाही, शेतकऱ्यांवरील उणे सबसिडीच्या लुटीतून धनदौलत, वैभव, मानमरातब इत्यादी मिळविणाऱ्या ऐतखाऊ इतरांना का असावी!

*(६ सप्टेंबर १९९५)*

◆◆

# उद्योजकाच्या वाटे :खाचखळगे, काटेकुटे

आर्थिक सुधारांचा बोलबाला सुरू झाल्यानंतर शेतीकडे अनेकांचे डोळे वळले आहेत. शेती म्हणजे गबाळ आाणि गावठी काम ही मार्क्सची भूमिका सर्वसाधारणपणे सगळयांच्याच मनात ठसलेली. उद्योगधंदा काढायचा किंवा व्यवसाय करायचा म्हणजे व्यापार करावा, निर्यात करावी, एखादा कारखानदारीचा प्रकल्प उभा करावा... या सगळयांसाठी पाहिजे तर बँकांचे कर्ज मिळवावे; सबसिडी तर अवश्य मिळवावी. उद्योजकता म्हणजे शहरी व्यवसाय अशी सर्वसाधारण समजूत स्वातंत्र्यकाळानंतर लोकांच्या मनात पक्की रुजविली होती.

**शेतीला प्रतिष्ठा**

गेल्या ४-५ वर्षांत परिस्थिती थोडी बदलू पाहत आहे. द्राक्ष बागायतदारांनी 'लंडनपार' घोडे नेले. ताजे गुलाब किंवा शुष्क पुष्पे परदेशी बाजारपेठेत जाऊ लागली, तेव्हा शेतीचीही थोडी प्रतिष्ठा वाढली. इतके दिवस बिगरशेतकरी माणसास शेती घेण्यासही मज्जाव होता. शिकलेले संपन्न शेतीच्या क्षेत्रात आले, तर ते जणू सगळ्या गोरगरीब शेतकऱ्यांचा चट्टामट्टा करून टाकतील असा कांगावा केला जाई. त्याऐवजी आता महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांकरितासुद्धा शेतीची कवाडे उघडू लागली आहेत. कंपनीच्या शेतीकरिता कमाल जमीनधारणेचा कायदा लागू नाही, कूळकायदा त्यांच्याकरिता बाजूला ठेवला जाईल, शेती-बिगरशेती ही भानगड त्यांना लागू राहणार नाही अशा गोष्टी बोलल्यातरी जाऊ लागल्या. अजून काही कोणी बहुराष्ट्रीय कंपनी शेतीच्या क्षेत्रात मोठी कामगिरी करून गेली आहे असे उदाहरण नाही. याउलट, शेतीमालावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रात अनेक देशी-विदेशी कारखानदार उतरत आहेत. त्यामुळे अगदी साध्या किराणा मालाच्या दुकानात उभे राहिले, तरी चणे-शेंगदाणे, चिवडा-चकल्या, चिप्स-चिजलिंग असे शेकडो पदार्थ दुकानात दिमाखाने बसलेले दिसतात. चटण्या,

पापड, लोणची, खाकरे यासारखे देशी टिकाऊ पदार्थ; इडली, डोसे असे पदार्थ झटकन घरच्याघरी तयार करता यावेत यासाठी लागणारी पिठे; ढोकळे, वडे असे तयार पदार्थ यांची मोठी गर्दी उसळली आहे. जॅम, सॉस ही विलायती तोंडवळ्याची टिकाऊ मंडळी, केक-पुडींग करण्याकरता लागणारे साहित्य आणि पिझ्झा, आईस्क्रीम यासारखे खाद्यपदार्थ त्यांच्याबरोबर मोठ्या दिमाखाने कोणत्याही ठिकाणी उभे दिसतात.

**शहरी गृहिणींची खाद्यप्रक्रिया**

माजघर शेतीचा कार्यक्रम संघटनेने जाहीर केला त्यामुळे काही ठिकाणी शेतकरी स्त्रियांनी कुरडया, पापड्या, शेवयांपासून थालीपीठ, चकल्या यांना लागणाऱ्या भाजण्या वगैरे वस्तू बाजारात आणल्या; पण या क्षेत्रातही शहरी महिलांनी जास्त आघाडी मारली. पदार्थ खरेदी करणारा ग्राहकवर्ग प्रामुख्याने शहरी; त्याच्या चव, रुची, गंध, स्वाद यांबद्दलच्या आवडी-निवडी शहरातील महिलांना अधिक चांगल्या माहीत. गावात ठेवणीचे पदार्थ करायचे म्हटले तरी उरलासुरला, पडका माल वापरला जातो. बाजारात जे बटाटे पाठवता येत नाहीत त्यांचा आम्ही कीस करतो. ती गोष्ट कैऱ्यांना लागू, लिंबांनाही व सर्वच भाज्या-फळांना. मुद्दाम चांगले पदार्थ घ्यावेत, ते केवळ टिकावे एवढ्याचकरिता नव्हेत, तर खमंग, स्वादिष्ट असावेत व आकर्षक दिसावेत याकरिता शहरी गृहिणी अखंड प्रयत्नात असतात. तयार खाद्यवस्तूंची बाजारपेठ शेतकरी महिलेपेक्षा शहरातील गृहिणीने ताब्यात घेतली हे याचे एक कारण.

**अन्न-प्रक्रियेकडे ओढा**

यापलीकडे शेतीमालाच्या प्रक्रियेच्या व्यवसायात प्रवेश करू पाहणारा असा एक नवा समाज पुढे येत आहे. यातील बहुतेक मंडळी वयाने तरुण म्हणजे चाळिशीच्या आतील. गाठीशी फारसा पैसा नाही. प्रत्येकाच्या गाठीस एखादी पदविका किंवा पदवी, क्वचित प्रसंगी अभियांत्रिकी, रासायनिक किंवा अन्न-प्रक्रियेच्या क्षेत्रातील. फार उच्च गुणांनी पदवी मिळवलेले या मंडळीत क्वचित आढळतात. बहुतेकांचा शेतीशी काही लागाबांधा आहे; पण शेतीचे दरवाजे त्यांना अनेक कारणांनी बंद झाले आहेत. शिकल्या-सवरल्यानंतर शहरातून गावी परत जाणे अनेक अर्थांनी कठीण असते. आहे त्या शेतीत जाऊन उदरनिर्वाहाची सोय कठीण, उलट आधीच असह्य भार झालेल्या जमिनीवर नवा अवघड भार वाढल्यासारखी स्थिती होते. नोकरीचे दरवाजे जवळजवळ बंद झालेले. म्हणजे स्पर्धा करून नोकरी मिळवण्याची फारशी कुवत नाही. चांगली बँकेतली, सरकारी

नोकरी मिळत असती तर यातील काही मंडळी तरी उद्योजक होण्याच्या नादाला लागली नसती. शेतीचा व नोकरीचा धोपटमार्ग सोडून उद्योजकत्वाची वहिवाट नसलेली बिकट वाट त्यांनी धरली ती, पुष्कळशी, पर्याय नाही म्हणून.

**सल्लागारांचा भूलभुलय्या**

मारून मुटकून का होईना; पण उद्योजक व्हायचे ठरले. जागेची सोय आहे; थोडेफार ज्ञान आहे. पाचपन्नास हजार रुपये म्हटले तर उभे करता येतात; पण नेमके कोणत्या दिशेला जावे हे त्यांना समजत नाही. कशाचे उत्पादन करावे, त्यासाठी कच्चा माल कसा मिळवावा, तंत्रज्ञान कोणते वापरावे, बाजारपेठेसाठी तो माल आकर्षक कसा करावा आणि देशी-विदेशी बाजारपेठेत तो कसा खपवावा ? याची त्यांना फार थोडी कल्पना असते. याविषयी कोणी मार्गदर्शन करेल का ? कोणी सल्ला देईल का ? याची ते मोठी डोळ्यात प्राण आणून वाटत पाहत असतात.

बहुधा याच कारणाने अलीकडे जिकडेतिकडे शेती आणि प्रक्रिया उद्योग यांना सल्ला देणारे व मार्गदर्शक उदंड झाले आहेत. जिकडेतिकडे शेतीची प्रदर्शने भरतात. फळे, भाजीपाला, फुले यांच्या उत्पादनासंबंधी रोज नवी-नवी पुस्तके येत आहेत. आधुनिकतम तंत्राने शेती कशी करावी व कापणी-मळणीनंतर प्रक्रिया इ. उद्योग कसे चालवावे यासंबंधी गावोगावी परिसंवाद, कार्यशाळा, प्रशिक्षण शिबिरे चालू आहेत. उद्योगार्थी मोठ्या आशेने अशा ठिकाणी जमतात. मोठ्या तन्मयतेने व श्रद्धेने मार्गदर्शकांचे बोल टिपून घेतात. आपल्याकडे कोणी शास्त्रज्ञ, उद्योजक थोडाच भेटणार आहे. संबंधित विषयावरील दोनचार इंग्रजी पुस्तके पाहिलेला, काही प्रायोगिक शेतीचा वसा घेतलेला, एखाद्या उद्योजकाचा स्पर्श झालेला - तोही चुटपूट. काही मार्गदर्शक सल्ला देणाऱ्या संस्था चालवतात किंवा अशा संस्थांत नोकरी करतात. काही दुसरे यंत्रसामग्री इत्यादींचे कारखानदार किंवा वितरक असतात. बोलतानाचा त्यांचा थाट मात्र सर्वज्ञाचा ! ''सर्व गोष्टींना सोडून मला शरण या, मी तुम्हाला तारून नेण्यास समर्थ आहे, ऐहिकच नव्हे तर पारमार्थिक यशाचा मार्ग मी तुम्हास दाखवतो,' अशी कृष्णार्जुनसंवादी भाषा ते वापरतात. हे परिसंवाद, कार्यशाळा पंचतारांकित विश्रामालयांच्या वातानुकूलित सभागृहात होवोत का आडोशापुरते उभारलल्या मांडवात होवोत. यांची वेशभूषा साहेबी. मराठी बोलण्यात आपल्याला खूपच त्रास पडतो असा एकूण आव; पण पाऊण तासाच्या एकूण बोलण्यात बिनचूक इंग्रजी वाक्यांची संख्या एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकी. हे दृश्य पाहिले, की नव्याने उद्योजक होऊ पाहणाऱ्या या तरुण मंडळींच्या भवितव्याविषयी मोठी चिंता वाटू लागते. अशा मंडळींशी

बोलण्याचा प्रसंग बऱ्याच वेळा येतो आणि एक मोठी भीती वाटते.

### उद्योजकतेचा अर्थ

कारखानदारी करण्याच्या उत्साहाने आणि ऊर्मीने अनेक तरुण गेल्या पन्नास वर्षांत पुढे सरसावले आणि समाजवादी अर्थव्यवस्थेत त्यांचा फज्जा उडाला. लायसेन्स-परमिट व्यवस्थेत नावाचे कारखानदार प्रत्यक्ष सरकारी आधिपत्याखालील मॅनेजर आणि तेही वेगवेगळ्या इन्स्पेक्टरांच्या पलटणींसमोर झुकून झुकून सलाम घालणारे अशी त्यांची परिस्थिती झाली. या नवीन पिढीच्याहीबाबत असेच घडले, तर मग काय होईल? उद्योजकता म्हणजे नोकरी न करणे, उद्योजकत्व म्हणजे थाटमाट व अफाट उत्पन्न अशा कल्पना घेऊन ही मंडळी बाजारपेठेत उतरली, तर त्यांचा चट्टामट्टा करायला अनेक लांडगे तयार बसलेले आहेत.

उद्योजकता म्हणजे काय ? याची व्याख्या आत्म्याच्या व्याख्येप्रमाणे 'नेति नेति' म्हणजे 'हे नाही ते नाही' अशी द्यावी लागेल किंवा भगवत्गीतेतील स्थितप्रज्ञाच्या व्याख्येप्रमाणे ज्याला सुख-दुःख, शीत-उष्ण यांचे सोयरसुतक नाही, जो आनंदाने मोहरून जात नाही व दुःखाने गांगरून जात नाही, जो सदासर्वकाळ सर्व चित्तवृत्ती जागृत ठेवतो, योग्य वेळी योग्य ते निर्णय घेतो; पण फलाच्या आकांक्षेविषयी निःस्पृह राहतो अशी काहीतरी द्यावी लागेल. एक गोष्ट नक्की, की उद्योजक बनण्याचा काही फॉर्म्यूला किंवा मूस नाही. गणपती यायच्या आधी गाव-गल्लीतील ठराविक मुशीतून एकसारख्या आकाराच्या गणपतीच्या मूर्ती पाडणारे पेठा स्थापतात. उद्योजक कोणत्याही ठशातून तयार होत नाही. उद्योजक म्हणजे गणपतीचा मूळ ठसा बनविणाऱ्या शिल्पकारासारखा असतो. गणपतीची मूर्ती कशी असते याचा पक्का अभ्यास असतो; पण नव्याने जी मूर्ती घडवायची, त्यात सगळेच काही नवीन, ते त्याने आपल्या कलेच्या व आत्मविश्वासाच्या आधाराने घडवायचे असते.

### सतीचे वाण

मी आपल्या पायावर उभा राहीन, स्वतंत्रपणे मानाने जगेन, दोन वेळा फाके पडले, तरी चालतील; पण पोटाची खळगी भरण्याकरिता काहीतरी पाट्या टाकण्याचे काम करणार नाही अशी बेदरकारपणाची मानसिकता उद्योजक होण्यासाठी आवश्यक आहे. कलाकारात असा कलंदरपणा आढळतो. आध्यात्मिकात अंगावरील कपड्याचे भान नसलेले अवधूत असतात. कलाकार व अवधूतांपेक्षाही उद्योजक ही वरची श्रेणी आहे. आजूबाजूच्या संपूर्ण परिस्थितीचे संपूर्ण ज्ञान, विज्ञान व त्यासाठी

लागणारे तंत्रज्ञान, दूरदृष्टी, हिशेबीपणा व सर्व असूनही सगळेच झुगारून देण्याची तयारी असे हे उद्योजकतेचे रसायन आहे. माकडापासून माणूस झाला, त्याच सुरावर माणसातून उद्योजक तयार झाला, असे म्हणावे इतके हे उद्योजकतेचे रसायन खास आहे.

दुर्दैवाने भारतात उद्योजकत्वाला आजपर्यंत कधी फारशी प्रतिष्ठा मिळाली नाही. वर्णव्यवस्थेत उद्योजक हे सर्व वैद्य किंवा शूद्र मानले जात. मुसलमानी दरबारात कलावंतांना मान होता. बिदागी होती; पण दरबाराबाहेर नाही. इंग्रजांच्या काळात काही जमातींनी उद्योगधंदे उभारले, त्यांच्याविषयी प्रतिष्ठित समाजाची भावना उपेक्षेचीच नाही, तर तुच्छतेची होती. फायदा मिळवणारे ते सारे तुच्छ ही स्वातंत्र्योत्तर काळातील पंडित नेहरूंपासून खालपर्यंत सर्वांचीच भावना.

उद्योजकतेचे रोपटे खुल्या हवेत चांगले वाढते, फुलते व फळते; समाजवादी किंवा हुकूमशाही वातावरणात ते कोमेजून जाते. रशियाच्या अवतीभवतीच्या सर्व देशांतील नागरिकांचा हा अनुभव आहे. कोणत्या तरी एका पाळीला नेमून दिलेल्या कामाच्या जागी जावे, ठराविक काम करावे, घरी परत यावे, दीड-दोन खोल्यांची जागा, जे सरकार देईल, त्यात समाधान मानावे. आठवड्याला दोनऐवजी तीन अंडी मिळू लागली, तर समाजवादाच्या अंतिम विश्वविजयाची ती द्वाही असल्याची डिंग मारावी... असे खुरटलेले आयुष्य काढलेल्यांना उद्योजक बनायचे कसे जमावे ? पंख कापलेल्या पक्ष्यांसारखी त्यांची स्थिती. पिंजरा उघडून दिला तरी पंख पसरून भरारी घेणे त्यांना शक्य नाही.

**उद्योजकतेस मारक वातावरण**

भारताचा पन्नास वर्षांचा समाजवादी अनुभव इतका जालीम व जुलमी नव्हता हे खरे; पण उद्योजकांचे पंख छाटण्याचे काम झाले. शेतीत तर झालेच. शेतीसंबंधी उद्योग काढायचा म्हणजे पाचपन्नास शेतकऱ्यांना गोळा करून, थोडे भांडवल जमा करायचे. सरकार दरबारी लटपटी करून मान्यता व वित्तपुरवठा करायचा. त्यानंतर तंत्रज्ञान सरकारी, भांडवल, सामग्री सरकारी, सगळे व्यवस्थापन सरकारी अशा तऱ्हेच्या कारखानदारीचे कर्णधार सरकारमहर्षी, उद्योगमहर्षी म्हणून गाजले. या अशा परिस्थितीत या नवीन तरुणांचा निभाव कसा काय लागायचा?

शेतीतील काम संपले, म्हणजे कापणी, मळणी झाली, की शेतकरी माल बाजारात घेऊन जातो. फारच थोडे शेतकरी माल साठवून बाजारातील किमती वधारण्याची वाट पाहू शकतात. माल टिकाऊ असो की नाशवंत असो, शेतकऱ्याला माल बाजारात नेण्याची मोठी घाई होते.

बाजारात शेतीमालाला भाव मिळत नाही याची अनेक कारणे आहेत; पण त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीमालाला भाव जाणीवपूर्वक पाडण्याचे सरकारी धोरण. जोपर्यंत सरकारच शेतकऱ्यांविरुद्ध आहे तोपर्यंत उद्योजकता दाखवूनही फारसा उपयोग नाही.

**तोंडी आलेला घास**

पाच वर्षांपूर्वी काँग्रेस शासनाने खुल्या व्यवस्थेकडे जाण्याची घोषणा केली. शेतकऱ्यांच्या मनात आशा पल्लवित झाली. सरकारचा बाजारपेठेतील हस्तक्षेप संपला तर शेतीमालाला भाव मिळेल. हातात दोन पैसे राहतील, त्यातून शेतीची सुधारणा करता येईल. अधिक पीक घेता येईल. त्यातून अधिक पैसा मिळेल. त्यातून काही व्यापार, कारखानदारी उभी करता येईल आणि अशा तऱ्हेने हजारो वर्षांपासून शेतकऱ्यांच्या मागे लागलेले दैन्य फिटेल अशी सुखद स्वप्ने शेतकरी पाहू लागतात न लागतात, तोच त्यांच्या लक्षात आले की नेता-तस्कर, गुंड-अफसर, डावे, उजवे, मध्यममार्गी, मंडल-मंदिरवाले सरेच सरकारशाहीच्या बाजूने व बळिराज्याच्या विरुद्ध दंड थोपटून उभे आहेत. समाजवाद संपला; पण समाजवादाच्या निमित्ताने उभी झालेली नोकरशाही, नियम व कायेकानूनची यंत्रणा शाबूत आहे. ती टिकवून ठेवण्याकरिता देशातील सर्व ऐतखाऊ दंड थोपटून सज्ज झाले आहेत. आज तरी त्यांचीच सरशी होत आहे असे दिसत आहे. तेव्हा शेतीमालाच्या संबंधाने उद्योगधंदे करू इच्छिणाऱ्यांना पहिली धोक्याची सूचना-सरकार कधी नेहरूव्यवस्थेकडे जाईल हे सांगता येत नाही. यंदा विनाकारणी गव्हाची आयात करण्याचे सरकारने ठरवलेच आहे. हे असे वारंवार घडू लागले, तर शेतीसंबंधित उद्योग इतका धोकादायक होईल, की सरकार दरबारी सज्जड वशिला असल्याखेरीज तो करणे अशक्य होईल.

**शेतीच उद्योग व्हावा**

शेतीउद्योगाचे थोडक्यात स्वरूप काय? माल पिकतो तिथे विकत नाही आणि जेव्हा पिकतो तेव्हा खपत नाही, ही दोन साधीसुधी तत्त्वे आहेत. शेतीउद्योजकाचे काम म्हणजे माल जिथे पिकत नाही त्या जागी नेणे किंवा जेव्हा माल पिकत नाही त्या वेळी तो उपलब्ध करून देणे.

आपल्याकडे पिकणारा माल उत्तरेत पिकत नाही. दक्षिणेत तयार होत नाही, मग तो तेथील बाजारपेठेत नेणे हा अगदी प्राथमिक शेतीउद्योग. दुसरीकडे माल न पाठवता आपल्याकडे तो साठवून ठेवणे आणि टिकून राहावा यासाठी आवश्यक तर त्यावर काही प्रक्रिया करणे, ही अशीच प्राथमिक उद्योजकता. माल देशाच्या

हद्दीच्या बाहेर निर्यात करणे हे त्यामानाने बरेच कठीण आणि नाजूक काम आहे. परदेशात नाशवंत मालाची निर्यात होऊ शकते तशीच टिकाऊ मालाचीही निर्यात होऊ शकते. स्थानिक बाजारपेठ, दूरच्या बाजारपेठा आणि परदेशी बाजारपेठा यांना नाशवंत, टिकाऊ किंवा प्रक्रिया केलेला माल पोहोचविणे हे शेतीउद्योगाचे मूळ स्वरूप.

माल एका जागेहून दुसऱ्या जागी हलविला तर त्याची किंमत वाढते. एका काळातून दुसऱ्या सुयोग्य काळी उपलब्ध केला तरी किमतीत वाढ होते आणि निसर्गदत्त स्वरूपापेक्षा अधिक उपयुक्त स्वरूपात माल बाजारपेठेत नेला, तर त्यासाठी ग्राहक अधिक पैसे मोजायला तयार होतात. सुयोग्य जागी सुयोग्य वेळी माल उपलब्ध करणे यासाठी सगळ्या बाजारपेठेचा चांगला बारकाईचा अभ्यास असला पाहिजे. वाहतूक केल्याने वा साठवणूक केल्याने हातात काय अधिक पडेल व त्यासाठी येणारा खर्च लक्षात घेतला तर हातात काय पडेल याचा कसोशीने हिशेब करावा लागतो व पार पाडावा लागतो.

**मारक संतुष्टता**

अलीकडे फळे आणि फुले परदेशांत निर्यात करण्याचा प्रयत्न अनेकजण करीत आहेत. काही जणांनी त्यात मोठे यश मिळवलेले आहे. आता आपल्याला या निर्यात व्यापाराच्या यशाची गुरूकिल्ली समजली, तोच अनेकांच्या बाबतीत त्यांनी उभा केलेला सगळा प्रपंच कोसळून पडत आहे. महाराष्ट्रातील द्राक्षांची बाजारपेठ कसोशीने स्पर्धा करून दुसरे देश बळकावू पाहत आहेत. अपयश का आले हे तपासणे महत्त्वाचे असतेच; पण त्याहीपेक्षा अकस्मात यश का मिळाले याचे कठोर विश्लेषण करणे महत्त्वाचे असते. हिंदुस्थानातील शेतीमालाला बाहेरच्या विकसित देशांत चांगली बाजारपेठ आहे. चांगल्या गुणवत्तेचा माल सातत्याने पुरवत राहिले तर हाती लक्ष्मीच आली असा फाजील विश्वास तयार होतो. देशांतर्गत बाजारपेठा मजबूत करणे यशस्वी निर्यातीसाठी आवश्यक आहे. दुर्दैवाने निर्यात क्षेत्रास 'आधी कळस मग पाया रे' असे प्रयत्न झाले आणि आता कोसळलेल्या कळसाखाली चेंगरलेल्यांचा आक्रोश ऐकू येत आहे.

**'सुपर मार्केट'चे महत्त्व**

देशभर बाजारपेठांचे जाळे विणण्याकरिता 'सुपर मार्केटचे जाळे अत्यंत मोलाचे ठरते. पाश्चिमात्य विकसित देशांच्या आश्चर्यजनक प्रगतीचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे तेथील किरकोळ विक्री केंद्रांची अशी जाळी. महाराष्ट्रातील द्राक्षे मोठ्या प्रमाणावर खरीदणारी 'मार्क्स् आणि स्पेन्सर' ही अशीच एक व्यवस्था. ''गरिबांसाठी

मार्क्स् आणि एंजल्स या समाजवादाच्या अध्वर्यूंनी काहीच केले नाही इतकी कामगिरी 'मार्क्स् आणि स्पेन्सर' दुकानांनी केली, ''अशी टिप्पणी प्रख्यात व्यंगकार जॉर्ज मिकत्से यांनी केली. दुकानांची जाळी विणायची अजून येथे सुरवात झाली नाही, तोपर्यंत आपला निर्यातीचा खटाटोप कधी उभा राहणार, कधी कोसळणार असाच असणार. कच्च्या मालावर प्रक्रिया करून, त्यातून काही ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणे हा शेतीउद्योगातला सर्वांत महत्त्वाचा विभाग. बहुतेक नवे तरुण उद्योजक या क्षेत्रात जाण्याची धडपड करत आहेत.

**गुणवत्ता महत्त्वाची**

'खाता येईल तितके खावे, नाही त्याचा मोरंबा घालावा' चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी प्रक्रिया व्यवसायांचे स्वरूप असे होते. बाजारात न खपण्याइतके पिकले तर माल प्रक्रिया करून साठवून ठेवावा. 'Eat what you can and can what you can't' असे या व्यवसायाचे स्वरूप फार झपाट्याने बदलले. ऊस उरतो म्हणून साखरेचे कारखाने निघाले, पण लवकरच साखर कारखान्यांना पुरवठा पडावा म्हणून उसाच्या खास बियाण्यांची लागवड, कसोशीने मशागत, शास्त्रीय व्यवस्थापन, वाढता पाणीपुरवठा आणि पसरती लागवड असा मोठा पसरता कार्यक्रम हाती घ्यावा लागतो. लागवड आणि मशागत यांच्यावर ताबा ठेवल्याखेरीज चांगली गुणवत्ता सातत्याने टिकवणे शक्य होणार नाही. जॉर्ज फर्नांडिस व त्यांच्यासारख्या अनेकांना बटाट्यांच्या काचऱ्या (वेफर्स) तयार करणे म्हणजे पोरखेळ वाटतो. काचऱ्या करणे म्हणजे बाजारात मिळतील ते बटाटे घेऊन चकत्या करून मिळेल त्या तळणातून काढणे नव्हे ! तर, त्यासाठी विशिष्ट जातीच्या बटाट्यांची लागवड करावी लागते. बटाटे शेतात असताना उष्णतामान ठराविक मर्यादेत राहील यासाठी जीवाचा आकांत करावा लागतो. तर तळण्याचे उष्णतामान १८७° से. की १८७.५° से. असावे, तळणीत काचऱ्या किती सेकंद राहाव्यात, त्यात त्या किती वेगाने फिराव्यात व त्यातून त्या बाहेर पडल्यानंतर व त्यांतील स्निग्ध पदार्थ ओढून किंवा फुंकून टाकावा हा एक सगळा मोठा खटाटोप आहे.

**निसर्ग देतो, अव्यापार नेतो**

आपली शेती दरिद्री आहे व मागासलेली आहे, म्हणजे येथे भांडवलाचा तुटवडा व त्याबरोबर तंत्रज्ञानाचा जुनाटपणा आहे. तरीही, निसर्गाची मेहरबानी अशी, की भांडवलसंपन्न देशातील फळांची, गुणवत्तेत बरोबरी करणारी फळे आम्ही पिकवू शकतो. फरक एवढाच, की भांडवलसिद्ध शेतीत ८० % च्या वर

अत्युच्च गुणवत्तेचा माल निघेल, तर आमच्या दरिद्री शेतीत हे प्रमाण २० % चे असेल. सर्वोत्तम गुणवत्तेची फळे १/५, त्याखालच्या गटातील १/५, मध्यम १/५, बऱ्यापैकी १/५ व कनिष्ठ दर्जाची १/५ अशी आपणाकडील फळांची वर्गवारी निसर्गाच्या प्रभावानेच होते. यांतील २० % आम्ही करू शकू; पण उरलेली ८० % देशात खपवायची सोय झाली तरच हा धंदा किफायतशीर होईल.

**ग्राहक हाच राजा**

परदेशी खरेदीदार आपल्या गिऱ्हाइकांचे कल्याण बघतात. त्यांना माल खपविण्यासाठी वेगवेगळया देशांतील शेतकऱ्यांच्या रांगा लागल्या आहेत. त्यांना एकमेकांविरुद्ध खेळवून जास्तीच जास्त चांगला माल कमीत कमी किमतीत संपादन करणे हे त्यांचे कामच आहे. हिंदुस्थानातही मोठे कारखानदार सुटे भाग पुरवणाऱ्या कारखानदारांत एकमेकांत लढत लावून फायदा मिळवतात, त्यातलाच हा प्रकार

**उसने तंत्रज्ञान, अपयशाचे कारण**

आपल्याला डावलून दुसऱ्या देशाचा माल परदेशी खरेदीदार भरू लागले, तर त्यातील मोठा भाग तरी देशातील बाजारपेठेत रिचवण्याची शक्यता तयार केली पाहिजे.

भारतात प्रक्रिया करणारे कारखानदार क्वचितच लागवडीवर ताबा ठेवतात. ते बहुधा बाजारात जो काही कच्चा माल मिळेल, तो खरेदी करतात. अशा प्रक्रिया कारखानदारीतून नामवंत माल तयार होण्याची काही शक्यता नाही. उत्पादन करायच्या मालाचे स्वरूप काय असावे ? आपल्या परंपरेत स्वादिष्ट, रुचकर आणि दिसायला आकर्षक असे पदार्थ नाहीत असे नाही; पण विजेत्यांच्या परंपरांनाच काय खाद्यपदार्थांनाही प्रतिष्ठा येते व जितांचे सर्व काही कुचेष्टेचा विषय होतो. या नियमानुसार बिस्किटे महद्‌पदाला चढली, चिरोटी गावंढळ ठरली; केकचा बडेजाव वाढला, अनारशांना कोणी विचारेनासे झाले. प्रक्रिया उद्योजकांमध्ये, काही किरकोळ अपवाद सोडल्यास, विलायती तोंडवळयाचे पदार्थ करण्याचीच विशेष घाई दिसते. त्यासाठी लागणारी माहिती, तंत्रज्ञान सारे काही तयार विकण्यासाठी मोठ्या नामवंत कंपन्याही उभ्या ठाकल्या आहेत. आजपर्यंतचा उद्योजकांचा अनुभव असा आहे, की त्यांच्या सल्ल्याने चालले तर कारखाना कदाचित चालेल ना चालेल, फायदा कदाचित मिळेल ना मिळेल; पण शेवटी तंत्रज्ञान व यंत्रसामग्री पुरवणारांचेच उखळ पांढरे होते. कारखानदार तसेच कोरडे राहून जातात. दुसरा कोणी येईल, आपला कारखाना बांधून देईल

व अशाने आपण कारखानदार बनू शकू, ही भाबडी कल्पना नव्या उद्योजकांनी मनातून समूळ काढून टाकली पाहिजे. उद्योजक बनायचे म्हणजे पैशाचा प्रश्न आलाच. भांडवल कोठून व कसे उभे करायचे, याकरिता चारी दिशांचा वेध घेणाऱ्या उद्योजक उमेदवारांना सरकारी सबसिडीच्या योजना कळतात आणि त्यांना मोठा मोह पडतो. तेलाची गिरणी घाला म्हणजे इतकी सबसिडी, ग्रामोद्योग स्वीकारा म्हणजे ५० % सबसिडी असल्या भुलभुलय्यात उद्योजक सहज सापडतात. एखादा औद्योगिक प्रकल्प सरकारी योजनेनुसार सबसिडी मिळावी इतका रुळलेला असला तर बाजारपेठेत तो मोठा यशस्वी होण्याची शक्यता अगदी नगण्य आहे.

**सरकारी हात, करी उद्योगाचा घात**

राष्ट्रीयीकृत बँकाही त्यांच्या बाबू लोकांमार्फत वित्त पुरवठा करण्याचे आश्वासन देतात. एखादा प्रकल्प बाबू लोकांना समजण्याइतका जनमान्य झाला, की त्यात नवलाई काही उरत नाही. बाजारपेठेत साऱ्या स्पर्धेला तोंड देऊन असले उद्योग टिकतील, ही शक्यता खोटीच.

शेतीप्रक्रियेच्या उद्योगात प्रवेश करू इच्छिणाऱ्या तरुणांना आणखी एक धोक्याचा कंदील दाखवणे आवश्यक आहे. सहकारासंबंधी आमच्याकडे मोठे काव्य ऐकवले जाते. 'विना सहकार नही उद्धार,' अशा काव्यपंक्ती ऐकल्या, की शेतकरी समाजातील तरुणांचेही चित्त थाऱ्यावर राहत नाही. शेतकऱ्यांनी सहकारी संस्था काढायच्या आणि बिगर शेतकऱ्यांनी कंपन्या काढायच्या असे हे द्वैत आहे. सहकाराविषयी टीकाटिप्पणी करण्याचे येथे काही प्रयोजन नाही; पण अगदी थोडक्यात सांगायचे म्हणजे सहकार नावाची चीज काही या देशात नाही. सहकाराच्या नावाखाली राज्यकर्त्या पक्षाच्या पुढारी मंडळींना सरकारी देखरेखीखाली पोसण्याची एक यंत्रणा आहे. या मंडळीत आपलाही प्रवेश होईल व एक दिवस आपणही सहकारमहर्षी किंवा उद्योजक होऊ, काही नाही तर निदान सहकारी क्षेत्रात मिळणाऱ्या सबसिडीचा एक लहानसा हिस्सा आपल्या हाती आला, तरी आपली अडचण भागून जाईल अशा आशेने भलेभले कर्तबगार या सहकाराच्या गुहेत गेले. त्यांची जातानाची पावले दिसली, येतानाची पावले कोणी पाहिलीच नाहीत.

शेतकरी तरुण फार वर्षांनी उद्योजक बनू पाहत आहेत. त्यांच्या वाटेत अनेक खाचखळगे, काटेकुटे आहेत. बाजूला मोह दाखवणारी अनेक मायावी रूपे आहेत आणि अक्राळविक्राळ जबडा पसरून बसलेले महाराक्षसही आहेत. परदेशी आराखड्याचा माल, परदेशी तंत्रज्ञान, ती पुरवणारे घाऊक मध्यस्थ, सरकारी

सबसिड्या व सरकारी बँकांचा वित्तपुरवठा या मार्गाने गेल्या ५० वर्षांत अनेक होतकरू छोट्या उद्योजकांचे वाटोळे झाले. छोट्या उद्योजकांचा विनाश करणारी तीच मंडळी शेतीउद्योजकाकडे हपापलेल्या नजरेने पाहत आहेत. या उद्योजकांच्या उपक्रमात यश येण्याची चिन्हे आज तरी काही मोठी आशादायक वाटत नाहीत.

*(६ जानेवारी १९९७)*

◆◆

# केंद्रीय अर्थसंकल्प :१९९७
# तारा की धूमकेतू ?

दरसालप्रमाणे २८ फेब्रुवारी रोजी वित्तमंत्र्यांनी लोकसभेत अंदाजपत्रक सादर केले आणि एक नवा तारा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर उदय पावला.

दरसालप्रमाणे वित्तमंत्री आपली प्रसिद्ध काळी ब्रीफकेस घेऊन आले. पत्रकार, फोटोग्राफर, टीव्हीवाले यांचा गराडा पडला. कॅमेऱ्यांचे दिवे चकाकले. वित्तमंत्री आपले भाषण करण्यासाठी उभे राहिले, त्या वेळी असे काही घडणार आहे अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती.

उद्योगधंद्यात मंदी, शेअर बाजार चलबिचल झालेला, पेट्रोलचे संकट आ वासून उभे राहिलेले, सरकारी नोकरांच्या पगारवाढीचा प्रश्न पिस्तूल रोखून उभा. हे प्रश्न वित्तमंत्री कसे हाताळतील याबद्दल उत्सुकता होती आणि चिंताही होती.

वाहतूक, संचार, ऊर्जा, शिक्षण, प्रशासन, सेवा या सगळ्याच पायाभूत संरचना डळमळीत झालेल्या अथवा कोसळलेल्या. परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान मिळवल्याखेरीज संरचना सावरता येत नाहीत हे उघड आहे; पण समाजवादाच्या कालखंडात माजलेले कायदेकानूंचे आणि अकार्यक्षमतेचे जंगल जोपर्यंत आहे, तोपर्यंत कोणालाही येथे येण्याचे आकर्षण काय म्हणून वाटावे? आम्हाला पेट्रोल, खतापासून ते लिपस्टिक, डिस्को कॅसेटपर्यंत हरेक वस्तू आयात करण्याची गरज; पण ते मिळवण्यासाठी बदल्यामध्ये जगाला देण्यासारखे आमच्याकडे काही नाही. नोकरशाहीची काटछाट केल्याखेरीज उद्योगधंदे जगू शकत नाहीत आणि काटछाट केली, तर नोकरशहा आणि त्यांचे समर्थक डावे आक्रोश करणार.

अशा या संकटांच्या चक्रव्यूहात संयुक्त आघाडीचे सरकार सापडलेले. तेरा

पक्षांची आघाडी. एकाचा पायपोस एकाच्या पायात नाही आणि देशापुढील प्रश्न सोडविण्यासाठी दंड थोपटून बसलेले तेरा पक्ष. अभिमन्यू चक्रव्यूहात शिरावा तशी वित्तमंत्र्यांची स्थिती.

अंदाजपत्रक सादर केल्यानंतर ते मंजूर होण्याच्या आधीच संयुक्त आघाडीचे सरकार पडेल अशी अनेकांची अपेक्षा होती. खुलीकरण तर करणे आहे आणि डावे पक्ष त्याला विरोध करण्यासाठी सज्ज आहेत... अशा परिस्थितीत अंदाजपत्रक लोकसभेसमोर आले.

आश्चर्य घडले ते हे, की चक्रव्यूहात अभिमन्यू अजून जिवंत आहे. देशापुढील आर्थिक संकट सोडवण्याचा काही मार्ग वित्तमंत्र्यांनी दाखवला आहे असे नाही; पण एवढे मात्र निश्चित, की २८ फेब्रुवारीच्या सकाळी संयुक्त आघाडीचे सरकार जसे होते, त्यापेक्षा त्याच दिवशी संध्याकाळी ते मोठे मजबूत झाले आहे. शेअर बाजारात अंदाजपत्रकाचे स्वागत झाले; उद्योजकांनी स्वागत केले. आरोग्य, विमा क्षेत्रात खासगी भांडवलाला प्रवेश देणे एवढा एक मुद्दा सोडला, तर डाव्यांना आणि नोकरदारांना अंदाजपत्रकाविरुद्ध मोठी तक्रार करायला जागा राहिली नाही. अंदाजपत्रक चांगले आहे हो; पण एवढा पैसा वित्तमंत्री आणणार कोठून, एवढीच तक्रार कम्युनिस्ट पक्षाचे नेते करत आहेत. उद्योजक आणि व्यापारी कंपन्यांवर कमरतोड करवाढ वित्तमंत्र्यांनी केली असती, तर हे डावे मोठे खुश होऊन थयथया नाचले असते.

अंदाजपत्रकाचे थोडक्यात वर्णन 'छप्परफाड अंदाजपत्रक' असे करता येईल. म्हणजे 'जो जे वांछील तो ते लाहो.' यात शेतकरी, स्त्रिया, वृद्ध, गरीब, नोकरदार अशा प्रत्येकासाठी सरकारी अनुदानांची तरतूद आहे; कल्याणकारी योजनांची मोठी यादी आहे. बरे, यासाठी कोणाला काही बोचेल अशी करआकारणीही नाही. मिळकतीवरील कर सगळे कमी केलेले; आयातशुल्के कमी केली; कंपन्यांच्या फायद्यावरील करात मोठी घट; एक्साइज आकारणी सोपी केलेली, कमी केलेली. कर वाढले म्हणावे तर ते फक्त विडीसिगारेटवर. त्यांच्याबद्दल विशेष सहानुभूती कोणालाच नाही. हे गौडबंगाल आहे काय ?

वित्तमंत्र्यांनी या अंदाजपत्रकात दोन अगदी अनोख्या गोष्टी केल्या आहेत. करांचे दर कमी केल्यामुळे कर चुकवण्याचे प्रमाण कमी होते, हा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे प्रत्यक्षात दर कमी केल्यामुळे वसुलीची रक्कम वाढते असा अनुभव आहे. वित्तमंत्र्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. मोठ्या शहरात ज्यांची काही मालमत्ता आहे – चारचाकी वाहन आहे, टेलिफोन आहे

किंवा आकारणीच्या वर्षात ज्यांनी परदेशी प्रवास केला आहे... अशा सर्वांना करआकारणीचे पत्रक भरणे आवश्यक केले आहे. या अटींची यादी वित्तमंत्री जेव्हा वाचत होते तेव्हा सभागृहात हास्यकल्लोळ उठत होता. करांसंबंधीच्या प्रस्तावाचे असे स्वागत झाले, याची गिनीज बुकातच नोंद करायला पाहिजे. क्रमाक्रमाने ही अटींची यादी वाढवता येईल आणि सक्तीचे करपत्रक मोठ्या शहरांप्रमाणे जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या गावांपर्यंत आणता येईल. दुचाकी वाहने, टेलिव्हिजन अशा वस्तूंच्या मालकीच्याही अटी वाढवता येतील. करपात्र इसमांची यादी वाढवण्याचा हा उपाय हा मोठा मुत्सद्देगिरीचा आहे. शिवाय, शेतीउत्पन्नावर कर लावावा की न लावावा, हा वादच वित्तमंत्र्यांच्या प्रतिभाशाली योजनेने मुळात खोडून टाकला आहे. स्वतः शेतकरी म्हणवणाऱ्या; पण बिगरशेती उत्पन्नावर शहरात राहणाऱ्यांना आता करपत्रक भरणे सक्तीचे होईल.

याखेरीज, एक्साइजसंबंधी एका तरतुदीत करआकारणी सरळ उत्पादन–क्षमतेशी जोडून दिली आहे. ही योजना अधिक व्यापक केली, तर कारखानदारांच्या मागील अधिकाऱ्यांचा जाच आणि भ्रष्टाचार कमी होईल. एवढे सगळे करून वित्तीय तूट साडेचार टक्के म्हणजे मर्यादेच्या आत राहिली आहे. रिझर्व्ह बँकेकडून हातउचल करण्याच्या पद्धतीवरही आपणहून नियंत्रण घालण्यात आले. मग हे सारे जमणार कसे? वित्तमंत्री आत्मविश्वासाने म्हणतात ,की त्यांच्या प्रस्तावामुळे करवसुली निदान १६ टक्क्यांनी वाढेल, उद्योगात उत्साहाचे वातावरण तयार होईल, उत्पादन वाढेल, त्यामुळेही करआकारणी वाढेल.

चिं. वि. जोशींच्या 'वेड्यांच्या इस्पितळा'त स्वतःला संशोधक समजणारा एक वेडा 'रुळावर लोहचुंबकाचा एक मोठा गोळा ठेवावा. तो गोळा लोखंडाच्या इंजिनास ओढेल आणि इंजिन लोहचुंबकाच्या गोळ्यास ढकलत पुढे नेईल,' असा शोध सांगतो. वित्तमंत्र्यांची अपेक्षा अशीच खुळचट आहे. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे करवसुली वाढली नाही, तर सरकारी यंत्रणाच कोसळणार आहे आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे करवसुली वाढली, तर त्यामुळे उद्योगधंद्यांचे उत्पादनखर्च वाढणार आहेत आणि कार्यक्षमता कमी होणार आहे. केवळ कर आकारणीत सूट मिळाली म्हणून वाढून वाढून उत्पादन वाढेल किती? सारी संरचना कोसळलेली आहे आणि नोकरशाहीचा अडथळा आहे तोपर्यंत उत्पादन वाढावे कसे?

मुद्दा स्पष्ट आहे. नोकरदार आणि प्रशासन यांवरील खर्च कमी केल्याखेरीज देशावरील आर्थिक संकट दूर होऊच शकत नाही.

या प्रश्नाला वित्तमंत्र्यांनी हातही लावला नाही. तरीही, एका नवीन ताऱ्याचा

उदय झाला आहे, हे नक्की. संयुक्त आघाडीचे सरकार मजबूत झाले आहे; पंतप्रधानांची प्रतिमा सुधारली आहे; वित्तमंत्र्यांबद्दल लोकांच्या मनात अपेक्षा तयार झाल्या आहेत. कदाचित बारा महिन्यांनी नव्या अंदाजपत्रकाच्या वेळी वित्तमंत्र्यांना विरोध करणे डाव्यांना आजच्या इतके सोपे राहणार नाही.

थोडक्यात, वित्तमंत्र्यांनी सुरवात मोठ्या थाटात केली आहे. एका नव्या ताऱ्याचा उदय झाला आहे. यामुळेच पोटशूळ उठून, विरोधी पक्षांनी त्यांना हाणून पाडायचे ठरले, तर हा तारा धूमकेतू ठरेल; पण आजच्या क्षणी सध्याच्या परिस्थितीत तेरा पक्षांचे कडबोळे असलेल्या शासनाच्या वित्तमंत्र्यांनी मोठे कल्पक आणि प्रतिभाशाली अंदाजपत्रक मांडले आहे.

*(६ मार्च १९९७)*

◆◆

# टांगते अंदाजपत्रक का नको ?

आजतरी पी. चिदंबरम यांचे पोरके अंदाजपत्रक मंजूर झालेले नाही. हा मजकूर प्रकाशित होईल तेव्हा तामिळ मनिला काँग्रेस सरकारमध्ये सहभागी राहो न राहो, ते मंजूर झालेले असेल असे दिसते. ते काही झाले तरी १९९७-९८ च्या अंदाजपत्रकाची मंजुरी किमान एकदोन महिने तरी लांबणीवर पडावी अशी माझी इच्छा आहे याची कुठेतरी नोंद राहावी म्हणून हा लेखनप्रपंच.

वेगवेगळ्या पक्षांच्या आणि त्यांच्या नेत्यांमध्ये अंदाजपत्रक मंजूर होण्याच्या आवश्यकतेबाबत असलेले मतैक्य मला अस्वस्थ करते. मुळात अकरावी लोकसभा बऱ्याच प्रमाणात विभागलेली आहे. या गटांचे विचार वेगवेगळे आहेत, इतकेच नव्हे, तर बहुधा परस्परविरोधीसुद्धा आहेत. प्रत्येक गट काही गटांना इतर गटांपेक्षा अधिक अस्पृश्य मानतो आणि म्हणूनच, हे सर्व पक्ष अंदाजपत्रक त्वरेने मंजूर व्हावे याबाबत एकमताने आग्रही भूमिका घेतात याबद्दल आश्चर्य वाटते.

काही म्हणतात, " 'राष्ट्रीय हिता'चा विचार करता, अंदाजपत्रक मंजूर व्हायला हवे."

"अंदाजपत्रक बनविण्यात मंत्रालयात जे काही काम केले गेले आहे, कष्ट घेतले गेले आहेत ते वाया जाणे उचित नव्हे." असे इतर काहीजणांचे म्हणणे आहे.

"या अंदाजपत्रकाचे सर्वांनीच स्वागत केलेले आहे हे पाहता, ते बनविणारे सरकार सत्तेवर असो वा नसो ते मंजूर व्हायलाच हवे," असेही आणखी काहीजणांचे म्हणणे आहे.

केवळ राजकारणीच नव्हे तर काही कारखानदारसुद्धा हे अंदाजपत्रक मंजूर व्हावे यासाठी एकत्रित प्रयत्न करीत आहेत. चिदंबरम यांच्या अंदाजपत्रकात कारखानदारीसाठी फायद्याच्या बऱ्याच प्रस्तावित तरतुदी आहेत, आधीच्या

सरकारपेक्षा नवीन सरकार अधिक डावीकडे झुकलेले आहे, त्यांनी नवीन अंदाजपत्रक बनवले, तर कारखानदारांना या फायद्यांना मुकावे लागेल, कदाचित.

काहींच्या मते, अंदाजपत्रकातील सर्वच प्रस्ताव चांगले आहेत. मध्याह्नीचे भोजन, लघु व मध्यम उद्योजकांना काही किरकोळ लाभ यासंबंधी काही प्रस्ताव घालून अंदाजपत्रक दुरुस्त करावे असे कॉंग्रेसवाल्यांना हवे आहे. भारतीय जनता पक्षाची करचुकव्यांना दिलेल्या सवलती आणि परदेशी गुंतवणूकदारांच्या फायद्याच्या सवलती यांना विरोध करणाऱ्या दुरुस्त्यांची लांबलचक यादी आहे. अंदाजपत्रकाच्या स्वागताचा शेअरबाजाराचा सुरवातीचा उल्हास मावळला आहे. एकंदरीने, अंदाजपत्रक सादर करताच झालेल्या स्वागताचा झगमगाट संपला आहे; हार्वर्डमधून आलेल्या या मवाळ विद्यार्थ्याने अत्यंत चलाखीने गृहपाठ पुरा केला आहे, हे लक्षात येऊ लागले आहे आणि पूर्वीच्या कोणत्याही अंदाजपत्रकाइतकेच हेही अंदाजपत्रक कुचकामी आहे हे सर्वांना समजून चुकले आहे.

तरीही विश्वासदर्शक ठराव बारगळला असतानाही त्या सरकारने बनविलेले अंदाजपत्रक मे महिन्याच्या अखेरीआधी मंजूर व्हावे, यात सर्वांनाच सारखेच स्वारस्य आहे याचा अर्थ कसा लावायचा?

वास्तविक अंदाजपत्रकावरील मंजुरी एकदोन महिने लांबणीवर पडली, तरी राष्ट्रहिताला काही धक्का लागण्याचे कारण नाही. सगळे अत्यावश्यक खर्च भारत सरकारच्या संचित खजिन्यातून होत असतात. त्यात राष्ट्रपती, सभापती, प्रमुख लेखापरीक्षक आणि नियंत्रक, राष्ट्रीय लोकसेवा आयोग, निवडणूक आयोग आणि विविध समित्या यांचे पगार आणि व्यवस्थापनाचा खर्च यांचा समावेश होतो. शिवाय, नुकसानभरपाई, कर्जफेड, निवृत्तिवेतन यासंबंधीच्या खर्चांनाही संसदेची मंजुरी लागत नाही. मग, अंदाजपत्रक मंजूर करण्याबाबतीत इतका प्रचंड उत्साह आणि लगीनघाई का?

याचे कारण सरळ आणि उघड आहे. सरकारी खर्चाचा सर्वांत मोठा एकमेव लाभधारक गट म्हणजे केंद्रीय कर्मचारी होय. शिवाय, अंदाजपत्रकाची मंजुरी लांबली, तर त्याचा पहिला फटका या सरकारी अधिकाऱ्यांनाच बसणार आहे. काही ना काही मार्गाने अंदाजपत्रक मंजूर करण्याची तजवीज केल्याशिवाय किंवा नवीन सरकारवरील विश्वासदर्शक ठराव लांबविल्याशिवाय या सरकारी अधिकाऱ्यांचा १ जून १९९७ चा पगार काढता येणार नाही, ही यातील खरी गोम आहे.

राजकारण्यांना विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीस विलंब होईल याची चिंता नाही किंवा कल्याणकारी सेवांमध्ये खंड पडेल याचे भय नाही किंवा उत्पादन व वितरण यावर विपरीत परिणाम होईल याबद्दलची खंतही नाही. राष्ट्रीय कार्यशक्तीच्या केवळ २% लोकांचे पगार वेळेवर देता आले पाहिजेत, यातच त्यांना रस आहे. सरकारी अधिकारी हे गरिबातले गरीब नक्कीच नाहीत. त्यांचे निव्वळ वैध उत्पन्न, सरासरीने, देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या दहा पट आहे. त्यांचे पगार व्हायचे थांबले तर त्यांच्यातील कोणालाही कोणत्याही गंभीर समस्येचा सामना न करता किंवा पोटाला चिमटा न घेता कित्येक महिने आरामात घालवता येतील. बिहारमधील उदाहरणावरून तर असे दिसते, की त्यांचे पगार बंद झाले तरी, कदाचित, ते त्यांच्या कार्यालयात येणे थांबविणार नाहीत.

गेल्याच वर्षी अमेरिकेसारख्या धनाढ्य राष्ट्रापुढे अशाच प्रकारची परिस्थिती उभी राहिली होती. त्यांनी पगार उशिरा करणे पसंत केले, इतकेच नव्हे तर पगाराच्या रकमेत थोडीफार काटछाटही केली. आपल्या देशात राजकारण्यांना या बाबू लोकांमुळे आणि नोकरशाहीमुळे सुखेनैव सत्ता भोगता येते आणि म्हणूनच, इतर विषयांवर त्यांचे कितीही मतभेद असोत, ते एकमताने आग्रह धरतात, की काहीही होवो, अंदाजपत्रक मंजूर झालेच पाहिजे, म्हणजे बाबू लोकांचे पगार वेळच्या वेळी होतील.

वास्तविक, अंदाजपत्रक मंजुरीवाचून लोंबकळत राहणे हेच राष्ट्रहिताचे ठरले असते. त्यामुळे, सरकारी अधिकाऱ्यांच्या सुरक्षित थाटमाटाला, फार पूर्वीच बसायला हवा होता, तो धक्का बसला असता. जेव्हा खरोखरी अटीतटीची परिस्थिती पुढे येईल तेव्हाच सरकारी खर्चाला कात्री लागू शकेल किंवा त्याला हिशेबी स्वरूप येऊ शकेल. प्रत्येक अधिकाऱ्याची कर्तबगारी तो किती खर्च करतो यावर नव्हे, तर तो किती खर्च वाचवतो यावर जोखली जाईल. वित्तीय तूट कमी करण्याची ही गुरूकिल्ली बनू शकते आणि कुणी सांगावं, समतोल अर्थसंकल्पाचीही.

तात्पर्य : अधिकारीवर्गाला ज्या जीवनशैलीची सवय झाली आहे, त्याच जीवनशैलीत त्यांना ठेवण्यासाठी धडपडणे हे काही सरकारचे मूलभूत ध्येय नाही.

*(६ मे १९९७)*

◆◆

# सामना : उद्योजक आणि बांडगुळांतला

शिवराज गोर्लेंनी त्यांच्या कादंबरीतून थोडा ओबडधोबड असा 'स्वार्थ' शब्द वापरला आहे. मराठीमध्ये एखादी आईन रॅण्ड जन्मली असती, तर तिनं काय शब्द वापरला असता 'व्हर्च्यू ऑफ सेल्फिशनेस' (Virtue of Selfishness)साठी हे सांगता येत नाही; कारण हाही तितकाच ओबडधोबड शब्द आहे. माझ्यापूर्वी जे बोलले त्या सर्वांनी स्वार्थवाद हा थोडा अतिरेक होतो, त्यालाही कुठंतरी बंधन पाहिजे आणि शेवटी माणसाला नैतिकतेचं, सामाजिकतेचं असं काहीतरी बंधन असावं असा एक तडजोडवादी सूर काढलेला दिसला. शिवराज गोर्लेंना हे मान्य करावं लागेल, की जर का त्यांच्या 'सामना' या 'स्वार्थवादा'चा पुरस्कार करणाऱ्या त्यांच्या कादंबरीवर चर्चा करण्यासाठी त्यांनी बोलाविलेल्या मंचावरील पाच लोकांपैकी तीनजण असा सूर काढत आहेत, याचा अर्थ या एका कादंबरीने काम झालेलं नाही, अशा अनेक कादंबऱ्या लिहाव्या लागतील!

दोन वर्षे तीन महिन्यांपूर्वी ही कादंबरी प्रसिद्ध झाली. मी काही फारसा चांगला मराठी वाचक नाही. पण, योगायोगानं दोन वर्षांपूर्वी हे पुस्तक माझ्या हाती आलं आणि वाचता वाचता मला आश्चर्य वाटायला लागलं, की आपण खरंच मराठीमध्ये लिहिलेली कादंबरी वाचतोय का एखाद्या इंग्रजी कादंबरीचं रूपांतर किंवा भाषांतर वाचतो आहोत! काही काही वाक्यांवर मी खुणा केल्या आहेत! 'व्यक्तीला खच्ची करून समाज मोठा बनत नाही,' 'जो जो कर्तबगार असतो, जो जो उत्पादक असतो त्याच्याविषयी सर्वसामान्य माणसाला द्वेष वाटतो आणि त्याच्या कर्तबगारीच्या द्वेषातून वेगळीवेगळी तत्त्वज्ञानं काढून ते शोषणाचं एक तत्त्वज्ञान बनवतात,' 'मी स्वतःकरिता जगत नाही आणि माझ्याकरिता दुसऱ्या कुणीतरी स्वतः स्वार्थत्याग करावा आणि मला जगवावं याची मला

शरम वाटेल,' 'स्वार्थ, पैसा, नफा ही काही पापं नाहीत...' ही असली वाक्यं आणि असला विचार मराठी भाषेला पेलू शकेल असं मला खरंच कधी वाटलं नव्हतं. मराठी भाषा म्हणजे, आपल्या लहानपणापासून सानेगुरुजींची. 'स्वत:करिता जगलास तर मेलास, दुसऱ्याकरिता जगलास तर मात्र खरंच जगलास.' मग, त्याच्यातले वेगळेवेगळे नायक निघाले. पत्र्याच्या चाळीत राहणारा मुंबईचा कामगारनेता नायक बनला आणि तत्त्वज्ञान एकूण असं, की 'ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।' गावाकरिता कुळाचा त्याग करावा आणि राष्ट्राकरिता गावाचाही त्याग करावा; महत्त्व समूहाला आहे, समाजाला आहे, व्यक्तीला नाही आणि समाजानंही काय साधायचं आहे?

*न त्वहम् कामये राज्यं । न स्वर्गम् नापुनर्भवम् ।।*
*कामये दु:ख तप्तानाम् । प्राणीनाम् आर्तिनाशनम् ।।*

दुसऱ्याचं दु:ख दूर करण्यातच जन्माचं सार्थक आहे. हे आम्ही लहानपणापासून ऐकत आलो आणि एक अशी काहीतरी विचित्र मनोवृत्ती मराठी वाचकांची बनलेली! मराठी सिनेमा लोकप्रिय म्हणजे नावात माहेर आणि डोळ्यातून पाण्याचे पूर वाहवणारी नायिका अशी मराठी सिनेमाची मर्यादा. तशी मराठी कादंबरीचीही एक मर्यादा बनलेली आहे. 'जो जास्त देहदंड भोगतो, जो जास्त कष्ट सोसतो, जो स्वत: जास्त त्रास भोगतो तो श्रेष्ठ.' मग त्याच्या देहदंडातून, आत्मक्लेशातून काही भलं घडत असो किंवा नसो! असा एक 'पीडावाद' ही मराठीची संस्कृती बनली.

या संस्कृतीतून शिवराज गोर्लेंनी आम्हाला पहिल्यांदा बाहेर काढलं आहे, काढण्याचा प्रयत्न केला आहे. अजून त्यांना फार प्रयत्न करावे लागणार आहेत.

त्यांचं पुस्तक वाचल्याबरोबर मी त्यांना पटकन पत्र लिहिलं आणि त्यांचं कौतुक केलं. त्यानंतर ते जेव्हा मला भेटले त्या वेळी मी त्यांना सूचना केली होती, की एकदा लेखक, प्रकाशक आणि इतर सर्वांनी या प्रश्नावर थोडी चर्चा केली पाहिजे.

प्रकाशकांनी ही कादंबरी 'लक्षवेधी' आहे असे म्हटले आहे, ही कादंबरी 'क्रांतिकारक' आहे असं म्हटलेलं नाही, स्वतंत्रतावादाचा, उद्योजकतावादाचा, साहसवादाचा हा काहीतरी एक आद्यग्रंथ आहे असंही म्हटलेलं नाही. ही एक 'लक्षवेधी' कादंबरी आहे, तेव्हा लोकांचं लक्ष वेधून घेण्याकरिता यावर चर्चा घडून आणावी अशी मी सूचना केली. उशिरा का होईना, दोन वर्षांनी चर्चा घडते आहे त्याबद्दल प्रकाशक व लेखक दोघांचंही अभिनंदन.

कादंबरीचं नाव 'सामना' आहे. सामना कुणाचा आहे ? गोष्ट साधारणपणे अशी – एक स्वकर्तृत्वावर उभा राहिलेला कारखानदार अनंतराव आणि दुसरा, आपण जन्माला आलो आहोत तेव्हा आपण समाजाचं काही देणं लागतो असं ऋण मानणारा एक कार्यकर्ता अप्पासाहेब. या दोघांमधला हा सामना आहे.

मी शाळेमध्ये असताना लिहायचो. ललित लेखन करायचो, कविताही करायचो आणि मला असं आठवतं, की 'सामना'च्या धर्तीचे कथाबीज असलेली एक कथा मी पार्ले टिळक विद्यालयामध्ये असताना विद्यालयाच्या हस्तलिखितात लिहिली होती. शाळेमधील दोन विद्यार्थी. एकाचे वडील हे रिझर्व्ह बँकेत अधिकारी. म्हणजे तो विद्यार्थी घरचा सुस्थितीतील. तसंच अभ्यासातही चांगला, खेळातही चांगला आणि दुसरा जो विद्यार्थी होता तो घरची गरिबी असलेला आणि गरिबी असल्यामुळेच आपण गुणवंत आहोत अशी कल्पना करून बसलेला. सानेगुरुजींनी आम्हाला सांगितलं होतंच, की धट्टीकट्टी गरिबी आणि लुळीपांगळी श्रीमंती ! साहजिकच, 'सामना'त जशी एक विद्या आहे, तशीच माझ्या कथेतही एक मुलगी होती आणि त्या लहानशा गोष्टीचा शेवट असा होता, की त्यातला जो श्रीमंत, कर्तबगार असा मुलगा हा बॉक्सिंगचा चँपियन असतो आणि स्पर्धेमध्ये केवळ त्याला आव्हान द्यायचं म्हणून हा दुसरा मुलगा, त्याची बॉक्सिंगमध्ये टिकण्याची काही शक्यता नसताना, बॉक्सिंगला उभा राहतो. चँपियनला वाईट वाटतं, की आपण याच्यावर कसा काय हल्ला करावा; पण तो सहजच मूठ हलवतो आणि समोरचा खाली पडतो आणि गोष्टीचा शेवट त्या मुलीच्या किंकाळीने होतो. इथे शिवराज गोर्लेंचं कथासूत्र आणि माझं त्या काळचं कथासूत्र यात मोठा फरक आहे.

शिवराजांच्या कथेमध्ये कर्तबगाराचे विजयच विजय होत जातात. पहिल्यांदा नायिका विद्या मिळते त्याला. नंतर महाराष्ट्रभूषण पदवीही मिळून जाते. त्यानंतर निवडणुकीतही विजय मिळतो. मला निवडणुकीच्या प्रचाराचा काही अनुभव आहे. शिवराज गोर्ल्यांनी ज्या तऱ्हेचा प्रचार दाखविला त्या तऱ्हेचा प्रचार केला तर अनंतरावांचं डिपॉझिट राहिलं नसतं; पण या कादंबरीत तसा प्रचार करूनसुद्धा लोकांमध्ये अशी काही परिवर्तनाची लाट उसळली, की अनंतराव निवडणूक जिंकून गेले आणि त्याहीपेक्षा मोठा गहरी घाव बसल्यासारखा हल्ला कोणता असेल तर तो म्हणजे अप्पासाहेबांचा मुलगा अजितेम हा स्वतःच मुळी अनंतरावांच्या बाजूने होता.

कर्तबगार अनंतरावांचे हे चार विजय कादंबरीत दाखविले आहेत, कार्यकर्ता

अप्पासाहेबांचा एकही विजय त्यात नाही आणि इथं कथेमध्ये मोठा विरोधाभास तयार होतो. जर का अनंतरावांना महाराष्ट्रभूषण पदवी देण्याइतका समाज जिवंत असेल, केवळ एका भाषणावर जर का समाज अनंतरावांना भरघोस मतं देत असेल आणि जर का खुद्द अप्पासाहेबांचा मुलगा हासुद्धा शेवटी वडिलांचा राग करून, अनंतरावांकडे जात असेल, तर मग तुम्ही कोणत्या समाजाविषयी तक्रार करीत आहात ? मग प्रश्न पडतो, की अशा तऱ्हेने वागणाऱ्या समाजाने समाजवादाला मान्यता दिलीच कशी ? मला वाटतं, कथावस्तूचा गाभा थोडा ठिसूळच आहे.

असं म्हटलं म्हणजे साहित्य समीक्षक लगेच म्हणतील, की लेखकांना कथावस्तूमध्ये बदल करायला सांगणं हे आपलं काम नाही. मी फक्त एवढंच सांगायचा प्रयत्न करतो आहे, की कथानक जर वास्तवाच्या जवळ आणायचं झालं तर काय करावं लागेल.

एक कल्पना करूया. हा जो काही सामना झाला, एका बाजूला कारखानदार आणि दुसऱ्या बाजूला कार्यकर्ता यांच्यातील, हा जरा एकाकी, एकाच संघर्षाला महत्त्व देणारा झाला. त्यातून चुकीची समजूत होण्याची शक्यता आहे, की कारखानदार तेवढे सगळे भले आणि कार्यकर्ते तेवढे सगळे वाईट, आता माझी परिस्थिती अशी विचित्र आहे, की मी उद्योजकतेचा पुरस्कार करणारा आंदोलक आहे. म्हणजे थोडासा अप्पासाहेब आणि थोडासा अनंतराव! किंबहुना, अनंतरावांचा विचार मांडण्याकरिता अप्पासाहेबांची साधनं वापरणारा मी. खुली व्यवस्था करण्याकरिता कारखाना काढणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच ज्यांच्याकडे पैशाचंसुद्धा भांडवल नाही अशा शेतकऱ्यांचं संघटन करणं हीही गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे. उद्योजक म्हणजे कारखानदार नाही; किंबहुना हिंदुस्थानात एखादा उद्योजक कारखानदार असला, तर मला माहीत नाही; खरा उद्योजक जर कोणी असेल, व्यावसायिक असेल तर तो ग्रामीण भागातला शेतकरी आहे. त्याच्याबद्दल काही या कादंबरीत उल्लेख नाही; पण ते लेखकाचं स्वातंत्र्य आहे. पण, मला असं वाटतं, की अप्पासाहेबांबरोबर, जे एसेम जोशींशी साधर्म्य असलेले दाखविले आहे. अप्पासाहेब पेंडशांसारखं एखादं पात्र हवं होतं, जे अर्थवाद मांडत नाही; पण समूहवाद मांडतात.

मी समाजवाद हा शब्द न वापरता समूहवाद हा शब्द जाणूनबुजून वापरीत आहे. अर्थकारणाकरिता समाजाचं प्राधान्य मानणारे ते समाजवादी. व्यक्तिगत निर्णय हा योग्य नसतो, समाजाकरिता जे निर्णय घ्यावे लागतात, ते शेवटी

सामाजिक पातळीवर होऊ शकतात, असं मानतात ते समाजवादी आणि त्याबरोबर सर्वसाधारण मनुष्य हा षड्रिपूंनी ग्रासलेला असतो, त्याचं 'अंततोगत्वा' हित काय आहे हे त्याला समजत नाही, ते सांगणारे आम्ही आहोत असं म्हणणारे आध्यात्मिक, धार्मिक, राष्ट्रवादाची कल्पना मांडताना धर्माचा आधार घेणारे म्हणजे समूहवादाच्या दुसऱ्या भागातले. असं एखादं पात्र या कादंबरीत आलं असतं, तर जास्त चांगलं झालं असतं. आणखी एक. केवळ तुम्ही सुलाख्यांवर तुटून पडू नका आणि केवळ काका टापऱ्यांवर तुटून पडू नका. सुलाख्यांकडून लायसेन्स-परमिट घेऊन, आपली कारखानदारी उभी केलेले, ज्यांच्याकडे उद्योजकतेचा लवलेश नाही आणि केवळ लायसेन्स-परमिटच्या आधाराने कारखानदार झाले असंही एखादं पात्र असतं, तर 'सामना'तलं चित्र जरा जास्त संपूर्ण झालं असतं.

या कादबंरीतला एक मुद्दा फार चांगला वाटला. सुलाख्यांकडे लायसेन्स-परमिट मिळवायला जायला लागतं; पण जेव्हा अनंतराव स्वत:च्या कारखान्यामध्ये एक लहानसं यंत्र तयार करू पाहतात, तेव्हा इंग्रजांच्या अमदनीतला इंग्रजी साहेब हा 'नवाथेनगर'ला येऊन, अनंतरावांचं कौतुक करतो. मला वाटतं, की ही घटना महत्त्वाची आहे. इंग्रजांच्या राज्यामध्ये जे काही चाललं होतं, तो सर्व अन्यायच होता, जुलूमच होता असं अप्पासाहेब ज्या ज्या प्रकरणात नायक आहेत त्या त्या प्रकरणात वाटतं. जालियनवाला बाग, रौलेट, सायमन वगैरे वगैरे घटना पाहिल्या म्हणजे वाटणारंच, की इंग्रजांचं राज्य म्हणजे जुलूमच होता. पण, अनंतरावांचं प्रकरण उघडलं, की त्याच्यामधला इंग्रज हा वेगळ्याच तोंडवळ्याचा दिसतो. खरी परिस्थिती काय होती?

मला वाटतं, इथे जोतीबा फुल्यांचा संदर्भ घेणे सयुक्तिक ठरेल. इंग्रज हा परकीय आहे. तो आमच्या भल्याकरिता आलेला नाही. तो इथून एक दिवस जाणार आहे हे नक्की. पण, तो जाण्याच्या आधी निदान इथल्या सर्वसामान्य माणसांना विद्या मिळवून शहाणं व्हायची संधी मिळाली आहे. ती संधी घेतल्याखेरीज जर का इंग्रजांना आपण काढून लावलं, राजकीय लढ्यालाच महत्त्व दिलं, तर काय होईल ? याचं जोतीबा फुल्यांनी समोर ठेवलेलं चित्र या कादंबरीत आपल्याला अवतरलेलं दिसतं.

अनंतरावांचा वाद हा उद्योजकतावाद नाही, या वादाच्या मागे आणखी काही जास्त व्यापक भूमिका आहे असं मला वाटतं.

आपल्याकडे शब्दाचं मोठं दारिद्र्य आहे. कुणीतरी काही वेगळं करायला लागला, की त्यावर आपल्याजवळील तुटपुंज्या शब्दसंपत्तीतील एखादा शिक्का

मारायचा आणि त्याला एखाद्या कप्प्यात बंद करून टाकायचं म्हणजे मग आपल्या डोक्याला ताप नाही असा आपल्या सर्व 'विचारवंतांचा' खाक्या.

हल्ली माझीसुद्धा ओळख करून देताना लोक मला 'खुल्या व्यवस्थेचा समर्थक' म्हणतात. मी खरंच 'खुल्या व्यवस्थेचा समर्थक' आहे का? मला वाटतं मी असलोच तर 'बंदिस्त व्यवस्थेचा विरोधक' आहे. आज कोणत्याही सामाजिक दुःखाकरिता, कोणत्याही सामाजिक अन्यायाकरिता मग ते दुःख, अन्याय किती का भयानक असेना, ते दूर करण्याकरिता शासन नावाच्या राक्षसीच्या हाती मी कणमात्रसुद्धा सत्ता द्यायला तयार होणार नाही. शासन कोणतीही समस्या सोडवत नाही कारण शासन हीच समस्या आहे. ही माझी आजची भूमिका; ही माझी भूमिका उद्या असेलच असं सांगता येत नाही.

समाजवाद संपला यात काही वाद नाही, पण भांडवलशाही जिंकली ही कल्पनाही तितकीच खोटी. भांडवलशाही समाजवादाच्या आधी संपलेली आहे. पण फक्त भांडवलशहांनी ग्रंथबद्धता, ग्रंथप्रामाण्य न मानल्यामुळे त्यांचा पाडाव कधी झाला हे पुराव्यानं दाखवता येत नाही. समाजवाद्यांनी ग्रंथप्रामाण्य मानल्यामुळे त्यांचा पाडाव झालेला इतका ढळढळीत दिसतो, की तो त्यांचा त्यांनासुद्धा नाकारता येणं अशक्य आहे. पण, याचा अर्थ व्यक्तिस्वातंत्र्याचा विजय झाला असं मी मानीत नाही.

कदाचित, ऐंशीनव्वद वर्षांनी अशी यंत्रं तयार झाली की ज्यायोगे दिल्लीत बसूनही आंबेठाणसारख्या कोपऱ्यातील गावातली पिके कशी आहेत हे पाहता आले तर नियोजनाचा आजवर झाला असा बट्ट्याबोळ होणार नाही. कदाचित दुसऱ्या ग्रहावरील आक्रमणं सुरू झाली किंवा एका बाजूला पृथ्वीवरील लोक आणि दुसऱ्या बाजूला इतर ग्रहांवरील लोक असं विज्ञानकूटकथांसारखं चित्र जर उभं राहिलं तर सगळ्या पृथ्वीवरील देशांचं नियमन करणारं एक नियोजन करणारं एखादं शासन उभं राहू शकतं अशी कल्पना करता येईल. पण आजच्या परिस्थितीमध्ये नियोजन व्यवस्थेचा पाडाव झाला आहे यात शंका नाही.

लोकसभेमध्ये विश्वासाच्या ठरावावर बोलताना आमचे पंतप्रधान म्हणाले, की 'रशियाचा पाडाव का झाला? माझे काही रशियातले उच्चपदस्थ मित्र म्हणतात की आमच्याकडे पक्ष होता, शासन नव्हते म्हणून रशियाचा पाडाव झाला.' मी एक लेख लिहून म्हटलं, No Prime Minister, तुमची चूक आहे. रशियाच्या पाडावाचा खरा निष्कर्ष असा की आजपर्यंत मनुष्यजातीने व्यक्तीच्या स्वतःच्या प्रेरणांपलीकडे अधिक विश्वसनीय अशी काही फूटपट्टी शोधून काढलेली नाही.

उद्या निघणार नाही असं मी म्हणत नाही. काही कायमचं लिहू नये. कायमचं लिहिण्याची हौस मार्क्सला होती आणि जे लोक दोनशे आणि तीनशे वर्षांचं भविष्य सांगण्याचा आग्रह धरतात, ते वीस वर्षेसुद्धा टिकत नाहीत.

मनुष्यजातीमध्ये एक एक परिवर्तन घडतं आहे. मनुष्य व्यक्ती म्हणून जन्मलेला नाही. जीवशास्त्रीयदृष्ट्या तो व्यक्ती म्हणून जन्मतो; पण तो एखाद्या समाजाचा भाग, टोळीचा भाग, गावाचा भाग, जातीचा भाग, धर्माचा भाग म्हणून जगतो. पहिल्या संस्कृती झाल्या, त्या नदीच्या काठी गाळपेराच्या जमिनीमध्ये, शेतीवर आधारलेल्या संस्कृती होत्या. त्याच्यामध्ये काम करणारे श्रमिक तयार झाल्यानंतर श्रमिकांवर आधारलेल्या संस्कृती तयार झाल्या. श्रमिकांच्या हाती साधनं मिळाल्यावर उत्पादकता वाढते, हे लक्षात आल्यानंतर भांडवलवादी व्यवस्था तयार झाल्या. त्या भांडवलवादी व्यवस्थेचे दोन भाग म्हणजे एक अमेरिकन भांडवलवाद आणि दुसरा रशियन समाजवाद – दोघंही भांडवलावर आधारित आहेत.

नवी संस्कृती अवतरते आहे, तिला काय नाव द्यावं ? मी तात्पुरतं नाव दिलं आहे उद्योजकतावाद. उद्योजकतावाद तयार होतो आहे. जमीन (Land) महत्त्वाची नाही, श्रम (Labour) महत्त्वाचे नाहीत, भांडवल (Capital) महत्त्वाचं नाही तर योजकता (Enterprise) म्हणजे उत्पादनाचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे हे मानणारी व्यवस्था तयार होते आहे आणि या संदर्भामध्ये आपल्याला 'सामना'मधल्या सामन्याकडे पाहिलं पाहिजे.

'स्वार्थ' हा शब्द बदनाम झाला आहे आणि शिवराज गोर्ल्यांनी आयन रॅण्डचं नाव वापरलं; म्हणून मी त्यांना प्रेमळ सल्ला देतो, की मांडणी करताना समाजवाद म्हटलं, की लगेच प्रतिक्रिया म्हणून स्वार्थवाद म्हटलंच पाहिजे असं नाही. किंबहुना, तुम्हाला जे काही म्हणायचं आहे, ते स्वार्थवादानं होत नाही. आयन रॅण्डनीसुद्धा या विचाराला Virtue of Selfishness म्हणून थोडं नुकसानच केलं आहे. मला मुद्दा टाळायचा नाही, त्याची मांडणी कशी करावी याबद्दल बोलतो आहे.

माझा विचार साधा आहे, की एका व्यक्तीसारखी दुसरी कोणती व्यक्ती असू शकत नाही. प्रत्येक माणसाचं व्यक्तिमत्त्व हे अनन्यसाधारण आहे. हे जर असेल, तर या विश्वाचा जो काही व्याप आहे याचा अनुभव घेण्याची आणि सिद्धांत समजून घेण्याची माझं शरीर ही एक अनन्यसाधारण व्यवस्था आहे. मी जो अनुभव घेऊ शकतो तो दुसरा कोणी घेऊ शकत नाही. मी माझ्या बारीकशा छिद्रातून जगाकडे पाहतो आहे; पण माझं हे स्वतःचं छिद्र पवित्र आहे, दुसऱ्याचं

छिद्र घातक आहे आणि म्हणून जी मंडळी दुसऱ्याच्या छिद्रातून जगाकडे पाहण्याचा प्रयत्न करतात किंवा आपण छिद्रविरहित पाहू शकतो अशी कल्पना करतात त्यांची परिस्थिती हत्ती पाहायला गेलेल्या चार आंधळ्यांसारखी होते. सगळे डोळस म्हणतात, आंधळ्यांना अपुरं ज्ञान झालं, आम्हाला मात्र सगळा हत्ती कळला; पण आपण हे कधी लक्षात घेत नाही, की डोळसांना कदाचित् अशी अनेक इंद्रियं नसतील, की त्यामुळे हत्तीचं अधिक सम्यक् दर्शन घेता आलं असतं.

स्वार्थी लोकांनी काय मोठे उत्पात घडवले हो ? परमार्थाचं नाव घेणाऱ्या आणि समाजाच्या कल्याणाचं व गरिबांच्या भल्याचं नाव सांगणाऱ्या लोकांनी लक्षावधी नाही, कोट्यवधींची डोकी फोडली, शिरच्छेद केले, घरं जाळली, स्त्रियांवर बलात्कार केले. स्वार्थाचं तत्त्वज्ञान नागडेपणानं मांडणारांनीसुद्धा कुणी इतकी भयानक पापं केली नाहीत, जी धार्मिकांनी आणि समाजवाद्यांनी केली. स्वार्थाला नावं ठेवतात म्हणून काही घाबरण्याचं कारण नाही; पण त्याचं तत्त्वज्ञान मांडताना आपण थोडी काळजी घ्यायला हवी.

आपण व्यक्तीच्या अनन्यसाधारणत्वाचं पावित्र्य जपतो आहोत. मी समतावादी आहे का ? मी विषयमतानिर्मूलनवादी नाही. मी समतेचा अर्थ कसा समजतो ? तुमच्यात आणि माझ्यात काय साम्य आहे ? समान का आहोत आम्ही ? आम्ही समान याकरिता आहोत, की तुम्ही जितके अनन्यसाधारण आहात, तितकाच मीदेखील अनन्यसाधारण आहे; आमच्या समतेचा पाया आमचे अनन्यसाधारणपण आहे.

'सामना'मधील अनंतराव आणि अप्पासाहेब यांच्यामधला जो वाद आहे, तो माझ्या मते, उद्योजक आणि कार्यकर्ता यांमधला नाही. मी माझ्या एका लेखात म्हटलं आहे, की देश जितका भिकार तितकी महात्म्यांची संख्या जास्त. संपन्न देशाला महात्म्यांची गरज नाही पडत. हा विचार थोडा समजावून घेऊया.

मी १९६८-६९ मध्ये माझे वडील वारले, तेव्हा स्वित्झर्लंडमधून परत आलो होतो. दहाव्या-बाराव्याच्या दिवशी नेहमीप्रमाणे अन्न जास्त झालं. तेव्हा माझ्या आईनं माझ्या बायकोला विचारलं, 'इतकं उरलं, आता काय करावं? स्वित्झर्लंडमध्ये असं उरलं, तर तुम्ही काय करता?' माझ्या बायकोनं म्हटलं, 'एखादा दिवस खाऊन बघतो, नाहीतर बाकीचं टाकून देतो.' माझी आई म्हणाली, 'म्हणजे असं उरलंसुरलं घेणारी मोलकरीण वगैरे तिकडे नसतात?' म्हणजे एखाद्या देशामध्ये आपल्या उष्ट्यावर जगण्याची अपेक्षा ठेवणारी माणसं असतच नाहीत, ही

कल्पनादेखील तिला सहन होत नव्हती.

त्याचप्रमाणे, ज्या ठिकाणी मागासपणा आहे, त्या ठिकाणी महात्मे तयार होतात. दुर्दैवाने आम्ही आज इतके मागासलेले आहोत, की आमच्याकडे एक गांधी तयारी व्हावे लागतात, एक अप्पासाहेब तयार व्हावे लागतात, अशी रांगच्या रांग तयार व्हावी लागते.

एक दिवस असा उजाडेल अशी आपण आशा करूया, की ज्या दिवशी देशाला महात्म्यांपासून स्वातंत्र्य मिळेल आणि सामान्य माणसांना समान अनुभव.

व्यक्तीनं जी काही प्रगती केली असेल, ती त्यानं केलेली असते. आर्थिक महात्मे असोत का धार्मिक, आध्यात्मिक महात्मे असोत यांनी सर्व समाजाला चुकीच्या दिशेने हाकारले आणि व्यक्ती आपापल्या छिद्रातून पाहता पाहता, चुका करत, पडत, सावरल्या, पुन्हा पुढे गेल्या. त्यांच्यामुळे मनुष्यजातीची जी प्रगती झाली ती लक्षावधी, कोट्यवधी सामान्य लोकांनी पडतपडत, पडल्यानंतर पुन्हा उठून पुढे चालून, जी स्वत:ची प्रगती केली त्यातून झाली आणि ज्यांना ज्यांना आम्ही महात्मे मानले, विचारवंत मानले, ते ते सर्व मनुष्यजातीच्या प्रगतीतले अडथळे ठरले.

'सामना'मधील सामना आहे तो कोणामधला? सामना आहे तो एका बाजूला समूहवाद, ज्यात व्यक्ती महत्त्वाची नाही, व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षांना स्थान नाही, समाजाला महत्त्व आहे आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तिवाद – समूहवादाचा पुरस्कार करणारे पुस्तकातील अप्पासाहेब काय किंवा प्रत्यक्षातले अप्पासाहेब पेंडसे काय, दोघांचीही जातकुळी एकच. मी क्रिकेट खेळलो, चांगलं क्रिकेट खेळलो, तर त्यामध्ये कदाचित काहीतरी राष्ट्रद्रोह होतो अशी अपराधी भावना हे समूहवादी आमच्या मनात तयार करतात.

मी चांगली चित्र काढण्यामध्ये रममाण झालो, तर मी काहीतरी चूक केली असं यांनी आम्हाला वाटायला लावलं. एक पाऊल पुढं टाकून, मी आग्रहानं मांडतो, की व्यक्ती म्हणून मला जर का केवळ आळस करण्यातच स्वारस्य वाटत असेल, गंभीरपणे तर तो आनंद घेण्याचं स्वातंत्र्यदेखील मला असलं पाहिजे. आनंदाचा शोध घेताना मला एक प्राणी फक्त आनंदी सापडतो. चिखलामध्ये किंवा पाण्यामध्ये डुंबणाऱ्या म्हशीच्या तोंडावर जी तृप्तता दिसते, ती मला दुसऱ्या कोणत्याही प्राण्याच्या चेहऱ्यावर दिसत नाही. अडचण कुठे तयार होते? आळशी माणसानं उद्योजकतेचं फळ आपल्याला मिळावं अशी आशा धरली, म्हणजे खरी अडचण होते. 'मी आळसवादाचा इतका पुरस्कर्ता आहे, की त्याचा आळशीपणाच्या फळांसकट स्वीकार करायला मी तयार आहे,' असा जर वाद

मांडला तर त्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा खरा अर्थ लागेल.

या कादंबरीत कामगारांच्या लढ्याबद्दल फार बोललं गेलं आहे. मीही वेगवेगळ्या निमित्तानं वेगवेगळ्या कामगार नेत्यांबरोबर काम केलेलं आहे. कामगारांच्या चळवळीबद्दल बोलताना एक गोष्ट विसरून चालणार नाही. एकदा दत्ता सामंतांना मी सहज प्रश्न विचारला, 'कांद्याचं आंदोलन करताना आम्ही कांद्याचा उत्पादनखर्च काढतो आणि मग मागणी करतो. तुम्ही जेव्हा संपाच्या वेळी पगार वाढवून मिळावेत म्हणून मागणी करता तेव्हा हिशेब कसा काय काढता?' दत्ता सामंतांनी उत्तर दिलं, '!!!! यांचे सगळे ताळेबंद आणि बॅलन्सशीट आम्हाला माहिती असतात. दाखवलेल्या फायद्याच्या किमान पाचपट फायदे काढतात. या चोरांना ठोकून जितकं काढता येईल तितकं काढून घेण्याचा आमचा प्रयत्न असतो.' तेव्हा, कामगार चळवळीला नावं ठेवताना लक्षात ठेवलं पाहिजे, की लायसेन्स-परमिट व्यवस्थेच्या आधारे जर का कारखानदार म्हणून मक्तेदारी मिळवली आणि तुमची पात्रता नसताना फायदे मिळवू लागलात, तर कामगारवर्ग हा एक चोरांचा गट दुसऱ्या चोरांकडून लूट काढून घ्यायचा प्रयत्न करणार आहे. तेव्हा, सगळे उद्योजक फार श्रेष्ठ आणि सगळे कामगार नेते, सगळे काका टापरे हे मात्र चुकीचे हे खरं नाही. हा धोक्याचा खेळ आहे.

क्रांती कोण करतं? लेनिन आणि मार्क्स यांच्या क्रांतीच्या सिद्धांताची मोठी चर्चा आहे. मी नेहमी म्हणतो, की क्रांती ही शोषित करीत नाहीत, क्रांती ही सर्वांत अधिक शोषित असतात ते करतात, सर्वांत अधिक शोषित क्रांतीचे अग्रदूत असतात असं आम्हाला मार्क्सनं सांगितलं. सर्वच क्रांत्यांचा इतिहास जर आपण पाहिला तर भाकरी मिळत नाही म्हणून भुकेलेल्या लोकांनी क्रांती केलेली क्वचितच दिसते. बंगालच्या दुष्काळामध्ये भुकेपोटी कोलकत्त्यात आलेले लोक भाताच्या गोदामासमोर उपाशी मेले; पण त्यांनी धान्याची गोदामं फोडली नाहीत. क्रांती करायला माणसाला काही ताकद लागते, काही साधनं लागतात. संध्याकाळची व्हिस्की चुकली म्हणून क्रांती करणारांची संख्या अधिक आहे. क्रांती होते ती शोषक नंबर दोन जास्त वेळा करताना दिसतो. शोषक नंबर एक हा वरचा पापुद्रा काढून, खालचा पापुद्रा क्रांती करताना दिसतो. तेव्हा कामगार चळवळीला नावं ठेवताना लायसेन्स-परमिट व्यवस्थेतल्या कारखानदारीतून ही कामगार चळवळ फोफावली, ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी.

'सामना'मध्ये निदान तीन वेळा अनंतरावांच्या तोंडी एक उल्लेख घातला आहे, 'शेवटी एक टापरे आणि शिरोळे एकत्र व्हायला लागले, तर आम्हा

उद्योजकांनासुद्धा एकदा एकत्र व्हायला लागेल.' आयन रॅण्डनी म्हणे पृथ्वीचं ओझं पेलणारा शेषनाग जर कधी आपला फणा हलवू लागला, तर काय होईल याची कल्पना मांडली आहे. एक सावधगिरीची सूचना– चोरांच्या टोळ्या बनतात, लुटारूंच्या टोळया बनतात, उद्योजकांच्या टोळया बनणं फार कठीण आहे. जे व्यक्तिवादी आहेत, उद्योजक आहेत त्यांनी एकत्र कसं काय जमावं ? हिंदुस्थानमध्ये समाजवादाचा डोलारा कोसळून पडला, नेहरूनियोजनाचा फज्जा उडाला आणि तरीदेखील आता नियोजन करणारं माझं मायबाप सरकार कुणी नाही, मी माझ्या पायांवर ताठ मानेनं उभा राहीन आणि स्वत:ची स्वत: प्रगती करीन, असं म्हणण्याऐवजी लोकांच्या झुंडींनी दोन रुपये किलो तांदूळ आणि रुपयाला झुणका–भाकर देणारांना मतं दिली, हे विसरू नका. 'सामना'मध्ये अनंतरावांचं जे यश दाखविलं आहे, ते फार दिशाभूल करणारं आहे. गेल्या निवडणुकीमध्ये समूहवादी नियोजनाचा विरोध करणारा एकमेव पक्ष म्हणून आम्ही निवडणुका लढविल्या आणि आमचा इतका फज्जा उडाला! तेव्हा उद्योजकवाद्यांनी हे लक्षात ठेवावं, की झुंडशाहीची साधनं वापरून व्यक्तिवादाचा विजय होईल अशी कल्पना करू नये. पण, 'सामना'मध्ये असं दिसतं, की सर्वसामान्य माणसं उद्योजकता, साहस आणि व्यक्तिवाद यांचं स्वागत करू शकतात. प्रत्यक्षात आजमितीला असं दिसतं, की हे असं फक्त काही विशेष संकटाच्या काळीच होऊ शकेल.

पिंजऱ्याचा दरवाजा उघडा राहिला, तरीसुद्धा पोपट स्वतंत्र होऊ पाहत नाही. आईच्या उदरातून गर्भसुद्धा बाहेर पडू इच्छित नाही, शक्यतो आईच्या कुशीतच राहावं असा प्रयत्न करतो, स्वातंत्र्य हे त्याच्या हिताचं आहे, हे माहीत असूनसुद्धा. दरवाजा उघडून दिला, तर पोपट थोडा उडून जातो आणि पुन्हा वाटीमध्ये डाळ पडायची वेळ येते, तेव्हा डाळ येते का नाही ते पाहायला येतो. सगळा इतिहास स्वातंत्र्याच्या दिशेने जातो, एवढीच तुमची जमेची बाजू आहे. पण, माणसं स्वातंत्र्याकडे जातात ती मागून लाथ बसल्यावरच जातात असं इतिहास सांगतो. ही वस्तुस्थिती दाखवणारी कादंबरी तयार होण्याची वाट पाहूया?

*(२१ जून १९९७)*

◆◆

# गर्जेल तो पडेल काय?

१९९९ साल उजाडताच केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हांनी कडकपणाची भाषा सुरू केली आहे. इतका दीर्घकाळ घाबरटपणात घालविलेल्या यशवंत सिन्हांना, देशाच्या आजच्या परिस्थितीत नेमके काय खरोखरी अवघड होत चालले आहे, याची खरंच माहिती नसावी. पुढील अंदाजपत्रकाचे वेध लागले आहेत आणि वेगवेगळ्या राजकीय दबावांखाली, यशवंत सिन्हांना गुळमुळीत धोरणे आखणे भाग पडेल आणि त्यावर कठोर निर्णय म्हणून शिक्कामोर्तब करून घेणे आवडेल.

अखेरी अर्थमंत्र्यांनी देशाची आर्थिक परिस्थिती भयानक असल्याचे मान्य केले. पाकिस्तानच्या संघाला हिंदुस्थानात खेळू देण्याविरुद्ध वाळ ठाकऱ्यांच्या गुंडागर्दीपुढे संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेला असहाय बघ्याची भूमिका घेण्यापलीकडे काही करता आले नाही. भरीत भर, भाजपशी जवळीक असणाऱ्या काही हिंदू धर्मांधांनी ऑस्ट्रेलियन मिशनरी श्री. स्टुअर्स स्टेन्स यांना आणि त्यांच्या मुलांना जाळून ठार मारले. अशा घटनांचा देशाच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होणे अपरिहार्य आहे. देशाची केवळ अर्थव्यवस्थाच नव्हे, तर सबंध देशच झपाट्याने उतरणीला लागला आहे असे दिसते आहे; कोणत्या क्षणी हिंदुस्थानचा 'ब्राझील' होईल हे सांगता येत नाही आणि तिकडे यशवंत सिन्हा नुसते हुशारच नव्हे, तर कडक दिसण्याचा प्रयत्न करीत आहेत!

कडक अंदाजपत्रक म्हणजे, अर्थमंत्र्यांच्या लेखी, प्रशासकीय खर्चाला हात न लावता वित्तीय तूट कमी करणे व त्यासाठी आयात करांमध्ये वाढ करणे आणि करांची पातळी उंचावणे, एवढेच दिसते.

पण, हा काही कठोर निर्णय नाही; उलट हा अगदीच गुळमुळीत पर्याय आणि सवंग पळवाट आहे. करांचे दर आणि त्याबरोबरच एकूण करसंकलन कमी

करणे आणि शिवाय, प्रशासकीय खर्च कसलीही दयामाया न बाळगता, मोठ्या प्रमाणावर कमी करून वित्तीय तूट कमी करणे हा खरा कडक निर्णय ठरेल. हे काम यशवंत सिन्हांच्या आवाक्याबाहेरचे आहे. नोकरदारांच्या दबावाला शरण जाऊन, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी मान्य केल्याबद्दल सिन्हा त्यांच्या आधीच्या राष्ट्रीय आघाडीच्या सरकारवरील ही टीका गांभीर्याने करीत असतील, तर त्यांनी विकासेतर बाबींबरील खर्च बंद करून, आपली प्रामाणिकता सिद्ध केली पाहिजे; इतिहासात त्यांचे नाव त्यामुळे, कडक असामी म्हणून अजरामर होईल! त्यांना जर बाबूसाम्राज्य आणि त्यांच्या पगार व लाडाकोडांवर होणाऱ्या अवाढव्य खर्चाला हात लावता येत नसेल, तर आजच्या परिस्थितीत कडक होणे अशक्य आहे, हे त्यांनी मान्य करणेच बरे. केवळ अर्थमंत्र्यांचीच नव्हे, तर त्यांच्या सरकारचीसुद्धा विश्वासार्हता अजून कमी होईल आणि त्याहीपुढे जाऊन देशातील राजकीय व आर्थिक संस्थांचीही पत कमी होईल. शब्दांचे खेळ फार काळ चालले, आता घाबरटपणावर कडकपणाचे शिक्कामोर्तब होणे शक्य नाही.

यशवंत सिन्हांनी, पाचव्या वेतन आयोगाच्या प्रकरणात गुडघे टेकण्याबद्दल त्यांच्या आधीच्या सरकारचा धिक्कार बेधडकपणे केला; पण त्यांचे सरकारही यापेक्षा काही फार बरे करीत नाही हे सत्य उरतेच. आता तर राज्यपातळीवर समरप्रसंग उभे राहू लागले आहेत.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाने सुचविल्याप्रमाणे वाढीव पगार देण्यासाठी लागणारे सुमारे १३०० कोटी रुपये जमा करणे शक्य होत नाही; म्हणून बिहारमधील सरकारी कार्यालये तब्बल ७६ दिवस बंद होती.

यशवंत सिन्हांच्याच परिवारातले महाराष्ट्राचे भाजप-सेना युतीचे सरकारही काही धीट नाही. त्यांनाही, शिक्षक संघटनेच्या ताठरपणापुढे आणि एस.टी. कर्मचाऱ्यांपुढे शरणागती पत्करावी लागली.

यशवंत सिन्हांप्रमाणेच, बहुसंख्य राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी मान्य केल्याबद्दल केंद्र सरकारला दोष दिला आहे व आयोगाच्या शिफारशी अमलात आणायच्या तर त्यामुळे राज्यांच्या तिजोरीवर पडणारा अतिरिक्त बोजा उचलण्यासाठी केंद्र सरकारकडून अर्थसाहाय्य मागितले आहे. यशवंत सिन्हा 'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशा अवस्थेत सापडले आहेत. मंदीचे परिणाम कमी करण्यासाठी त्यांना कराची पातळी आणि प्रशासकीय खर्च - दोन्ही कमी करावे लागतील.

राजकीय दाबदबाव पाहता, त्यांना प्रशासकीय खर्चही कमी करणे शक्य

होणार नाही आणि करपातळीही खाली आणणे जमणार नाही. खरोखरी कडक राहण्याचे मनात नसताना, ते कडकपणाची भाषा करीत आहेत.

आपण कशासंबंधी बोलत आहोत, याची साधी जाण नसलेले एक अर्थमंत्री आपल्यासमोर आहेत; ते आणि त्यांचा पक्ष आर्थिक आघाडीवरील लढाई हरले आहेत, हे कळूनसुद्धा ते अशा आविर्भावाने मर्दुमकीचा आव आणीत आहेत, की कौतुकाऐवजी त्यांच्याबद्दल दया वाटू लागते.

*(मूळ इंग्रजी लेखाचे मराठीकरण)*

*(६ फेब्रुवारी १९९९)*

◆◆

# वाय-टू-के अंदाजपत्रक

केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांचे वाय. टू. के. अंदाजपत्रक म्हणजे दुप्पट भ्रमनिरास आहे. ते मोठे धडकबाज आणि कठोरही असणार असल्याचे डिण्डिम पिटण्यात आले होते. देश १९९१ सालाप्रमाणे आर्थिक संकटात असताना अर्थमंत्री वित्तीय तूट कमी करण्याच्या दृष्टीने काही ठोस पावले उचलतील अशी लोकांची अपेक्षा होती. कारगिल, ओरिसामधील भयानक चक्रीवादळ, राजकीय अनिश्चितता, जगभर खनिज तेलाच्या किमती तिपटीवर पोहोचणे... या घटनांमुळे या वेळचेही अंदाजपत्रक कठोर आणि कल्पकतापूर्ण असणे आवश्यक होते. ही दुहेरी अपेक्षा अर्थमंत्र्यांमधील किमयागारानेही पुरी केलेली नाही. त्यांनी आपले, ना कठोर, ना कल्पकतापूर्ण असे अंदाजपत्रक सादर करण्याचे काम उरकले. काही सवंग विनोद आणि अनाठायी शायरीची उधळण वगळता अर्थमंत्र्यांचे अंदाजपत्रकी भाषण अगदी रूक्ष आणि नीरस होते. दूरदर्शनवरून त्यांचे भाषण पाहणारे त्यांच्यापेक्षा पडद्याच्या तळाशी उमटणाऱ्या शेअर बाजारातील पडत्या किमती आणि निर्देशांक सांगणारा मजकूर अधिक एकाग्रतेने पाहत होते.

अशा प्रकारचे आणखी एखादे अंदाजपत्रक सादर झाले, तर लोक अंदाजपत्रकाच्या दिवशी दूरदर्शनच्या पडद्यासमोर चिकटून बसण्याचे सोडूनच देतील. अंदाजपत्रकावरील चर्चेत भाग घेण्यासाठी गेलो असता, माझे स्वागत करताना एक ख्यातनाम विचारवंत म्हणाले, "स्पष्टच बोलायचे तर, स्वातंत्र्यानंतरचे हे सर्वांत वाईट अंदाजपत्रक आहे." अर्थमंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकात अनेक बाबी 'नव्या नवती'च्या असल्याचे आग्रहाने म्हटले - या दशकातले पहिले अंदाजपत्रक, या शतकातले पहिले, या सहस्रकातील पहिले. सध्या बाजारातही बऱ्याच वस्तू 'सहस्रका'चा छाप आपल्या नावांबरोबर मिरवीत आहेत; पण 'सहस्रका'चा काही विशेष आढळत नाही. वाय. टू. के. अंदाजपत्रकाचीही तीच

गत आहे.

महसूल वाढविण्याच्या बाजूने काही भक्कम पावले उचललेली नाहीत.

उत्पादन-शुल्कासंबंधी सुसूत्रीकरणाचे पाऊल चांगले आहे; पण ते १९८० च्या दशकाला साजेसे आहे, नव्या सहस्रकाला नव्हे.

शेती उत्पन्नावर आयकर बसविण्यास सुरवात करण्याचा इरादा म्हणजे भिजका फटाकाच नव्हे, तर मोठा विनोद निघाला. फार्महाऊसवर मिळालेल्या उत्पन्नावर आयकर बसविण्याचा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी मांडला आहे; पण फार्महाऊसच्या मालकांनी लग्नाच्या पार्ट्या वगैरेसाठी ते भाड्याने देऊन, मिळविलेल्या उत्पन्नावर कर बसविण्यास आजवर काय हरकत होती, याचा खुलासा करण्यासाठी अर्थमंत्रालयाचे कोणी अधिकारी भेटले नाहीत.

खर्च कमी करण्याच्या बाजूचा विचार केला तर, प्रशासनाचा आकार गंभीरपणे कमी करण्याच्या बाबतीत अपयश हे किमान पन्नास वर्षांचे जुने दुखणे आहे. युरियावरील तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील अनुदाने कमी करण्याचा एक प्रस्ताव अंदाजपत्रकात आहे; पण ही दोन्ही पावले किमान तीस वर्षे आधीच उचलायला हवी होती. या प्रस्तावांवर विरोधक हल्ला करतीलच; पण खुद्द सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षही या प्रस्तावांना प्रखर विरोध करतील. मी हे आता लिहीत असलो, तरी कोणत्या क्षणी हे दोन्ही प्रस्ताव मागे घेतले जातील, हे सांगता येणार नाही. अर्थमंत्रालयाची अधिकृत सूत्रे, अनुदाने कमी करण्याची ही पावले उचलली तरी या दोन्ही बाबींवरील अनुदानांत खऱ्या अर्थाने घट होणार नाही असे सिद्ध करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. सर्वांत जास्त अनुदानाची बाब म्हणजे प्रशासनावरील खर्च; त्याला मात्र बोटसुद्धा लावलेली नाही. शून्याधारित अर्थसंकल्प, प्रस्थापित यंत्रणेची कसून फेरतपासणी, त्यानंतर स्वेच्छानिवृत्तीची आणि सोनेरी हस्तांदोलनाची योजना याबाबत संदिग्ध आश्वासने आहेत; पण सर्वांना माहीत आहे, की त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही आणि सगळ्यांना महागाई भत्त्याची आणखी एक वाढ दिली जाईल आणि खतांवरील व सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील अनुदान कपातीने वाचलेला पैसा गडप होऊन जाईल.

गरिबी हटविणे, उत्पन्न आणि रोजगार निर्माण करणे, अन्न-सुरक्षेची हमी आणि अनुकूल बाजारपेठ टिकवून ठेवण्यासाठी शेतीक्षेत्राचा विस्तृत आणि कायमस्वरूपी विकास होणे अत्यावश्यक आहे. यावर आपला ठाम विश्वास असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. गेल्या वर्षी पाऊस काही समाधानकारक झाला

नाही आणि शेतीउत्पादनातही प्रत्यक्षात घट अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत, शेतीक्षेत्रासाठी ज्या काही उपाययोजना घोषित केल्या आहेत, त्यांत उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहनपर असे काहीच नाही. संरचनात्मक विकास आणि पतपुरवठा व्यवस्थेच्या विस्ताराच्या योजनांची एक भली मोठी जंत्री अर्थमंत्र्यांनी केली आहे, यात काही शंका नाही. 'ग्रामोदय' कार्यक्रमासाठी त्यांनी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समितीही स्थापन केली आहे. ग्रामीण विकास शेतीतील सुबत्तेऐवजी कल्याणकारी कार्यक्रमाद्वारेच करावयाची बाब आहे, अशी अर्थमंत्र्यांची समजूत असावी असे उघडउघड दिसते. त्यांच्या भाषणातील रस्ते, पाणी, संदेश-दळवळण आणि इतर सर्व विषयांवरील परिच्छेद हे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या दस्तऐवजातील संबंधित परिच्छेदांशी जवळजवळ मिळतेजुळते आहेत, त्यांतील रकमा आधीच्या रकमांपेक्षा बऱ्याच मोठ्या आहेत, एवढाच काय तो फरक. आधीच्या योजना अयशस्वी झाल्या असताना, आता त्या नव्याने मांडल्याने यशस्वी कशा होतील, यासंबंधी अर्थमंत्र्यांनी काही खुलासा केलेला नाही.

याबाबतीत अर्थमंत्र्यांनी केवळ निराशाच केली नाही, तर त्यांची गाडीच हुकली आहे, जी पुन्हा पकडणे अशक्य आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या चर्चेच्या दुसऱ्या फेरीच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत. भारतीय शेती अचानकपणे स्पर्धेतून बाद ठरते आहे. इतिहासात पहिल्यांदाच, बहुतेक शेतीमालांच्या देशांतर्गत किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतीच्या तुलनेत चढ्या झाल्या आहेत. बहुतेक राष्ट्रे व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या खुलीकरणाचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार करू लागली आहेत. इंडिया सरकार मात्र आपल्या शेतकऱ्यांना बाजारपेठ आणि तंत्रज्ञान यांच्या संपर्काचे स्वातंत्र्य नाकारीत आहे. १९६० मध्ये 'हरितक्रांती'साठी हिंदुस्थानची तयारी कमीच होती, येऊ घातलेल्या 'जनुक क्रांती'ला सामोरे जाण्यासाठी देश त्याहूनही कमी तयार आहे.

सारांश, अर्थमंत्र्यांनी शेतीक्षेत्रासाठी मांडलेले प्रस्ताव १९६० च्या दशकातील आहेत. माहिती, संदेश दळणवळण आणि करमणूक यांसाठी काही मूलभूत पावले उचलल्याचा दावा, त्याची छाननी करायला घेतली तर लगेच फोल सिद्ध होईल. निर्यातीवरील वाढीव करांमुळे, निर्यात क्षेत्र ज्या कायदेशीर तरतुदींची मेहेरनजर केल्याचे अर्थमंत्री सांगतात, त्या निरुपयोगी ठरतात. या क्षेत्रातसुद्धा अर्थसंकल्पातील प्रस्ताव किमान दहा वर्षांपूर्वी पुढे यायला हवे होते.

वाय-टू-के अर्थसंकल्पावर शेअर बाजाराची प्रतिक्रियाही प्रतिकूल आहे. शेअरबाजाराची जाणकारी असलेल्या यशवंत सिन्हांचे नेमके कुठे चुकले?

अलीकडच्या काळात शेअर बाजारात आलेली तेजी ही माहिती, संदेश दळणवळण व करमणूक क्षेत्रातील भरभराटीमुळे होती, हे सर्वज्ञत आहे. या क्षेत्रांच्या संदर्भात काही अनुकूल उपाययोजना केल्या, तर अर्थसंकल्पातील इतर बाबी किती का क्षुल्लक असो, शेअर बाजारातील तेजी टिकून राहील अशी भाबडी आशा अर्थमंत्र्यांच्याही मनात असेल, कदाचित; बाजारातील चित्र नेमके उलटे दिसेल. वाय-टू-के यशवंत सिन्हांना चांगलाच बाधलेला दिसतो.

*(मूळ इंग्रजीवरून अनुवादित)*

*(२१ मार्च २०००)*

◆◆

# विजय आणि पराभवाचे अर्थकारण

दुसऱ्या महायुद्धात जर्मनी बेचिराख झाला. रशिया, फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिका या दोस्त राष्ट्रांनी हिटलर व मुसोलिनी यांच्या नेतृत्वाखालील नाझीवादाचा संपूर्ण पाडाव केला. जर्मनी तर इतका उद्ध्वस्त झाला, की आता पुन्हा कधी जर्मनीतील कारखाने, उद्योगधंदे, व्यापार समर्थपणे उभे राहू शकतील, ही शक्यताच दिसत नव्हती. आणखी एक अजब प्रकार घडला. युद्धामुळे दोस्त राष्ट्रे थकली होती, याला थोडाफार अपवाद अमेरिकेचा. अमेरिकेने दोस्त राष्ट्रांना प्रचंड प्रमाणावर युद्धसामग्री पोहोचविली. अमेरिकन फौजा युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांत प्रत्यक्ष धुमश्चक्रीत उतरल्या; पण अमेरिकेची भूमी रणभूमी एकदाही झाली नाही. दुसऱ्या महायुद्धापासून सुरू झालेल्या सरसकट बॉम्बहल्ल्यांच्या परिणामांतून अमेरिकेच्या अंगावर ओरखडादेखील न पडता, ती निभावून गेली. युद्धसामग्री तयार करण्यासाठी उभे केले गेलेले कारखाने झपाट्याने शांततेच्या काळातील उत्पादन करण्यासाठी आपापली फेरमांडणी करीत होते.

जित राष्ट्रांच्या मदतीसाठी अमेरिकेने एक योजना जाहीर केली. योजनेचे नाव 'मार्शल प्लॅन' जेते राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांच्या पुनर्बांधणीसाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी स्वत: कंबर कसून उभे राहावे, हे दृश्य त्या वेळी अनोखेच होते. पुनर्बांधणीसाठी प्रचंड रकमेची मदतकर्जे तर दिली गेलीच; पण त्याशिवाय जर्मन नाण्याचा विनिमयदर अत्यंत कमी ठेवण्याची परवानगी देऊन, जर्मनीतून होणाऱ्या निर्यातीवरील सारी बंधने सरसकट उठविण्यात आली. ही मदत मिळाली नसती, तर दृढनिश्चय, प्रचंड प्रयत्न, कष्टाळूपणा, जिद्द, उद्योजकता या साऱ्या जर्मन गुणांचे चीज झाले असते किंवा नाही, याबद्दल शंकाच आहे. निदान, जर्मन राष्ट्राच्या पुनर्बांधणीला कितीतरी अधिक वेळ लागला असता.

प्रत्यक्षात युद्धातील शरणागतीनंतर वीसपंचवीस वर्षांतच जर्मनी पूर्णपणे सावरला

आणि आज, जर्मनीची आर्थिक ताकद आणि प्रभाव इतका वाढला आहे, की त्याची झळ अमेरिकन व्यवस्थेसही लागत आहे. जेत्यांनी जितांना सावरायचे हा प्रकार १९४८ मध्ये प्रथम घडला आणि नंतर तो एक नियमच बनून गेला. व्हिएतनामच्या युद्धात अमेरिकेला काढता पाय घ्यावा लागला, तरी विध्वंस व्हिएतनामचा झाला. पण, त्याची भरपाई करण्याचे अमेरिकेने मान्य केले, हा त्यातलाच प्रकार.

आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील हा मोठा चमत्कारिक भाग आहे. युद्धखोर राष्ट्रांनी शेजारी राष्ट्रांची खोडी काढावी, हल्ले करावे, लढाया कराव्या आणि शेवटी, लढाईत मार खाल्ल्यानंतर शत्रुराष्ट्रांनीच त्यांच्या मदतीला धावावे, हे सगळेच तसे 'फार्सिकल' वाटते. दुसऱ्या महायुद्धानंतर तर 'हरलेले जिंकले आणि जिंकलेले हरले,' अशी म्हणच पडली आहे.

विजयी राष्ट्रे पराभूत राष्ट्रांच्या मदतीला धावू लागली, ते काही दयाबुद्धीने नाही, करुणेपोटीही नव्हे, तर शुद्ध स्वार्थापोटीच. हा स्वार्थ कोणता ? या स्वार्थाचे अर्थशास्त्र जगाला पटविण्याचे काम एका छोट्या आकाराच्या पुस्तकाने केले. लेखकाचे नाव केन्स आणि पुस्तकाचे नाव 'शांततेचे आर्थिक परिणाम' एका पुस्तकातील विचारामुळे, मांडणीमुळे जगाच्या इतिहासात फरक घडून यावा असे घडते. त्यातील केन्सचे 'शांततेचे आर्थिक परिणाम' हे मोठे ढळढळीत उदाहरण आहे.

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पाडाव झाला. फ्रान्स, इंग्लंड इत्यादी दोस्त राष्ट्रे विजयी झाली. फ्रान्समधील राजेशाहीच्या काळातील देखणी राजधानी व्हर्साय येथे भव्य प्रासादात जित आणि जेते राष्ट्रांच्या वाटाघाटी सुरू झाल्या. तहाच्या कसल्या, शरणागतीच्याच अटी काय त्या ठरवायच्या होत्या. दोस्त राष्ट्रांना अमेरिकेने प्रत्यक्ष युद्धात न पडता, साधनसंपत्तीचा प्रचंड पुरवठा केला होता. जर्मनीची तर पराभवात पुरी वाताहतच झाली होती; पण त्याबरोबर फ्रान्स आणि इंग्लंड या जेत्या देशांच्याही अर्थव्यवस्थेने जबर फटका खाल्ला होता. आर्थिक सुबत्ता काय ती फक्त अमेरिकेतच नांदत होती आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विड्रो विल्सन यांच्याकडे सारे जग मोठ्या आशेने पाहत होते.

पण, विड्रो विल्सन यांना युरोपीय प्रदेशात फारसे स्वारस्य नव्हते म्हणा किंवा त्यांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत कोणी नव्हते म्हणा, तहाच्या अटी युरोपनेच ठरविल्या. जर्मनीने युद्धकाळात दाखविलेल्या क्रौर्याबद्दल, लुटालुटीबद्दल, कत्तलीबद्दल इंग्लंड आणि त्याहूनही फ्रान्समध्ये सर्वदूर विलक्षण संतापाची आणि

सूडाची भावना होती. आता जर्मनी हरला आहे, शरण आला आहे, तर त्याला असा काही धडा शिकविला पाहिजे, की पुन्हा जर्मन राष्ट्र आणि लोक उठून उभे राहणेच अशक्य झाले पाहिजे, तरच तेही करण्यात तथ्य आहे आणि शांततेला काही अर्थ, असे सगळ्यांनाच वाटत होते.

व्हर्साय तहात जर्मनीवर शरणागतीच्या अटी लादण्यात आल्या, त्या मोठ्या कडक होत्या. जर्मनीस सैन्य उभारण्यास बंदी झाली; नौदलावर बंदी घालण्यात आली. कोळसा आणि लोखंड यांच्या संपन्न खाणीचे प्रदेश फ्रान्सला जोडण्यात आले. उभे कारखाने जर्मनीतून उचलून फ्रान्समध्ये नेण्यात आले आणि त्याखेरीज, प्रचंड रकमांची खंडणी जर्मनीने दर साल दोस्त राष्ट्रांना पोहोचविली पाहिजे अशा अटी घालण्यात आल्या.

विजयी राष्ट्रांत सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले. जर्मनीचा त्रास कायमचा सुटला, महायुद्धाचा बदला घेण्यात आला असेही समाधान त्यांना वाटत होते. अशा वेळी केन्सने आपले पुस्तक प्रसिद्ध केले.

पुस्तकातील प्रमुख मांडणी अशी : जर्मनीवर व्हसार्यच्या तहात शरणागतीच्या ज्या अटी लादण्यात आल्या आहेत, त्यांतून शांतता तर प्रस्थापित होणार नाहीच; पण दुसरे महायुद्धच उभे राहील. कोणत्याही राष्ट्रातील लोकांना कायम अपमानित अवस्थेत ठेवणे शक्य नाही, हे राजकीय सत्य आहे. त्यापलीकडे, व्हसार्यचा तह आणि त्यातील अटी अर्थशास्त्रीय सामान्य तत्त्वांच्या विरुद्ध आहेत.

जर्मनीने दोस्त राष्ट्रांना द्यावयाच्या खंडणीचा मुद्दा घ्या. खंडणी काही जर्मन नाण्यांत द्यायची नाही. तसे असते तर प्रश्न सोपा होता. नोटा छापण्याचे कारखाने एक दिवस चालविले असते, तर खंडणीची रक्कम पुरी होऊ शकली असती; पण त्या कागदाच्या कपट्यांची काय किंमत आणि त्यांतून दोस्त राष्ट्रांना काय मिळणार? खंडणीची रक्कम आंतरराष्ट्रीय चलनात द्यावयाची आहे. हे चलन जर्मनीस मिळावे कोठून? त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जर्मन मालाची निर्यात झाली पाहिजे; पण निर्यात करण्यासाठी जर्मनीकडे काही राहिलेलेच नाही. खाणीचे प्रदेश फ्रान्सने घेतले; कारखाने नटबोल्टांसहित उचलून नेले. तेथे उत्पादन व्हावे कसे? लोकांना जगण्याचीच जेथे मारामार होणार आहे, तेथे निर्यात करावी कशी?

समजा, एवढे करून जर्मनीने 'येन केन प्रकारेण' निर्यातीसाठी वरकड उत्पादन तयार केलेच, तर विजयी राष्ट्रे त्या मालाची आयात आपापल्या देशात करून घेण्यास तयार होतील काय? जर्मन माल विजयी राष्ट्रांच्या बाजारपेठांत येऊन

पोहोचू लागला तर त्यांच्या स्पर्धेमुळे विजयी राष्ट्रांतील कारखाने बंद पडू लागतील आणि विजेत्या राष्ट्रांतच बेकारी व मंदीची लाट येईल, ''खंडणी नको आणि तुमच्या मालाची आयातही नको,'' असे म्हणण्याची वेळ विजयी राष्ट्रांवरच येईल.

''आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्थेत धनकोच्या मदतीखेरीज ऋणको कधी कर्ज फेडू शकत नाही. एका अर्थाने देशादेशांमधील मोठ्या रकमांची कर्जे फेडता येतच नाहीत किंवा ती फेडून घेणे धनकोंनाच परवडत नाही,'' असा वरवर विचित्र दिसणारा सिद्धांत केन्सने मांडला. त्याच्या सिद्धांताचा प्रत्यय झपाट्याने आला. जर्मन अर्थव्यवस्था कोसळली; नाण्याचे अवमूल्यन इतक्या प्रचंड वेगाने होऊ लागले, की 'खिशात नोटा घेऊन दुकानात जावे आणि पिशवी भरून माल आणावा.' याऐवजी, 'पोत्यात नोटा भरून न्याव्यात आणि खिशातून माल घरी आणावा...' अशी विपरीत परिस्थिती आली. नाण्याची स्थिरता ही केवळ अर्थकारणातच नव्हे, राजकारणात आणि समाजकारणातही निश्चित नैतिक मूल्यांइतकीच महत्त्वाची असते. शेअर्समध्ये, सरकारी कर्जरोख्यांत सुरक्षितपणाच्या अपेक्षेने, गुंतवणूक करणारे भिकारी बनले; उंडगे, टोणगे मजा मारू लागले. पोट जाळण्याकरिता भल्या भल्या घरच्या लेकीसुना रस्त्यावर फिरू लागल्या. खंडणीचे हप्ते चुकू लागले. त्या बदल्यात फ्रान्सने आणखी मुलूख बळकावून घेतला आणि परिस्थिती आणखीनच बिघडत गेली आणि शेवटी, नाझीवाद व हिटलर यांचा भस्मासुर उभा राहिला.

*(६ एप्रिल २०००)*

◆◆

# फाल्गुन-शिमगा-होळी
# शिळया भाताला तीनदा फोडणी

मध्यमवर्गीय ब्राह्मण घरातील स्वयंपाकाविषयी बोलताना विनोदाने म्हटले जाते, 'सकाळच्या वरणाला संध्याकाळी फोडणी आणि संध्याकाळी उरलेल्या भाताला सकाळी फोडणी.' केंद्र शासनातील शेतकऱ्यांसंबंधी धोरणाचा असाच काही प्रकार चालला आहे. त्याच त्या शिळया कढीला ऊत आणून, शेतकऱ्यांवर आपण काय प्रचंड मेहेरबानी करीत आहोत असा देखावा नवे शेतकी मंत्री राजनाथ सिंग यांनी मांडला आहे.

जुलैच्या १६ तारखेला राजनाथ सिंग यांनी अर्थमंत्री जसवंत सिंग यांच्यासमवेत एक पत्रकार परिषद घेतली. दस्तुरखुद्द अर्थमंत्र्यांनी कृषिमंत्र्यांना एवढा मान दिल्याची पहिलीच घटना असावी! शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीककर्जावर ९% च्या वर व्याजाचा दर आकारला जाणार नाही अशी घोषणा स्वत: जसवंत सिंग यांनीच केली. नाबार्डकडून सहकारी सोसायट्यांच्या यंत्रणेला सहा ते साडेसहा टक्क्यांपर्यंत व्याजदराने वित्तपुरवठा होतो. तो राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, तालुका सहकारी बँका एवढ्या लांब रस्त्याने गावच्या विविध सेवा सहकारी सोसायटीकडे पोहोचतो. वाटेवरच्या प्रत्येक मध्यस्थाने आपल्या खर्चाचा बोजा त्याच्यावर लादल्याने शेतकऱ्यांच्या हाती कर्जाची रक्कम पोहोचेपर्यंत व्याजाचा दर १४-१५ टक्क्यांवर जातो; तोदेखील सगळयाच शेतकऱ्यांना सारखा लागू होत नाही.

सरकारी आकडेवारीनुसार दोनेक टक्के कर्जे १० टक्क्यांपेक्षा कमी व्याजाने दिली जातात; १७ टक्के कर्जे १० ते १२ टक्क्यांनी, ४६ टक्के कर्जे १२ ते १५ टक्क्यांनी, ३२ टक्के कर्जे १५ ते १८ टक्क्यांनी, अडीच टक्के १८ ते २० आणि अर्धा टक्के कर्जे २० टक्क्यांच्या वर व्याजाने दिली जातात. रिझर्व्ह बँकेची ही आकडेवारी व्यापारी बँकांसंबंधी आहे. सहकारी व्यवस्थेतून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या

कर्जाविषयी अशी आकडेवारी उपलब्ध नाही.

जसवंत सिंगांनी खुश होऊन शेतकऱ्यांना बहाल केलेल्या या घोंगडीला दोन प्रचंड विवरे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे ९% व्याजाची सूट फक्त पीककर्जांनाच लागू आहे, दीर्घ मुदतीच्या भूविकास कर्जांना नाही. विहीर, लिफ्ट योजना अशा कामांसाठी शेतकऱ्यांना पहिल्याप्रमाणेच १८ टक्क्यांपर्यंत व्याज द्यावे लागेल. दुसरी गोष्ट – वित्तमंत्र्यांची ही योजना फक्त व्यापारी बँकांनाच लागू आहे. पीककर्जाच्या वाटपात व्यापारी बँकांचा हिस्सा फक्त ४४,९२९ कोटी रुपयांचा म्हणजे ४५ टक्क्यांइतका मर्यादित आहे. उरलेली ५५% पीक– कर्जे सहकारी यंत्रणेमार्फत पुरवली जातात. म्हणजे, व्यवहारात या घोषणेमुळे शेतकऱ्यांचा फायदा फारच थोडा होणार.

हा चमत्कार कसा घडून येणार ? वित्तमंत्री म्हणतात, 'नाबार्ड यापुढे वित्तपुरवठा परस्पर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना करतील. त्यामुळे राज्य स्तरावरील बँकेच्या प्रशासकीय खर्चाचा बोजा कमी होईल.' राज्य बँकांचा प्रशासकीय खर्च २–३ टक्क्यांचा आहे असे धरले, तरी त्यामुळे शेतकऱ्यांवर पडणारा व्याजाचा बोजा १०–११ टक्क्यांनी कमी होऊन, तो ९ टक्क्यांच्या खाली येईल अशी काहीही शक्यता नाही. किंबहुना, जिल्हा आणि तालुका बँकांचा वाढता प्रशासकीय खर्च लक्षात घेता, शेतकऱ्यांपर्यंत वित्तपुरवठा पोहोचेतो, कदाचित् पुन्हा पहिल्यासारखीच परिस्थिती राहील आणि शेतकऱ्याला द्याव्या लागणाऱ्या व्याजाच्या दरात काहीच कमी होणार नाही. वित्तमंत्र्यांची ही योजना प्रामुख्याने व्यापारी बँकांना लागू आहे, राज्य मध्यवर्ती बँकांना वळसा घालून, नाबार्डने वित्तपुरवठा केला, तरी त्याचा परिणाम व्यापारी बँकांवर होण्याची शक्यता नाही. सहकारी व्यवस्थेच्या स्पर्धेमुळे बँकांना व्याजदरात काही कपात करावी लागेल. पण, इतिहास पाहता तशी शक्यता फारशी नाही. ही योजना राबविताना त्याच्या शिल्पकारांचे चित्त ठिकाणावर होते किंवा नाही याबद्दल शंका आहे ! मूळ योजना व्यापारी बँकांकरिता; पण उपाययोजना मात्र सहकारी बँकांच्या क्षेत्रात ! ही उपाययोजना इतकी तुटपुंजी आहे, की व्याजाच्या दरात फारतर २–३ टक्क्यांचा फरक पडावा, पण, गवगवा मात्र 'शेतकऱ्यांना ९% पेक्षा अधिक व्याजाचा दर द्यावा लागणार नाही' असा.

याच पातळ कढीला पंतप्रधानांनी २७ जुलै रोजी पुन्हा ऊत आणला आणि जणू काही शासनाकडून जितके काही करणे शक्य होते, तितके सगळे आपल्या सरकारने केले आहे, असा आव आणून त्यांनी, 'शेतकऱ्यांनी आता देखरेख

समित्या तयार करून, या योजनेचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो याची खात्री करून घ्यावी,' असे आवाहन केले. दि. ३१ जुलै रोजी पुन्हा एकदा वर्तमानपत्रांत, टेलिव्हिजनवर ही बातमी झळकली – 'शेतकऱ्यांना ९% पेक्षा जास्त व्याजाचा दर द्यावा लागणार नाही.'

जसवंत सिंगांनी घोषणा केली, तेव्हा 'ही योजना फक्त रु. ५०,००० पर्यंतच्या पीककर्जांना लागू आहे,' असे म्हटले. पंतप्रधानांनी त्याच कढीला फोडणी देताना रक्कम २ लाखांपर्यंत वाढवली. कॅबिनेटचा निर्णय होताना शेवटी काय ठरले, कमाल मर्यादा रु. ५० हजारांची का दोन लाखांची हे स्पष्ट झाले नाही. वस्तुतः या विषयासंबंधी निवेदन आणि बातमी कॅबिनेटचा निर्णय झाल्यानंतर म्हणजे ३१ जुलैलाच प्रसिद्ध होणे योग्य झाले असते. प्रशासकीय यंत्रणेत फाईल तयार करणाऱ्या बाबूपासून पंतप्रधानांपर्यंत फाईल वर वर जाताना प्रत्येक पायरीवर प्रसिद्धी माध्यमांकडे निवेदने जाऊ लागली, तर बाबू लोकांच्या आणि मंत्र्यांच्या प्रसिद्धी हव्यासाचा हा परिणाम आहे असे म्हणावे लागेल. पण, प्रत्येक पायरीला शेतकऱ्यांवर काही नवी मेहेरबानी केली जात आहे असे भासवणे केवळ राजकीय स्वार्थापोटीच होऊ शकते.

हा दर सरळ व्याजाचा की चक्रवाढ व्याजाचा हेही स्पष्ट नाही. पण, शेतकऱ्यांना यापुढे पीककर्जे सहकारी व्यवस्था आणि व्यापारी बँका या दोन्हींमार्फत कमाल ९% व्याजाने मिळतील असे गृहीत धरू. गेली कित्येक वर्षे सहकारी पीक-कर्जांची परतफेड न झाल्यामुळे बहुतेक विविध सेवा सहकारी सोसायट्यांचे काम बंद पडले आहे. 'नवे- जुने' होणेसुद्धा बंद झाले आहे. बहुतेक शेतकरी आता खासगीतच कर्जे मिळवतात. त्यासाठी, साहजिकच, भरमसाट दराने व्याज द्यावे लागते. या सावकारी व्याजांवर केंद्र शासनाच्या साऱ्या घोषणांचा काहीही परिणाम होणार नाही. पण, ज्याला ज्याला पीककर्ज हवे त्याला त्याला ते ९% दराने मिळणार आहे असे समजूया. हा व्याजाचा दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार आहे का ? जागतिक बाजारपेठेतील व्यापारस्पर्धेत शेतकरी उतरू शकणार आहे काय ?

शेतकऱ्याला पीक विकून मिळणारी रक्कम शंभरातील नव्वद वेळा सरकारी आधारभूत किमतीवर अवलंबून असते. ही आधारभूत किंमत कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाने तयार केलेल्या उत्पादनखर्चाच्या आकडेवारीवर ठरते. या आयोगाचे अगदी अलीकडचे उपलब्ध अहवाल पाहिले, तर पीककर्जावरील व्याजाचा आयोगाने हिशेबात झालेला खर्च २-३ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. (सोबतचा

तक्ता पाहा)

| कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाच्या हिशेबात धरलेल्या व्याजाच्या रकमा लक्षात घेता, पीककर्जाचा आधारभूत किमतीतून मिळणारा व्याजदर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति हेक्टर रुपयात | | | |
| क्र. | पीक | आयोगाने धरलेला पिकाचा खर्च | पीकखर्च | आयोगाने व्याजापोटी धरलेली रक्कम | उत्पादनखर्चाच्या हिशेबात धरला जाणारा व्याजदर द.सा.द.शे. |
| १. | भात (धान) | ७०६३ | ७५०० | २२४.४७ | ३.० |
| २. | ज्वारी (हा.) | ५९२९ | ५००० | ९५.७९ | १.९ |
| ३. | बाजरी(हा.) | ५१२४ | ४५०० | ८९.९९ | २.० |
| ४. | भुईमूग | १०,३६५ | ८००० | १६८.१५ | २.३ |
| ५. | कपाशी | १०,३७४ | ८००० | १९६.७९ | २.५ |

घराच्या छपराला आधार देण्याकरिता उभा केलेला खांब छपरापेक्षा कमी उंचीचा असला तर तो दोन इंचांनी कमी असो का दोन फुटांनी – छप्पर डोक्यावर कोसळून कपाळमोक्ष झाल्याखेरीज राहणार नाही. किंमत ठरवताना व्याजाचा दर २–३ टक्के धरायचा आणि वसूल करताना मात्र ९ टक्क्यांचा दर लावायचा हा जुनाच सरकारी खाक्या आहे. अशा पद्धतीने काँग्रेसने ४० वर्षे राज्य चालवले. शेतकरी संघटनेने आता शेतकऱ्यांना शहाणे केले आहे. भाजपला यापुढे हे शेतीकारण चालवता येणार नाही.

केवळ तुलना म्हणून, शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत स्वातंत्र्यापूर्वी काय व्यवस्था होती, ते थोडक्यात पाहणे उद्बोधक ठरावे.

इंग्रजी राज्य आल्यावर जमिनीची तुकडेबंदी झाली. रोख महसूल भरण्याची पद्धत जमीनदारी आणि रयतवारी दोन्ही पद्धतींस लागू झाली. पोटापुरते पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनादेखील रोख महसूल भरणे अशक्य झाले. तेवढी रक्कम तरी उभी करण्यासाठी सावकाराचे पाय धरावे लागू लागले. गहाण लिहून दिलेल्या जमिनी कोर्टाकडून हुकूमनामा आणून, जप्त होऊ लागल्या. शेतकऱ्यांमध्ये मोठा संताप उसळला. पुणे व नगर जिल्ह्यांत शेतकऱ्यांनी सावकारांच्या घरांवर धरणे धरले, कर्जासंबंधीचे कागदपत्र नष्ट करण्यास सावकारांना भाग पाडले; प्रसंगी, दहशतीसाठी सावकारांचे नाक किंवा कान कापले. दक्षिणेतील शेतकऱ्यांच्या या उत्स्फूर्त उद्रेकाने इंग्रज सरकारही हलले. अनेक समित्यांनी अभ्यास–अहवाल तयार

केले. परिणामत:, सरकारी तिजोरीतून द्यायच्या तगाई कर्जांची सुरवात झाली आणि सहकारी संस्थांचे जाळेही इंग्रज सरकारने उभारायला सुरवात केली. याच सुमारास ब्रिटिश सरकारने कर्जावर जबरी व्याज आकारण्याविरुद्ध कायदा केला; पण परंपरागत दामदुपटीच्या म्हणजेच द्वैगुण्याच्या रिवाजाला मात्र मान्यता दिली.

१९०१ मध्ये अविभक्त पंजाब प्रांतात सर छोटूराम यांच्या 'युनियनिस्ट पार्टी'चे राज्य होते. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या विरोधाला न जुमानता सर छोटूराम यांनी कायदा मंजूर करून, शेतकऱ्यांची जमीन कर्जापोटी काढून घेण्यावर बंदी घातली.

१९३८ मध्ये मद्रास प्रांतात (त्यात आताचा आंध्र प्रदेशही होता) चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस शासनाने एक कायदा करून, शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधीच्या सगळया खटल्यात वसूल करण्याची रक्कम जास्तीत जास्त दरसाल ६.२५% सरळ व्याजाने असावी असे ठरवले. हा कायदा 'राजाजी कायदा' म्हणून लोकप्रिय झाला. हा कायदा पुढे केंद्र शासनाच्या १९४९ च्या बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये १९८४ मध्ये केलेल्या दुरुस्तीने रद्दबातल ठरवला आणि बँकांनी आकारावयाच्या कर्जाच्या व्याजावरील ६.२५ टक्क्यांची मर्यादा काढून टाकली. आंध्र प्रदेश हायकोर्टाने १९८८ मध्ये 'शेतीवरील कर्ज' हा राज्यशासनाचा विषय असल्याने केंद्रीय लोकसभेस राज्याचा कायदा रद्दबातल ठरवता येणार नाही असा निर्णय दिला. पण, सुप्रीम कोर्टाने केंद्र शासनाचीच तळी उचलली. केंद्राचा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट (सुधारित) आणि सुप्रीम कोर्टाचा या विषयावरील निर्णय – दोन्ही घटनाबाह्य आहेत, ते रद्द ठरवले आणि 'राजाजी कायद्या'प्रमाणे शेतीवरील सर्व कर्जांवर कमाल ६.२५% व्याजाची मर्यादा कायम केली, तर शेतकऱ्यांना काही दिलासा मिळू शकेल. केंद्र शासनाची कमी व्याजाची देणगी आधी गळत्या भांड्यातली आहे, ती शेतकऱ्याच्या फाटक्या झोळीत पडेपर्यंत त्याचा कोणालाच फायदा होणार नाही. तीच तीच घोषणा तीन तीनदा केल्याने काही फरक पडत नाही. पूर्वीच्या काळी सावकार व्याजाची आकारणी करताना निरक्षर शेतकऱ्यांना बनवण्यासाठी 'फाल्गुन, शिमगा आणि होळी' असे तीन महिने मोजत त्यातलाच हा केंद्र शासनाच्या सावकारीचा प्रकार आहे!

*(६ ऑगस्ट २००३)*

◆◆

# शेतकऱ्यांवर संपुआ अंदाजपत्रकाची कुऱ्हाड

सात वर्षांपूर्वी विद्यमान वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी केंद्र शासनाचे अंदाजपत्रक सादर केले होते, त्या अंदाजपत्रकाची खूपच वाहवा झाली होती. 'ड्रीम बजेट' किंवा 'आपण स्वप्नात तर इतके चांगले अंदाजपत्रक पाहत नाही ना,' असे वाटावे असे त्याचे कौतुक झाले. त्यानंतर आर्थिक सुधारांचे महत्त्वाचे शिल्पकार म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांच्या बरोबरीने त्यांची गणना होऊ लागली.

काँग्रेसच्या दोस्त पक्षाच्या तिकिटावर २००४ च्या निवडणुकीत चिदंबरम निवडून आले, तेव्हाच ते वित्तमंत्री होणार हे ठरल्यासारखेच होते.

सात वर्षांपूर्वी चिदंबरम यांचे हात मोकळे होते; आर्थिक सुधार पुढे नेण्याचे काम कोणतीही बाधा न येता, ते करू शकत होते. या वेळी मात्र त्यांची परिस्थिती कचाट्यात सापडल्यासारखी आहे. मंत्रिमंडळात एका बाजूला सुधारवादी स्वत: प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग, त्याखेरीज नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मोंटेकसिंग अहलुवालिया; यांच्या पाठिंब्यावर आर्थिक सुधारांचा ओघ अधिक प्रवाही करणे शक्य होते. याउलट, दुसऱ्या बाजूला संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) सरकार ज्यांच्या आधारावर चालले आहे, ते ६३ डावे खासदार, सर्व आर्थिक सुधारांना विरोध करण्यासाठी कंबर बांधून सिद्ध झाले आहेत. याखेरीज सोनिया गांधींच्या अध्यक्षतेखालील समीक्षा समितीत आणि नियोजन मंडळाच्या सल्लागार समितीत अधिकृतरीत्या स्थान मिळालेले गैरसरकारी संघटना (NGO) चे प्रतिनिधी हेही सर्व आर्थिक सुधारांच्या विरोधात उभे ठाकलेले. अशा परस्परविरोधी ताकदींच्या चिमट्यात सापडलेले वित्तमंत्री काय मार्ग काढतात यासंबंधीच्या अनिश्चिततेमुळेच शेअर बाजारही कोसळला. तो पुनश्च मार्गावर आणणे याचाही एक बोजा वित्तमंत्र्यांवर होता.

२००४ च्या निवडणुकांचे विश्लेषण करणाऱ्या सर्व तज्ज्ञांचा एक सूर

निश्चित होता. शेतकरी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) शासनावर नाराज होते. खरे म्हटले तर ४५ वर्षांची, काँग्रेसी शासनाची शेतीमालाचे शोषण दूर करण्याची क्रूर परंपरा मोडून, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने शेतकऱ्यांच्या मुक्तीच्या दिशेने अनेक महत्त्वाची पावले टाकली होती; परंतु अनुदानांच्या योजना जितक्या चटकन नजरेत भरतात तितक्या मुक्तीच्या योजना शेतकऱ्यांनाही भावत नाहीत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे दुर्दैव इथे ओढवले.

महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे प्रशिक्षित कार्यकर्ते मोठ्या संख्येने असल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूनेच राहिले. पंजाबमध्येही तसेच झाले; परंतु आंध्र प्रदेश, तामिळनाडू, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात इत्यादी राज्यांत मात्र शेतकऱ्यांच्या दूरगामी हिताची जाणीव करून देण्यात रालोआ अयशस्वी ठरली. शेतकऱ्यांनी रालोआला हरवले असा बोभाटा झाला. त्यामुळे, नवीन सरकार आता शेतकऱ्यांकरिता काहीतरी सज्जड करून दाखवेल अशी मोठी अपेक्षा शेतकरीवर्गात पसरली होती.

काँग्रेसप्रणीत संपुआच्या सरकारचे शेतीसंबंधी धोरण काय असावे, याची काही चिन्हे मोठी शुभ होती. २४ जून २००४ रोजी खुद्द प्रधानमंत्र्यांनी शेतीसाठी एक 'न्यू डील' (एक नवे युग) सुरू करण्याचा इरादा जाहीर केला. त्याआधी एक आठवडा म्हणजे १८ जून रोजी शेतकऱ्यांसाठी नवे कर्जपुरवठ्याचे धोरण जाहीर करण्यात आले. ही शुभचिन्हे लक्षात घेता यावेळी तरी अंदाजपत्रकात चिदंबरमसाहेब शेतकऱ्यांसाठी काहीतरी स्वप्नील चमत्कार करून दाखवतील अशी आशा होती. यंदा पावसाने डोळे वटारल्याने आणखी एक विपदा तयार झाली. पाऊस लवकर येणार, भरपूर येणार असे हवामानखात्याने भविष्य वर्तवले होते. पावसाच्या काही सरी लवकर आल्याही. हवामानखात्याच्या अंदाजावर भरवसा ठेवून, शेतकऱ्यांनी पेरण्यांना सुरवात केली, पेरण्या उरकून घेतल्या आणि पाऊसबाबा गायब झाला. अनेक ठिकाणी दुबार पेरण्याही फुकट गेल्या. 'स्वातंत्र्यानंतर शेतीची प्रगती झाली, विकास झाला,' हा साराच बोलबाला व्यर्थ होता. भारतातील शेती आजही 'पावसाचा जुगार' आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. अर्थसंकल्पात, पाण्याची शाश्वती वाढविण्याकरिता काही उपाय असतील, उपलब्ध पाण्याची परिणामकारकता वाढवण्याच्या काही योजना मांडल्या जातील, शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे खरीदता यावे यासाठी काही मदत दिली जाईल अशी अपेक्षा होती. वित्तमंत्र्यांच्या २००४-०५ च्या अंदाजपत्रकाने शेतकऱ्यांच्या तोंडाला अक्षरशः पाने पुसली आहेत. एवढेच नव्हे तर, शेतकऱ्यांची

आणि सर्व देशाची मोठ्या हातचलाखीने फसवणूक करण्यात आली आहे.

हे अंदाजपत्रक सादर झाल्याबरोबर सगळीकडे एकच नारा उठला, 'हे शेतकऱ्यांचे बजेट आहे, गरिबांचे बजेट आहे.' वास्तवात सात वर्षांपूर्वी 'स्वप्नील' अंदाजपत्रक देणाऱ्या चिदंबरमसाहेबांनी या वेळी भुलभुलय्या तयार करून केवळ 'सपनों का सौदागर' बनण्याचा प्रयत्न केला आहे.

या अंदाजपत्रकाने शेतकऱ्यांचे काय भले केले ? गवगवा असा, की तीन वर्षांत शेतकऱ्यांच्या कर्जपुरवठ्याची रक्कम दुप्पट करण्याची घोषणा झाली, यामुळे शेतकऱ्यांची कर्जासंबंधीची विवंचना संपून जाईल, त्यांना नवे कर्ज मिळण्यातही अडचण येणार नाही आणि कर्जाची परतफेड ही समस्या राहणार नाही. अंदाजपत्रकाचे समर्थन किंवा गुणगान करणाऱ्या साऱ्या विद्वानांनी कर्जपुरवठ्याच्या वाढीव रकमांचे तोंड फाटेपर्यंत गोडवे गायिले.

कर्जपुरवठ्यासाठीचा वाढीव निधी नाबार्ड, व्यापारी बँका, ग्रामीण क्षेत्रीय बँका आणि सहकारी बँका यांच्याकडून उपलब्ध होणार आहे, सरकारी खजिन्यातून नाही. थोडक्यात, कर्जपुरवठ्याच्या वाढीव रकमेची बाब अंदाजपत्रकात नाही, फक्त वित्तमंत्र्यांच्या अंदाजपत्रकीय भाषणात आहे. यात खजिन्याला तोशीस काहीच नाही. या २५००० कोटी रुपये रकमेचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा बँकांनाच होण्याची शक्यता अधिक आहे. कर्जबाजारी शेतकरी निराशा आणि मानहानीची भीती यांच्यापोटी पटापटा आत्महत्या करीत आहेत आणि वित्तमंत्री तीन वर्षांत कर्जपुरवठ्याची रक्कम दुप्पट करण्याची घोषणा करतात, म्हणजे 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' अशी परिस्थिती आहे.

बँकांकडे कर्जपुरवठ्यासाठी रक्कम उपलब्ध झाली, तरी तिचा शेतकऱ्यांना काय लाभ ? देशातील एकूण कर्जदार शेतकऱ्यांपैकी फक्त २% शेतकरी नवीन कर्ज उचलण्यास पात्र राहिले आहेत. जुन्या कर्जांच्या थकबाकीमुळे बाकी शेतकरी कर्ज घेण्यास अपात्र झाले आहेत. मग, वित्तमंत्र्यांच्या या उदारतेचा फायदा कोणाला ?

शेतकऱ्यांना आवश्यकता आहे, ती तातडीने जबरदस्तीच्या कर्जवसुलीपासून संरक्षणाची. शेतीमालाला भाव नाही, त्यामुळे शेती तोट्यात आणि शेती तोट्यात, त्यामुळे शेतकरी कर्जात. कर्ज परत फेडण्याची शेतकऱ्यांवर कायद्यानेही जबाबदारी नाही आणि नीतिशास्त्रातही ते बसत नाही. शेतकरी ऋणको नाही, धनको आहे, तरीही कर्ज घेण्यासही अपात्र आहे. अशा परिस्थितीत वित्तमंत्री नव्या कर्जासाठी वाढीव रक्कम उपलब्ध करून देण्याच्या बाता मारतात आणि त्या आधाराने 'वित्तमंत्र्यांनी शेतकऱ्यांचे भलेच भले केले,' अशा घोषणा होतात. शेतकऱ्यांचा

प्रश्न अजून बहुतेकांना समजलेला नाही आणि शेतकऱ्यांच्या वेदनांबद्दल कोणाच्या मनात सहानुभूती नाही, एवढेच यावरून स्पष्ट होते.

दुसरा प्रश्न पाण्याच्या तुटवड्याचा. वित्तमंत्र्यांनी यासाठी एक नव्या प्रकारची योजना मांडली आहे. या योजनेचा पुरस्कार किसान समन्वय समितीच्या भोपाळ येथील (४ जुलै २००४) बैठकीत करण्यात आला होता. धरणे, कालवे अशा योजनांवर अफाट खर्च होतो. साठवलेल्या पाण्याचा पूर्ण उपयोग होत नाही. अनेकदा त्याची चोरी होते, दुरुपयोग होतो. त्यामुळे पाणी साठवण्याच्या नव्या योजनांवर भर देण्यापेक्षा अस्तित्वात असलेले पाण्याचे साठे, तलाव, तळी दुरुस्त करून, पाण्याचा पुरवठा वाढवावा आणि अशा पाण्याचा अधिक उत्पादक उपयोग होण्यासाठी ठिबक सिंचनासारख्या व्यवस्थांचा उपयोग करण्यास सरकारने प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी किसान समन्वय समितीने केली होती. अस्तित्वात असलेल्या जलाशय आणि पाणीपुरवठा यांच्या दुरुस्तीच्या व निगरानीच्या सर्व खर्चाची जबाबदारी शासनाने उचलावी व त्याबरोबरच वीजपुरवठा आणि ठिबकसिंचन संच शेतकऱ्यांना विनामूल्य पुरवावे, अशीही मागणी समितीने केली आहे. वित्तमंत्र्यांनी यातील जुन्या जलाशयांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम अंदाजपत्रकात घेतला आहे आणि त्यासाठी यंदाच्या अंदाजपत्रकात तरतूदही केली आहे. किती रकमेची ? प्रयोगादाखल प्रकल्पांकरिता फक्त रुपये १०० कोटींची. त्यानंतरच्या पाच वर्षांत प्रत्येक वर्षी रुपये ३००० कोटींची तरतूद करण्याचे आश्वासन आहे. लोकांचा तहानेने जीव जातो आहे, पेरण्या फुकट जात आहेत, जमिनींना शोष पडला आहे आणि वित्तमंत्री पाच वर्षांची लांब मुदतीची योजना मांडतात. तहान लागल्यावर विहीर खणायला लागणाऱ्या दीड शहाण्यांना कोणी सुज्ञ म्हणत नाही!

संपुआ सरकारने किमान समान कार्यक्रम (किसका) मान्य केला आहे. त्यासाठी १०००० कोटी रुपयांची तरतूद करून एक अवाढव्य नोकरशाही सोनिया गांधींच्या दिमतीस दिली आहे. 'पंतप्रधानकीची जबाबदारी नाही; पण थाटमाट मात्र सगळा' अशा पद्धतीत 'किसका'च्या अंमलबजावणीवर देखरेख करण्याचे काम सोनिया गांधींनी घेतले आहे. संपुआच्या किमान समान कार्यक्रमात शेतीसंबंधी शेतकऱ्यांच्या आशा फुलवणारी निदान दोन कलमे आहेत.

शेतीमालाचे भाव पाडणाऱ्या साऱ्या व्यवस्था तातडीने बरखास्त करण्याचे आश्वासन त्या 'किसका'मध्ये आहे. याचा अर्थ सक्तीची वसुली, लेव्ही, झोनबंदी, प्रदेशबंदी, साठवणूकबंदी, प्रक्रियाबंदी, एकाधिकार, निर्यातबंदी आणि परदेशी मालाची महाग आयात (Dumping) या साऱ्या व्यवस्था बंद करण्याचे आश्वासन

आहे. या जुलमी व्यवस्थांचा कायदेशीर आधार आहे जीवनावश्यक वस्तू कायदा आणि त्या अमलात आणणारे महत्त्वाचे खलनायक म्हणजे भारतीय खाद्यान्न महामंडळ, नाफेड आणि कृषी उत्पन्न बाजार समित्या. या सर्वांची राजवट संपविण्याविषयी एक चकार शब्दही संपुआ सरकारच्या अंदाजपत्रकात नाही आणि वित्तमंत्र्यांच्या भाषणातही नाही. मग, 'किसका'च्या अंमलबजावणीच्या बाता कशासाठी ?

'किसका'मध्ये आणखी एक आश्वासन आहे - शेतकऱ्यांवरील कर्जाचा आणि व्याजाचा बोजा कमी केला जाईल असे हे आश्वासन आहे. यात संपूर्ण कर्जमुक्ती येत नाही, हे वित्तमंत्र्यांनी लोकसभेत स्पष्ट केले. पण, भाकड झालेल्या जिंदगी (Non-performing Assets)ची रक्कम कमी करण्यासाठी बिगरशेती क्षेत्रात जशा योजना आखल्या जात आहेत, तशा योजनाही शेतीक्षेत्राला उपलब्ध नाहीत. शेतकऱ्यांच्या कर्जाची 'एका हप्त्यात वासलात' (One time settlement) लावण्याच्या गोष्टी अनेकवेळा झाल्या, प्रत्यक्ष हाती काहीच आले नाही. 'मुद्दल भरल्यास व्याज माफ' किंवा 'दामदुप्पट' अशी, कर्जभार थोडाफार हलका करणारी योजना वित्तमंत्र्यांनी स्वीकारलेली नाही. किमान समान कार्यक्रमात दिलेली दोन आश्वासने संपुआ सरकारने प्रामाणिकपणे अमलात आणली असती तरी शेतकऱ्यांनी त्यांना दुवा दिला असता. वाढत्या कर्जपुरवठ्याचा खुळखुळा; पण कर्जाचा बोजा हलका करण्याची बातही नाही. पाण्याच्या प्रश्नाचीही जाण नाही. वित्तमंत्र्यांनी आर्थिक सुधाराची बाजू मात्र बऱ्यापैकी राखली. त्या विषयात त्यांना काठावरचे गुण द्यायला हरकत नाही. शेतीक्षेत्रात मात्र त्यांनी हातचलाखीने धूळफेक करून शेतकऱ्यांचे भले केल्याचे चित्र रंगवले. प्रत्यक्षात मात्र सुलतानी आणि अस्मानीच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला त्यांनी आधाराचा हातही दिलेला नाही. संपुआतील सर्व पक्ष स्वतःच्या गरिबांच्या आणि दलितांच्या कैवाराविषयी मोठी बढाई मारतात; आयकरपात्र उत्पन्नाची किमान रक्कम रुपये ५०,००० पासून रुपये १,००,००० पर्यंत वाढवली, हे संपुआच्या गरिबांच्या कैवाराचे उदाहरण म्हणून सांगतात. देशातला खरा गरीब ५०,००० रुपयांवर मिळकत असलेला नाही, राखीव जागांच्या व्यवस्थेच्या आधाराने सरकारी नोकरीत घुसलेला नाही; देशातील खरा गरीब गरिबीपायी आणि कर्जापोटी आत्महत्या करीत आहे. संपुआ आणि वित्तमंत्री यांनी शेतकऱ्यांची म्हणजे खऱ्या गरिबांची हेटाळणी करून, त्यांच्या जखमांवर मीठ चोळले आहे.

*(२१ जुलै २००४)*

◆◆

# २००५ च्या अंदाजपत्रकामागील आडाखे आणि अंदाज

फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी लोकसभेत केंद्र शासनाचे इसवी सन २००५-२००६ चे अंदाजपत्रक सादर झाले.

संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) सरकारचे प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग स्वतः जागतिक कीर्तीचे गाढे विद्वान अर्थशास्त्री. १९९३ मध्ये देशाची सारी अर्थव्यवस्था कोसळायला आली होती. परकीय चलनाच्या गंगाजळीचा खडखडाट झालेला. देशातील सोने गहाण ठेवून, अर्थव्यवस्था चालविण्याची वेळ आलेली. त्या वेळचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव - नेहरू खानदानाबाहेरचे पंतप्रधान - यांनी हिंमत केली या देशाला विनाशाकडे वेगाने नेणारी नेहरूप्रणीत समाजवादाची गाडी थांबवून, नवे मुक्त अर्थव्यवस्थेचे शिंग फुंकले. त्या कामगिरीतील प्रमुख जबाबदारी पार पाडण्याचे श्रेय त्यांचे वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचे. दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या देशात, जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे त्यांनी चमत्कार घडवून आणला. उत्पादन वाढू लागले, निर्यात वाढली, गुंतवणूक वाढू लागली, परकीय चलनाचा वेग शुक्लेंदुवत वाढत चालला.

या कर्तबगारीची प्रभावळ असलेले डॉ. मनमोहन सिंग आज स्वतः पंतप्रधान. त्यांचे वित्तमंत्री पी. चिदंबरम्, खुल्या व्यवस्थेचे धोरण बिगर काँग्रेसी शासनकाळातही कुशलतेने पुढे नेऊन दाखविलेले, अर्थशास्त्र आणि कायदा या दोन्ही क्षेत्रांतील अभ्यास व व्यासंग यांनी ख्याती पावलेले. त्यापलीकडे , मृदु स्वभाव, भाषेवरचे प्रभुत्व, मंद हास्य आणि शांत प्रवृत्ती इतक्या गुणांचा समुच्चय असलेले हे वित्तमंत्री.

२८ फेब्रुवारीला चिदंबरम बोलू लागले आणि लोकसभेतील खासदार, प्रेक्षकसज्जातील श्रोते, पत्रकार आणि देशभर दूरचित्रवाणी संचांसमोर बसून त्यांचा शब्द न् शब्द कानात साठवून ठेवणारे नागरिक ऐकू लागले, मंत्रमुग्ध

झाले आणि डोलू लागले. चिदंबरम यांचे पहिले अंदाजपत्रक स्वप्नवत म्हणून गाजले होते, या अंदाजपत्रकाचा परिणाम गारुड्याच्या पुंगीसारखा डोलवणारा होता.

वित्तमंत्र्यांनी २००४-०५ सालची संपुआ शासनाची आर्थिक कामगिरी सांगितली. आर्थिक वाढीची गती जवळजवळ ७%, उद्योगधंद्यांच्या वाढीची गती ६% च्या आसपास. शेतीची प्रगती खुंटलेली खरी; पण त्याचा दोष पावसावर ढकलता येतो. संपुआ शासनाच्या सुरवातीच्या महिन्यात शेअर बाजार कोसळला होता. कोषीय (Fiscal) स्थिती ढासळल्याने महागाई भडकली होती. पण, हळूहळू शेअर बाजार सावरला. संपुआवरील डाव्या पक्षांच्या प्रभुत्वामुळे गुंतवणूकदारांच्या मनात निर्माण झालेला संशय निवळू लागला. सोनिया गांधी, मनमोहन सिंग, चिदंबरम् ही त्रयी डाव्यांच्या सापाला ताब्यात ठेवू शकतात; या सापाचे दात पाडण्याचे व विष उतरवण्याचे कौशल्य या त्रयीत आहे याची प्रचीती आल्यानंतर शेअर बाजारातील तेजीने उच्चांक ओलांडून भरारी मारली. महागाई वाढण्याची गती कमी झाली.

भाषणाची सुरवात तर उत्तम झाली. आता पुढे ? वित्तमंत्र्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) शासनाची खिल्ली उडवली. गेल्या वेळच्या आर्थिक सर्वेक्षणात त्यांनी 'रालोआ शासनाच्या कारकिर्दीत देशातील आर्थिक परिस्थिती सुदृढ असल्याचे' सर्टिफिकेट दिले होते. या वेळी त्यात थोडी सुधारणा केली. 'रालोआ'चे वित्तमंत्री नशीबवान होते. पण, रालोआच्या कारकिर्दीतील अर्थव्यवस्थेच्या बाळशात काही छुपे आजारही होते. त्यांचा परिणाम संपुआ शासनाला भोगावा लागल्याचे, त्यांनी आवर्जून सांगितले.

संपुआ शासनाला प्रचंड नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. त्सुनामीचा प्रलय, काश्मिरातील प्रचंड हिमपात इथपासून अगदी मांढरादेवीच्या चेंगराचेंगरीपर्यंत उल्लेख झाला. श्रोत्यांची सहानुभूती मिळाली. या सर्व संकटांना तोंड देऊन, संकटग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे खंबीर आश्वासनही दिले. या संकटप्रसंगी शासकीय यंत्रणेची अकार्यक्षमता उघडी पडली होती, त्याचा मात्र उल्लेख नाही. धोक्याची पूर्वसूचना देण्याची व्यवस्था शासनाने बासनात बांधून ठेवली नसती, तर हजारो लोकांचे प्राण वाचले असते याचाही उल्लेख अनावश्यक ठरला.

आता पुढे ? अर्थातच, संपुआच्या राष्ट्रीय समान किमान कार्यक्रमाची भलावण. त्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अर्थकारण 'आम आदमी'करिता नसल्याची टीका. एवढे नमन झाल्यावर वित्तमंत्र्यांनी आपला नवा खेळ मांडायला सुरवात केली.

आता केवळ 'गरिबी हटाओ' नाही, तर गरिबी आणि बेरोजगारीवर 'हल्ला

बोल' !

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना :** खर्चात वाढ ४,०२० कोटींपासून ११,००० कोटींपर्यंत.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना :** कायकर्त्यांचे प्रशिक्षण, प्राथमिक आरोग्य केंद्रे सशक्त करणे, बरोबरच दिल्लीच्या आयुर्विज्ञान संस्थे (AIIMS) सारख्या सहा संस्था उभ्या केल्या जातील – पुढच्या आर्थिक वर्षात!

**अंत्योदय अन्न योजना :** अडीच कोटी परिवारांपर्यंत पोचवण्याचा विचार.

**शिशुविकास योजना :** ८९,१६८ नवी अंगणवाडी केंद्रे पोषणाचा दर्जा दुणावणार. निम्मा खर्च राज्यशासनांच्या डोक्यावर, अर्धा केंद्र शासनाकडे.

**सर्व शिक्षा अभियान :** प्रारंभिक शिक्षाकोषात रुपये ७,१५६ कोटीपर्यंत वाढ.

**पेयजल आणि सार्वजनिक आरोग्य :** सर्व योजना राजीव गांधी पेयजल अभियान (Mission) मध्ये सामावल्या जातील. २ लाख १६ हजार घरांपर्यंत पेयजल नेण्याचा कार्यक्रम. सार्वजनिक आरोग्य योजना देशातील एकूण एक जिल्ह्यात विस्तारणार.

**अनुसूचित जाती व वन्य जमातींसाठी अनेक शिष्यवृत्त्या :** निवडक विद्यापीठांत M. Phil आणि Ph. D. करणाऱ्या विद्यार्थ्यांवर विशेष भर.

**स्त्रिया आणि मुलांच्या** दृष्टीने अंदाजपत्रकाची वेगळी प्रस्तुती करण्याची योजना हळूहळू सर्व खात्यांना लागू करण्याचा इरादा.

**अल्पसंख्याकांच्या विकासासाठी अल्पसंख्याक विकास कॉर्पोरेशन** (कोष नाही), सर्व शिक्षा अभियान, कस्तुरबा बालिका विद्यालय योजना, अंगणवाडी केंद्रे विशेषकरून अल्पसंख्याकांच्या वस्त्यांत, प्रदेशांत राबवणार.

**मागास प्रदेश विकास कोष :** रुपये ५,००० कोटी. गेल्या वर्षी स्थापन झालेला समविकास कोष, ज्यातून बिहार राज्याची भर केली होती, अजून दोन वर्षे चालूच राहणार. रुपये ७,०९५ कोटी. जम्मू-काश्मीरसाठी राज्ययोजनेखेरीज पुनर्वसनासाठीही मदत देणार. बागलिहार धरणासाठी उचित अर्थपुरवठ्याची तरतूद केली जाईल. ईशान्य भागासाठी रु. ४५० कोटींची तरतूद.

**भारत निर्माण :**

- ९ कोटी हेक्टर जमीन सिंचनाखाली आणणार.
- गरिबांसाठी ६० लाख नवी घरे
- हजारांवरील वस्तीच्या सर्व गावांना सडका
- पेयजलाचा पुरवठा नसलेल्या ७४,००० वाड्या-वस्त्यांना पुरवठा

होणार

● १२,५०० गावांना आणि २३० लाख घरकुलांना वीजपुरवठा

समाजातील प्रत्येक कमजोर वर्ग, जाती, प्रदेश, विभाग यांची या अंदाजपत्रकात भलावण झाली. शेतीला विशेष प्राधान्य देण्याचे राष्ट्रीय समान किसान कार्यक्रमातील आश्वासन आहे.

**फळबाग अभियान :** रुपये ६३० कोटी. नवी बाजारव्यवस्था आणण्याची जबाबदारी 'नाबार्ड' आणि 'NCDC' या संस्थांकडे. कृषिउत्पन्न बाजार समित्यांच्या कायद्यात सुधारणा करण्याची योजना राज्यांपुरतीच सीमित.

**आता शेतकऱ्यांची लयलूट!**

**जलसंधारण, पूरनियंत्रण, भूसंधारण :** गेल्या अंदाजपत्रकाच्या वेळी जाहीर झालेली तळी व गावतळी यांच्या दुरुस्तीची योजना आता मार्च २००५ मध्ये चालू होण्याची शक्यता. यामध्ये ४६ जिल्ह्यांतील ७०० तळयांच्या कामांतून ७०,००० हेक्टर क्षेत्रात सिंचनव्यवस्था होणार. यासाठी यावर्षी १८० कोटींची तरतूद राहील.

**ठिबक व फवारे सिंचन :** ७० लाख हेक्टर चालू पंचवार्षिक योजनेत. पुढील पंचवार्षिक योजनेत १४० लाख हेक्टर.

**कर्जपुरवठा आणि कर्जबाजारीपणा :** गैरसरकारी संस्था (NGO) आणि गावातील ज्ञानकेंद्रे यांच्यामार्फत कर्जपुरवठा करण्याची योजना रिझर्व्ह बँक बनवेल. गेल्या वर्षी कर्जपुरवठ्यासाठी १०५,००० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठरले होते. ते ओलांडून प्रत्यक्षात १०८,५०० कोटी रुपयांचा कर्जपुरवठा झाला आहे. ५० लाख नवीन खातेदारांना कर्जे देण्यात आली( !) या वर्षी कर्जपुरवठ्याच्या रकमेत ३०% वाढ होईल व ही रुपये ३६,००० कोटींची रक्कम आणखी नव्या ५० लाख शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करेल.

**बचतगटांची** संख्या २ लाखांपासून २५ लाखांपर्यंत वाढवण्यात येईल. या गटांसाठीचा भांडवल निधी रुपये २०० कोटींपर्यंत वाढवला जाईल. यासाठी अर्हताप्राप्त NGO च्या माध्यमांतून बँकांकडून कर्जे पोहोचवली जातील.

● NGO, बचतगट इत्यादींना छोट्या विमा योजनांतही सहभागी करून घेतले जाईल. १५ ऑगस्ट २००७ पर्यंत गाव तेथे ज्ञानकेंद्र ( !) यासाठी ८० NGO व तत्सम संस्थांच्या मार्फत ही योजना राबवली जाईल.

● शेतीविषयक संशोधनासाठी रुपये ५० कोटीचा राष्ट्रीय निधी उभा करून शेतीकरिता खरोखर उपयोगी संशोधनास चालना दिली जाईल.

अंदाजपत्रकात अशाच प्रकारच्या खिरापतीचा कार्यक्रम वित्तमंत्र्यांच्या सर्व भाषणभर चालू राहिला.

कारखानदारी, साखर कारखाने, छोटे उद्योगधंदे, संसाधन (Infrastructure) एवढेच नव्हे तर, राष्ट्रीय महामार्ग योजना, इंदिरा आवास योजना, शहरी विकास या सर्वच क्षेत्रांतील संबंधितांना प्रसन्न प्रसन्न वाटावे अशी उधळण झाली.

**या सगळ्यांकरिता पैसा कोठून यायचा?**

रेल्वे अंदाजपत्रकात लालूप्रसादांनी भाडेवाढ केली नाही. वित्तमंत्र्यांनीही करदात्या नागरिकांचा फारसा रोष ओढवून घेतलेला नाही.

आयात शुल्क, विक्री कर, उत्पादन कर यात किरकोळ फेरफार केले; पण त्यांच्या एकूण परिणामी शासनाची मिळकत ना वाढली, ना कमी झाली.

प्रत्यक्ष करांत वित्तमंत्र्यांनी सर्वांनाच खुश करून टाकले. करपात्रतेची किमान रक्कम एक लाख गेल्याच वर्षी वाढवून दिली होती. त्यात काही फरक केला नाही; परंतु ही रक्कम महिलांकरिता व ज्येष्ठ नागरिकांसाठी वाढवून दिली.

कंपन्यांवरील करआकारणी जबरदस्त वाढवावी अशी डाव्यांची मागणी होती. तिला वित्तमंत्र्यांनी दाद दिली नाही; परिणामी, शेअरबाजार वधारला.

शेतीतील मिळकतीवर कर लावला पाहिजे अशीही डाव्यांची मागणी होती. तिलाही वित्तमंत्र्यांनी धूप घातलेला नाही.

शेतीच्या जमीनधारणेत सुधारणा करून, मोठ्या(?) जमीनदारांच्या जमिनी काढून घेऊन, त्या भूमिहीन व अल्पभूधारक यांना देण्यात याव्यात अशीही डाव्यांची जोरदार मागणी होती.

कारखानदारीतील कार्यक्षमता वाढावी या दृष्टीने कामगार कायद्यात बदल करावेत, असा प्रस्ताव आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आला होता. प्रत्यक्षात अंदाजपत्रकात मात्र मजूर चळवळीला दुखावल्यासारखे होईल असे कोणतेही प्रस्ताव सुचवण्यात आलेले नाहीत.

शेतमजुरांसाठी शिक्षण, आरोग्यसेवा, राहण्यासाठी घरे पुरवण्याची योजनाही डावे मागत होते. सर्वच गरीब आणि दारिद्र्यरेषेखालील प्रजा यासाठी अशा योजना वित्तमंत्र्यांनी जाहीर केल्या. पण, शेतमजुरांसाठी काही खास कल्याणकारी योजना मांडण्यात आल्या नाहीत. रोजगार हमी योजनेप्रमाणे 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' पद्धतीने वतनदारी करावी, मिळालेले धान्य विकून पैसे कमवावेत याबद्दल भूमिहीनांना संतोष आहेच. भूमीसुधार झाले तर मिळालेल्या जमिनीत 'जमीन कसण्याची पाळी येते काय?' ही चिंता दूर झाल्यानेही त्यांना समाधान आहे.

अशा दानशूर अंदाजपत्रकाच्या घोषणांचे, अर्थातच, सर्वत्र स्वागत झाले. संपुआच्या नेत्यांनी भलावण केली. डाव्या पक्षांनीही, 'आमचे म्हणणे वित्तमंत्र्यांनी ऐकून तर घेतले,' असे समाधान व्यक्त केले. विरोधकांनी नेहमीप्रमाणे, 'गरिबांसाठी काही नाही,' वगैरे सूर लावले. अर्थशास्त्र्यांनी अंदाजपत्रकाच्या एका एका अवयवाविषयी टीकटिप्पणी केली. एखाद्या माणसाचे वर्णन करताना नाक कसे आहे, कान कसे आहे, डोळे कसे, पाय कसे, हात कसे, केस कसे यांची सुटी सुटी चिकित्सा झाली; पण सगळे मिळून व्यक्तिमत्त्व काय आहे, या माणसाची प्रकृती काय याची चर्चा फारशी झाली नाही, तर त्या माणसाची ओळख कशी होणार ?

संपुआ शासनाच्या या पूर्ण वर्षाच्या पहिल्या अंदाजपत्रकाने नेमके काय घडले ? राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मागे टाकून, संपुआने सत्ता हाती घेतली, काँग्रेसला त्यासाठी लालू-सोरेनसारख्या भ्रष्टाचारी-गुन्हेगारांशी सोयरीक करावी लागली; केरळ, पश्चिम बंगालसारख्या राज्यांत काँग्रेसचे प्रमुख प्रतिस्पर्धी असलेल्या डाव्या पक्षांशी समझोता करून, त्यांची अरेरावीही सहन करावी लागली. अशा परिस्थितीत या अंदाजपत्रकाचा अर्थ काय ?

आघाडी शासनांचा धर्म काँग्रेस आणि सोनिया गांधी यांच्या प्रकृतीला झेपणारा नाही. जातीयवादाचे बुजगावणे उभे करीत, त्यांना भाजपप्रणीत रालोआलाही संपवायचे आहे आणि त्याबरोबर लालू, मुलायम आणि डावे यांचे मतदारसंघ स्वतःच्या ताकदीवर निवडणुकांत जिंकायचे आहेत. काँग्रेसची एकछत्री सत्ता तयार झाली, की काही तात्कालिक संकटांचे निमित्त करून, खानदानाबाहेरच्या पंतप्रधानांची गच्छंती करून, सर्व सत्ता हाती घेण्यास नवा 'आतला आवाज' दुजोरा देऊ लागेल.

सर्व दलित, आदिवासी, अल्पसंख्याक - खास करून मुस्लिम मतांवरचा 'संपुआ' घटकपक्षांचा ताबा संपवणे आवश्यक आहे. या हेतूनेच अंदाजपत्रकातील शब्दांची आणि आश्वासनांची खैरात झाली आहे.

नेहरूप्रणीत समाजवाद तर इतिहासजमा झाला. स्वातंत्र्य आणि खुलीव्यवस्था या संकल्पना भारतीयांच्या परंपरागत 'मायबाप सरकार' प्रवृत्तीला झेपणाऱ्या नाहीत. सम्यक् राष्ट्राच्या उद्धारापेक्षा आपला समाज, जाती आणि वर्ग यांच्या उत्कर्षाची तहान अधिक प्रखर आहे.

खुली व्यवस्था आणि सरकारशाही यांची यशस्वी व्यवहारी सांगड कशी घालता येईल?

पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली वित्तमंत्री म्हणून काम करत असताना डॉ. मनमोहन सिंग मला स्पष्टपणे म्हणाले होते, "तुमचा स्वातंत्र्याचा विचार ठीक आहे. शेवटी खुल्या व्यवस्थेत आपल्याला जावेच लागेल. पण, तेथे जाण्याची योग्य गती कोणती याचा सर्वांत योग्य (राजकारणी) अंदाज रावसाहेबांना आहे."

दक्षिण दिल्लीतील निवडणुकीतील डॉ. मनमोहन सिंग यांच्या पराभवानंतर त्यांना हे स्पष्ट झाले, की निखळ स्वतंत्रतावाद राजकारणात खपत नाही. सध्याची राजकीय व्यवस्था वापरून, सत्ता हाती घेण्याची क्षमता असलेला नेता आणि त्याचा पक्षच खुली व्यवस्था आणू शकेल. शुद्ध खुला विचार घेऊन, राजकारणात मार खाणारा नेता व पक्ष काय कपाळाची खुली व्यवस्था आणणार!

हेच कोडे अटल बिहारी वाजपेयींनाही पडले होते. त्यांनी मंदिरवाद्यांच्या मदतीने भारतीय जनता पक्ष सत्तेत आणला आणि मंदिरवादी व स्वदेशीवादी यांना आटोक्यात ठेवून खुली आर्थिक धोरणे पुढे चालवली. पण, धर्मवाद, स्वदेशी आणि स्वतंत्रतावाद यांचे वाजपेयी-मिश्रण लोकांना रुचले नाही. 'मोदी'वादाने वाजपेयींचे दूध नासले – आणि 'भारत उदय' आम जनतेचा उदय नाही अशी भावना देशात पसरली. खुल्या व्यवस्थेच्या सुरवातीच्या काळात लोकांकडून रक्त, घाम, अश्रू यांची अपेक्षा करावी लागते. त्या काळात, स्वतंत्रतावाद फक्त भद्र लोकांकरिता आहे असा सार्वत्रिक समज अत्यंत घातक ठरणे साहजिक आहे आणि तसा तो ठरलाही.

डॉ. मनमोहन सिंग यांची दृष्टी थोडी वेगळी आहे. लोकमनावर प्रभुत्व गाजवणारी एक जादूची कांडी त्यांच्या हाती लागली आहे. तिच्या आधाराने निरोगी अर्थव्यवस्था आणण्याची त्यांची मनीषा आहे. या कार्यक्रमात खानदानाचा आधार घेणे शक्य नाही. खानदान आणि खुले अर्थशास्त्र यांची सांगड कशी घालावी ?

पी. व्ही नरसिंह राव यांनी मध्यम मार्ग सुचवला होता. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी एक सैद्धांतिक पर्याय पुढे ठेवला होता.

'ॲरोच्या सिद्धांता (Arrow's theorem) प्रमाणे, सामूहिक निर्णय प्रक्रिया ही अशास्त्रीय असते हे नाकारता येत नाही; परंतु तरीही दुष्काळ, दारिद्र्य, बेरोजगारी, अनारोग्य यांनी पिडलेल्या दरिद्री-नारायणाकरिता शासनाची काही जबाबदारी आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार या क्षेत्रांत शासनाने आक्रमक आणि कार्यक्षम कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे,' असे त्यांचे प्रतिपादन

होते.

काँग्रेस नेते राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या शासनकाळात अमर्त्य सेन यांच्या वारंवार भेटीगाठी घेत होते, NGO कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेत होते, हे लक्षात घ्यायला पाहिजे.

डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्र, मेधा पाटकर, वंदना शिवा यांचा पुराणमतवाद आणि अमर्त्य सेन यांचे नैतिक तत्त्वज्ञान अशा मिश्रणाचा प्रयोग संपुआ शासनाखाली होऊ घातला आहे.

या प्रयोगात नाव दीनदुबळ्यांचे आहे, दलितांचे आहे, शेतकऱ्यांचे आहे, मजुरांचे आहे, गरिबांचे आहे; पण, ते कल्याण करण्याची जबाबदारी आहे शासन आणि नोकरशाही यांच्याकडे. नेहरूप्रणीत समाजवादाच्या जमान्यात समाजवादाच्या नावाखाली सवर्ण प्रभुत्वाखालील नोकरशाहीचे उखळ पांढरे झाले, नोकरशहा माजले. सोनियावादाच्या या नवीन प्रयोगाच्या वेळी नोकरशाही थोडी अधिक 'मंडला'वलेली आहे, एवढाच काय तो फरक.

डॉ. अमर्त्य सेन यांना नोबेल पुरस्कार मिळाला, तेव्हा मी लिहिलेल्या लेखात काही प्रश्न विचारले होते. 'नोबेल पुरस्कार ठीक आहे; पण तो समाजशास्त्र, नैतिक तत्त्वज्ञान अशा क्षेत्रात द्यायला काहीच हरकत नव्हती. पुरस्कार अर्थशास्त्रात कशासाठी?' दुसरा प्रश्न, – 'कार्यक्षम सरकारी कार्यवाही किंवा हस्तक्षेप हा 'वदतो व्याघात्' आहे. सरकार समस्या क्या सुलझाए, सरकार यही समस्या है! मग, सरकारच्या हाती दीनोद्धाराच्या कार्यक्रमाची सूत्रे देऊन काय साधणार?'

संपूर्ण स्वातंत्र्योत्तर काळात गरिबी हटवण्याच्या घोषणांखाली नोकरशाही पोसली गेली. गरीब गरीबच राहिला आणि 'गरिबी हटाओ' मोठा धंदा बनला.

पी. चिदंबरम् यांच्या अंदाजपत्रकी भाषणात सरकारी हस्तक्षेपाचा वारंवार उल्लेख आहे.

''विकास, स्थैर्य आणि न्याय यासाठी शासनाचा निर्णायक हस्तक्षेप'' हे या अंदाजपत्रकाचे ब्रीदवाक्य आहे. भाषणाच्या शेवटी अमर्त्य सेन यांचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. तामिळ कवी संत विरुवल्लुवार यांच्या पंक्तीही वित्तमंत्र्यांनी उद्धृत केल्या. सर्व कल्याण–कार्यक्रमांत गैरसरकारी संघटनांची (NGO ची) मदत गृहीत धरली आहे आणि सर्व कमजोर वर्गांना लुभावणारी आश्वासने दिली आहेत.

थोडक्यात, स्वातंत्र्यानंतरचा जुनाच, गरिबांना फसवण्याचा खेळ चालू आहे. 'मातीचे सोने करून दाखवतो' म्हणणाऱ्या ठगाच्या हाती माणूस एकदा फसेल;

दुसऱ्यांदा फसला, तर त्याचे हसे होईल.

पन्नास वर्षांपूर्वी समाजवादाची घोडचूक लोकांनी उत्साहाने स्वीकारली, वाट हरवली हे समजायला पन्नास वर्षे लागली. याही वेळी काही वेगळे होईल असे नाही. नोकरशाही काही महात्म्यांनी भरलेली नाही. भ्रष्टाचार, कामचुकारपणा, अकार्यक्षमता यांमुळे हजारो कोटी रुपयांची उधळमाधळ होणार आहे. दीनदुबळ्यांच्या हाती काही लागणे सुतराम शक्य नाही.

गरिबांच्या उद्धारासाठी महात्माजींनी 'अन्त्योदय' सांगितला; पण, त्यासाठी 'गरिबांच्या पाठीवरून उतरा,' अशी उपाययोजना सांगितली. इंग्रजांच्या काळात ज्यांनी लुटले, स्वातंत्र्यानंतर ज्यांनी पिळले तेच पुन्हा गरिबांच्या कल्याणासाठी सरसावले आहेत, ही मोठी शोकांतिक आहे.

**याला उपाय काय?**

समाजवादाचा आग्रह धरता येत नाही म्हणून समाजाची समाजवादी धारणा (Socialistic Pattern of Society) असा शब्दप्रयोग नेहरूंनी वापरला आणि लायसेन्स-परमिट-कोटा राज्य बनवले; आकडेवारीचा खेळ करून देशाच्या विकासाचा आभास उभा केला. त्यानंतर ३० वर्षांनी इंदिराबाईंना 'गरिबी हटाओ'चा नारा द्यावा लागला. सरकारी हस्तक्षेपाने गरिबी हटत नाही, याचा साक्षात्कार व्हायला इतकी वर्षे का जावी लागली ?

सरकारी नियोजनाचे, मग ते नियोजन रशियातील असो की भारतातील, उद्दिष्टांची आतषबाजी हे महत्त्वाचे अंग असते. त्यामुळे, नियोजनकर्त्यांना स्वप्नांचे सौदागर बनता येते. नियोजनाच्या मसुद्यात कधीही, कोठेही अपयशाची फुटपट्टी ठरवली जात नाही. चिदंबरम यांनी ९ कोटी हेक्टर जमीन पाण्याखाली आणण्याचे उद्दिष्ट जाहीर केले; पण त्याबरोबर ५० लाख हेक्टर जमीनही सिंचनाखाली न आल्यास आमचे नियोजन फसले याची आम्ही कबुली देऊ, असे कोठेही म्हटले नाही.

समाजवादाचा फसलेला डाव आता NGO च्या मदतीने मांडण्याचा प्रयत्न होत आहे. यशस्वी झाला, तर कोणाला दुःख होण्याचे कारण नाही; पण या कार्यक्रमातून पुन्हा एकदा आर्थिक अरिष्टाच्या कडेलोटापर्यंत जाण्याचे टाळायचे असेल, तर या प्रत्येक उद्दिष्टाबरोबर अपयशाचे निश्चित मापदंड ठरवून त्यानुसार सातत्याने पुनर्निरीक्षण घेत राहिले, तरच या नव्या अरिष्टातून सहीसलामत सुटण्याची आशा बाळगता येईल.

*(६ मार्च २००५)*

◆◆

# सावकारांचे पुनरागमन

खासगी सावकारांसंबधी वादविवाद इतिहासजमा झाला आहे असे ज्यांना वाटत असेल त्यांच्यासाठी एक बातमी आहे. महाराष्ट्राच्या विदर्भ विभागातील, आत्महत्या करणाऱ्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सत्तेच्या अगदी शिखरावर असलेले लोकही, खास करून विदर्भातीलच शेतकरी आत्महत्येचा पर्याय स्वीकारतात, त्याचे कारण मांडण्यासाठी षड्यंत्र रचीत आहेत. त्याही पलीकडे, शेतकऱ्यांच्या या हवालदिलपणाचे केंद्र यवतमाळ जिल्हा का असावा, हेही शोधण्याच्या मिषाने त्यांनी षड्यंत्र रचले आहे. सहकारी बँकांनी सुरू केलेल्या कर्जवसुली मोहिमेत त्यांचे अधिकारी व कर्मचारी ज्या जाचक आणि अपमानकारक पद्धती अवलंबित आहेत; त्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन, विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, हे स्पष्ट दिसत असताना यवतमाळ जिल्ह्यासाठी मात्र वेगळेच रामायण रचले जात आहे. यवतमाळ हा पूर्वी इजारदारांचा म्हणजे शंभर–सव्वाशे एकर पदरी बाळगणाऱ्या जमीनदारांचा प्रदेश म्हणून ओळखला जायचा. साहजिकच, त्यातले काही इजारदार खेड्यातील लोकांना कर्जाऊ पैसे देत. पूर्वाश्रमीच्या या इजारदारांपैकी काही आजही कर्जाऊ पैसे देण्याचा व्यवसाय करीत असण्याची शक्यता आहे. खासगी सावकारांचे जवळजवळ उच्चाटन झाले आहे असे म्हटले जात असले, तरी आजमितीला महाराष्ट्रातील नोंदणीकृत सावकारांची संख्या एक लाखाच्या जवळपास आहे. त्यातलेच काही यवतमाळ जिल्ह्यातही आपला व्यवसाय करीत असण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील शेतकरीसुद्धा खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. खासगी सावकारांना आपल्या कर्जवसुलीसाठी जोरजबरदस्तीचा कोणताच मार्ग उपलब्ध नसतो. आता तर खुद्द महाराष्ट्र राज्य शासनच, 'खासगी सावकारांची

कर्जे फेडू नका,' असा सल्ला शेतकऱ्यांना देत आहे. काही असले तरी, आपल्या कर्जवसुलीसाठी खासगी सावकार जे काही मार्ग अवलंबू शकतात ते, आज सहकारी किंवा व्यापारी बँका त्यांच्या कर्जवसुलीसाठी जे मार्ग वापरीत आहेत त्यांच्या तुलनेत अगदी 'अळणी' ठरतील. वास्तव काही असले, तरी महाराष्ट्रातील सत्ताधारी आघाडीच्या नेत्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यासत्राचे खापर यवतमाळमधील खासगी सावकारांच्या माथ्यावर फोडण्याचे ठरवले आहे. खासगी सावकारांकडून कर्ज घेतले असण्याची शक्यता असावी अशी एकदोन प्रकरणे त्यांनी त्यासाठी उकरून काढली आहेत. तेवढ्या भांडवलावर राज्याचे उपमुख्यमंत्रीच नव्हे तर टेलिव्हिजनची एक नामांकित वाहिनी आपला भरपूर वेळ खर्च करून, खासगी सावकार आपल्या कर्जवसुलीसाठी जुलूमजबरदस्तीचे मार्ग अवलंबीत आहेत आणि त्यामुळे शेतकऱ्यांत वैफल्य दाटले आहे असा प्रचार करीत आहे.

पण, हा आरोप टिकत नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. सरकारी अधिकारीच, कर्जामुळे हैराण झालेल्या एखाद्या शेतकऱ्याला गोडीगुलाबीत घेऊन, त्याच्या जमिनीचा विक्रीव्यवहार कर्जप्रकरणात रूपांतरित करायला लावतो आणि ती विकत घेणाऱ्या तथाकथित सावकार-खरेदीदारांची शेतकऱ्यांना हजारांनी रक्कम कर्जाऊ देण्याची ऐपतही नसते, तरी हे व्यवहार कागदोपत्री होतात. टेलिव्हिजनच्या त्या वाहिनीच्या कॅमेऱ्यासमोर उभे राहून, एखादा साधासुधा शेतकरी जेव्हा ही हकिकत घडाघडा सांगतो तेव्हा त्या वाहिनीवाल्यांची मोठी पंचाईत होते. ते खरेदीदार 'सावकार' म्हणजे दुसरेतिसरे कोणी नव्हे तर 'स्वस्तात मिळते आहे तर घेऊन टाकू' या भावनेने जमीन विकत घेणारे भूमिहीन शेतमजूरच असावेत असे हे नाटक प्रत्यक्षात पाहणाऱ्यांच्या लक्षात सहज येते.

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले, त्या काळात 'खासगी सावकार आणि त्यांचा कारभार' हा देशातील मोठा कळीचा मुद्दा होता. समाजवादी राजवटीच्या ऐन बहरात खासगी सावकार आणि जमीनदार म्हणजे राजकीय भाषणबाजीची प्रमुख लक्ष्ये होती. शेती हे तोट्याचे कलम आहे याबद्दल कोणीच काही बोलत नसत. शेतकऱ्यांच्या दैनावस्थेचे सगळे खापर सावकारांच्या आणि जमीनदारांच्या 'पाताळयंत्री' कारवायांवर फोडले जात असे आणि मग, सावकार आणि जमीनदार या दोन्ही संस्थांचे मोठ्या तडफेने उच्चाटन करण्यात आले.

खासगी सावकारीचे उच्चाटन होऊनसुद्धा शेती हे तोट्याचेच कलम राहिले, शेतकऱ्यांच्या डोक्यावरील वाढत्या कर्जबाजारीपणाचा बोजाही कायम राहिला

आणि परिणामी, वैफल्यामुळे आणि नाचक्कीच्या भीतीने ते आत्महत्येकडे ढकलले जात आहेत, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. सावकार आणि जमीनदार यांच्या उच्चाटनामुळे शेती क्षेत्रावर मात्र एक ठळक परिणाम झाला. या दोन्ही संस्थांच्या उच्चाटनाबरोबर, शेतीक्षेत्रात तयार झालेली बचत गावकुसाच्या आत न राहता, आता ती शहरी भागांकडे वाहू लागली. संस्थांच्या उच्चाटनामागे हाच हेतू असावा असे वाटण्यास मोठा वाव आहे. शेतकऱ्यांच्या दैनावस्थेला खरोखरच खासगी सावकार कारण आहेत का?

गेल्या महिन्यात 'फायनान्शियल एक्स्प्रेस' या दैनिकाने 'नवीन शेतीची आव्हाने' या विषयावर एक 'गोलमेज परिषद' आयोजित केली होती. निमंत्रितांत वित्तीय संस्थांच्या आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश होता. आश्चर्य म्हणजे या शेतीविषयक परिषदेला शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कोणालाही निमंत्रण नव्हते. महाराष्ट्राचे कृषी आयुक्त श्री. गोएल यांनी ही बाब आवर्जून निदर्शनास आणली. शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे या परिषदेत कोणी नसले, तरी वित्तीय संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बऱ्याच अधिकाऱ्यांनी आपल्या मांडणीत 'शेतीक्षेत्रात खासगी सावकारांचे काही स्थान आहे आणि समर्थनही आहे; शेतीमधील संसाधनांचा दर्जा सुधारण्याच्या आणि शेतीतील गुंतवणूक वाढण्याच्या दृष्टीने त्यांचे अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रण करता येईल,' असे निदर्शनास आणून दिले. विशेष म्हणजे, या परिषदेत सहभागी झालेले आय.सी.आय.सी.आय. बँकेचे कार्यकारी संचालक श्री. नचिकेत मोर हे स्वत: यवतमाळ जिल्ह्याचे मूळ रहिवासी आहेत.

श्री. मोर आणि इतर प्रतिनिधींनी मांडलेल्या मुद्द्यांचा थोडक्यात सारांश :

'हिंदुस्थानातील शेती स्थानिक परिस्थितीशी जुळणाऱ्या, यथार्थ वित्तपुरवठा संस्थांपासून वंचित आहे. ज्यांच्याकडे शेतीला वित्तपुरवठा करण्याची थोडीफार वित्तीय क्षमता होती, त्यांना १९५० च्या दशकात गावातून चंबूगबाळे आवरून पळ काढावा लागला आणि अजूनही त्यांच्यामागचा ससेमिरा चालू आहे. त्याशिवाय, शेतीला 'राम राम' करण्यासंबंधीचे सरकारी धोरण शेतीमध्ये, शेतीचा गाडा चालू राहण्याइतपतसुद्धा नवीन हुन्नर आणि भांडवल येण्याला प्रतिबंध करते.'

ग्रामीण पतपुरवठ्याच्या पारंपरिक व्यवस्थेविरुद्ध १९५०च्या दशकातील विषारी मोहीम केवळ शेतकऱ्यांच्या भोळेभाबडेपणामुळे यशस्वी झाली. सावकारांना काढून, त्यांच्या जागी येणाऱ्या, तारणहार वाटणाऱ्या सहकारी प्राथमिक सोसायट्या आपले काहीसे भले करतील असे शेतकऱ्यांना वाटले होते. पण, सहकारी संस्था

या काही खासगी सावकारांहूनही अधिक वाईट ठरल्या, हे या संस्थांवरील राजकीय प्रभावाने सिद्ध झाले आहे. खासगी सावकार लावत असलेल्या व्याजदरांबाबत बरेच दावेप्रतिदावे केले जातात; पण सावकार जो काही व्याजदर लावतात तो पैसे देण्याघेण्याच्या धंद्यातील संभाव्य धोका आणि शेतकऱ्याला दिवसाच्या कोणत्याही वेळी, आठवड्याच्या आणि वर्षाच्या कोणत्याही दिवशी कर्ज मिळण्याची खास सोय ते ठेवतात, त्यांच्या दृष्टीने उचितच असतो, याला अर्थशास्त्रज्ञांनी मान्यता दिली आहे. यापलीकडे, सहकारी बँकांचा त्यांच्या सर्व व्यवहारांची गोळाबेरीज करता, जो व्याजदर पडतो तो सावकारांच्या व्याजदरापेक्षा काही उदार असत नाही. अलीकडे, सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाच्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेने आदेश काढले आहेत, की शेतकऱ्यांच्या कर्जावर वार्षिक सरळ व्याजच लावावे (तिमाही, सहामाही इ. नाही) आणि थकबाकीदार झाल्याशिवाय व्याजाची चक्रवाढ करू नये. व्यापारी बँकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आज्ञेचे पालन केलेले दिसते; पण बहुतेक सर्व सहकारी बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या या आज्ञेचे पालन केले नाही आणि आपल्या आदेशांचे पालन होते आहे किंवा नाही, याकडे रिझर्व्ह बँकही फार गंभीरपणे पाहते आहे असे दिसत नाही.

शेतीक्षेत्रातील गुंतवणूक आणि त्याला होणारा वित्तपुरवठा यात सुधारणा होण्यासाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे.

◆सहकारी सोसायट्यांचे शुद्धीकरण

◆उचित नियंत्रणयंत्रणेच्या देखरेखीखाली खासगी सावकार कार्यरत राहावेत अशी सोय

◆शेतीला 'राम राम' करणे व शेतीक्षेत्रात पदार्पण करणे यावर असलेल्या निर्बंधांचा फेरविचार.

मी खासगी सावकारांचे काही वकीलपत्र घेतलेले नाही. सावकारीचा धंदा पूर्वापार चालत आला असला, तरी इंग्रजांनी जमीन महसूल रोखीने वसूल करण्याची सुरवात केली तेव्हापासून खासगी सावकारी भरभराटीला आली, हे निर्विवाद सत्य आहे. त्या काळी, अगदी सुस्थितीतील शेतकऱ्यांनासुद्धा महसूल भरण्यासाठी रोकड जमा करणे मुश्किल होऊ लागले आणि त्यांना सावकाराच्या दारी जाणे भाग पडले. भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचा फायदा घेऊन, काही सावकारांनी बेकायदेशीर आणि अनैतिक 'करण्या' करीत, आपला व्यवसाय चालवला असेल, हे न समजण्यासारखे नाही.

१९५०च्या दशकात खासगी सावकारांना गावातून हुसकावून लावण्यात आले

आणि शेतकरी वाऱ्यावर पडले. अनधिकृत वित्तीय संस्थांचा म्हणजे सावकारांचा कारभार चालूच राहिला आणि आजही शेतीला होणाऱ्या वित्तपुरवठ्यातील मोठ्या हिश्श्याचा स्रोत या संस्थाच आहेत. आजच्या घडीला जातीय विद्वेषाची आणि सावकारविरोधी जुन्या विखाराची आग भडकवण्याची गरज आहे का ? का शेतीकर्जाच्या व्याजदराबाबत तर्कसंगत आणि स्थानीय तोडगा शोधायला हवा?

*(२१ जानेवारी २००६)*

◆◆

# केंद्रीय अंदाजपत्रक २००६-०७
# 'शिळया कढीला ऊत'

वित्तमंत्री माननीय श्री. पी. चिदंबरम यांनी या वर्षी गोड स्वप्नवत अंदाजपत्रक देण्याचे वचन दिले होते. खरे म्हणजे गेल्या वर्षीच्या गोड स्वप्नामध्ये थोडी सुधारणा करू, असे त्यांना हे वचन देताना म्हणायचे असावे.

वचन देऊन नार्थ ब्लॉकमधील आपल्या टेबलाशी आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले असावे, की दिलेले वचन पाळणे जरा कठीणच आहे. मग गोड स्वप्नील अंदाजपत्रक देता येत नाही, तर निदान भीतिदायक अंदाजपत्रक न देता, दिलेले अंदाजपत्रकच गोड स्वप्नील अंदाजपत्रक असल्याचा बाजा वाजवावा, असे ठरवून २८ फेब्रुवारी २००६ रोजी देशाच्या वित्तमंत्र्यांनी नेमके हेच केले.

शाहरूख खानचा 'मैं हूँ ना?' हा गेल्या वर्षीच्या डायलॉग सोडून, त्यांनी या वेळी 'तिरुवल्लावर आणि विवेकानंद' यांचा आश्रय घेतला. विकास हाच गरिबीवर सर्वोत्तम उतारा आहे, असा इशारा त्यांनी आपल्या डाव्या मित्रांना मोठ्या खुबीने दिला.

वित्तमंत्र्यांचे अंदाजपत्रकी भाषण तब्बल नव्वद मिनिटे चालले. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांतील विनामूल्य अशा या दर्शनकाळातील सोळा मिनिटे राजकारणी फर्डेबाजी आणि वित्तविधेयकी आणि विधेयकबाह्य उपाययोजनांसंबंधी फुटकळ शेरेबाजी यांत त्यांनी घालवली.

अप्रत्यक्ष करांमध्ये किरकोळ बदल, अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये 'जैसे थे' परिस्थिती आणि शेवटी सेवाक्षेत्रांवरील वाढीव करदायित्व यामुळे डाव्या आघाडीला संतोष वाटावा. भारतीय अर्थव्यवस्थेची चढती कमान, शेअर बाजारातील अपूर्व भरभराट आणि राष्ट्रीय सकल उत्पादनातील ८% दराची वाढ... या पूर्वी न ऐकलेल्या गोष्टींचे श्रेय कारखानदारी आणि सेवा क्षेत्रांचे आहे; ते सरकारला देता येणार नाही.

शेती क्षेत्राचा विचार आला, की सगळे मुसळच केरात जाते. राष्ट्रीय सकल उत्पन्न (GDP) ८.१ टक्के वाढले, तरी शेतीक्षेत्रातील वाढ केवळ २.१ टक्के दराने झाली आहे. शेतीक्षेत्राच्या विकासदराचा हा आकडासुद्धा तसा फसवा आहे; कारण गेल्या वर्षीच्या या क्षेत्राचा विकासदर उणे होता. अन्नधान्य उत्पादनाच्या आघाडीवर खरे तर चांगली कामगिरी असायला हवी; पण हे उत्पादनही ३ वर्षांपूर्वीच्या उत्पादनापेक्षा कमीच आहे. सरकारने शेतीक्षेत्रातील उत्पन्नवाढीचा दर ४ टक्क्यांवर नेण्याचा संकल्प सोडला आहे. स्वामिनाथन समितीच्या शिफारशी वगळता संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारजवळ हा विकासदर गाठण्यासाठी काहीच योजना तयार नाहीत. स्वामिनाथन समितीच्या शिफारशींतही शेतीक्षेत्राला झेप घेता येईल असे फारसे काही नाही.

शेतकऱ्यांचा जाणता नेता म्हणून विद्यमान कृषिमंत्र्यांचा आणि दिवसरात्र 'आम आदमी'च्या भल्याचा ध्यास घेतलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडीचा दिमाख हजारोंच्या संख्येने होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे पोकळ सिद्ध होत आहे, ही त्याहूनही वाईट बाब आहे.

पी. चिदंबरम यांचे अंदाजपत्रक आत्महत्येच्या कड्यावर उभ्या असलेल्या शेतकऱ्याला काही आशेचा किरण दाखवीत नाही आणि शेतीक्षेत्रासाठी संकल्पित ४ टक्के विकासदरासाठी काही योजनाही देत नाही, हे पाहता हे अंदाजपत्रक अक्षरशः फोल ठरले आहे.

२००५-०६ सालातील अंदाजपत्रकात शेतीक्षेत्रातील सिंचनासाठी ४५०० कोटी रुपयांची तरतूद आणि १६८० कोटी रुपयांचे अनुदान असे ६,१८० कोटी रुपये मंजूर केले होते. त्याशिवाय, राज्य सरकारांनी २,५२० कोटी रुपये खर्च करावे अशी अपेक्षा होती. गेल्या वर्षी सिंचनासाठी प्रस्तावित या एकूण ८,७०० कोटी रुपयांपैकी फक्त २,२५० कोटी रुपयेच खर्च झाले. चालू वर्षीच्या अंदाजपत्रकात मात्र सिंचनासाठी फक्त ७,१२१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, म्हणजे ती गेल्या वर्षीच्या ८,७०० कोटींपेक्षा कमीच आहे. गेल्या वर्षीच्या तरतुदीनुसार सिंचनाचा अनुशेष अंदाजे ४००० कोटी रुपयांचा आहे असे जरी गृहीत धरले, तरी यंदाच्या अंदाजपत्रकाने कृषिसिंचनाला तोंडघशीच पाडले म्हणावे लागेल.

सिंचन क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी पहिल्या टप्प्यासाठी २०,००० पाणीसंस्था आणि १४ लाख ७० हजार हेक्टर लाभक्षेत्र निर्धारित केले आहे. या क्षेत्रात सिंचन प्रकल्प उभे करण्यासाठी बहुउद्देशीय संस्थांकडून आवश्यक तो निधी जमवण्यात येईल, असे आश्वासन वित्तमंत्र्यांनी आपल्या यंदाच्या अंदाजपत्रकी

भाषणात दिले आहे. शिवाय, राज्यशासनांकडून हे काम करण्यासाठी 'मेमोरेंडम ऑफ अंडरस्टँडिंग'ही घेण्यात येईल. म्हणजे एकूणात 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र'! थोडक्यात, गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकानंतर सिंचनासाठी काही फारसे झाले नाही आणि येत्या वर्षातही फार काही होणे शक्य दिसत नाही.

गेले वर्षभर केंद्रीय वित्तमंत्री आणि कृषिमंत्री 'सरकारने शेतीक्षेत्रासाठी वाढीव कर्ज उपलब्ध केले आहे,' असा डांगोरा पिटीत आहेत. काहीही वाद न घालता, हे असे कर्ज उपलब्ध झाले आहे आणि शेतकऱ्यांच्या हातीही ते सहजासहजी पडू शकते आहे, असे गृहीत धरले, तरी एक प्रश्न पडतो, की सरकारने शेतीचे रूपांतर अर्थव्यवस्थेऐवजी 'कर्जव्यवस्थे'मध्ये करण्याचे ठरवले आहे काय? कालांतराने फायद्यात जाणाऱ्या उद्योगाच्या दृष्टीने कर्जाची हप्तेबंदी करणे उचित होऊ शकेल. पण, शेती हा मुळातच तोट्याचा व्यवसाय आहे. त्यासाठी आणखी पैसा पुरवणे, हे सरकार ते शेतकरी यांमधल्या यंत्रणेलाच लाभदायक होईल. अधिक कर्ज उपलब्ध करणे म्हणजे अजून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना आत्महत्येकडे ढकलण्यासारखे होईल. गेल्या वर्षी शेतीकर्जाच्या रकमेत ८०,००० कोटींपासून १,३१,००० कोटी रुपयांपर्यंत वाढ खरोखरीच सरकारखाती खर्च झाली असेल आणि तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्याऐवजी वाढल्या असतील, तर यंदा शेती कर्जाची रक्कम १,४१,००० कोटी किंवा १,७५,००० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावाकडे दक्षतेने पाहावे लागेल.

वित्तमंत्र्यांनी सहकारी वित्तसंस्था आणि प्रादेशिक बँकांकडून होणारा अल्पमुदतीचा कर्जपुरवठा नाबार्डमार्फत करण्याचे आश्वासन दिले आहे. नाबार्ड अशा व्याजदराने हे कर्ज वित्तसंस्थांना देईल, की अंतिमत: शेतकऱ्यांच्या हाती ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज ७ % व्याजदराने पडेल. आज तरी नाबार्ड असे काही करताना दिसत नाही. बरेच दिवसांपासून संपुआ सरकारचे मंत्री शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ७% व्याज द्यावे लागेल, असे सांगत आहेत; पण अजून तसे काही झालेले नाही. वित्तमंत्र्यांनी गेल्या वर्षीच्या पोकळ आश्वासनांची पुनरुक्ती केली आहे.

वित्तमंत्री व्याजदर दोन टक्क्यांनी कमी करून, शेतकऱ्यांना मदत करण्याची भाषा करीत आहेत. पण, बहुसंख्य सहकारी बँका तिमाही, सहामाही चक्रवाढीने व्याज लावतात, ही वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीत, व्याजदर दोन टक्क्यांनी कमी करण्याला काहीच अर्थ नाही; उलट, वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून, ते शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच होईल.

गेल्या वर्षी अनुभवाला आलेले शेतकऱ्यांचे आत्महत्यासत्र रोखण्यासाठी

खरे म्हटले तर, दोन उपाययोजना आवश्यक होत्या. अनेक पाहणी अहवालांनी शिफारस केली आहे, त्याप्रमाणे शेतकऱ्यांना ४ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. त्याने प्रश्नाची झळ कमी व्हायला मदत झाली असती. पण, सर्वांत परिणामकारक उपाय म्हणजे 'जमिनीची बाजारपेठ' उभी करणे. अशी बाजारपेठ उभी झाली, तर आत्महत्येच्या कड्यावर उभा असलेला शेतकरी आपली जमीन स्पर्धात्मक किमतीला विकून समस्यामुक्त होऊ शकेल; ज्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेला तोंड देत, शेती करीत राहणे अवघड वाटते आहे अशा शेतकऱ्यांना शेतीतून निवृत्ती घेऊन, अन्य व्यवसायात प्रवेश करणे शक्य होईल.

*(६ मार्च २००६)*

◆◆

# केंद्रीय अंदाजपत्रक उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोकळे करणारे हवे

भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या हिंदुगतीच्या चौकटीतून बाहेर पडून, तिने जवळजवळ दोन अंकीपर्यंत मजल मारली असली, तरी त्याचे श्रेय ना राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या धोरणांना, ना संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या धोरणांना. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या आर्थिक सुधारांना भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्वाच्या विषयपत्रिकेने वेसण घातली, तर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांच्या खुलीकरणाकडील झुकावाला संयुक्त पुरोगामी आघाडीच्या डाव्या मित्रपक्षांनी खोडा घातला.

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी, अत्यल्प प्रमाणात का होईना, आर्थिक सुधारांना मोकळी केलेली वाट समाजवादाच्या जमान्यात प्रस्थापित झालेल्या पांढरपेशा वर्गाच्या तोंडाला पाणी सुटण्यास आणि भारतीय उद्योजकांच्या क्षमतेला काही अंशी मोकळा श्वास घेण्यास पुरेशी होती. शेतकऱ्यांच्या उद्योजक क्षमतेला काही उत्तेजना देण्यात मात्र हा आर्थिक सुधारांचा कार्यक्रम अजूनही अपयशी ठरला आहे. भारतीय उद्योजक मात्र या आर्थिक सुधारांमुळे नेहरूप्रणीत समाजवादी दुर्दैवाच्या फेऱ्यामुळे तयार झालेल्या 'लायसेन्स्-परमिट-निर्बंध-कोटा-इन्स्पेक्टर'च्या बेड्यांतून मुक्त झाला आणि त्याने जागतिकीकरण आणि माहितीतंत्रज्ञान यांच्या आविष्कारावर आरूढ होऊन, भारताच्या विकासाची गती दोन अंकी करण्याचा जवळजवळ चमत्कारच घडवला.

देशाच्या अर्थव्यवस्थेचे आपणच चालक आहोत, ही प्रौढी आणि त्यामुळे, सर्व मोक्याच्या जागा आपल्याच आधिपत्याखाली ठेवण्याची हाव सोडून देणे आणि भारतीय उद्योजकांना त्यांच्या उपक्रमासाठी सुलभ वातावरण निर्माण करणारे व त्यांना पाठबळ देणारे ही त्यातल्या त्यात सभ्य भूमिका स्वीकारणे, हेच आता

कोणत्याही सरकारच्या दृष्टीने शहाणपणाचे ठरेल.

शेतीक्षेत्राच्या दृष्टीने सरकारने शेतकऱ्यांची जमीनमालकी, निविष्ठा व शेतीमाल यांच्या बाजारपेठेचे, तसेच तंत्रज्ञान स्वीकाराचे स्वातंत्र्य याबाबतीत शेतकऱ्यांना उपद्रव देणे सोडून देणे हेच सर्वांत उत्तम ठरेल.

**१. शेतीक्षेत्र :**

आज हजारोंनी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. जे तगून आहेत, त्यांतले जवळजवळ निम्मे शेतीला 'रामराम' ठोकून, शेतीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत आहेत. केवळ त्यांच्या बापजाद्यांनी जमिनीचा एखादा तुकडा वारसा म्हणून त्यांच्यासाठी ठेवला आहे; म्हणून ते या बुडीत शेतीव्यवसायाचे ओझे वर्षानुवर्षे वाहत आहेत. जमीन खरेदीविक्रीसंबंधी एक नवीन धोरण आणि शेतीतून बाहेर पडणे किंवा शेतीचा स्वीकार करणे यासाठीही नवीन धोरण आखणे उचित ठरेल. जमीनमालकीसंबंधी कायद्यांतील तरतुदींच्या अभेद्यतेमुळेच शेतकरी आणि शेतीक्षेत्राबाहेरीलही कोणी शेतीत गुंतवणूक करण्यास धजत नाहीत.

**२. जमीनमालकी आणि 'रामराम' धोरण**

हरितक्रांतीच्या सुरवातीला कूळकायदा, जमीनदारीविरोधी कायदे, कमाल जमीन धारणा कायदा यांसारख्या विविध कायद्यांच्या कृपेने अनेक जमीनदारांना आणि मोठ्या जमीनधारकांना शेतीतून बाहेर पडण्याची संधी मिळाली. आधुनिक तंत्रज्ञानाने सुरू होत असलेल्या शेतीतील नवीन क्रांतीच्या सुरवातीला, ज्या शेतकऱ्यांना जागतिकीकरणाने आणि नवीन तंत्रज्ञानाने उभी केलेली आव्हाने आपल्याला पेलतील की नाही, अशी शंका वाटत असेल त्यांना शेतीतून बाहेर पडणे सुलभ व सुकर झाले पाहिजे. त्याचबरोबर या नव्या क्रांतीच्या युगातील शेती करण्याची ज्यांची इच्छा आहे व ज्यांच्याजवळ त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री, व्यवस्थापकीय क्षमता, तंत्रज्ञानाविषयीचे व्यावहारिक ज्ञान आहे आणि जागतिकीकरणाच्या आव्हानांचा सामना करण्याची धमक आहे, त्यांच्यासाठी, भले ते शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आले नसोत, शेतीत प्रवेश करण्यास मुक्तद्वार असले पाहिजे. शेतीक्षेत्रातील आर्थिक सुधार केवळ बाजारपेठ, कर्ज आणि तंत्रज्ञान यांच्या स्वातंत्र्याइतपत मर्यादित असून चालणार नाही; व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्यही मिळणे आवश्यक आहे.

कारखानदारी क्षेत्रातील आर्थिक सुधारांच्या दृष्टीने आता शेतजमिनीच्या मालकीच्या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. बहुतेक राज्यांनी 'आर्थिक विकास क्षेत्रां (SEZ)'च्या उभारणीला

चालना दिली आहे. लायसेन्स-परमिट-कोटा राज्याला वैतागलेले कारखानदार 'आर्थिक विकास क्षेत्रा'ची वाट धरू लागले आहेत. ज्यायोगे इतरत्र नवीन व्यवसाय सुरू करता येईल, इतकी रास्त नुकसानभरपाई मिळण्याची शाश्वती दिसत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी 'आर्थिक विकास क्षेत्रां'साठी आपल्या जमिनी देण्याचे नाकारून, या प्रकल्पाविरोधी आघाडी उघडल्यामुळे तो सध्या ठप्प झाला आहे.

समर्थनीय सार्वजनिक कार्यासाठी जमिनी संपादन करण्यासाठी शेतकऱ्यांचा होणारा विरोध खालील तीन तत्त्वे मान्य केली, तर सहजपणे शमण्याची शक्यता आहे.

१. संपादनासाठी जमीन निवडताना शेतजमीन सुपीक आहे का पडीक आहे, बागायती आहे का जिराईत, एकपिकी आहे का बहुपिकी ? हे महत्त्वाचे मुद्दे होऊ शकत नाहीत. शेतकऱ्याची - जमीनमालकाची इच्छा ही निर्णायक असावी. ज्या शेतकऱ्याला आपली शेती चालू ठेवण्याची इच्छा असेल - यशाची आशा किती का कमी असो - त्याला कायद्याचा बडगा दाखवून, जमिनीपासून वंचित करता येणार नाही.

२. एखाद्या शेतकऱ्याला शेती करणे सोडून देण्याची इच्छा असेल, तर त्याला त्याच्या मनाप्रमाणे आपल्या शेतजमिनीची वासलात लावता आली पाहिजे, अगदी खुल्या बाजारातसुद्धा त्याला आपली जमीन विकता आली पाहिजे.

३. एखाद्या शेतकऱ्याला शेती करण्यात रस नसेल आणि त्याचीच जमीन काही कारणासाठी सरकारला हवी असेल, तर त्याला खुल्या बाजारात त्या जमिनीची जी जास्तीत जास्त किंमत मिळण्याची शक्यता असेल, त्याहून अधिक किंमत देऊन सरकारने ती घ्यावी.

आकर्षक नुकसानभरपाई आणि भांडवल भागापोटी जमीन देण्यास शेतकऱ्याला प्रवृत्त केले, तरी इतकी मोठी रक्कम आणि भागभांडवल हाताळण्याची सवय नसलेल्या त्या शेतकऱ्याला ती रक्कम गुंतविण्यासंबंधी आणि भांडवल भागांच्या व्यवस्थापनासंबंधी सल्ला देणारी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.

शेती करीत राहणाऱ्या शेतकऱ्यांना, गोदामांची व्यवस्था उभी राहिली, तर मालाच्या ज्या पावत्या मिळतील, त्या 'निगोशिएबल इन्स्टुमेंट' म्हणून वापरता आल्या पाहिजेत. शेअर बाजारातील 'डेरिव्हेटिव्ह मार्केट'च्या धर्तीवर या गोदाम-पावत्यांची (Warehousing receipts) बाजारपेठ, तसेच शेतीला 'रामराम' किंवा शेतीत प्रवेश करण्याच्या दृष्टीने जमिनीची बाजारपेठही उभारणे आवश्यक

आहे. या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आत्महत्येला पर्याय देणारी बाजारपेठयंत्रणा उभारण्यासाठी एखादे विशेष कार्यबल (Special Task Force) स्थापन करण्याचा अर्थमंत्री विचार करू शकतील.

**३. शेतीक्षेत्राला नुकसानभरपाई**

उणे सबसिडीच्या धोरणामुळे शेतीक्षेत्राचे जे नुकसान झाले आहे, त्याची भरपाई करण्याच्या दृष्टीने सरकारला काही पावले उचलावी लागतील आणि त्यासाठी सुमारे २६०,००० कोटी रुपयांच्या आसपास खर्च येईल. शेती व्यवसाय चालू ठेवण्याची इच्छा असलेले शेतकरी आणि शेतीक्षेत्रात नव्याने प्रवेश करू इच्छिणारे बिगर-शेतकरी यांच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. केवळ १९८१ ते २००० या वीस वर्षांच्या काळात शेतीमालाच्या किमती पडेल ठेवण्याच्या सरकारच्या धोरणामुळे शेतीक्षेत्राचे सुमारे ३००,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

राज्यघटनेच्या नवव्या अनुसूचित १९७३ नंतर घातलेले कायदे आता न्यायालयीन छाननीच्या कक्षेत आले आहेत. १९५५ चा जीवनावश्यक वस्तू कायदा या अनुसूचित १९७६ मध्ये घातला गेला; त्यामुळे त्याची आता न्यायालयीन पडताळणी होऊ शकते. या कायद्याच्या घटनात्मकतेला न्यायालयात कोणीतरी आव्हान देईल, याची वाट पाहणे चुकीचे ठरेल. तो रद्द करण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे कितीतरी अधिक चांगले ठरेल. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तयार झालेला हा जुनापुराणा कायदा पूर्णतःच रद्द करणे आवश्यक आहे. भविष्यात गरज पडल्यास परिस्थितीनुरूप तशा प्रकारचा सयुक्तिक कायदा नव्याने करता येऊ शकेल. १९५५चा जीवनावश्यक वस्तू कायदा रद्द झाला म्हणजे शेतीमालाची साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया, व्यापार आणि निर्यात, तसेच शेतीतील निविष्टा यांवरील सर्व निर्बंध आपोआपच संपतील. महाराष्ट्र राज्य कापूस एकाधिकार खरेदी योजना आणि तंबाखू नियंत्रण ही दोनच उदाहरणे हा कायदा किती अन्याय्य आहे, हे दाखविण्यास पुरेशी आहेत.

शेतीमालाच्या निर्यातीला बंदी करणाऱ्या सर्व व्यवस्थांच्या ऐवजी टप्प्या-टप्प्यांच्या करांची प्रणाली स्थापन करण्यात यावी; कधीही निर्यात चालू किंवा बंद करण्याच्या धरसोडीच्या निर्यातधोरणामुळे भारताला अनेक निर्यात बाजारपेठा कायमच्या गमवाव्या लागल्या आहेत.

अन्न-महामंडळ भ्रष्ट आणि अकार्यक्षम बनले असून, शेती आणि स्वयंपाकघर यांची सांगड घालण्यात अपयशी ठरले आहे. ते पूर्णतः बरखास्त करून त्या जागी, शेतीमाल आणून टाकल्यानंतर बाजारातील चालू किमतीच्या ७०% रकमेच्या

पावत्या देणाऱ्या गोदामांचे जाळे उभारावे आणि गोदामांच्या या पावत्या 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट' म्हणून वापरता येतील अशी व्यवस्था करावी.

रेशनिंग म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थासुद्धा भ्रष्टाचारग्रस्त आणि कमालीची अकार्यक्षम बनली आहे. आजकाल दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी स्थानिक राजकीय हितसंबंधांच्या प्रभावाखाली बनते. सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी आता काही प्रयत्न करणे निष्फळच ठरेल. त्यामुळे या व्यवस्थेचे संपूर्ण जाळेच मोडीत काढावे आणि वेगवेगळ्या गरजू लाभार्थी समाजघटकांसाठी 'अन्नतिकिटांची (Food Stamps)' व्यवस्था तयार करता येईल.

**४. शेतीक्षेत्रातील संस्थांचे स्वरूप**

कर्तृत्ववान नेतृत्वाखाली उभारलेल्या किंवा काही प्रकारच्या एकाधिकाराचे संरक्षण लाभलेल्या व उत्पादनातील नावीन्याचे महत्त्व नसलेल्या संस्थांचा अपवाद वगळता शेतीक्षेत्रातील सर्व सहकारी संस्था अपयशी ठरल्या आहेत.

विविध न्यायालयांत जमीनमालकीविषयक अनेक खटले तुंबून पडलेले आहेत ही वर्तमानस्थिती पाहता 'करार शेती' ला फारसे चांगले भवितव्य नाही. काही वाद उत्पन्न झाल्यास त्यासंबंधी दावे त्वरेने निकालात निघणे शेतकऱ्यांना गरजेचे आहे. आजची न्याययंत्रणा तशी हमी देण्यास असमर्थ आहे. शेतकऱ्यांची शेतजमीन व श्रम यांचे भांडवलभागात (Equity) रूपांतर करून शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन करण्याचे आजवरचे प्रयत्न, स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधी प्रकरणांच्या कारणाने फारसे पुढे गेले नाहीत. शेतजमिनीचे भांडवलभागात रूपांतर करण्याची संकल्पना लोकांना सर्वसाधारणपणे रुचली नाही; कारण त्यामुळे लग्न झालेल्या मुली किंवा विधवा झालेल्या सुना यांना संपत्तीतला वाटा नाकारण्याचा पारंपरिक युक्तिवादच निकामी ठरतो. पण, आता मुलींनाही मुलांच्या बरोबरीने जन्मतःच बापाच्या मालमत्तेत वाटा देणारा कायदा झाल्यामुळे, येत्या शेतकी क्रांतीमध्ये 'इंडिया आणि कं.' काय करते आहे, याची वाट पाहत बसण्यापेक्षा, पुन्हा एकदा 'शेतकऱ्यांच्या कंपन्या' स्थापन करण्याचा प्रयत्न करून चालवणे उपयुक्त ठरू शकेल. या 'शेतकऱ्यांच्या कंपन्या' किरकोळ खरेदी-विक्री केंद्रांचे जाळे तयार करून, ते वापरण्यात 'इंडिया आणि कंपनी' ला सरस ठरतील. शेतकऱ्यांची किरकोळ खरेदीविक्री केंद्रांची जाळी तयार झाली, तर आज जो पिकवणारा व खाणारा यांतील संधानाचा अभाव दिसतो, तो भरून निघेल. तेव्हा अर्थमंत्र्यांनी अशा प्रकारचा उपक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना सबळ प्रोत्साहन द्यायला हवे. शेतजमीन व श्रम यांचे भांडवलभागात रूपांतर करून होणाऱ्या

शेतकऱ्यांच्या कंपन्यांचा आराखडा तयार करण्यासाठी एखादे ‘कार्यबल’ स्थापन करण्याचा विचार अर्थमंत्र्यांनी करावा.

**५. शेतीक्षेत्रातील संरचना**

अन्न, माती, पाणी तसेच शेतीतील निविष्टा यांच्या गुणवत्ता तपासण्या करणाऱ्या प्रयोगशाळांची जाळी निर्माण करण्याच्या योजनेसाठीही अर्थमंत्र्यांनी आपल्या २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात तरतूद करायला हवी. २९ डिसेंबर २००६ रोजी अर्थसंकल्पपूर्व चर्चेच्या वेळी अंदाजे ६००० कोटी रुपये खर्चाचा या संदर्भातील एक प्रस्ताव अर्थमंत्र्यांसमोर सादर करण्यात आला आहे.

किरकोळ खरेदीविक्री केंद्रांची जाळी आणि प्रयोगशाळांची जाळी यांखेरीज, प्रत्येक गावात माहितीच्या देवाण-घेवाणीचे केंद्र असणाऱ्या ‘संगणक जाळया’च्या उभारणीने शेतकऱ्यांना मोठी मदत होऊ शकेल. शेतकऱ्यांना अशा केंद्रातून जगभराच्या शेतीमालाच्या बाजारपेठांतील मागणी, पुरवठा, किमती यांची परिस्थिती तसेच नजीकच्या भविष्यकाळातील संबंधित विभागांतील पिकांचे अंदाज यांबद्दलची माहिती मिळू शकेल. केंद्रातील माहिती भरण्याच्या सुविधेचा उपयोग स्थानिक माहिती गोळा करण्यासाठी, तसेच इलेक्ट्रॉनिक वायदे बाजारातील व्यवहारांसाठी होऊ शकेल. या प्रकारचे जाळे उभारण्याच्या योजनेचा तपशीलवार आराखडा तयार करण्यात आला आहे. सुमारे शंभर गावांचा समावेश होऊ शकेल अशा संगणक जाळयाचा प्राथमिक प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न करता येईल; त्यासाठी एकदाच अंदाजे फक्त एक कोटी रुपयांचा खर्च होईल.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना भ्रष्ट नोकरशाहीच्या ओझ्याखाली गटांगळया खाऊ लागली आहे आणि तिने शेतीच्या दैनंदिन कारभाराचे नुकसान करायला सुरवात केली आहे. या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या जागी नवीन योजना आखणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत रोजगाराच्या शोधात असलेल्या प्रत्येक कुटुंबाला दहा लाख रुपयांचे कर्ज देण्यात यावे. इतक्या भांडवलावर प्रत्येक कुटुंबाला दर साल ८०,००० रुपयांचे उत्पन्न कमावता येऊ शकेल. या कुटुंबांना हे कर्ज देताना, या भांडवलावर त्यांनी लघुउद्योग मंत्रालयाने शिफारस केलेला एखादा स्वयंरोजगार सुरू करण्याची अट घालण्यात यावी. वर्षामागून वर्षे तीच ती दगडमातीची, मेहनती कामे करण्याची मजुरी देण्याऐवजी गरिबांना स्वयंरोजगार करण्यास उद्युक्त करणे हा या योजनेचा उद्देश असेल.

**६. शेती कर्ज**

राष्ट्रीय किसान आयोगाच्या शिफारशीनुसार पीककर्जावरील व्याजाचा दर

द.सा.द.शे. ४ टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. सध्याचा ७% व्याजदर आणि ४% व्याजदर यांच्यातील फरकाची रक्कम एका वेगळ्या निधीत ठेवून, वेळ आल्यास या निधीचे परिसमापन (Liquidation) करण्यात यावे.

इंग्रज सरकारने व्याजखोर सावकारीपासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी Usurious Loan Act हा कायदा केला होता. या कायद्याने शेतकऱ्यांना आकारायच्या व्याजदराला ६% ची मर्यादा घातली होती, व्याजाच्या चक्रवाढ आकारणीस बंदी घातली होती आणि कर्जाच्या दामदुपटीलाही मनाई केली होती.

हा कायदा पुनरुज्जीवित करावा आणि या कायद्यावर कुरघोडी करणारा बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट रद्द करावा. 'युझुरिअस लोन अ‍ॅक्ट'च्या तरतुदींच्या अधीन राहून, खासगी सावकारीच्या व्यवस्थेस मान्यता देऊन, काटेकोर देखरेखीखाली, त्यांना त्यांचे व्यवहार करण्यास मुभा द्यावी. कायद्याने मान्यता दिलेली असो वा नसो, खासगी सावकारांचे काही स्वभावगुण असे आहेत, की जे शेतकऱ्यांना त्यांच्या निकडीच्या वेळी उपयोगी ठरतात. त्यामुळे कोणी कितीही प्रयत्न केले, तरी त्यांचे उच्चाटन करणे अशक्य आहे, तसे करूनही चालणार नाही. त्यांना शेतीकर्जाच्या अधिकृत चौकटीत समाविष्ट करून घेणेच उपयुक्त ठरेल. आजचा विशिष्ट सावकार हा गावचा 'बनिया' नाही; आज, पुन्हा एकदा जमीनमालक बनण्याची आस असलेला शेतमजूरच शेतकऱ्यांना कर्ज देतो.

राष्ट्रीय किसान आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे शेतकऱ्यांकडील कर्जवसुलीला स्थगिती दिली पाहिजे; किमान भारतीय शेती उणे सबसिडीच्या जाचातून सुटत नाही तोपर्यंत तरी, सक्तीच्या कर्जवसुलीला स्थगिती दिली पाहिजे.

**७. जबाबदार सरकार**

१९९१ पासून बरेचसे निर्बंध शिथिल झाले असले, तरीही सरकारचा मनोदय खरोखरीच खुलीकरणाची आणि जागतिकीकरणाची कास धरण्याचा आहे का आणि त्या दिशेने वाटचाल करण्याची त्यांची 'राजकीय इच्छाशक्ती' आहे काय, याबद्दल भारतीय उद्योजक कमालीचे साशंक आहेत. समाजवादाच्या दुर्दैवी फेऱ्यात निर्माण झालेल्या बऱ्याच संस्था अजून जशाच्या तशा आहेत. आर्थिक सुधारांना सुरवात झाली असे म्हणत असले, तरी सरकारी नोकरदारांची संख्या सतत वाढतच आहे. नोकरशाहीला खुश ठेवण्यात सरकार अधिकाधिक उत्सुक राहत आहे. जागतिक मानाने पहिले, तर आपल्याकडे सरकारी नोकरदारांना जास्त पगार मिळतो असे नाही; एखाद्या सरकारी नोकराने सार्वजनिक क्षेत्रातील नोकरी खटपटीने मिळवली, तर त्याला तो जे काम करतो त्यासाठी भरमसाट

पगार दिला जातो. ज्यांना दुर्दैवाने, सरकारी नोकरीलाच धरून राहावे लागते, ते सरकारीपणाचे ओझे वाहत राहतात आणि ते जे काही कमाल काम करतात, त्यासाठी त्यामानाने त्यांना बराच कमी पगार दिला जातो. पाचव्या वेतन आयोगाने तर राज्यांच्या आर्थिक परिस्थितीचे प्रचंड प्रमाणावर नुकसान केले आहे. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे या पाचव्या वेतन आयोजाने नोकरदारांचे कामकाज व उत्पादकता यांच्यात सुधारणा करण्यासाठी ज्या शिफारशी केल्या होत्या, त्यांना सरळसरळ वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. आता तर त्या शिफारशींवर अंमलबजावणी करण्याचा विचारही न करता सहाव्या वेतन आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. सरकारची सवंग लोकप्रियता आणि कामगार संघटनांची ब्लॅकमेल करण्याची वृत्ती यांची ही परिणती आहे.

'आम आदमी' कल्याणकारी सरकार या संकल्पनेमुळे चलनवाढीचा दर धोक्याच्या उंचीवर पोहोचत आहे आणि करांच्या जाळयाचाही विस्तार वाढत आहे. एकंदरीत सर्वच करप्रणाली उत्पादकांना सजा देणारी आणि ऐतखाऊंना मजा देणारी' झाली आहे.

समाजवादी युगाने नोकरशाहीच्या साम्राज्याचे अनेक स्तर निर्माण केले. राज्यघटनेच्या ढाच्यात 'नियोजन आयोगा'ला कोठेच स्थान नाही. तरीही, आर्थिक सुधारांनंतरच्या काळातही त्याला काही धक्का न लागता, तो केंद्रशासनातील नोकरशाहीचे सर्वांत मोठे साम्राज्य म्हणून अबाधित चालू आहे. प्रधानमंत्र्यांचे कार्यालय हे तसे सौम्य आणि मध्यम म्हटले जायचे; पण आजकाल त्याचे रूप इतके अवाढव्य झाले आहे, की त्यात सर्व मंत्रालयांचे काम जवळजवळ दुसऱ्यांदा केले जाते. तेच ते काम करणाऱ्या अशा आस्थापनांची काटछाट केली पाहिजे. ज्या बाबतीत वेगळी माहिती जमा करण्याची गरज असेल, त्या बाबी वगळता प्रमुख मंत्रालयांनी गोळा केलेली माहिती प्रधानमंत्री कार्यालयासारख्या आस्थापनेने वापरावी. सरकारचा प्रशासकीय खर्च अशा पातळीला जाऊन पोहोचला आहे, की सरकारी नोकरशाही ही जणू स्वत:चीची सेवा करण्यासाठी अस्तित्वात आहे. बऱ्याच बाबतीत असे जाणवते, की भारतीय उद्योजकतेला प्रशासन हाच मोठा अडसर ठरतो.

सरकारच्या प्रशासकीय खर्चात कपात करण्यासाठी खालील उपाययोजना करता येतील :

१)अनावश्यक कामे सोडून देणे व त्यासंबंधी मंत्रालये, खाती आणि संस्था बंद करणे.

२)व्यवस्था, नोकरदारांच्या सोयीसवलती आणि कार्यालयीन डामडौल यांच्यात कपात करणे.

पदांनुसार व कायमस्वरूपी नोकरीची प्रथा बंद करून, फक्त दहा वर्षांपुरती नेमणूक करण्याची पद्धती स्वीकारावी. कार्यक्षमता लक्षात घेऊन, ही नेमणूक आणखी फक्त पाच वर्षांसाठी वाढविता येईल. या पद्धतीत आजच्यापेक्षा बराच जास्त पगार द्यावा; पण निवृत्तिवेतन, आरोग्य भत्ता, भविष्य निर्वाह निधी, घरभाडे, प्रवासभत्ता इत्यादी खिरापती बंद कराव्यात.

सर्वसामान्य नियम म्हणून कायदा व सुव्यवस्था आणि संरक्षण या दोन बाबी वगळता सर्व आर्थिक व्यवहारांतून सरकारने आपले अंग काढून घ्यावे. सार्वजनिक क्षेत्रातील तोट्यातील आस्थापनांबाबतची निर्गुंतवणूक प्रक्रिया सुस्पष्ट व पारदर्शक तत्त्वांच्या पायावर सुरूच ठेवावी. खासगीकरणाच्या मार्गाने मरणोन्मुख आस्थापनांना जिवदान देण्याची पद्धत तशी अडाणीपणाची आहे. सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना आणि सहकारी संस्था यांची क्षेत्रे खुली करून, देशी व परदेशी गुंतवणुकीला मुक्तद्वार देऊन, त्यांना स्पर्धेत उतरविणे हा यावरील एक चांगला उपाय ठरेल.

इतर बाबतींमध्ये उद्योगांचे व्यवस्थापन व मालकी कामगार, ग्राहक, कच्च्या मालाचे व सेवांचे पुरवठादार यांच्याकडे सोपवून, 'नाही रेंच्या हुकूमशाही'च्या ऐवजी "आहेरें'ची 'आहेरें'साठी 'आहेरें'नी चालविलेली लोकशाही" प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा.

सरकारचे सर्व कल्याणकारी कार्यक्रम 'श्रद्धा व करुणा' तत्त्वांवर चालविलेल्या सुयोग्य संस्थांच्या हवाली करावेत.

**८. करप्रणाली**

वर्तमान अर्थमंत्र्यांनी करांचे सुसह्य दर आणि काटेकोर वसुलीची पद्धत असलेले समजदार करधोरण स्वीकारले, त्याचा लाभ मिळायला सुरवात झाली आहे. नुसते करांचे दर कमी करणे नव्हे, तर देशातील उत्पादक घटकांना करभारामुळे सामना कराव्या लागणारी स्पर्धात्मक असुविधा कमी करण्यासाठी एकूणच करसंकलन कमी करण्याची ही एक सुसंधी आहे. वर्तमान अर्थमंत्र्यांनी करप्रणाली अधिक पारदर्शक, न्याय्य करण्यासाठी जो पुढाकार घेतला आहे, तो पुढे चालू राहिला पाहिजे.

खरे म्हणजे एखाद्याची करपात्रता त्याची आस्थापना, खेळते भांडवल, क्षेत्र, ऊर्जावापर आणि टाकाऊ कचऱ्याची विल्हेवाट यांच्या आधारे अजमावून, त्याचे

करदायित्व ठरवणे ही आदर्श पद्धती ठरेल. करवसुलीमधील सुधारणा कौतुकास्पद असली, तरी करदात्याच्या घरी प्रवेश करण्याचा किंवा जबरदस्ती घुसखोरी करण्याचा अधिकार कोणाही करवसुली कर्मचाऱ्याला असता कामा नये, हे तत्त्व मान्य झाले पाहिजे.

आजकाल, करवसुली ही सरकारी खर्च/उधळपट्टीसाठी निधी उभारणे यासाठीच केवळ केली जात नाही; लोकांना, विशेषतः विरोधकांना दमदाटी करण्यासाठी, ब्लॅकमेल करण्यासाठी त्याचा हत्यार म्हणून उपयोग केला जातो. करांचे प्रमाण, विशेषतः व्यक्तिगत करांचे प्रमाण कमी करण्याची आणि करप्रणाली पारदर्शक बनवण्याची आवश्यकता आहे.

जकात/अबकारी कर व मूल्यवर्धित कर यांच्या प्रणालींचे सतत पुनर्विलोकन व्हावे. पास्ता, नमकीन, पोटॅटो चिप्स, चीज, इडली-डोसा मिक्स आणि प्रक्रिया केलेले मांस व सागरी मत्स्यान्न यांना जकात/अबकारी करातून सूट दिलेली असली तरी, उदाहरणार्थ गोरगरीब, कुपोषित, प्रवासी मोठ्या प्रमाणात ज्यांचा वापर करतात, त्या एनर्जी बिस्किटांवर मात्र ८% अबकारी कर आणि १६% मूल्यवर्धित कर असावा हे, न कळण्यासारखे आहे.

*(६ फेब्रुवारी २००७)*

◆◆

# शेतकऱ्यांच्या असंतोषात तेल ओतणारा अर्थसंकल्प

वाढत्या संख्येने होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विशेष आर्थिक क्षेत्रांच्या नावाने होऊ घातलेल्या सरकारी भूसंपादनाच्या विरोधात शेतकऱ्यांमध्ये उफाळून आलेला असंतोष आणि कृषिक्षेत्राच्या विकासाचा अत्यंत अत्यल्प दर या सर्वांच्या पार्श्वभूमीवर पी. चिदंबरम यांच्या २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात, शेतीक्षेत्रातील गुंतवणुकीच्या दृष्टीने आकर्षक नसले, तरी त्यात किमान थोडाफार किफायतशीरपणा येईल अशी काही चाकोरीबाहेरील आणि नावीन्यपूर्ण पावले उचलली जातील अशी बऱ्याच लोकांची अपेक्षा होती.

वर्ष २००६-०७ च्या आर्थिक समीक्षेच्या निष्कर्षांवरूनही असे वाटत होते, की हा अर्थसंकल्प जरी अगदी शेतकरीकेंद्रित नसला, तरी किमान शेतीकेंद्रित असेल. या वर्षीचा अर्थसंकल्प सादर करीत असताना अर्थमंत्र्यांनी केलेल्या भाषणातील पहिले दोनचार परिच्छेद ते वाचत असताना, ही अपेक्षा टिकूनही होती.

'धोरणे ठरवताना शेतीक्षेत्राला अग्रक्रम असला पाहिजे आणि आपल्या साधनसंपत्तीवर त्या क्षेत्राचा अग्रहक्क असला पाहिजे,' असे अर्थमंत्र्यांनी केलेले उत्स्फूर्त वक्तव्य या अपेक्षेला बळ देणारेच होते.

त्यापुढे जाऊन, त्यांनी 'अन्य बाबी बाजूला ठेवता येतील; पण शेतीबाबत दिरंगाई चालत नाही,' हे पंडित जवाहरलाल नेहरूंचे विधान उद्धृत करून शेतीक्षेत्र हे 'आपल्यासमोरील मुख्य आव्हान,' असे त्याचे वर्णन केले. 'शेतकरी जर हाताची घडी घालून, स्वस्थ बसले तर सर्वसंगपरित्याग केलेल्या साधूलाही मुक्ती मिळणे कठीण होईल,' या अर्थाची त्यांनी एक काव्यपंक्तीही ऐकवली.

अरेरे! शेवटी, हा सर्व खणखणाट आणि घोषणाबाजी या अर्थसंकल्पात शेतीक्षेत्राच्या नावे असलेला रिकामा भोपळा लपविण्यासाठीच होता.

या अर्थसंकल्पात शेतीक्षेत्रासाठी आणि शेतकऱ्यांसाठी, खरोखरीच काही आहे का?

भाषणाच्या सुरवातीला, अर्थमंत्र्यांनी, शेतीक्षेत्रातील विकासाच्या लाजिरवाण्या कामगिरीची लाजतकाजत कबुली देत, देशाच्या एकूण उत्पन्नाच्या वाढीच्या संदर्भातील कर्तृत्वांची जंत्री वाचली. विशेषत: पंजाब व उत्तरांचल राज्यांत त्यांच्या पक्षाला जो पराभवाचा फटका बसला, त्या पार्श्वभूमीवर, त्यांच्याच पक्षाच्या सदस्यांच्या दबावामुळे त्यांना सततच्या वाढत्या महागाईबद्दल खुलासा करावा लागला. खरेतर, बँकांतील पतपुरवठा, चलनपुरवठा आणि परकीय चलनाचा साठा यांतील वाढ ही एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या वाढीच्या दोन अंकी दराशी ताळमेळ राखून आहेत; पण त्यामुळेच महागाई वाढते आहे असे भासवण्याचा अर्थमंत्र्यांनी प्रयत्न केला. वाढती महागाई हा संयुक्त पुरोगामी आघाडीने 'आम आदमी'च्या नावाने राबविलेल्या कल्याणकारी आर्थिक धोरणांचा परिपाक आहे, हे कबूल करण्याचे धारिष्ट्य अर्थमंत्र्यांनी दाखविले नाही. वाढत्या महागाईचे सर्व खापर त्यांनी पुरवठ्यातील अडीअडचणींवर फोडण्याचा प्रयत्न केला. लिहून आणलेले अर्थसंकल्पीय भाषण बाजूला ठेवून, किमती आटोक्यात ठेवण्यासाठी गहू आणि भात यांच्या वायदेबाजारावर या क्षणापासून बंदी घालण्यात येत असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले.

वायदेबाजाराचे मूलभूत उद्दिष्ट आणि त्याची कार्यपद्धती याबद्दल अर्थमंत्री अनभिज्ञ असावेत असे मानणे चुकीचे ठरेल. वायदेबाजारामुळे शेतकऱ्यांना आपला शेतीमाल बाजारात आणण्याच्या दृष्टीने फुरसत (अवसर) मिळते आणि बाजारपेठेची निवड करण्याची संधीही (अवकाश) मिळते; पिकला, की मिळेल त्या भावाने शेतीमाल विकण्याच्या अगतिकतेतून त्याची सुटका होते. वायदेबाजार हे अपेक्षित किंमत मिळविण्याचे, किमतीतील चढउतारांवर मात करण्याचे आणि धोक्याचा प्रभाव कमी करण्याचे परिणामकारक साधन आहे; आरडाओरड करून लोकांना भडकविण्याचाच उद्योग करणारे डावे म्हणतात तसा काही तो सट्टा किंवा जुगाराचा खेळ नाही.

वायदेबाजारावर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर करणाऱ्या त्याच अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात पुढे ई-गव्हर्नन्स आणि भांडवल बाजार यांच्या महत्त्वावर भर दिला; वायदेबाजारातील 'ऑप्शन्स आणि हेजिंग' विरुद्ध डाव्या अर्थशास्त्र्यांनी केलेली फटकेबाजी अर्थमंत्र्यांना मान्य नसावी, बहुधा त्यामुळे, गहू आणि भात यांच्या वायदेबाजारावरील बंदीने त्यांना एकतर केंद्रीय कृषिमंत्र्यांवर

राजकीय कुरघोडी करायची असेल किंवा आर्थिक व वित्तीय धोरणे राबविण्यात त्यांना आलेल्या अपयशाची माळ अडकवण्यासाठी 'बळीचा बकरा' गाठायचा असेल.

वायदेबाजारात विकला जाणारा आणि इतरत्र विकला जाणारा माल यांच्या किमतीत फारसा फरक नसतो, हे दाखविणारे संख्याशास्त्रीय पुरावे अनेक सापडतील.

काही दिवसांपूर्वीच सरकारच्या दडपणामुळे बऱ्याच कंपन्यांनी गहू खरेदीच्या बाजारपेठेतून माघार घेतली आणि गहू खरेदीबाबत बदनाम झालेल्या भारतीय अन्नमहामंडळाला रान मोकळे करून दिले. आता गव्हाच्या वायदेबाजारावर बंदी आल्यामुळे तर शेतकऱ्यांना आधारभूत किमतीतच अन्नमहामंडळाकडून पिळवणूक करून घेतल्याशिवाय पर्यायच उरला नाही. पंजाब, हरयाना, पश्चिमी उत्तर प्रदेश या भागातील गहू उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारने घातलेल्या या बंदीला विरोध करण्याचा निर्धार केला आहे, याची अर्थमंत्र्यांनी आणि संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने नोंद घ्यावी; शेतकरी अन्न महामंडळाच्या खरेदी केंद्रावर बहिष्कार घालणार आहेत. अर्थमंत्र्यांनी खोडी काढून, शेतकऱ्यांना आव्हान दिले आहे. परिणामी, पंजाब, हरयाना इत्यादी राज्यांतील शेतकरी आणि सरकार यांच्यात गहू खरेदीच्या येत्या हंगामात घनघोर लढाई जुंपणार आहे.

अर्थमंत्री आपला अर्थसंकल्प पंजाबमधील निवडणुकांचे निकाल लागायच्या आधी एक दिवस सादर करण्याऐवजी निकालाच्या दुसऱ्या दिवशी करीत होते, हे काँग्रेस पक्षाचे नशीबच म्हणावे लागेल.

ग्रामीण भागाचा चेहरामोहरा तात्पुरता आणि वरवर बदलण्याच्या 'भारत निर्माण' कार्यक्रमाच्या तपशिलांची जंत्री वाचणे तसे सोपे काम आहे. हा खेळ सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक भाषणात केला जातो, मग ते भाषण लाल किल्ल्यावरचे असो की राजपथावरचे; सेंट्रल हॉलमधील असो की संसदेमधील. आतापर्यंत, मोठा गाजावाजा केला असला, तरी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजे प्रचंड अपयश हे स्पष्ट झाले आहे; ही योजना म्हणजे नोकरशाहीची लुच्चेगिरी, नोंदींची जुळवाजुळव आणि गरिबांच्या मनात आळशी वृत्तीचे रोपण करण्याचा उपक्रम ठरली आहे.

या योजनेच्या बाबतीत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या संदर्भात अर्थमंत्र्यांनी स्वतंत्र निवेदन केले, ही लक्षणीय बाब आहे. अर्थमंत्र्यांनी अल्पसंख्याक (मुस्लिम समाजासाठी संपुआच्या परिभाषेतील न दुखावणारा सौम्य शब्द), महिला, ईशान्येकडील भाग आणि शारीरिकदृष्ट्या अपंग यांच्यासाठीही

अर्थमंत्र्यांनी स्वतंत्र दान दिले आहे.

अर्थमंत्र्यांची 'मागासलेपणा'ची व्याख्या आर्थिक व्यवसायाऐवजी जन्माच्या आधारे केलेली दिसते.

शेतकऱ्यांसाठी वित्तमंत्र्यांच्या भाषणात, देऊनदेऊन गुळगुळीत झालेल्या पोकळ वचनांचा धबधबाच पडला आहे.

राष्ट्रीय किसान आयोगाने सादर केलेला राष्ट्रीय कृषिनीतीचा मसुदा विचाराधीन आहे.

ग्रामीण कर्जबारीपणाच्या सर्व पैलूंचा अभ्यास करण्यासाठी डॉ. आर. राधाकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल अजून तयार व्हायचा आहे.

विदर्भात ज्या योजना अत्यंत वाईट तऱ्हेने अपयशी ठरल्याष्ट्व त्यांच्याच धर्तीवर देशातील इतर भागांसाठी विशेष योजना आखण्याबाबत जाता जाता उल्लेख करण्यात आला. या योजनेचा विस्तार करण्यासंबंधी किंवा त्यासाठी वाढीव तरतूद करण्यासंबंधी काही प्रस्ताव नाही.

डाळींच्या उत्पादनवाढीसाठी उत्तम बियाणे विकास कार्यक्रम, चहाच्या उत्पादनवाढीसाठी कार्यक्रम आणि निधी, वर्धितगती सिंचन लाभ कार्यक्रम, जलस्रोत पुनर्भरण व दुरुस्ती, जलस्रोत व्यवस्थापन यांचा फक्त उल्लेख केला गेला.

कृषी विस्तार योजना परिणामकारक करणे आवश्यक आहे याची नोंद घेऊन, त्याची जबाबदारी कृषिमंत्रालयावर टाकण्यात आली; कृषिमंत्रालयाने राज्यसरकारांशी सल्लामसलत करून, नवीन कार्यक्रम आखावा आणि त्यानुसार 'प्रशिक्षण भेट' योजनेत सोयीस्कर बदल करून ती राबवावी. म्हणजे, नवीन प्रस्ताव नाही आणि नवीन तरतूदही नाही.

खतांच्या अनुदानांच्या बाबतीतही अर्थमंत्र्यांनी, खत शेतकऱ्यांच्या हाती परस्पर पोहोचविण्याची पर्यायी पद्धत शोधण्याचा आपला पवित्र मनसुबा जाहीर केला आणि त्यासाठी खतउद्योगाच्या सहकार्याने अभ्यास करणार असल्याचे सांगितले.

कृषी विमा, नाबार्ड, ग्रामीण संरचना विकास यांसाठी केलेल्या तरतुदी किरकोळ आहेत.

पीककर्जावरील व्याजाचा दर ७ टक्क्यांवरून ४ टक्क्यांपर्यंत कमी करणे, शेतीमाल व निविष्टांच्या दर्जाची तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळांचे जाळे उभारणे, प्रत्येक गावाला सहभागी करून घेणारे माहिती तंत्रज्ञानाच्या केंद्रांचे जाळे, तसेच शेतकऱ्याचे शिवार आणि ग्राहकाचे स्वयंपाकघर यांचा परस्पर संपर्क जोडून,

देणाऱ्या किरकोळ विक्री केंद्रांचे जाळे उभारणे अशा, वेगवेगळ्या आयोगांनी केलेल्य शिफारशींची अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात दखलसुद्धा घेतली नाही.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि ही संख्या सतत वाढतेच आहे. विशेष आपत्तिग्रस्त भागांसाठी साहाय्यकारी योजनेचा उल्लेख करण्यापलीकडे अर्थमंत्र्यांनी या समस्येची दखल घेतली नाही.

शेतजमिनीच्या बाजारपेठेची आवश्यकता, विनियोगक्षम गोदाम पावत्या आणि जमीनविक्रीनंतर हाती येणाऱ्या रकमेच्या गुंतवणुकीबाबत शेतकऱ्यांना तज्ज्ञ सल्ला देणाऱ्या सेवा या विषयांना अर्थमंत्र्यांनी स्पर्शसुद्धा केला नाही.

ज्या अर्थमंत्र्यांनी गेल्या वर्षी 'ड्रीम बजेट' सादर केले, त्यांनी खाली उतरून, नाउमेद करणारा, अप्रस्तुत अर्थ-अ-संकल्प सादर केला आणि येत्या उन्हाळ्यात शेतकऱ्यांच्या उठणाऱ्या आगडोंबाची बीजेच पेरली आहेत.

*(६ मार्च २००७)*

◆◆

# महागाई : सुधारण्याची एक संधी

महागाईच्या भडक्याने हिंदुस्थानची अवस्था जवळजवळ हवालदिल झाली आहे. 'बंदरात धान्याच्या बोटी नांगरल्या, तरच जनतेच्या मुखी घास पडेल,' अशा अवस्थेतून बाहेर पडून देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याचा अभिमान बाळगण्याचे दिवस कधीच मागे पडून गेले आहेत. अगदी २००४ सालापर्यंत आपण, खाद्यतेल आणि डाळी यांची आयात करीत असलो तरी, अन्नधान्याचे निव्वळ निर्यातदार होतो. २००५ सालामध्ये सरकारच्या मनात अचानक आले, की आपल्या देशातील भूक भागविण्यासाठी देशातील उत्पादन आणि उपलब्धता सुधारणे जास्त चांगले होईल आणि मग सरकारने आर्थिक गाड्याचे चाक चक्क उलटे फिरवून, अन्नधान्याची निर्यात थांबवून टाकली. परिणामी, आज आपण गहू, डाळी आणि खाद्यतेल यांचे निव्वळ आयातदार झालो आहोत; कापूस आणि साखर यांचीच थोडीफार बचत (surplus) राहते. गेली तीन वर्षे आपण गव्हाची आयात करीत आहोत आणि अनुभव असा आहे, की गव्हाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ दिवसेंदिवस अधिकाधिक ताठर होत आहे आणि गव्हाचे पारंपरिक पुरवठादार देश आपल्याला मदत करायला असमर्थ आहेत किंवा राजी नाहीत.

जागतिक पुरवठ्याची परिस्थिती खरोखरी चिंताजनक आहे. चाळीस आणि पन्नासच्या दशकांत जगात मुबलक अन्नधान्य होते आणि त्यावर डोळा ठेवून हिंदुस्थान सरकारला वाटत होते, की आपल्याकडील शेतीक्षेत्राकडे काणाडोळा केला, तरी फारसे काही बिघडणार नाही; पण तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे हवामानातील बदल हे आहे. पाऊसमान कमालीचे बेभरवशाचे झाले आहे आणि तापमानातील चढउतारही मोठ्या प्रमाणावर होत आहेत. पेट्रोलियम पदार्थांच्या भरमसाट किमतीमुळे अनेक देश अन्नधान्य उत्पादनांच्या जागी पर्यायी इंधन पिके घेण्याच्या मागे लागले आहेत.

आपल्या देशातील ‘हरितक्रांती उत्पादकते’चा वक्र सपाट होऊन बराच काळ लोटला आहे. भूजलपातळी झपाट्याने खोलावत आहे. बियाण्यांमध्ये गुणवत्तेचे पुनर्भरण करण्याच्या अभावी आपण बरेच कमी उत्पादन देणाऱ्या आणि कमी प्रथिनांच्या संकरित वाणांवरच भागवून घेऊ लागलो आहोत. खतांसंबंधीच्या चुकीच्या धोरणामुळे जमिनीतील स्फुरद, पालाश आणि शेकडो वर्षांत मातीत साठलेली सूक्ष्म पोषण द्रव्ये यांच्यात घट होऊन, त्या क्षीण होत चालल्या आहेत. सिंचनाच्या लघु, मध्यम आणि मोठ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये काही प्रगती होत असेल, तर ती अत्यंत धीमी आहे. शेतीमालाच्या आधारभूत किमती आणि (सक्तीच्या) वसुली किमती ही राजकीय लोकप्रियता मिळविण्याची आणि अन्नधान्याच्या आयातातील हितसंबंध जोपासण्याची केवळ साधने झाली आहेत.

दक्षिणेतील लोक आता भाताऐवजी गव्हाचे पदार्थ खाऊ लागले आहेत, असा दावा सरकार करीत असले, तरी प्रत्यक्षात दक्षिणेतील राज्यातील लोक अजूनही भातखाऊच आहेत आणि तेथील स्वस्त धान्य दुकानांतील गव्हाचा उठाव सातत्याने कमी होत चालला आहे आणि तांदुळाच्या उत्पादनातील जी काही अल्पस्वल्प बचत (surplus) आहे त्याला नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशातून होणारी मागणी नगण्य आहे. हिंदुस्थानच्या उर्वरित भागात, लोकांच्या उत्पन्नातील वाढीमुळे त्यांच्या खाण्यापिण्यात विविधता आली असून, त्यांच्या जेवणात मांस-मटन, मासे, दूध, दुग्धजन्य पदार्थ आणि फळे यांचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे.

हिंदुस्थान सरकारची आर्थिक धोरणे सुखवस्तू ग्राहकवर्गाच्या हाती अधिकाधिक पैसे देतात. परिणामी वाढलेली त्यांची क्रयशक्ती महागाईच्या आगीत तेल ओतते. उलटपक्षी, लोकसंख्येतील अन्नधान्याचे उत्पादन करणाऱ्या घटकांना बाजारपेठेतील अन्नधान्याच्या किमती तत्काळ पडणे आणि कालांतराने त्यांचे उत्पादन व पुरवठा घटणे असा दुहेरी परिणाम करणाऱ्या प्रतिकूल सरकारी हस्तक्षेपांना तोंड द्यावे लागते.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचे कर्तृत्वाच्या पताका फडकवण्याचे कार्यक्रम, विशेषतः राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि सहावा वेतन आयोग ही सरकार ज्या पद्धतीने रंगसफेतीचा आणि सुखवस्तू उपभोक्त्यांची क्रयशक्ती वाढवण्याचा व समाजाच्या उत्पादक घटकांची गळचेपी करण्याचा खटाटोप चालूच ठेवत आहे, त्याची उदाहरणे आहेत.

२००५ सालाच्या सुमारास स्वयंसेवी संघटनांच्या चर्चासत्रांमधून ‘अन्नसुरक्षा’ या विषयावर चर्चा करण्यात काही अर्थ उरला आहे का, याबद्दल बुद्धिजीवी लोक

शंका व्यक्त करू लागले. त्यातल्या त्यात प्रभावी स्वयंसेवी संघटना युक्तिवाद करू लागल्या आहेत, की या विषयावर चर्चा करणे सयुक्तिकच आहे, फक्त 'अन्नसुरक्षा' म्हणताना त्यात फक्त अन्नाची प्रत्यक्ष उपलब्धता एवढेच न धरता, जनसामान्यांची क्रयशक्ती, इंधन व पाणी यांची उपलब्धता, साक्षरतेचा प्रसार आणि अगदी महिलांचे सक्षमीकरण या बाबीही लक्षात घेतल्या पाहिजेत. ४० आणि ५० च्या दशकांत 'अन्नाचा तुटवडा' हे गंभीर संकट होते, ते आता तसे राहिले नाही, हे स्पष्ट आहे.

अचानक, गंभीर चर्चांमधील हा सुसंस्कृतपणा तडिपार झाला आहे. अन्नअसुरक्षितता, तुटवड्याची शक्यता, मोठ्या प्रमाणावर उपासमार आणि दुष्काळ हाताच्या अंतरावर येऊन ठेपलेली दु:स्वप्ने वाटू लागली आहेत. आठवड्याच्या आठवड्याला ७.४१% दराने वाढणाऱ्या महागाईने लोकानुरंजनी 'आम आदमी' अर्थशास्त्र किमती स्थिर राखणे आणि विकास या दोहोंशी विसंगत असल्याचा संपुआ गोटाला साक्षात्कार झाला आहे. तरीही, 'इंडिया शायनिंग'कडे आता दुर्लक्ष करून चालणार नाही याबद्दल अंधुकसेही भान त्यांना आले असावे असे वाटत नाही.

संपुआच्या डाव्या समर्थकांकडे महागाईवर उपाययोजना करण्यासाठी देण्यासारखा सल्ला ठराविक ठोकळेबाज सल्ला देण्यासारखा आहे :

निर्यातबंदी करा आणि स्वस्त आयातीला मुक्तद्वार ठेवा;

स्थानिक शेतीमालाचे बाजार पाडा आणि व्यापारी आस्थापना व गोदामांवर धाडी घाला आणि अखेरी,

पगारदारांची मिळकत वाढवा.

मागच्या दोन आठवड्यांत सरकारने हे सर्व उपाय योजून पाहिले आहेत. पण, महागाईने त्यांना काही दाद दिली नाही. पूर्वी श्रीमती इंदिरा गांधींनी प्रयत्न केला होता, त्याचप्रमाणे संपुआ सरकार अन्नधान्याच्या बाजारपेठेचे राष्ट्रीयीकरण करण्याचा अधिकृतपणे विचार करत आहे. सरकार सर्वांगीण विकासाची 'आम आदमी' सरंचना स्थापित करीत आहे असे दिसत आहे; त्यामुळे-

(१) नावाला 'किमान आधारभूत किंमत; पण प्रत्यक्षात शेतकऱ्याला मिळू शकणाऱ्या जास्तीत जास्त किमतीची शिफारस करणारा 'कृषी उत्पादनखर्च व किंमत आयोग'.

(२) शेतीमालाचे बाजारभाव पाडण्यास कारणीभूत होणाऱ्या सर्व निर्बंधांचा दारूगोळा,

(३) अकार्यक्षमता आणि सांडलवंड यांचा अक्षम्य उच्चांक गाठलेले 'भारतीय

अन्नमहामंडळ (FCI)'.

(४) दारिद्र्यरेषेखालील आणि दारिद्र्यरेषेच्या वरील फारच थोड्या लोकांना लाभणारी आणि ३६ ते ५०% गळतीसाठी कुख्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था अर्थात रेशनिंग या नेहरूप्रणीत शेतकरीविरोधी धोरणांच्या संस्थांचे पुनरागमनच होणार आहे.

या उपाययोजना परिस्थिती फक्त अधिकच बिघडवणार आहेत. सरकार जाणूनबुजून डोळ्यावर पट्टी बांधून घेत आहे आणि बाजारपेठेचा फायदा डावलून चालण्याचा प्रयत्न करीत आहे; त्यामुळे आज ना उद्या ते धडपडणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

देशाला आजच्या हवालदिल अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी अगदी वेगळीच संरचना आखायला हवी :

(१) हंगामाच्या वेळी आपल्या मालाला काय भाव मिळू शकेल, याचे संकेत देणाऱ्या वायदे बाजारावरील सर्व निर्बंध हटविणे.

(२) गोदामांची यंत्रणा आणि गोदामाच्या पावत्या विनियोगाचे साधन म्हणून उपयोगात आणणारी यंत्रणा;

(३) परदेशी थेट गुंतवणूक आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूक यांना शेतीमालांच्या बाजारात मुक्तद्वार ठेवणे, ज्यामुळे सेबी (SEBI) ने औद्योगिक क्षेत्रामध्ये जो चमत्कार घडवून आणला, तसाच चमत्कार होणारा भरपूर पतपुरवठा आणि गुंतवणूक यांच्या साहाय्याने शेतीतसुद्धा घडून येईल.

दुर्दैवाने, सत्तेवर बसलेल्या राजकारण्यांत दूरदृष्टीचा अभाव असल्याने त्यांना अनेकवेळा अयशस्वी झालेल्याच योजना परत परत दिसतात आणि त्यांच्याच प्रयोगाचा ते पुन्हा पुन्हा प्रयत्न करतात. भविष्यात अधिक फायदेशीर ठरणाऱ्या कोणत्या तरी कामाची मुहूर्तमेढ रोवण्याचा साधासुधा कार्यक्रम न करता, अखेरी सरकार काहीतरी करीत आहे, अशी मतदारांची समजूत होऊ शकेल अशा बाजारपेठेच्या राष्ट्रीयीकरणासारख्या धसमुसळ्या योजना राबविण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे राजकारणी पसंत करतात. म्हणूनच, विरोधकांना शाब्दिक वादविवादात हरविण्याचा नाद सोडून, संयुक्त पुरोगामी आघाडी महागाईच्या दरातील सध्याची वाढ ही चुकांची अंतरिम दुरुस्ती करण्याची संधी मानतील अशी आशा निर्माण होण्याची शक्यता नसल्यातच जमा आहे.

*(मूळ इंग्रजीवरून भाषांतरित)*

*(२१ एप्रिल २००८)*

◆◆

# वित्तमंत्री आणि कर्जमाफीची 'डांबरी बाहुली'

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या समस्येला केंद्रीय वित्तमंत्री पी. चिदम्बरम् जेव्हा जेव्हा हात लावतात, तेव्हा तेव्हा ते त्यात अधिकाधिक अडकत जातात, त्यातून ते स्वतःला सोडवू शकत नाहीत आणि ती समस्या झटकूही शकत नाहीत.

संपूर्ण शेतकरी समाजाच्या बोकांडी बसलेला कर्जबाजारीपणाचा हा ब्रह्मराक्षस मुळात उभा कसा राहिला? दशकानुदशके अधिकारावरील लोक यासाठी किफायतशीर जमीनधारणा, हवामानाचा लहरीपणा, किडीकीटकांमुळे होणारी हानी, व्याजाचे अवास्तव भरमसाट दर, शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा, शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा बिगरशेती कामांसाठी वापर, कमी उत्पादन व उत्पादकता, दारू व इतर मादक द्रव्यांचे व्यसन, शेतकरी समाजाचा निव्वळ आळशीपणा इत्यादी विविध घटकांना दोषी धरत आले आहेत. भारतीय कृषिअर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमधून शेतकऱ्यांबद्दलची ही द्वेषबुद्धी दशकानुदशके चालत आली आहे. १९९० च्या सुमारास मात्र या द्वेषबुद्धीचे पितळ उघडे पडले.

जागतिक व्यापार संघटनेकडे भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या संबंधी जी आकडेवारी सादर केली, त्यावरून भारतीय शेतकऱ्याचे दारिद्र्य आणि वर्षानुवर्षे साचत आलेल्या ज्या कर्जाच्या बोजाखाली तो भरडला जातो आहे, ते कर्ज याचा ठपका त्याच्यावर ठेवणे चुकीचे असल्याचे प्रकाशात आले. त्यासाठी आजवर शेतकऱ्याला दोष देत आलेल्या सर्व अर्थशास्त्र्यांना आणि सर्व राजकीय पक्षांना आपले शब्द मुकाटपणे गिळून कबूल करावे लागले, की एकापाठोपाठ एक सर्वच सरकारांनी शेतीमालाच्या बाजारपेठेत हस्तक्षेप करण्याची हाती असलेली सर्व हत्यारे चालवून, देशातील बाजारपेठेत शेतीमालाच्या किमती पाडण्याच्या कारवाया केल्या; त्यामुळेच

मुख्यत: शेतकरी कर्जबाजारी झाले. शेतकऱ्यांची जमीनधारणा कितीही कमी-जास्त असो, ती कशाही भूप्रकारची वा हवामानाची असो, ती कोणत्याही राज्यातील असो... सरकारच्या किमती पाडण्याच्या या धोरणामुळे शेती व्यवसाय हा कायम घाट्याचाच व्यवसाय ठरला होता. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा अगदी 'दख्खनच्या बंडा'नंतर आणि तगाई कर्जाच्या तरतुदीनंतरही चालूच राहिला. खासगी सावकारांवर कायद्याने बंदी घालून, त्यांच्या जागी सहकारी पतसंस्थांची यंत्रणा काळजीपूर्वक उभी केल्यानंतरसुद्धा शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढतच राहिला. व्यापारी बँका आणि सहकारी पतसंस्थांसारख्या अधिकृत/कायदेशीर संस्थांकडून शेतकऱ्यांना कर्ज पुरवण्याच्या प्रयत्नात ग्रामीण अर्थव्यवस्था आणखी ढासळली आणि ग्रामीण भागात तयार होणारी बचत शहरी भागाकडे खेचली जाऊ लागली. धनको संस्थेच्या भलेबुरेपणाचा आणि शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. कर्ज कोठून का मिळेना, शेतीक्षेत्राचा कर्जबाजारीपणा वाढतच राहिला.

दख्खनच्या बंडाची इंग्रजांच्या वसाहतिक सरकारने ज्या तत्परतेने दखल घेतली, त्यावरून त्या सरकारच्या ठायी शेतकऱ्यांच्या दुरवस्थेबद्दल संवेदनशीलता होती, हे स्पष्ट आहे.

स्वतंत्र भारताच्या सरकारांनी मात्र शेतकऱ्यांच्या संघटनांच्या कर्जमुक्तीच्या मागणीला - किमान १९८४ नंतर काही ठोस युक्तिवादाच्या आधारावर केलेल्या मागणीलाही धूप घातला नाही. १९८५ नंतरच्या काळात दीड लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतरच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची समस्या आणीबाणीची झाल्याचा सरकारला साक्षात्कार झाला. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे काटेकोर आणि काळजीपूर्वक विश्लेषण केले असते, तर त्या आत्महत्या सर्व जातिगटांमध्ये आणि वयोगटांमध्ये होत असल्याचे स्पष्ट झाले असते. त्यात जमीनधारकांचे प्रमाण बहुतांश होते. कितीही अनिश्चित असले, तरी भूमिहीन शेतमजुरांना ठराविक वेतनाचा आधार असतो. त्यामुळे ते, ज्यांना निसर्गाच्या लहरीपणाला तसेच राजकीय सरकारच्या जुलूमशाहीला सतत तोंड द्यावे लागते, त्या जमीनधारकांपेक्षा खचितच चांगल्या अवस्थेत असतात. त्यामुळे, आत्महत्यांमध्ये त्यांचे प्रमाण नगण्य आढळते. त्यात कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रातील विदर्भ यांसारख्या कापूस उत्पादक प्रदेशांत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या त्यांच्यावर लादलेल्या विविध पिकांवरील उणे सबसिडीशी संबंधित आहेत. त्याचा हा

निर्णायक पुरावा आहे. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून कपाशीचे पीक सर्वाधिक उणे सबसिडीची शिकार होत आले आहे. १९८६ ते १९८९ या तीन वर्षांच्या काळात कापसावरील उणे सबसिडी २०६ टक्के होती. शिवाय पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर कीटकनाशकांचा वापर, त्याचबरोबर नकली व भेसळयुक्त कीटकनाशके आणि बियाणे यांमुळे कापूस उत्पादक शेतकरी अधिकच कचाट्यात सापडले. इतके स्वच्छ दिसत असतानासुद्धा, अधिकारारूढ लोक पूर्वीप्रमाणेच या लेखाच्या सुरवातीला सांगितलेले घटक या आत्महत्यांना कारणीभूत असल्याचे घोकत राहिले. स्वातंत्र्योत्तर काळात राबविलेली शेतकरीविरोधी धोरणे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या कड्यावर लोटण्यास सरळसरळ कारणीभूत असल्याचे कबूल करणे सत्तारूढ शक्तींना शक्य होत नसावे.

आपल्यावरील कर्जे बेकायदेशीर आणि अनैतिकही आहेत, शिवाय आपल्याकडे थकीत दाखविल्या जाणाऱ्या कर्जाची एकूण रक्कम सरकारने उणे सबसिडीच्या रूपाने शेतकरी समाजाच्या केलेल्या नुकसानीच्या तुलनेत अगदी नगण्य असल्याचा दावा शेतकऱ्यांनी रास्त मार्गांनी स्पष्टपणे केला होता/करीत आहेत.

२९ फेब्रुवारी २००८ पर्यंत म्हणजे वित्तमंत्र्यांनी त्यांच्या 'कजमाफी आणि कर्जसवलत' योजनेची घोषणा केली, त्याआधी देशभरात सर्वदूर अशी अपेक्षा केली जात होती, की आगामी सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीचे हे शेवटचे अंदाजपत्रक असल्यामुळे वित्तमंत्री शेतकऱ्यांचा राग शमविणारी काही पावले उचलतील. शेतीचा अकिफायतशीरपणा, दिवाळखोरी या राष्ट्रीय घटना आहेत, त्यांचा जमीनधारणा किंवा धनको संस्थांचे स्वभावस्वरूप यांच्याशी काही संबंध नाही, याला मान्यता देणारी एखादी योजना तज्ज्ञ वित्तमंत्र्यांनी आखायला हवी होती.

कर्जदार शेतकऱ्यांत त्यांच्या जमीनधारणेवरून भेदाभेद करण्यात काहीच अर्थ नाही, तसेच धनको संस्थांच्या स्वरूपांच्या आधारावरही फरक करण्यातही अर्थ नाही. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला शेतकऱ्यांच्या दुरवस्थेची जबाबदारी स्वीकारणे परवडणार नाही, हे सत्य आहे; कारण त्याची उभारणीच १९४७ पासूनच्या काँग्रेसी सरकारांच्या सदोष पठडीच्या आधारावर झाली आहे. वित्तमंत्र्यांनी आपल्या 'कर्ज माफी आणि कर्ज सवलत' योजनेच्या प्राथमिक आराखड्यात, 'शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा अकिफायतशीर जमीनधारणा, निसर्गाचा लहरीपणा आणि खासगी सावकारांची जुलूमशाही या कारणानेच तयार झाला आहे, या काँग्रेसच्या खोट्या दाव्यालाच चिकटून राहण्याचा प्रयत्न केला आहे.

२९ फेब्रुवारी २००८ रोजी वित्तमंत्र्यांनी घोषित केलेली कर्जमाफी योजना ही

सरळसरळ काँग्रेसी सिद्धांतावर आधारलेली आहे.

वित्तमंत्र्यांच्या या कर्जमाफीच्या योजनेने सर्वदूर इतके असमाधान पसरले, की, त्याकडे काणाडोळा करणे अशक्य झाले. अगदी भारतीय सत्तेच्या मक्तेदार घराण्यातील राजकुमारांनीही या असमाधानाची नोंद घेतली आणि कुठेतरी वक्तव्य केले, की ही योजना पाच एकरांवरील शेतकऱ्यांना लागू व्हावी, या दृष्टीने तिचा फेरविचार होणे आवश्यक आहे.

अधिकारवाणीतून आलेल्या या फर्मानाकडे दुर्लक्ष करणे वित्तमंत्र्यांना न परवडणारे होते. २३ मे २००८ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर त्यांनी आपल्या 'कर्जमाफी आणि कर्जसवलत योजने'च्या विस्ताराची घोषणा केली आणि कर्जमाफीची रक्कम ६० हजार कोटींवरून ७१ हजार ६८० कोटींपर्यंत वाढवल्याचे सांगितले. या नवीन विस्तारित योजनेनुसार वेगवेगळया राज्यांतील एकूण २३७ निवडक, कोरडवाहू आणि दुष्काळप्रवण जिल्ह्यांतील सर्व म्हणजे लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांना त्यांच्या थकीत कर्जाच्या रकमेपैकी २५ टक्के किंवा वीस हजार रुपये यांपैकी जे जास्त असेल इतक्या कर्जाची सूट मिळणार आहे.

लहान, मध्यम आणि इतर जमीनधारकांमध्ये तयार केलेले द्वैत काही अंशी कमकुवत झाले, या अर्थी कर्जमाफी योजनेची विस्तारित आवृत्ती, अर्थातच, मूळ योजनेची सुधारित आवृत्ती आहे. पाच एकरांहून अधिक जमीनधारणा असलेले शेतकरी जर नशिबाने त्या दुष्काळप्रवण वगैरे निवडक जिल्ह्यांपैकी एखाद्या जिल्ह्यातील असतील, तर कर्जमाफीचा काही ना काही लाभ मिळण्यास पात्र राहतील.

तरीसुद्धा ही योजना अधिक तर्कशुद्ध आणि सुसंगत झाली आहे असे नाही. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नैसर्गिक, वातावरणविषयक घटकांमुळे तयार झालेला नाही. सरकारने जाणूनबुजून शेतीमालाचे भाव पाडण्याची धोरणे राबवली आणि शेतीला सतत तोट्याच्या व्यवसायाच्या अवस्थेत ठेवण्याचे कारस्थान केले; त्यामुळेच कर्जबाजारीपणाचा ब्रह्मराक्षस शेतीच्या डोक्यावर बसला म्हणणे अधिक योग्य आहे. निवडक जिल्ह्यांच्या यादीमुळे जितक्या समस्यांचे निराकरण होण्याची शक्यता आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त नव्या समस्या उभ्या राहणार आहेत. दक्षिणेतील बहुतेक राज्यांत जूनच्या सुरवातीलाच मॉन्सूनचा पाऊस सुरू होतो; पण त्यामुळे तेथे शेतीचा हंगाम सुरू झाला, तरी कोणा शेतकऱ्याला पीककर्ज मिळू शकेल आणि कोणाला नाही, याची अनिश्चितताच राहणार आहे. उत्तरेकडील

भागात आजकाल जो काही बिगरमोसमी पाऊस पडत आहे, त्यावरून असे वाटते, की मोसमी पाऊस त्या भागात बऱ्याच उशिरा सुरू होईल आणि त्या भागातील जिल्ह्यांची वर्णी दुष्काळप्रवणांच्या यादीत लागेल. परिणामी, दक्षिणेतील शेतकरी पीककर्ज मिळण्यासाठीच्या पात्रतेच्या अनिश्चिततेचे बळी ठरण्याची दाट शक्यता आहे.

कर्जमाफी किंवा सवलतीसाठी शेतकऱ्यांची पात्रता अजमावण्यासाठी जिल्हा हे एकक धरणे ही सरळसरळ तर्कदुष्टतेची कारवाई आहे आणि तेवढेच करण्याची केंद्रशासनाची कुवत आहे. पीकविम्याच्या योजनांमध्ये विम्याची देय रक्कम ठरविण्यासाठी जिल्हा नव्हेच, अगदी गटसुद्धा प्रचंड असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर वेगवेगळी असते. काही भागांना लघु किंवा मध्यम सिंचन प्रकल्पांचा लाभ मिळत असतो, तर काहींना नाही. 'एका जिल्ह्यातील शेतकरी समाज' हा कर्जमाफी योजनेच्या मापदंडांनुसार एकजिनसी आहे असे धरणे निव्वळ खुळचटपणाचे ठरेल.

त्याही पुढे जाऊन, या निवडक जिल्ह्यांच्या यादीत काही जिल्हे असे आहेत, की ज्यांना पाण्याच्या स्रोतांचे मोठे वरदान आहे. मग, जे जिल्हे दीर्घ काळापासून दुष्काळप्रवण आहेत, ते या यादीतून का वगळले गेले? वित्तमंत्र्यांच्या 'जिल्हा' पद्धतीमुळे जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आपापसात वाद उभे राहतील, जे सोडवणे महाकठीण होईल.

'एक खोटे लपवण्यासाठी दहा खोट्या गोष्टी रचाव्या लागतात,' असे म्हटले जाते. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेची जबाबदारी त्यांच्या पक्षांवर असण्याचा डाग झाकण्यासाठी संपुआ सरकार आणि पी. चिदंबरम आधीच आणीबाणीची झालेली परिस्थिती आणखीनच गुंतागुंतीची करीत आहेत आणि ही परिस्थिती आहे त्यापेक्षा निदान अधिक वाईट होऊ नये; यासाठी रास्त उपाययोजना आखण्याची प्रक्रिया अशक्य करण्यात गुंतले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची 'डांबराची बाहुली' हातातून फेकून देण्यास वित्तमंत्री असमर्थ ठरले आहेत, ती बाहुलीही त्यांच्या हातातून सुटू इच्छित नाही आणि त्यामुळे वित्तमंत्र्यांचे हात दिवसेंदिवस डांबराने अधिकाधिक काळवंडले जात आहेत.

*(मूळ इंग्रजीवरून रूपांतरित)*

*(६ जून २००८)*

◆◆

# महागाई आणि उंटावरील वैदू

कुविख्यात आणीबाणीच्या ३३ व्या वर्षदिनी म्हणजे २५ जून २००८ रोजी 'महागाईविरुद्ध युद्ध' सुरू करण्याच्या नावाखाली ज्या काही हालचाली होत आहेत, त्या पाहून, 'उंटाच्या पाठीवरील वैदू'च्या गुजरातमधील एका भन्नाट लोककथेची आठवण झाली.

कोणे एके काळी एक ख्यातनाम वैद्य कायम उंटाच्या पाठीवर बसून असे, तो उंटाच्या पाठीवरून कधी उतरत नसे आणि उंटालाही खाली बसू देत नसे. तो एका नामांकित गुरूचा चेला होता आणि औषधोपचार व शल्यकर्माच्या बाबतीत पंचक्रोशीत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. सभोवती बांधलेल्या भिंतींनी बंदिस्त गावात एकदा कोणत्यातरी रोगाची साथ आली; गावातले सगळेच लोक त्या रोगाने ग्रस्त झाले. अर्थातच, त्या महान वैदूला गावात बोलावण्याशिवाय चांगला पर्याय नव्हता. विद्वान वैद्यराज गावापर्यंत आले; पण गावाच्या वेशीवरच अडले. उंटाच्या पाठीवर लादलेल्या पुस्तकांच्या गठ्ठ्यांवर बसलेले वैद्यराज तसेच जाऊ शकतील इतकी काही ती वेस उंच नव्हती. उंटावरून उतरायला नको; पण उंटाच्या पाठीवरील वैद्यकी पुस्तकांचा एखादा गठ्ठा जरी खाली उतरला असता, तरी त्यांना उंटासह वेशीच्या आत जाता आले असते. पण, त्यांना आपली पुस्तके आपल्यापासून अलग करणे मान्य नव्हते आणि उंटावरून उतरायचीही त्यांची तयारी नव्हती त्यामुळे त्यांचा गावात प्रवेश होणे अशक्य होऊन बसले. मग ते विद्वान गृहस्थ एकापाठोपाठ एक सल्ले देऊ लागले. त्यांच्या सल्ल्यांप्रमाणे गावकऱ्यांनी आधी वेस तोडली, मग उंटाची मान छाटली, अखेरी पुस्तकांचे बाड उंटाच्या पाठीवरून खाली उतरवले, तेव्हाच वैद्यराज गावात प्रवेश करू शकले; तोवर साथीच्या रोगाने गावात हाहाकार माजवला होता.

२००८ सालच्या अभूतपूर्व महागाईच्या विरोधात पुकारलेल्या युद्धाच्या

सेनापतीपदावरील विद्वान डॉक्टरांनी, अखेरी, २५ जून २००८ रोजी आपले सर्व पूर्वग्रह आणि प्रतिष्ठेच्या बाबी बाजूस ठेवून, गगनाला भिडू पाहणाऱ्या किमतींनी ग्रासलेल्या देशावर उपचार सुरू केले आहेत. महागाई जेव्हा ७ ते ९ टक्क्यांच्या प्राथमिक स्तरावर होती, तेव्हा केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अगदी वरवरच्या लक्षणांवर भर देऊन भाजीपाला, फळे, कडधान्ये आणि खाद्यतेल यांच्या किमती उतरवण्याचे प्रयत्न केले आणि तेसुद्धा, पराभवाची खात्री असतानाही युद्ध पुकारणाऱ्या हूणांच्या अटीला राजासारखे. अर्थमंत्र्यांनी खाद्यतेलावरील आयातशुल्क कमी करण्याचे आदेश देऊन, त्याच्या आयातीसाठी दरवाजे सताड उघडले. खाद्यतेलाच्या निर्यातदार देशांनी खाद्यतेलावर प्रचंड निर्यातशुल्क लावले, परिणामी भारतातील उत्पादन व कमी केलेले आयातशुल्क यांपासून मिळणारा फायदाच संपुष्टात आला आणि तरीही अर्थमंत्र्यांनी आयातशुल्क कमी करण्याचा आपला निर्णय बदलला नाही. बिगर-बासमती आणि काही बासमतीसदृश जातींमधील फरक ओळखणे अत्यंत कठीण आहे हे माहीत असतानासुद्धा अर्थमंत्र्यांनी बिगर-बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली. त्यांनी अन्नधान्याचा साठा करण्यावर बंदी घातली आणि अन्नधान्याच्या गोदामांवर धाडी घालण्यासाठी पोलिसांना रान मोकळे करून दिले. व्यापाऱ्यांनी साठविलेला माल अधिक खोल भूमिगत झाला आणि किमती अधिकच भडकल्या. २००७ मध्ये अर्थमंत्र्यांनी चार शेतीमालांच्या वायदेबाजारावर बंदी घालून, त्यांच्या मूळ उत्पादकांचे म्हणजे शेतकऱ्यांचे बाजारपेठेचे स्वातंत्र्य नाकारले होते; महागाईविरोधी लढाईतील या वरवरच्या उपचारात त्यांनी आणखी चार शेतीमालांच्या वायदेबाजारांवर बंदी घातली. एवढे पुरे झाले नाही म्हणून, की काय त्यांनी वायदेबाजारावर प्रचंड प्रमाणात वस्तुविनिमय कर (Commodity Transaction Tax- CTT) लागू केला. या करामुळे वायदेबाजाराचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. या महोदयांचा वायदे बाजाराबद्दलचा आकस प्रसिद्धच आहे. शेअर बाजाराच्या बरोबरीने वायदेबाजारही आपल्या मंत्रालयाच्या अखत्यारीत आणण्याचा त्यांचा डाव मागे एकदा फसलेला आहे. वायदेबाजार विदेशी थेट आणि संस्थात्मक गुंतवणुकींच्या बाबतीत शेअर बाजाराशी स्पर्धा सुरू करील, या भीतीपोटी अर्थमंत्र्यांच्या मनात वायदेबाजाराला संपूर्ण मोकळीक देण्याबाबत पक्की अढी असल्याचेही सर्वज्ञात आहे.

महागाईच्या साथीने ग्रस्त झालेल्या गावात प्रवेश करण्याआधीही या विद्वान वैद्यराजांनी सर्वदूर उच्छाद मांडलेला होता. ज्या मालांच्या किमतीमध्ये काही वाढ झाल्याचे दिसत होते, त्या मालांचे उत्पादक निव्वळ हताश झाले होते.

मोसमी पाऊस अगदी वेळेवर होऊनसुद्धा, त्यांच्या मनात अधिक उत्पादन किंवा अधिक पिके घेण्याचा उत्साहच वाटत नव्हता. दुरवस्थेच्या टोकावर पोहोचलेल्या अशा बहुसंख्य लोकांची परिस्थिती सुधारण्यात या वैद्यराजांना काही स्वारस्य नाही, हे स्पष्ट दिसत होते आणि मग, एकाएकी महागाईच्या दराने दोन अंकांत उडी मारली आणि तो ११ टक्क्यांच्या वर पोहोचला. विशेष म्हणजे या काळात शेतीमालांच्या किमतीच्या वाढीचा दर उणे होता आणि कल्पनाशक्ती कितीही ताणली, तरी या दोन अंकी महागाईवाढीचे खापर विद्वान डॉक्टरांना कृषिखात्याच्या भारवाहू मंत्रिमहोदयांच्या माथी फोडणे असंभव होते. परिस्थिती इतकी गंभीर झाली, की आपलाच शिरच्छेद व्हावा यासाठी जनतेचा गदारोळ होईल, या भीतीने राणीसाहेब 'वैद्यराजांचा शिरच्छेद करा,' असा आदेश देतात की काय असे वाटावे.

शेवटी वैद्यराजांना आपले सगळे आकस आणि प्रतिष्ठेच्या कल्पनांना मूठमाती द्यावी लागली. महागाईचा हा जो काही दणका बसला आहे, तो प्राथमिक गरजेच्या वस्तूंच्या चढ्या किमतींमुळे नाही, तर संपुआच्या 'सर्वसमावेशक विकासा'च्या धोशाखाली सरकार शहरी ग्राहकाच्या हाती जी अफाट क्रयशक्ती ओतत आहे, ते यामागचे खरे कारण आहे, हे या विद्वान वैद्यराजांना माहीत नाही असे नाही. 'सर्वसमावेशक विकास' या डळमळीत जिन्यावरूनच राणी सिंहासनावर पोहोचली आहे आणि तिचा रोष ओढवून घ्यायला नको; म्हणूनच केवळ वित्तमंत्री या दुरवस्थेच्या मूळ कारणाचा वेध घेण्याचे जाणूनबुजून टाळत आहेत.

शेवटी, विद्वान डॉक्टरांनी चलनसंकोचाचे पारंपरिक उपाय योजण्याची सुरवात केली आहे. व्याजदर सर्वांगांनी वाढणे आणि कर्ज अधिक महाग होणे यांचे संकेत देणाऱ्या सीआरआर (Cash Reserve Ratio) आणि रेपोरेट (बँकांना दिल्या जाणाऱ्या अल्पमुदत कर्जाचा व्याज दर) यांच्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असते. त्यामुळे एखादी नवीन उपाययोजना करण्यामुळे, बँकेच्या उधारीने प्राप्त होणाऱ्या ग्राहकांच्या क्रयशक्तीवरच विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. किमतीच्या आघाडीवर नजीकच्या भविष्यात, निदान नवीन खरिपाचे पीक हाती पडेपर्यंत तरी काही सुधारणा होण्याची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. खरिपाची पिके हाती लागल्यावरच किमती थोड्याफार कमी होण्याची आशा करता येईल.

वित्तमंत्रालयाकडून आलेल्या संकेतांनुसार चलनविषयक किंवा आर्थिक धोरणाचा प्रस्ताव सध्याच्या कठीण परिस्थितीला तोंड देण्यास पुरेसा नाही असे

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी स्पष्टपणे सूचित केले आहे. श्रम मंत्रालयाने अलीकडेच ‘कामकरी वर्गाचे कौटुंबिक उत्पन्न व खर्च’ यासंबंधीच्या सर्वेक्षणाचा अहवाल जाहीर केला आहे. त्यानुसार, पगारदार आणि मजुरकरी वर्गांच्या मासिक उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या वर्गांचा कौटुंबिक अन्नधान्याचा खर्च घटत चालल्याचेही या अहवालात नोंदवले आहे. यावरून, शहरी ग्राहकाचा केवळ बँकेकडून होणारा पतपुरवठा कमी करून भागणार नाही, तर त्यांच्या उत्पन्नालासुद्धा आवर घालणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. त्याशिवाय, शेतीमालाचे भाव पाडण्याच्या उद्देशाने राबवलेली सर्व धोरणे अनाठायी असल्याचे संख्याशास्त्रीय दृष्टीने सिद्ध झाले आहे. पण, हमखास ठराविक उत्पन्न मिळविणाऱ्या गटांच्या उत्पन्नात कपात करण्याची धोरणे आखणे संयुक्त पुरोगामी आघाडीला रुचणारे नाही, कारण मग त्यांच्या ‘सर्वसमावेशक विकास’ सिद्धांताचा फुगाच फुटेल.

गावाला साथीच्या रोगातून अजूनही वाचवता येईल; पण कोडे पडते की : वेशीपाशीच अडून गावाच्या सर्वनाशाला कारणीभूत होण्याऐवजी हे विद्वान वैद्यराज सरळसरळ रोगाच्या मुळालाच हात घालून उपचार सुरू का करीत नाहीत?

*(मूळ इंग्रजीवरून अनुवादित)*

*(६ जुलै २००८)*

◆◆

# वायदेबाजाराविरुद्ध चिदम्बरम यांचे व्यक्तिगत युद्ध

वाढत्या किमतींविरुद्ध आरडाओरड टिपेला पोहोचल्याला सहा महिने होऊन गेले. या काळात, संसदेच्या दोन्ही सभागृहांत निश्चित बहुमत असूनही संयुक्त पुरोगामी आघाडीचे (संपुआ) सरकार मोठे अडचणीत सापडले आहे. त्याहीपेक्षा काँग्रेस पक्षाच्या जाणकार नेत्यांनाही महागाईच्या उधाणाबद्दल खुलासा करणे अधिक अडचणीचे झाले आहे. राष्ट्रीय सकल उत्पन्नात (GDP) उच्च दराने वाढ होत असल्याच्या दाव्यामुळे तयार झालेल्या उन्मादानंदाच्या फुग्यातील हवा भराभरा ओसरू लागली आहे. भारत-अमेरिका अणुकराराविषयी संसदेत व्हावयाच्या चर्चेच्या ऐन मोक्यावर, संपुआ सरकारला बाहेरून पाठिंबा देणाऱ्या डाव्या पक्षांनी सरकारवर महागाईच्या मुद्द्यावर झोड उठवून, सरकारला मोठ्या पेचात पकडले. स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व सरकारांनी, तुटवडा आणि महागाई यांना तोंड देण्याची वेळ आल्यानंतर जे केले, तेच नेमके मनमोहन सिंग सरकारने केले.

खाद्यतेलाच्या किमती वाढताहेत काय? मग, खाद्यतेलाची आयात करा; जरूर पडली, तर खाद्यतेलावरील आयातकर कमी करा. तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांचा उत्साहभंग झाला आणि त्यांनी जर उत्पादन घटवले, तर त्याची चिंता करण्याचे काय कारण? झालेच तर त्यांचेच नुकसान होईल आणि पुढे वाढून ठेवलेल्या परिस्थितीचा सामना भविष्यातील सरकारला करावा लागेल!

अन्नधान्याच्या किमती वाढताहेत? तांदूळ, मका, दूधपावडर आणि काय काय - शेतीमालांच्या निर्यातीवर बंदी घाला. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत शेतीमालाच्या किमती पडल्या आणि शेतकरी दुःखी झाले, तर तो उद्याचा प्रश्न आहे; आज आणि या घडीला समोर ठाकलेल्या प्रसंगातून निभावून नेणे महत्त्वाचे आहे.

वायदेबाजाराच्या माध्यमातून विकल्या जाणाऱ्या शेतीमालाच्या किमतीत विशेषकरून वाढ होते आहे काय? मग, घाला बंदी वायदेबाजारावर. संपुआच्या डाव्या मित्रांची धारणाच आहे, की बाजारपेठ हीच मुळी वाईट आहे आणि वायदेबाजार म्हणजे निव्वळ सट्टेबाजांचा अड्डाच असतो आणि महागाईचे खापर कोणाच्या डोक्यावर फोडावे याच्या शोधात असलेल्या 'आम आदमी'चे सान्त्वन करण्यास ही घोषणा प्रभावी ठरते. स्वतः संपुआ सरकारने स्थापन केलेल्या समितीने जरी म्हटले, की वस्तूंच्या किमतीतील वाढ किंवा अस्थिरता आणि वायदेबाजार यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही, तरी काय फरक पडतो? घाला वायदेबाजारावर बंदी.

सरकारने याआधीच कडधान्ये, गहू अणि तांदूळ यांच्या वायदेबाजारावर बंदी घातली आहे. आता त्याने बटाटा, रबर, रिफाइंड सोयातेल आणि हरभरा यांच्याही वायदेबाजारावर बंदी घातली आहे. आधीच, बाजारातील मंदीमुळे बटाटा आणि रबर उत्पादक शेतकरी वैफल्यग्रस्त झालेले आहेत, अगदी संघर्षाच्या पवित्र्यात आहेत; नेमके याच वेळी सरकारने त्यांच्या वायदेबाजारावर बंदी घातली आहे. एवढ्यावर न थांबता, सरकारने वायदेबाजारातील प्रत्येक एक लाख रुपयांच्या व्यवहारावर १७ रुपयांचा उलाढाल कर (CTT) लागू करून, वायदेबाजार नेस्तनाबूत करण्याचा आपला मनसुबा उघड केला आहे.

साहजिकच, शेतीमालाच्या वायदेबाजारातील व्यापारव्यवहार थंडावत चालले आहेत. शेतीमालाच्या वायदेबाजारावर वरवंटा फिरवण्याचा संपुआ सरकारने चंग बांधला आहे, हे आता उघड झाले आहे. काँग्रेसच्या समाजवादी अर्थव्यवस्थेने वायदेबाजाराला निश्चेतनावस्थेत जाण्यास भाग पाडले, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने वायदेबाजाराला त्या अवस्थेतून बाहेर काढून, त्याचे पुनरुज्जीवन केले, हे वास्तव संपुआ सरकारने आनंदाने कधी स्वीकारलेच नाही.

तज्ज्ञांनी वायदेबाजाराचा स्पष्ट पुरस्कार केला म्हणून काय झाले? राजकारणात मूठभर तज्ज्ञांना विचारतो कोण? राजकारणात झुंडीच्या मताला महत्त्व आले आहे. पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री तसेच नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष या सर्वांचा कल वायदेबाजाराच्या बाजूने आहे, वित्तमंत्री मात्र वायदेबाजाराला जमीनदोस्त करणे हा आपल्या व्यक्तिगत विषयपत्रिकेतील मुद्दा मानतात. संसदेचा आखाडा सोडून, ४ मे २००८ रोजी, 'जर का सर्वसाधारण लोकांचे मत वायदेबाजाराच्या विरोधात असेल, तर सरकार त्याकडे दुर्लक्ष करणार नाही,' असे विधान संसदेबाहेर करणे त्यांना सोयीस्कर वाटले. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू

असताना, त्यांनी हे विधान दूर स्पेनमधील माद्रिद येथे केले. संसदेचे कामकाज सुरू असताना मंत्र्यांनी संसदेबाहेर धोरणात्मक घोषणा करणे या सदरात वित्तमंत्र्यांची ही कृती मोडते. संसदेच्या विशेषाधिकाराचा हा सरळसरळ भंग आहे. त्यांच्या कृतीबद्दल संसदेत मांडलेला हक्कभंग प्रस्ताव गुंडाळण्यात वित्तमंत्री यशस्वी झाले. परिणामी, संसदेला धाब्यावर बसवण्यासाठी ते अजून निर्भीड झाले.

२० मे २००८ रोजी २००८-२००९ च्या अर्थसंकल्पातील चर्चेला उत्तर देताना जगभरातील अनेक देशांत वायदेबाजारावर उलाढाल कर (CTT) असल्याचे आणि हा उलाढाल कर जवळजवळ शेअर बाजारातील उलाढाल करासारखाच (STT) असल्याचा दावा करीत, त्यांनी भारतात वायदेबाजारावर लादलेल्या उलाढाल करावरील टीकेला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

संसदेतील, शेतकऱ्यांच्या नेत्यांच्या दृष्टीने ही बाब तशीच वाऱ्यावर सोडून देण्यासारखी नव्हती. त्यांनी जगभरातील वायदेबाजारांशी मोठ्या परिश्रमाने संपर्क साधून, त्यांच्याकडे अशा प्रकारचा काही उलाढाल कर किंवा तशा स्वरूपाची काही वसुली केली जाते काय, याची चौकशी केली आणि त्यांच्याकडून तशी लेखी उत्तरे मिळवली. या माहितीतून निघालेला निष्कर्ष मोठा धक्कादायक आहे. उलाढाल करासारखी वसुली असणारे एकच उदाहरण अख्ख्या जगात सापडले आणि तेही छोटेखानी तैवानचे. तेथेही तायफेक्स (TAIFEX) या शेअर बाजारात विकल्या जाणाऱ्या फक्त सोन्यावर अशा तऱ्हेचा उलाढाल कर आहे आणि तोसुद्धा एक लाख रुपयांच्या उलाढालीवर फक्त १९ पैसे इतकाच आहे; भारतात मात्र चिदम्बरम एक लाख रुपयांच्या उलाढालीवर १७ रुपये कर लावण्याची बाजू लढवत आहेत.

लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे भारतात सोन्याच्या ज्या खरेदीविक्री रोख्याचा (ETF) व्यवहार शेअर बाजारामार्फत होतो, त्यावर कोणताही उलाढाल कर नाही. आश्चर्याची गोष्ट अशी, की भारतात आता वायदेबाजारात खरेदीविक्री होणाऱ्या सोन्यावर उलाढाल कर असेल; पण शेअर बाजारात सोन्याच्या संबंधातील रोख्यांचे व्यवहार मात्र करमुक्त असतील.

जगातील २५ मोठ्या वायदेबाजारांमध्ये मिळून, जगातील सर्व वायदेबाजारांतील उलाढातील ९९.९९% उलाढाल होते आणि तेथे कोणत्याही स्वरूपाचा उलाढाल कर (CTT) नाही. काही युरोपीय देशांमध्ये जो काही कर आकारला जातो, तो त्या बाजारांनी पुरवलेल्या सेवांसाठी वर्धितमूल्य कराच्या (VAT) धर्तीचा असतो.

वित्तमंत्री त्यांचे स्वत:चे आणि त्यांच्या पक्षाचे जे काही वजन आहे, त्याच्या

आधाराने संसदेच्या सभागृहाची जाणीवपूर्वक दिशाभूल करून, हक्कभंगाचा प्रस्ताव धुडकावून लावण्यात यशस्वी होतीलही, कदाचित.

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच डॉ. मनमोहन सिंगांनी 'संपूर्ण देश कारखानदारी माल आणि शेतीमाल या दोहोंचीही एकमय बाजारपेठ बनवण्याचे' मनोरथ मांडले होते. वित्तमंत्री, बाजारपेठेच्या सर्व प्रकारांना विरोध करण्याची आण घेतलेल्या घटकांच्या प्रभावाखाली वायदेबाजाराला झिडकारून टाकीत आहेत, संसदेच्या सभागृहांचे कामकाज सुरू असताना संसदेबाहेर दूर माद्रिदसारख्या ठिकाणी धोरणात्मक घोषणा करून, संसदेला धाब्यावर बसवतात आणि वायदेबाजाराच्या संबंधात संसदेला धादांत खोटी माहिती पुरवतात, हे पंतप्रधानांच्या त्या मनोरथांबरोबर कसे राहू शकते ?

वित्तमंत्र्यांचा बाजारपेठविरोध फारच पुढे गेला आहे आणि बऱ्याच काळापासून चालू आहे. आपल्या दूरदृष्टीच्या मनोरथापासून ढळण्याचे समर्थन करण्यासाठी 'आघाडी धर्मा'ची सबबही आता पंतप्रधानांना सांगता येणार नाही; बाजारपेठेचे वैरी आता त्यांच्या पाठीवरून उतरले आहेत. त्यांनी आता गरिबांच्या स्वयंघोषित कैवाऱ्यांच्या कर्कश कलकलाटाकडे लक्ष देण्याऐवजी आपले सगळे धारिष्ट्य गोळा करून, आपला 'आतला आवाज' ऐकावा आणि आपल्या मनोरथांच्या दिशेने पाऊल उचलावे हेच उचित ठरेल.

*(मूळ इंग्रजीवरून रूपांतरित)*

*(२१ सप्टेंबर २००८)*

◆◆

# नव्या संपुआ अर्थसंकल्पाच्या तोंडावर

नव्या संयुक्त पुरोगामी आघाडीचा पहिला अर्थसंकल्प, एका बाजूला आतंकवादाचे वादळ जमा होण्याच्या आणि दुसऱ्या बाजूला जागतिक आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर आखला जाणार आहे. या परिस्थितीतही हा अर्थसंकल्प काही भरघोस आधार देईल अशी आम आदमीची अपेक्षा असणार, हे नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट आहे. अर्थात, अशी धोरणे आखली, तर त्यांना पुरेसा आधार देतील अशी गुंतवणूक व उद्यम-उपक्रम यांना प्रोत्साहन देणारी धोरणे आखणे आवश्यक आहे. नवे संपुआ सरकार डाव्या आघाडीच्या छळापासून मुक्त झाल्यामुळे त्याला आपली धोरणे ठरविताना बराच मोकळेपणा मिळणार आहे, ही एक जमेची बाब आहे.

मागच्या अर्थसंकल्पातील चुका काढून टाकणे, ही नवा अर्थसंकल्प आखण्याची चांगली सुरवात ठरेल.

अनेक दशके भारतीय शेतीला उणे सबसिडीचा त्रास भोगावा लागला, याबद्दल आता काही वाद उरला नाही. उणे सबसिडीच्या अमलामुळे शेतकऱ्यांच्या माथी गरिबी, कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या आल्या आणि शेतीक्षेत्रात भांडवलाची चणचणही निर्माण झाली. तोट्याच्या धंद्यात गुंतवणूक करणे कोणालाच रुचत नाही. त्यामुळे, शेतीक्षेत्रात (खासगी व सार्वजनिक - दोन्ही प्रकारच्या) गुंतवणुकीचा अभाव, तर शेअर बाजार मात्र दुय्यम आणि तिय्यम दर्जाच्या क्षेत्रांतील पैशाने धष्टपुष्ट झालेला आहे, हे समजण्यासारखे आहे. शेतकऱ्यांचे बाजारपेठेचे स्वातंत्र्य तत्त्वतः मान्य करणे, हा शेतीक्षेत्रावरील उणे सबसिडी हटविण्याचा एकमेव मार्ग आहे. शेतीमालाच्या किमती पाडण्याच्या उद्देशाने राबवली जाणारी धोरणे आणि मार्ग बंद केले आणि ग्राहकाच्या व उत्पादकांच्या हितसंबंधात बळकट समतोल साधला, तर शेतकऱ्यांना बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळू शकेल. शहरी

ग्राहक अन्नधान्याच्या कमी किमतीला प्राधान्य देतो, तर ग्रामीण ग्राहकाला शेतीमालाच्या किमती अधिक हव्या असतात; कारण त्यामुळे त्याच्या उत्पन्नात वाढ होते हे पूर्णपणे ध्यानात न घेताच, आतापर्यंत किमतीविषयक धोरणे आखली गेली.

शेतीमालाचा वायदेबाजार ग्राहक आणि उत्पादक यांच्या किंमतविषयक हितसंबंधांचा समतोल सांभाळून, व्यापार करण्यावर बेतलेला असतो, एवढेच नव्हे, तर त्यामुळे शेतीमधील गुंतवणुकीच्या सुधारणेला वाव मिळतो. दुर्दैवाने, संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार, काहीही कारण नसताना, काही शेतीमालांच्या वायदेबाजारावर बंदी घालण्याचे धोरण राबवीत आले आहे. त्याही उपर, या सरकारने मागच्या वार्षिक अर्थसंकल्पात वायदेबाजारावर अवाच्या सवा उलाढाल कर (Commodity Transaction Tax) लादण्याचा प्रस्ताव मांडला होता. अजूनही प्रलंबित असलेला हा प्रस्ताव पूर्णत: आणि रोखठोकपणे रद्द केला गेला पाहिजे.

सेन कमिटी अहवाल २००८ मध्ये सुचविल्याप्रमाणे 'वायदेबाजार मंडळ विधेयक' जलदगतीने मंजूर होण्याच्या दृष्टीने आणि शेतकऱ्यांना वायदेबाजारातील व्यापारात उतरण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने पावले उचलणे आवश्यक आहे.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दरमहा २५ किलो धान्य (गहू, तांदूळ) ३ रुपये प्रति किलो दराने देण्याचे आश्वासन काँग्रेसने आपल्या लोकसभा निवडणूक २००९च्या जाहीरनाम्यात दिले आहे. यामुळे धान्य बाजारपेठेचा मोठा भाग पडेल किमतीच्या अमलाखाली राहील. भारतीय अन्नमहामंडळाचा धान्य साठवणुकीचा आणि देखभालीचा प्रतिकिलो खर्च १ रुपया ५० पैसे इतका प्रचंड असल्यामुळे, ३ रुपये किलोने धान्य द्यायचे तर वितरकांना मोठ्या प्रमाणात किंमत अनुदान देणे भाग पडेल. अर्थातच, जागतिक व्यापार संस्थेच्या सदस्य देशांचा त्याला मोठा विरोध तर होईलच, शिवाय शेतीच्या अनुदानासंबंधी भारतीय शिष्टमंडळाने या संस्थेत आजवर घेतलेल्या भूमिकेलाही बाधा येईल.

सरकारच्या शेतीविरोधी किंमत धोरणांनी शेतकऱ्यांवर कर्जबाजारीपणाची आणि आत्महत्येची पाळी आणली आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेमुळे बँकांना आपली कुंठित मालमत्ता (Non-Performing Asset) मोकळी करता आली, हे खरे; पण या योजनेने शेतीक्षेत्रातील हताशपणात काही घट झाली नाही. या कर्जमाफी योजनेला अधिक सुटसुटीत

पुस्ती जोडली पाहिजे, की ज्यामुळे त्या योजनेचा लाभ कोणाला मिळणार, कोणाला मिळणार नाही, याबद्दल 'जर-तर'चा काही संदेह राहणार नाही. हे करण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे सध्याच्या योजनेत वेगवेगळी जमीनधारणा असलेले कर्जदार शेतकरी आणि कर्ज देणाऱ्या विविध प्रकारच्या धनको संस्था यांमध्ये जे भेद केले आहेत, ते सर्व काढून टाकणे होय.

लोकसभेच्या या निवडणुकीतील काँग्रेस पक्षाच्या यशात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा मोठा वाटा आहे. प्रत्यक्षात या योजनेमुळे भ्रष्टाचाराला प्रचंड वाव मिळालाच; पण त्याहीपलीकडे शेतीतील श्रमबाजारपेठेवर त्याचा विपरीत परिणाम झाला. शिवाय, या योजनेमुळे ग्रामीण भागातील, सर्वसामान्यांमध्ये मेहनत करून पैसे कमवण्याबद्दल मोठ्या प्रमाणात अनास्था तयार झाली. काम न करताच, कमी का असेना, थोड्याफार उत्पन्नाची हमी देणाऱ्या या योजनेऐवजी ज्या लोकांना केवळ काबाडी न करता काही उद्योगव्यवसाय उभा करून, आपले जीवनमान सुधारायची इच्छा आहे, अशा लोकांना अगदी 'अक्कलखाती खर्च' म्हणून बऱ्यापैकी बीजभांडवल पुरवून, संधी देणारी योजना अधिक उपयुक्त आणि फलदायी ठरू शकेल. कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील मजुरीचे दर आणि कामाचे दिवस असे असता कामा नयेत, की ज्यामुळे ज्या क्षेत्रातील ४० टक्के लोक आधीच दुरवस्थेमुळे त्यातून सुटण्याची संधी शोधीत आहेत, त्या शेतीक्षेत्रातील मजुरांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होईल.

गतिमान औद्योगिकीकरण, विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ) आणि जागतिक तापमानवाढ यामुळे शेतीक्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाची क्रांती अपरिहार्य आहे. या परिस्थितीत, शेतीक्षेत्रात गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल असे काही मार्ग काढणे महत्त्वाचे आहे. त्याच वेळी, शेतकऱ्यांसाठी 'निर्गम धोरणा (Exit Policy)'चीही आखणी झाली पाहिजे; ज्या योगे, बाजारपेठेच्या आणि तंत्रज्ञानाच्या या नव्या युगात शेतीत आपला निभाव लागणार नाही असे वाटणाऱ्या शेतकऱ्यांना अन्य उद्योगव्यवसायात आपले नशीब अजमावण्यासाठी शेती सोडणे शक्य व्हावे आणि ज्यांच्याजवळ नव्या युगाचे आव्हान पेलण्याइतकी तंत्रज्ञानाची जाण, व्यवस्थापकीय क्षमता आणि भांडवल आहे, त्यांना - ते शेतकरी असोत की बिगरशेतकरी - शेतीक्षेत्रात उतरणे शक्य व्हावे.

*(६ जून २००९)*

◆◆

# आम आदमीचे नाव घेत नोकरशाहीला खुश करणारा अर्थसंकल्प

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दुसऱ्या कारकिर्दीतील पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे ६ जुलै २००९ रोजी बरोबर ११ वाजता प्रणव मुखर्जी – संपुआचे नवे वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्प सादर करण्यास सुरवात केली. प्रणवदा हे जुने कसलेले वित्तमंत्री आहेत. इंदिरा गांधींच्या काळातही ते वित्तमंत्री होते आणि त्यांच्या अमदानीतील शेवटचा अर्थसंकल्पही त्यांनीच सादर केलेला होता. इंदिरा गांधींच्या काळात झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबद्दल त्यांनी आपल्या भाषणात जे प्रशंसोद्‌गार काढले, ते म्हणजे केवळ स्वत:च्याच पाठीवर थाप मारून घेण्याचाच प्रकार होता.

या अर्थसंकल्पासंबंधी सर्वच जनतेच्या मोठ्या अपेक्षा होत्या. एका बाजूला जागतिक आर्थिक मंदीची लाट, त्यातून हिंदुस्थानवर ओढवलेले बेकारीचे संकट आणि काही प्रमाणामध्ये दिवाळखोरीचे संकट या सगळयांना तोंड देण्याकरिता नवीन सरकार काय औषधी शोधून काढते, यासंबंधी उत्सुकता होतीच. दुसऱ्या बाजूला २००९ सालच्या निवडणुका संपुआने जिंकल्या, त्या 'आम आदमी'च्या घोषणेने जिंकल्या. मंदीच्या लाटेवर आम आदमीचे भले करण्याचा कार्यक्रम घेतला, तर त्यामुळे सर्व अर्थव्यवस्थेमध्ये मुबलक प्रमाणात पैसा सोडला जाईल आणि त्यामुळे बाजारपेठेमध्ये गिऱ्हाइकी वस्तूंची मागणी वाढून, मंदीची लाट थोपवायला काही प्रमाणात मदत होईल असा निवडणुकीतील संपुआच्या प्रचारकांचा आग्रह होता.

प्रणवदांच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थातच मतदारांचे उतराई होण्याकरिता 'आम आदमी'च्या भल्याच्या कार्यक्रमांची लयलूट आहेच आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असो, इंदिरा आवास योजना असो, रस्ते बांधणी योजना असो, आरोग्य योजना असो – त्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा सामान्य माणसाच्या

नावाने खर्च करावयाचा या अर्थसंकल्पात दाखविण्यात आला आहे.

अशा तऱ्हेचे कार्यक्रम हाती घेतले, विशेषतः रोजगार हमीसारखे कार्यक्रम हाती घेतले, तर त्यामुळे मंदीची लाट थोपविण्यास मदत होते, हा १९३० सालच्या मंदीच्या वेळचा अनुभव आहे.

परंतु हिंदुस्थानातील परिस्थिती खूपच वेगळी आहे. येथे सर्वसामान्य माणसाच्या नावाने खर्च करण्यासाठी तिजोरीतून काढलेला पैसा सामान्य माणसाच्या हाती न जाता, तो प्रामुख्याने नोकरशहांच्या हाती जातो आणि त्यामुळे ग्राहकाच्या बाजारपेठेमध्ये उतरणाऱ्या ग्राहकाच्या हाती फारच थोडा पैसा प्रत्यक्ष येतो. कै. राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी उघड केले होते, की दिल्लीच्या खजिन्यातून गरिबाच्या नावाने बाहेर पडलेल्या एक रुपयातील जेमतेम फक्त ३५ पैसेच त्याच्यापर्यंत पोहोचतात. आता तर दिल्लीमध्ये आम आदमीच्या नावाने ६५ रुपये खर्च झाले, तर त्यातील केवळ १ रुपया आम आदमीपर्यंत पोहोचतो. नियोजन आयोगाच्या एका समितीच्या या अभ्यासाच्या आधाराने पाहिले, तर या अर्थसंकल्पात आम आदमीच्या नावाने खर्चासाठी तरतूद केलेला हा पैसा म्हणजे केवळ नोकरशाहीला खुश करण्यासाठी केलेली व्यवस्था आहे असेच म्हणायला पाहिजे.

अर्थसंकल्पाच्या दोन दिवस आधीपर्यंत साऱ्या हिंदुस्थानात पावसाचा तुटवडा होता. आज मुंबईत तरी पाऊस चालू झाला आहे, महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस पडत आहे; पण एवढ्यातच वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पाच्या दोन दिवस आधी शेतकऱ्यांची आणि साऱ्या देशाचीच जी काही मानसिक स्थिती झाली होती, तिचा विसर पडू देणे योग्य झाले नाही. वित्तमंत्र्यांनी याबाबतीत संपूर्ण काणाडोळा केला आहे.

जागतिक उष्णतामान वाढते आहे, हवामानात बदल होतो आहे. त्यामुळे पावसाळा यंदा गेल्या वर्षीपेक्षाही उशिरा चालू झाला; पुढच्या वर्षी, कदाचित, याहीपेक्षा आणखी उशिरा चालू होईल आणि जेव्हा पावसाळा चालू होईल तेव्हा ४५ अंशांच्या पलीकडेसुद्धा तापमान गेलेले असेल. नेहमीच्या ऋतुचक्राप्रमाणे जून महिन्यात जेव्हा पाऊस येतो तेव्हा जमिनीला फूल (वाफसा) येते. म्हणजे, उष्णतामान आणि पाऊस यांचे एक विशेष मिश्रण देशात वर्षानुवर्षे शेतीला मदत करीत आहे. हवामानातील बदलामुळे ही परिस्थिती बदलली, तर यापुढे आलेल्या पावसामध्येसुद्धा पेरणी करता येईल किंवा नाही याबद्दल शंकाच आहे.

कसेही झाले तरी एकूण पावसाच्या रूपाने ढगांतून पडलेले पाणी नद्यांतून समुद्रात जाणार, समुद्रातून ढग होऊन पुन्हा पाणी बरसणार या निसर्गचक्राच्या पलीकडे जाऊन, काही पाणी आणि त्याचा पुरवठा वाढविण्याची शक्यता नाही.

आता पाणी काळजीपूर्वक वापरण्याचे व नासधूस थांबविण्याचे जास्तीत जास्त कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत, हे उघड आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाहिले, तर पाण्याचा नाश सर्वांत जास्त होतो, तो बाष्पीभवनामुळे. कडक ऊन आणि कमी पाऊस अशा परिस्थितीमध्ये 'आकाशाखालील शेती' दिवसेंदिवस अशक्य होत जाईल; त्यामुळे आच्छादित शेतीला आता पर्याय नाही. आच्छादित शेतीतही आता पाटाने पाणी देणे हे शक्य होणार नाही. त्याकरिता ठिबक, तुषार किंवा धुक्याच्या स्वरूपात पिकांना पाणी देणे आवश्यक होईल. या सर्व कार्यक्रमांकरिता फार मोठ्या प्रमाणावर पैसा लागणार आहे. शेतकऱ्यांची अपेक्षा अशी होती, की वित्तमंत्री या सर्व योजनांसाठी आपल्या अर्थसंकल्पात भरघोस तरतूद करून मोसमी पावसावरील अवलंबनातून शेतीची कायमस्वरूपी सोडवणूक करतील. पण, वित्तमंत्र्यांच्या साऱ्या अर्थसंकल्पामध्ये यासंबंधीचा काही उल्लेखही नाही आणि काही तरतूदही नाही.

वित्तमंत्र्यांनी केलेल्या काही घोषणा कदाचित शेतकऱ्यांना साहाय्यकारी होऊ शकतील. वित्तमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पात शेतीकर्जावरील व्याजाचा दर ७ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर आणण्याची घोषणा केली आहे आणि तेही कर्जाची रक्कम किंवा प्रयोजन यांच्या बाबतीत भेदभाव न करता. यात काही खोडीही होऊ शकते. कदाचित, अर्थमंत्र्यांनी जाणूनबुजून तिला वाव ठेवला असावा. भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत ४ टक्क्यांपर्यंत फायदा व्हावा अशी सोय नाही, हे वास्तव आहे; मग ६ टक्के झाले, तरी कर्जावरील व्याज भरणे कसे शक्य व्हावे ? कृषी उत्पादनखर्च व मूल्यआयोग जोपर्यंत उत्पादनखर्चाच्या हिशेबात शेतीतील धोका आणि अपेक्षित फायदा हे घटक घेत नाही, तोपर्यंत उदारतेने कमी केलेल्या ६ टक्के दराने ही पीककर्जावरील व्याज भरणे अशक्य राहील.

भारतीय शेतीतील पोषणमूल्यांच्या असमतोलाची वित्तमंत्र्यांनी दखल घेतली याबद्दल त्यांना श्रेय दिले पाहिजे. खतांवरील सबसिडीबाबत खतउत्पादकांच्या विरोधाला न जुमानता, वित्तमंत्र्यांनी खतांवरील सबसिडी कारखानदारांना न देता, परस्पर शेतकऱ्यांच्या हाती सोपविण्याची नवीन पद्धत मांडली आहे, याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे.

अर्थमंत्र्यांनी हा अर्थसंकल्प मांडताना अजून एक चांगली गोष्ट केली आहे. (शेतीमालाच्या) वायदेबाजारावरील उलाढाल कराला (Commodity Transaction Tax) आणि त्यायोगे वायदेबाजारावर दबाव आणण्याच्या प्रवृत्तीला तिलांजली दिल्याची घोषणा आपल्या अर्थसंकल्पात केली.

अर्थकारणात कायम हस्तक्षेप करण्याच्या मोहाने आणि 'कधी चालू, कधी बंद' पठडीच्या धोरणांनी सरकार अर्थमंत्र्यांच्या या घोषणेत काही बदल करणार नाही अशी आशा धरणे एवढेच आपल्या हाती आहे; पण शेतकऱ्यांच्या मनात वायदेबाजाराबद्दलचा भरवसा निर्माण झाला आणि त्याचा फायदा त्याला कळू लागला, तर त्यात भाग घेण्याची स्वतःची यंत्रणा तो स्वतःच शोधून काढेल. सुदैवाने, शेतीमालाच्या वायदेबाजाराची मुक्त सुरवात झाली, तर शेतीतील गुंतवणुकीचा अभाव वेगाने दूर व्हायला सुरवात होईल.

अर्थसंकल्प सादर करण्याच्या केवळ ४८ तास आधी देशावर दाटलेली दुष्काळी परिस्थिती प्रणवदांनी नजरेआड केली. सरकारने आठवड्यापूर्वी एका रात्री अचानकपणे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ केली याकडेही त्यांनी काणाडोळा केला. कच्च्या खनिज तेलाच्या किमती वाढत असतील आणि आपल्याकडील खनिज तेलांचे स्रोत वाढवणे शक्य नसेल, तर इंधनाच्या पर्याप्त पर्यायांचा शोध घेणे निकडीचे आहे. यासाठी, पेट्रोलियममंत्री एक समिती स्थापन करतील अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली हे खरे; पण या समितीची कार्यकक्षा आणि जबाबदारी काय असेल याबद्दल त्यांनी काहीच खुलासा केला नाही.

खनिज तेलाला पर्याय म्हणून इथेनॉल (शेततेल) आणि बायोडिझेलचे उत्पादन व वापर करणे हे एक चांगले आर्थिक व पर्यावरणविषयक धोरण आहे, असे बऱ्याच राष्ट्रांत अनुभवास आले आहे. हे धोरण अमलात आणताना तीन तात्त्विक निर्णय घेणे आवश्यक आहे. इथेनॉल किंवा बायोडिझेलचे उत्पादन कोणी करावे यावर काही निर्बंध असता कामा नये, हे पहिले तत्त्व. दुसरे, पेट्रोल किंवा डिझेलमध्ये इथेनॉल किंवा बायोडिझेल किती प्रमाणात मिसळावे याचा निर्णय वाहनमालक-चालकांनी घ्यावा, सरकारने नव्हे. सरकारने फक्त वाहनमालक-चालक त्यांना योग्य वाटणाऱ्या प्रमाणात जैविक इंधन खनिज इंधनात मिसळतात ना, याकडे लक्ष द्यावे आणि तिसरी व महत्त्वाची बाब म्हणजे जैविक इंधनाची किंमत. कोणत्याही परिस्थितीत, परदेशांतून कच्चे खनिजतेल आयात करण्यात स्वारस्य असलेल्या तेल कंपन्यांकडे जैविक इंधनाची किंमत ठरविण्याचे अधिकार देणे गैर आहे. खरेतर, देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने वहिवाट मोडून, क्रांतिकारक दिशेच्या या धोरणासंबंधी काही सुस्पष्ट घोषणा करणे वित्तमंत्र्यांच्या अधिकारात निश्चित बसले असते.

प्रणव मुखर्जींनी आपल्या अर्थसंकल्पात, ज्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी अशा तीनचार किरकोळ घोषणा केल्या आहेत; पण त्यांनी त्यांना इतिहासात

स्थान देऊ शकल्या असत्या अशा दोन मोठ्या सुवर्णसंधी हुकवल्या आहेत.

प्रणव मुखर्जींनी या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने, अर्थशास्त्रामध्ये बऱ्याच काळापासून चर्चेत असलेला एक प्रश्न ऐरणीवर आणला, याबद्दलतरी निदान त्यांना श्रेय द्यावेच लागेल.

आर्थिक मंदीवर उतारा काय ? आर्थिक मंदी 'खड्डे खणा, खड्डे बुजवा' आणि 'अन्नछत्र' यांसारख्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देते की उद्योजक आणि पोशिंद्यांना प्रेरणा देते ? भारताचा येत्या दोनतीन वर्षांतील अनुभव, अगदी रिकार्डोच्या काळापासून उकल न झालेल्या या समस्येचे निःसंदिग्ध उत्तर देईल.

*(२१ जुलै २००९)*

◆◆

# विलक्षण भाववाढीचे घटित

एकीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती अभूतपूर्व पातळीवर पोहोचल्या आहेत आणि त्याच वेळी सरकार मात्र महागाईचा दर हा न्यूनतम, किंबहुना उणे असल्याचा दावा कशाच्या आधारावर करीत आहे हे कळेनासे झाले आहे. या दोन्ही गोष्टींमुळे समग्र जनतेच्या मनात असंतोष खदखदत आहे.

'महागाईचा दर' हा चालू आठवड्यातील आणि वर्षापूर्वीच्या याच आठवड्यातील किमतीच्या परिस्थितीच्या मूळ निर्देशांकांच्या आधाराने काढलेला निर्देशांक असतो.

आजचा महागाईचा दर उणे आहे याचा अर्थ आजचा 'घाऊक किंमत निर्देशांक' वर्षभरापूर्वी याच दिवशीच्या 'घाऊक किंमत निर्देशांका'पेक्षा बराच कमी आहे, एवढाच होतो.

मात्र, ग्राहकाला मोठ्या कष्टाने प्रत्यक्षात ज्या किमतीना तोंड द्यावे लागते त्या 'ग्राहक किंमत निर्देशांका'च्या प्रभावाने ठरतात.

'ग्राहक किंमत निर्देशांक' काही ठराविक मालांच्या एका आधारभूत कालखंडातील एकत्रित किमतीच्या तुलनेत आजच्या किमतीची पातळी दाखवतो.

या निर्देशांकाचे चढउतार कसे होतात याच्याशी सर्वसामान्य माणसाला काही देणेघेणे नसते, त्याच्या दृष्टीने आजघडीला आपल्या गरजा भागविण्यासाठी बाजारात प्रत्यक्षात काय किंमत मोजावी लागते, हेच महत्त्वाचे असते.

किमती मुळात बाजारातील पुरवठा आणि मागणी यांच्या प्रमाणातील अन्योन्य परिस्थितीवर ठरतात. ज्या बाजारपेठेतील किमतींचा अभ्यास केला जातो, त्या बाजारपेठेचे स्वरूप काही, किमतीचा नूर ठरवत नाही.

बाजारपेठेच्या या किंवा त्या स्वरूपानुसार किमतीचा नूर ठरतो असे मानणे म्हणजे शुद्ध खुळचटपणा ठरेल. उदाहरणार्थ, वायदेबाजारातील किमती किंवा अगदी आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती, एवढेच नव्हे तर सार्वजनिक वितरण

व्यवस्थेतील ‘स्वस्त धान्य दुकानातील किमतीसुद्धा मालाचा पुरवठा आणि मागणी यांच्या एकंदर परिस्थितीनेच ठरतील.

पुरवठा आणि मागणी यांच्या ताकदींमधील ‘ढळलेला समतोल’ साठ्याची हेराफेरी आणि किंमत यांच्यातील दुष्टचक्रास कारणीभूत होतो. या दुष्टचक्रात किमती वाढू लागल्याष्ट्ठ की बाजारपेठेच्या अर्थशास्त्राविषयी अनभिज्ञ असणारांचा असा समज होतो, की महागाई साठेबाजीमुळे वाढली आहे. अशा परिस्थितीत सट्टेबाज बाजारपेठेची – मग ती वायदेबाजाराच्या स्वरूपातील असो की शंभर टक्के रेशनिंगच्या व्यवस्थेतील असो – कोंडी करण्याचा प्रयत्न करतात.

सर्वसाधारण अनुभव आणि गृहीतही असे आहे, की बाजारपेठेतील पुरवठा आणि मागणीचा तोल ढळला, की सदा सर्वकाळ, बऱ्याच जीवनावश्यक वस्तूंच्याच किमती गगनाला भिडतात.

आज ग्राहकाला गगनाला भिडलेल्या बाजारभावांना प्रत्यक्षात सामना करावा लागत आहे. या परिस्थितीचा अन्वयार्थ कसा लावायचा? तूरडाळीची किंमत ४७.५४ टक्क्यांनी वाढली आहे. १ ऑगस्टपासूनच्या आठवडाभरातच किमती सर्वसाधारणपणे ४० टक्के इतक्या प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. किमतीतील ही शीघ्रगतीची वाढ संयुक्त पुरोगामी आघाडीच्या ‘समावेशक विकासा’च्या धोरणामुळे झाली आहे, असा माझा दावा आहे.

संयुक्त पुरोगामी आघाडी मंदीवर उतारा म्हणून वेगवेगळी पॅकेजेस, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व संपुआचे इतर कार्यक्रम यांच्या माध्यमांतून होणारी निधीची खैरात, सहाव्या वेतन आयोगाने केलेली पगारवाढ आणि अनेक प्रकल्प व धोरणे मोठ्या तडफेने पुढे रेटीत आहे आणि परिणामतः सर्वसामान्य जनतेच्या – संपुआच्या भाषेत ‘आम आदमी’च्या – हाती अनर्जित रोख रक्कम सोपवीत आहे. वर्षानुवर्षे कनिष्ठ दर्जाचे जीवनमान जगत असलेल्या आणि प्रचंड प्रमाणात वैतागलेल्या ‘आम आदमी’च्या मनी बऱ्यापैकी खर्चीक आणि आरामदायी जीवन जगण्याची आस असणार, हे सिद्ध करण्याची काही गरज नाही.

कारखान्यांतील कामगाराच्या हाती अनपेक्षितपणे वाढीव रक्कम येते, तेव्हा अधिक काळ सुटीवर जाण्याची आणि मौजमजा करण्याची त्याची प्रवृत्ती असते, हे अनेक सामाजिक सर्वेक्षणांनी आणि अभ्यासांनी दाखवून दिले आहे. मुंबई आणि सोलापूरमधील गिरणी कामगार त्यांच्या हाती बोनसची रक्कम पडताच सगळेच्या सगळे आपापल्या गावी जातात आणि बोनसची जवळजवळ सगळी रक्कम संपेपर्यंत तिकडेच राहतात.

‘आम आदमी’च्या हाती पडणाऱ्या अनर्जित जादा रकमेमुळे होणारी सामाजिक उत्पन्नामधील वाढ, असलीच तर, अगदी किरकोळ असते.

हाती वाढीव क्रयशक्ती आली आणि तीही विनाश्रम, की आजवर ज्या गोष्टी आपल्याला अपवादानेच चाखता आल्या आणि ज्या वरच्या वर्गातील लोकांना सर्रास वापरता येतात; म्हणून मनात साहजिक असूया बाळगली अशा वस्तूंच्या खरेदीला ‘आम आदमी’ प्राधान्य देतो. डाळी, खाद्यतेले, दूध, दुग्धजन्य पदार्थ, साखर यांसारख्या वस्तू नव ‘श्री’मंत आम आदमीच्या मागणीत प्राधान्याने येतात. महागाईच्या या कालखंडात ज्या वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या, त्या याच वस्तू आहेत हे लक्षात येते आणि म्हणूनच मध्यम आणि उच्च मध्यमवर्गांतील गृहिणी सध्याच्या महागाई-विरोधात तावातावाने आरडाओरड करीत आहेत.

उत्पन्नाच्या यंत्राला पुरवणी जोडणे हे ‘समावेशक विकासा’चे प्रमुख साधन आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, संपुआच्या कर्तृत्वाचे नगारे बडवणारे इतर अनेक विशेष कार्यक्रम यांद्वारे पैशांची खैरात आणि सहाव्या वेतन आयोगाने नोकरदारांच्या समोर टाकलेले प्रचंड घबाड यांचा आणखी एक परिणाम झाला आहे. या सगळ्या उचापतीमुळे कष्ट करून, पैसे कमावण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे आणि त्यामुळे शेतमजूर दुर्मिळ झाले आहेत. परिणामत: डाळी, तेलबिया, दुग्धजन्य पदार्थ या आधीच मजुरीचा खर्च अधिक असणाऱ्या उत्पादनांचा मजुरीचा खर्च अधिक वाढला, उत्पादन कमी झाले आणि म्हणून, बाजारातील त्यांच्या किमती वाढल्या.

सर्वसाधारणपणे फक्त गरिबांच्याच खाण्यात येतात अशा भरड धान्यांच्याही किमती वाढल्या आहेत, याचे कारण काय यासाठी, अर्थातच, संशोधन करायला हवे. एक अंदाज असा आहे, की वाढत्या वजनावर आणि चरबीवर ताबा ठेवण्यासाठी सुस्थितीतील लोकांची आणि तब्येतीबाबत उतारवयात जागरूक झालेल्या ज्येष्ठ नागरिकांची – ज्यांच्या लेखी किंमत ही गौण बाब आहे – या भरड धान्यांची मागणी वाढल्यामुळे त्यांच्या किमतीत वाढ झाली असावी.

थोडक्यात, सर्वसामान्यांची क्रयशक्ती कृत्रिमतेने फुगविणाऱ्या ‘समावेशक विकासा’च्या धोरणांमुळे मागणीचा रेटा प्रचंड वाढला आणि त्यामुळे मालाच्या किमती भडकल्या.

वेतन आणि भाडे यांच्या माध्यमातून ‘पुरवठा’ आपली ‘मागणी’ तयार करू शकतो; पण अंतर्बद्ध संरचना आणि उचित तंत्रज्ञान असल्याशिवाय ‘मागणी’

आपला ‘पुरवठा’ निर्माण करू शकत नाही.

‘समावेशक विकासा’च्या नावाखाली कृत्रिमरीत्या लोकांच्या हातची क्रयशक्ती वाढविणाऱ्या भारत सरकारने आणि वेगवेगळ्या राज्यसरकारांनी, त्यामुळे वाढलेल्या मागणीची पूर्तता होण्याइतका पुरवठा वाढण्याच्या दृष्टीने शेतीमालाचे उत्पादन वाढण्यास प्रोत्साहन देणे महत्त्वाचे मानून, शेतीक्षेत्रालाही पुरेसे पाठबळ द्यायला हवे होते, ते केले नाही. राष्ट्रीय नियोजन मंडळाच्या एका समितीच्या अहवालानुसार सरकारच्या तिजोरीतून ‘आम आदमी’चे हात बळकट करण्यासाठी ६५०० रुपये बाहेर पडले, तर ‘आम आदमी’च्या उत्पन्नात १०० रुपयांनी वाढ होते. या वाढीव १०० रुपयांमुळे सुमारे ७० रुपयांच्या अन्नधान्याची मागणी वाढते.

शेतीच्या आजच्या परिस्थितीत, ७० रुपये बाजारमूल्याचे धान्य पिकवायला शेतीमध्ये सुमारे २०० रुपये गुंतवावे लागतात. राष्ट्रीय नियोजन मंडळाच्या वरील समितीचा हिशेब लक्षात घेतला, तर हे २०० रुपये शेतीत पोहोचायचे, तर सरकारी खजिन्यातून १३००० रुपयांची तरतूद करायला हवी. झटपट कच्चा हिशेब केला, तरी असे म्हणता येईल, की ‘आम आदमी’चे उत्पन्न वाढविण्यासाठी खर्च केलेल्या प्रत्येक रुपयामागे, त्यामुळे वाढलेली मागणी भागविण्यासाठी शेतीउत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी किमान दोन रुपये खर्च करायला हवेत. पण, हे घडत नाही. त्यातून, उशिरा आलेल्या आणि अपुऱ्या पावसामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

निवडणुकीच्या राजकारणात ‘समावेशक विकासा’चे आमिष रामबाण ठरले आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने त्याला काही अर्थ आहे का, हे येणारा काळच ठरवील.

२००९ च्या लोकसभा निवडणुकीत यशस्वी ठरलेल्या ‘समावेशक विकासा’च्या धोरणाच्या अंमलबजावणीतील पक्षपातीपणा डाळी, तेलबिया, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ यांच्यासारखा वस्तूंच्या विलक्षण भाववाढीने उघड्यावर आणला आहे. मात्र, निवडणुकीत जिंकलेले हे ‘समावेशक विकासा’च्या धोरणांचे घोडे अर्थशास्त्राच्या मैदानावर चांगलेच ढेपाळू लागले आहेत.

*(मूळ इंग्रजीवरून स्वैर मराठीकरण)*

*(२१ ऑगस्ट २००९)*

◆◆

# अंदाजपत्रक आणि शेतीच्या समस्या

संयुक्त पुरोगामी आघाडी द्वितीय (संपुआ-२) सरकारचे पहिले संपूर्ण अंदाजपत्रक तयार करण्याची यंत्रणा कार्यरत झाली आहे. ६ जानेवारी २०१० रोजी श्री. प्रणव मुखर्जी, केंद्रीय अर्थमंत्री, शेतीमध्ये आर्थिक हितसंबंधी घटकांच्या प्रतिनिधींशी अर्थसंकल्पपूर्व चर्चा करतील.

सध्याचे दिवस दिल्लीतील अर्थमंत्र्यांसाठी फारसे चांगले आहेत असे नाही.

**जागतिक मंदी**

जागतिक मंदीच्या धक्क्यापासून भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर बचावली आहे. सरकारी धोरणांचा त्याच्याशी काही संबंध नाही; त्याचे सारे श्रेय काटकसर करून बचत करणे आणि निर्यातीतसुद्धा सुमारे २५ टक्क्यांनी घट झाली आहे. अप्रत्यक्ष करांच्या रूपाने महसुलातही या वर्षी त्याच प्रमाणात घट झाली आहे. अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये मोठे बदल करण्यास हा काळ अनुकूल निश्चित नाही. २०१० सालासाठी 'व्यापारी माल आणि सेवाकर' (GST-Goods and Service Tax) लागू करण्याचा संकल्पही सरकारला बासनात गुंडाळून ठेवावा लागेल अशी भीती आहे. वित्तीय शिस्तीच्या मर्यादांशी ताळमेळ राखणेही अर्थमंत्र्यांना अवघड जाण्याचीच शक्यता आहे.

**अंतर्गत सुरक्षा**

देशातील अंतर्गत सुरक्षेची स्थिती फारशी आनंददायी नाही. नक्षलवाद्यांविरोधी मोहीम वर्तमान अंदाजापेक्षा कितीतरी अधिक खर्चीक होणार आहे. देव न करो, पण पुन्हा आतंकवादी हल्ला झाला, तर योजनांवरील खर्चासाठी अर्थमंत्र्यांच्या हाती फारच तोकडा निधी राहील, अशी शक्यता आहे.

**हवामानबदल**

दुर्दैवाचे फेरे कमी का आहेत, नेमके याच वेळी हवामानातील बदलांनी

अनपेक्षित क्रूर रूप धारण केले आहे. २००९ च्या खरीप हंगामात मोसमी पाऊस उशिरा आल्याने किमान एक आणि अनेक प्रसंगी दोन पेरण्या वाया गेल्या. सुदैवाने, उशिरा आलेल्या पावसानंतर असाधऽरण धुवाँधार पाऊस झाला नाही. तसे झाले असते, तर सरकारी यंत्रणेची त्रेधातिरपीट उडाली असती.

तसे झाले नाही म्हणून वाया गेलेल्या बियाण्यांच्या बदली बियाणे पुरवण्याचे काम फक्त सरकारी यंत्रणेला करावे लागले. उशिरा आलेल्या मोसमी पावसानंतर जर का धुवाँधार पाऊस झाला असता, तर तशा परिस्थितीत देशातील वेगवेगळ्या कृषिविभागांसाठी पर्यायी पीकपद्धतीचा विचार करावा लागला असता. अशा प्रसंगाला तोंड देण्याच्या दृष्टीने सध्याच्या सरकारी यंत्रणेकडे काहीच सज्जता नाही.

२०१०च्या पावसाळ्यात वरुणदेवाचा काय आणि कसा कोप होईल, याची कोणालाच कल्पना नाही. कोपनहेगन हवामान परिषद बचावात्मक खेळींनीच संपली; चर्चेत हरितगृह वायूउत्सर्जनाच्या मुद्द्यावर अडसर असल्यामुळे या परिषदेत हवामानाच्या आघाडीवर काही मोठे सुधार होतील याची अपेक्षाही नव्हती.

'आकाशाखालील शेती' आणि 'निसर्गाच्या लहरीवरील शेती' यांचे दिवस संपले आहेत, हे उघड दिसते आहे. या आकस्मिक प्रसंगाबाबत युद्धपातळीवर पावले उचलण्याचा सुजाणपणा अर्थमंत्र्यांनी दाखवावा, अशी अपेक्षा करण्यात काही गैर ठरणार नाही.

**नवीन शेती**

आकाशाखालील व निसर्गाच्या कृपेवरील शेतीच्या ठिकाणी नवीन प्रकारची शेती करण्यासाठी काचगृहे, पॉलीहाऊस किंवा तत्सम व्यवस्था सज्ज करावी लागेल. ते जमत नसेल, तर हवामानाच्या सर्व अतिरेकांमध्ये तगून राहू शकेल आणि रुजण्यालायक परिस्थितीचा सुगावा लागेपर्यंत सुप्तावस्थेत राहू शकेल अशा बहुस्तरीय अवगुंठित (Multi-layer coated) बियाण्यांचा पुरवठा करण्याची व्यवस्था करावी लागेल. बहुस्तरीय अवगुंठित बियाण्याचे तंत्रज्ञान तसे फार महाग नाही; पण प्रश्न असा आहे, की अशी झेप घेण्याची अर्थमंत्र्यांची इच्छा असेल का?

**रासायनिक खते व पेट्रोलियम अनुदाने**

दशकानुदशके रासायनिक खते व पेट्रोलियम पदार्थ यांच्यासाठी दिली जाणारी अनुदाने म्हणजे सरकारी खजिन्यावरील भारी बोजा ठरला आहे. मागच्या वेळी,

लोकसभा निवडणुकींनंतर आपले पहिले अंदाजपत्रक सादर करताना प्रणव मुखर्जींनी खतांवरील अनुदानाच्या पद्धतीत सुधार करण्याची योजना मांडण्याचे आश्वासन दिले होते. त्यांच्या सुधारित योजनेचे फायदे परस्पर शेतकऱ्यांच्याच हाती पडतील असे त्यांनी म्हटले होते. अजूनतरी सरकारने त्यादृष्टीने पावले उचलल्याचे ऐकिवात नाही आणि नवीन अर्थसंकल्प सादर होण्याच्या दिवसापर्यंत अशी काही योजना प्रत्यक्षात येणे केवळ असंभव आहे.

अर्थमंत्र्यांनी पेट्रोलियम कंपूमध्ये मुसंडी मारण्याचे धाडस गोळा केले, तर पेट्रोलियम अनुदानांच्या खर्चातही चांगल्यापैकी कपात करता येईल.

दुर्दैवाने, पेट्रोलियम अनुदानाची समस्या आणि जैविक इंधनाचे उत्पादन यांच्याकडे दोन वेगवेगळ्या आणि विभक्त बाबी म्हणून पाहिले जाते. अलीकडेच सरकारने जेव्हा 'साखर नियंत्रण आदेशा'मध्ये दुरुस्ती जाहीर केली, तेव्हा सरकारने जैविक इंधनांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची मौलिक संधी गमावली. जैविक इंधनाचे उत्पादन करून, देशातील पेट्रोलियमची किमान ३० टक्के गरज भागवण्याची आणि पर्यायाने खनिज तेलाच्या आयातीची गरज पर्यायाने क्षमता भारताकडे आहे.

**कर्जमाफी योजना**

केंद्रशासनाच्या कर्जमाफी योजनेचा संपुआला २००९ च्या निवडणुकांत चांगला फायदा झाला असता, तरी मोठ्या प्रमाणावरील शेतकऱ्यांना या योजनेचा वाराही लागला नाही, हे आता काही गुपित राहिलेले नाही. या योजनेतून शेतकरी समाजाला प्रत्यक्षात किती लाभ झाला आहे, याचा वस्तुनिष्ठ आणि सर्वंकष आढावा घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांच्या संघटना सातत्याने करीत आहेत. या विषयात सरकारने सखोल अभ्यास करावा, ही एक चांगली कल्पना आहे. त्याचे पहिले पाऊल म्हणजे ही कर्जमाफी योजना तपशीलवार आणि काटेकोर अशा संगणकीय आज्ञावलीमध्ये (Computer Software) रूपांतरित करणे आणि त्यानंतर कर्जमाफी योजनेच्या लाभधारक शेतकऱ्यांची विगतवारी करून, त्यांतील काही नमुने अभ्यासासाठी घ्यावे. त्या नमुन्यांतील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा प्रत्यक्षात मिळालेला लाभ आणि वरील संगणकीय हवा असलेला लाभ यांची तुलना करणे.

**शेतीमालाच्या किमती**

शेतीमालांच्या वाढत्या किमती हे संपुआ सरकारसमोर उभे ठाकलेले आव्हान आहे आणि म्हणून अर्थमंत्र्यांना या वाढत्या किमतीबद्दल जास्त चिंता आहे. अन्नधान्याच्या तुटवड्याचे खापर कृषिमंत्री दुष्काळाच्या माथी मारू पाहत आहेत;


पण ते बिलकूल खरे नाही. कांदे आणि बटाटे यांच्या संबंधाची बाजारातील ताजी आकडेवारी पाहिली, तर या मालाचा बाजारात समाधानकारक – गरजेहून अधिक पुरवठा असूनसुद्धा त्यांच्या किमतीत वाढ होणे चालूच आहे. त्यावरून, कृषिमंत्र्यांचा दावा खोटा असल्याचे स्पष्ट होते असे लक्षात येईल.

संपुआ सरकारने उत्पादक घटकांना आनुषंगिक चालना न देताच, 'सर्वसमावेशक विकासा'च्या नावाखाली अनर्जित पैसा लोकांच्या हाती देऊन, बाजारातील एकूण मागणी फुगवली हेच खरे तर अन्नधान्याचा महागाईचे कारण आहे. संपुआच्या अर्थमंत्र्यांची हे कबूल करण्यात अर्थातच पंचाईत होईल. 'आम आदमी'ने संपुआला राजकीय घबाड मिळवून दिले. त्यामुळे साहजिकच आता 'आम आदमी'चे भजन बंद करणे संपुआच्या नेत्यांना अवघडच वाटणार.

आजच्या अर्थमंत्र्यांचे पूर्वज सध्या नक्षलवाद्यांचा पाठलाग करण्यात व्यग्र आहेत. त्यांचे वारस म्हणजे वर्तमान अर्थमंत्री यांच्यावर अर्थसंकल्प सादर करताना, मुळात त्यांनी न मांडलेल्या भूमिकांचे समर्थन करण्याची जबाबदारी पडणार आहे.

*(६ जानेवारी २०१०)*

◆◆◆



गॅट करारावर सही करताना शासनाने शेतीवर दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांची उलटी पट्टी म्हणजे कर लावला याचा कबुलीजबाब जगाच्या भर दरबारात दिला आहे.

सगळ्या अर्थशास्त्रज्ञांत या उणे सबसिडीच्या प्रश्नाबाबत मौन पाळण्याचे एक मोठे कारस्थान शिजले असावे. उणे सबसिडीबद्दल बोलणे त्यांना रुचत नाही, पचत नाही. सबसिडी मान्य केली की आयुष्यभर त्यांनी मांडलेले अर्थशास्त्र खोटे होते याचा कबुलीजबाब द्यावा लागतो. इतकी वर्षे आपण शेतीसंबंधी बोललो, इतके लिहिले, जगभर मान्यता मिळवली, भरपूर कमाईही केली; हे सगळे करताना आपण जे बोललो ते अडाणीपणाने तरी होते किंवा अज्ञानाने तरी किंवा खऱ्या परिस्थितीचा अंदाज असूनही अप्रामाणिक भामटेपणाने लिहिले होते असा कबुलीजबाब देण्याची किमान सचोटीही अर्थशास्त्रज्ञांत नाही म्हणून त्यांनी 'मौनम् सर्वार्थ साधनम्'चा आधार घेतला आहे.

- शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

₹ १५०